# एक होती रेशीमनगरी

गोपाळ वामन टोकेकर



# प्रस्तावना

मानवनिर्मित कृत्रिम धागानिर्मितीचा भारतातील पहिला कारखाना म्हणजे कल्याणजवळील मोहोने येथील नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन (एन.आर.सी.). एनआरसीच्या मुंबईतील मुख्य कार्यालयात माझी युनियन होती. १९७२ साली मोहोने कारखान्यातील कर्मचारी सुद्धा माझ्याकडे आले आणि कारखान्यात माझी युनियन आणण्याची विनंती केली. कारखान्यात त्यावेळी कोणाचीच युनियन नसल्यामुळे कामगारांची अवस्था निर्नायकी झाली होती. मी एकंदर परिस्थिती लक्षात घेतली. कंपनी व्यवस्थित चालायची असेल आणि कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळायला हवा असेल तर तिथे आपली युनियन सुरू केली पाहिजे असे माझे मत बनले. त्याप्रमाणे आम्ही तिथे युनियन सुरू केली. या युनियनचा मी अध्यक्ष होतो आणि ट्रान्सपोर्ट ॲण्ड डॉक वर्कर्स युनियन या मुंबईच्या गोदीतील युनियनमधले माझे सहकारी श्री. बी. मोहनराव सरचिटणीस बनले.

त्याच सुमारास कंपनीचे मालक चिनाई यांनी कंपनी कपाडिया यांना विकली त्यामुळे माझा व कपाडिया यांचा कंपनीतील प्रवेश जवळजवळ एकदमच झाला. त्यावेळी भरपूर नफा असूनही कंपनीतील वेतनमान फारच कमी होते. पदवीधरालासुद्धा ३०० रुपयाच्या आसपास पगार मिळत असे, वेगवेगळ्या थरातील कामगारांच्या कामाचे स्वरुप आणि त्यांना मिळणारे वेतन यांचा अभ्यास करून आम्ही कंपनीला मागण्या सादर केल्या आणि कंपनीनेही त्या मान्य केल्यामुळे कामगारांच्या पगारात भरघोस वाढ झाली आणि सर्व कामगारांचे जीवनमान उंचावले. या कामगिरीपेक्षाही त्या काळात कंपनी वाचविण्याची कामगिरी मी करू शकलो हे मला विशेष महत्त्वाचे वाटते.

कंपनीतील अधिकाऱ्यांची ऑफिसर्स गिल्डही आम्ही स्थापन केली. त्यावेळी नवल टाटा कंपनीचे चेअरमन होते. बाहेरचा माणूस युनियन कशी स्थापन करू शकतो असा प्रश्न कोणीतरी उपस्थित केला तेव्हा 'महात्मा गांधी काँग्रेसचे चार आण्याचे सभासदसुद्धा नव्हते तरी ते काँग्रेसचे नेते होते' असे प्रत्युत्तर टाटा यांनी दिले.

ऊठसूठ संप, आंदोलन करणे, अवास्तव, अवाजवी मागण्या करणे हे आमचे धोरण कधीच नव्हते. संप केला तरी तो कधी मागे घ्यायचा हे ठरवूनच, असे माझे धोरण असते. कारण कंपनी जगली तर कामगार जगेल हे आमचे तत्व आहे. कामगार नेत्याने तात्कालिक फायद्यापेक्षा दूरगामी हिताचा विचार केला पाहिजे असे

मी मानतो.

मात्र कपडे बदलल्यासारखी युनियन बदलण्याची कामगारांची प्रवृत्ती आणि कामगार चळवळीत शिरलेली गुंडगिरी यामुळे आमची युनियन कंपनीत फार काळ टिकू शकली नाही. कामगार संघटना निवडण्यासाठी झालेल्या निवडणूकीत आमच्या युनियनचा पराभव झाला. 'आम्हाला निवडून दिले नाहीत तर तुमचे कुंकू पुसून टाकू' अशा धमक्या कामगारांच्या बायकांना कॉलनीत जाऊन प्रतिस्पर्धी युनियनच्या कार्यकर्त्यांनी दिल्या, असे म्हटले जाते. तरीही मी आमचा पराभव मोकळेपणाने मान्य केला.

लेखक श्री. गो. वा. टोकेकर हे त्यावेळी एनआरसी वसाहतीतील शाळेचे प्राचार्य होते. त्यांनी भरपूर अभ्यास करून हे पुस्तक लिहिले आहे. त्यावेळी कंपनीत घडत असलेल्या घटनांची त्यांनी सूक्ष्म दृष्टीने नोंद घेतली आहेच, शिवाय समाजात तेव्हा घडत असलेल्या महत्त्वाच्या घटनांचेही त्यांनी मार्मिक वर्णन केले आहे.

एनआरसी परिवारासाठी ही इतिहास सांगणारी कादंबरी महत्त्वाची आहेच, पण एखाद्या उत्तम चाललेल्या उद्योगाची कशी वाताहात होते याचे चक्षुर्वैसत्यम चित्रण यात असल्यामुळे अभ्यासूंसाठीसुद्धा ती उपयुक्त आहे. श्री. टोकेकर यांचे त्यासाठी खास अभिनंदन!

श्री. टोकेकर, युनियनच्या कामात रस घेत. युनियनच्या सभा, बैठकांना ते नियमित येत, त्यामुळे प्रस्तावना लिहिण्याची त्यांनी विनंती केल्यानंतर मी ती लगेच मान्य केली. त्यांच्यामुळे कादंबरीला प्रस्तावना लिहिण्याची संधी मला मिळाली, नाहीतर ती मिळायला मी काही ललित लेखक नाही.

श्री. टोकेकर यांचे पुन्हा एकवार अभिनंदन व त्यांना हार्दिक शुभेच्छा!

**एस. आर. कुळकर्णी**

# माझी भूमिका

कल्याणजवळील एनआरसीचा प्रचंड उद्योग गेली दोन वर्षे बंद होत असल्याच्या बातम्या येत आहेत. ६४ वर्षे या उद्योगाने अनेक चढउतार पाहिले. मी स्वतः तीन दशके ह्या कंपनीत नोकरीस होतो. तीन भाषामाध्यमातून चालणाऱ्या इथल्या प्रचंड विद्यालयात हजारो विद्यार्थी व शेकडो शिक्षक होते, तिथे काही काळ मी प्राचार्यही झालो. त्याच बरोबर 'रेयॉन न्यूज' ह्या इंग्रजी, मराठी, गुजराती व हिंदी भाषेत दरमहा प्रकाशित होणाऱ्या मासिकाचा संपादकही होतो. ह्या दोन्ही नात्याने कंपनीतील अनेक जबाबदार व्यक्तींशी माझा जवळून परिचय झाला होता.

एनआरसी सारखी कंपनी बंद पडणे म्हणजे अनेकांचे संसार उध्वस्त होणे स्वाभाविक होते. हे असे का व्हावे, याचा मनाला सहाजिक प्रश्न पडत होता. उत्तम प्रशासक, उत्तम तंत्रज्ञ, कुशल कामगार, कर्तबगार अधिकारी असे सगळे असताना उद्योग बंद पडतो तो केवळ मालक-कामगार संघर्षामुळे नाही. त्यामागची कारणे शोधली पाहिजेत. प्रश्न फक्त ह्या उद्योगाचा नाही, सूत गिरण्यांपासून ह्या पडझडीला सुरुवात झाली. व्यवस्थापनाचा तात्पुरता दृष्टिकोन, उद्योग बंद करून अधिक फायद्याची शक्यता, स्वार्थी होयबा अधिकाऱ्यांचे संगनमत आणि मुख्यतः शासनाचा ह्या सर्व चोरट्या व्यवहारास पाठिंबा ही मुख्य कारणे असू शकतात. मला एनआरसीचा इतिहास लिहायचा नव्हता, तो लिहिणे माझ्या आवाक्या बाहेरचेही होते, जुने पुरावे नष्ट झालेले, जुनी माणसे काळाआड गेलेली, त्यातून कोणी देश विदेशात स्थिरावलेले, त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेणं मला वाढत्या वयातील दुर्बलतेमुळे अशक्य. तेव्हा आहे त्या माहितीचा उपयोग एक ऐतिहासिक कादंबरी लिहायला पुरेसा आहे असे वाटले. त्यात एक दिवस माझ्या मुलाने श्री. मश्रुवाला यांची एक ई-मेल दाखवली. त्यात पान- दोन पानात मला उत्तेजन देणारे खूप होते.

मी इतिहासातील घटनांची नोंद घेऊ लागलो. १९४६ ते १९५० उत्पादन सुरू होईपर्यंतच्या लेखनास मला देशाची, महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक परिस्थितींचा वापर करणे भाग होते, त्याचाही मला अभ्यास करावा लागला. 'रेयॉन न्यूज'चे जुने अंक कै. वि.ग. नवरे यांचे संग्रही होते. त्यांचे चिरंजीव डॉ. अनिष यांनी तत्परतेने ते मला दिले.

एका झपाटल्या अवस्थेत मी तीन महिने त्या सुदिन-सुर्दिनात जगत होतो, ते नवीन उभे करत होतो. कादंबरीचा नेहमी मान्य असलेला आकृतिबंद येथे नाही. कादंबरीत कथानकाला पूरक नायक, नायिका, खलनायक, खलनायिका, नैसर्गिक

संकटे, गूढ रहस्ये, प्रेम प्रकरणे नाहीत. संघर्ष तर कोणत्याही कथेचा आत्मा असतो. तो ह्यात आहे. म्हणून जिवंत चित्र उभे करू शकतो असे वाटते, वाचकांना ते रुचल्यास अधिक आनंद. एका रासायनिक उद्योगासंबंधी लिहितांना, तांत्रिक बाजू महत्त्वाची असते, माझे मित्र श्री. रत्नाकर आंबेकर यांनी ह्या कामी फार मोलाचे सहकार्य केले.

अंतर्गत लाथाळ्यांमुळे बुडत असलेल्या ह्या महाउद्योगाला वाचविण्याचे युनियनचे विधायक कार्य कॉ. एस. आर. कुळकर्णीसारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचा नेता मिळाल्यामुळे एनआरसीला लाभले. कॉ. एस.आर.चे हे काम कामगार संघटनांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदले जायला हवे. भाझे भाग्य, एस.आर.नी माझ्या ह्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली.

जाताजाता एक खुलासा करावासा वाटतो. ह्या कादंबरीतील सर्व दृष्टीने सुगीचा काळ मी हात न राखता लिहिला आहे. चांगल्याला चांगले म्हणणे ह्यात गैर काही नाही. पण काही वाचकांचा समज होण्याची शक्यता आहे की नोकरीत सुख व बढत्या मिळविण्यासाठी मी आस्थापनाची भाटगिरी केली असावी. वस्तुस्थिती नेमकी उलटी आहे. विविध जबाबदाऱ्या पार पाडतांना टोकाचे मतभेद होत होते आणि शक्य तेथे मी व्यक्तही करत होतो.


एका टोकाच्या मतभेदापायी अखेरीस मी निवृत्तीवयापूर्वी ५-६ वर्षे आधीच त्यागपत्र देऊन संबंध तोडला. तरीही तीस वर्षांचे नातेसंबंध तुटत नाहीत, म्हणून हा लेखन प्रपंच. सामान्य आकृतिबंधापासून थोड्या फरकात वाचकही स्वीकारतील अशी आशा आहे.

इत्यलम.

**गो. वा. टोकेकर**



# प्रकरण पहिले



फडके मास्तर शाळेत जाण्याच्या घाईत हाते. कसेबसे दोन घास खाऊन त्यांनी कोट-टोपी चढवली. टाचा झिजलेल्या वहाणात पाय सरकवून निघणार तोच सूनबाईने डब्याची पिशवी त्यांच्या हातात दिली.

'येतो गं सूनबाई', त्यांनी खुंटीवरची मळकी छत्री घेतली आणि ते निघाले.

दिंडी दरवाजापर्यंत आलेल्या सूनबाईने विचारले, 'संध्याकाळी येणार ना?'

'वाट नको पाहूस. एखाद वेळेस रहावे लागेल' - मास्तर म्हणाले.

पारावरच्या शनीला त्यांनी नमस्कार केला. सवयीने पाय चपलेतून निघालेच. उशीर झाला होता. सहा मैल चालून मोहन्याला जायचं होतं. दिवाळीच्या सुट्टीत फारच आराम झाला.

पोरं, गावकरी वाट पहात असतील.

पिशवीतले केसरीचे अंक त्यांनी चाचपडले. म्हणजे रात्री झोप नाही लागली तर केसरीतल्या 'महायुद्धाचा इतस्ततः पसरलेल्या ज्वाला' ही ताम्हनकरांची लेखमाला चाळता येईल.

युद्ध एकदाचं संपल होतं. अमेरिकेने जपानवर अणुबॉम्ब टाकून लाखो लोकांचा बळी एका क्षणात घेतला. बलाढ्य जपान शरण आला.

आता कसले इंग्रज जातात? १९४२ ची चळवळ थंडावली होती. पुढारी तुरुंगात होते. गांधींच्या 'चले जाव'ला इंग्रजांनी धूप घातली नाही. आणि आतातर...

पाय चालत होते. रस्त्यात वर्दळ नव्हती. गावाबाहेरच्या मोठ्या रस्त्याने मात्र चालताना काळजी घ्यावी लागत होती. लष्कराचे रणगाडे, मोठाल्या गाड्यांची रांग त्यांच्या विरुद्ध दिशेने चालली होती.

युद्ध थांबले असे आपण वाचले आणि मग ह्या सैन्याच्या हालचाली का? मास्तरांच्या मनात विचार आला.

काही दिवसांपूर्वी मुंबईच्या गोदीत नौदलातील भारतीय सैनिकांनी बंड केले होते. प्रचंड स्फोट होऊन मुंबई हादरली होती. अनेक व्यापारी कुटुंबांनी धास्ती घेऊन मुंबई सोडली होती.

मुंबईत जागा मिळणे सोपे झाले होते. त्यांच्या काही नातेवाईकांनी मुंबईत गिरगावात जागा घ्यायला सुचवलेही होते.

पण पैसे कुठून आणणार! स्कूल बोर्डातल्या मास्तरला पगार तो काय असणार! त्यातून पत्नीचे आजारपण. तिचे निधन. मोठ्या मुलीचं लग्न. ह्यात काय किडूकमिडूक होतं, तेही संपलं.

मोठा मुलगा थोडंफार कमावत होता पण शिक्षण अपुरं झालेल्या बाळूला चांगली नोकरी कशी मिळणार? मास्तरांच्या ओळखीनेच मुंबईतल्या एका पेढीवर तो हिशेब लिहिण्याचं काम करत होता.

धाकटा नाना नुकताच मॅट्रिक पास होऊन रेल्वेत लागला होता. तात्यांमुळे, त्यांच्या जावयांमुळे, नानाचं शिक्षण निर्वेध झालं होतं आणि त्यांच्याच ओळखीने नाना रेल्वेत नोकरी करत होता.

सूनबाईला पोरांची काळजी घ्यायला मास्तरांनी निघताना सांगितलं होतं. पण नाना काही आता कुकूबाळ राहिला नव्हता. नाना हुशार होता. चटपटीत होता. फाडफाड इंग्रजी बोलायचा, मोठमोठी इंग्रजी बुकं कुठून कुठून आणायचा आणि रात्री जागून वाचायचा.

सुटीत घरी असूनही नानाची गाठ पडली नव्हती. कुठे संघाच्या शिबिराला गेला होता.

नव्या नोकरीत असूनही हा लष्कराच्या भाकऱ्या भाजायला रजा काढतो?

रात्री रात्री संघाच्या बैठकींना जाऊन काय करायचा देव जाणे. त्याचा पाय घरात राहायचाच नाही. त्याच्या उद्योगाविषयी हडसून खडसून विचारायला हवे होते. पण नानाशी चार गोष्टी बोलायला भेट तर झाली पाहिजे?

एकदोनदा उलट त्यानेच मास्तरांना स्पष्ट शब्दात सांगितलं, 'बापू आता ही वणवण पुरे करा. आता तुमच्या नोकरीची गरज नाही. आणि करायचीच झाली तर गावात बदली करून घ्या.'

त्याला सांगायला काय होते! नानाचे उद्योग त्यांना दिसत होते. ह्याची नोकरी तरी टिकणार की नाही देव जाणे.

आणि इंग्रजांच्या राज्यात अशी तोंड उचलून बदली मानणं सोपं आहे की काय?

नानाविषयीची चिंता त्यांना सतावत होती.

नाही म्हणायला धाकट्या रमेशची काळजी तरी सूनबाईने घ्यावी अशी त्यांची इच्छा. तसे जावई, तात्यांची फेरी रोज असायची. तात्यांचा त्यांना मोठा आधार होता.

विचारांच्या वावटळीत चार मैल चालून झाले होते ते समोर नदी आडवी आली तेव्हा त्यांच्या ध्यानात आले.

पूल ओलांडून ते जाऊ लागले. गावाकडे अनेक ट्रकगाड्या जात होत्या. पुलाला कठडा नव्हता. त्यामुळे जीव मुठीत घेऊन मोटार-गाड्या जाईपर्यंत मास्तर थांबले. तरी पूर्वीपेक्षा बरी सोय झाली असंच त्यांच्या मनात आलं. पूर्वी फरशीवरून नदी पार करावी लागे. कित्येकवेळा फरशीवरून पाणी वहात असे. पावसाळ्यात तर तरीचा उपयोग करावा लागे. मास्तरांकडून तरवाले पैसे कधीच घेत नसत, त्यांच्या मुलांना शहाणे करणाऱ्या ह्या माणसाकडून उतार-भाडे कसे घ्यायचे?

रेल्वेने चौपदरी मोठा लोखंडी पूल बांधला आणि हा जुना, दगडी कमानीवर उभा राहिलेला रस्ता लोकांना आयताच मिळाला.

रेल्वेचे रूळ ओलांडून मास्तर गावाकडे निघाले. धूळ उडवत पुन्हा काही

मोटारगाड्या गावाकडे गेल्या.

ह्या काही मिलिट्रीच्या गाड्या वाटत नव्हत्या. तो खाकी रंग गाड्यांना नव्हता. ड्रायव्हर व त्यातील लोकही इंग्रजी नव्हते, आपलेच वाटत होते.

दोन दिवस आपण नव्हतो तर इतक्या हालचाली गावात झाल्या.

आता गांवातले लोक त्यांनाच विचारणार? त्यांच्या दृष्टीने मास्तर म्हणजे सर्वज्ञ. त्यांना काय उत्तर देणार?

मास्तर विचारात पडले. पण पाय संथ गतीने चालत होते.

एकदा गावात शिरायच्या आत मास्तरांनी एका मोरीवर बसून सावकाश तंबाखू मळला. चुनेगच्ची तयार होताच गोळी अलगद त्यांनी गालात ठेवली. वा! छान! मास्तरांना हुरूप आला.

दुरूनच गावाबाहेरचं मारुतीचं देऊळ दिसत होतं. आपल्या कर्मभूमीला त्यांनी हात जोडले. गेली कित्येक वर्षे तीच त्यांची शाळा होती.

कोणी मास्तर मोहन्याला टिकतच नव्हता. फडके मास्तर टिकले. गावकऱ्यांशीही त्यांचे चांगले जमले. चौथ्या यत्तेपर्यंतची शाळा. ते सगळे वर्ग एकटेच शिकवत. मास्तरांची शिस्त कडक होती. गावकऱ्यांना असाच मास्तर हवा होता. पोरगा शाळेत गेला नाही तर मास्तर चार पोरांना पाठवून त्याची पालखी करून आणत. आणणारी मुलंही खूष. दांडी मारणारा पोरगाही खूष. आणि तोंडाला पदर लावून ही गंमत बघत घराच्या दाराशी उभ्या राहणाऱ्या आयाबायाही खूष.

मास्तर शाळेजवळ येताच दहापंधरा पोरांचा घोळका मोठ्याने ओरडला. एका तरतरीत मुलाने मास्तरांची पिशवी, छत्री घेतली, दुसऱ्या कोणी जाऊन शाळेची घंटा बडवली, पाहता पाहता तीस-चाळीस पोरं जमली.

मास्तरांसाठी एकाने खुर्ची बाहेर आणली. मास्तर त्यात बसले, टोपी काढून त्यांनी घाम पुसला. कोणीतरी पाणी आणून दिले.

'आज झाडण्याची पाळी कोणाची होती रे? - मास्तर.

'माझी', काशिनाथ ओरडला, 'मास्तर आमीबी मद्दत क्येली त्येला', दोनचार पोरांनी सांगितलं.

'आणि पाण्याचा पिंप कोणी भरला?' मास्तर.

'मी मी मास्तर' गणू आणि मोरू पुढे झाले.

'शाब्बास. चला आता सगळे प्रार्थनेला तयार रहा हं, वर्गाप्रमाणे. रांगेत. मस्ती अजिबात बंद. हं. प्रार्थना सुरू कर!' मास्तरांनी आज्ञा दिली.

'या कुंदेन्तु तुषार हार धवला' मुलानी कशीबशी प्रार्थना म्हटली.

'आता चला आपापल्या वर्गाच्या जागी' मास्तर म्हणाले.

बाजूच्या खोलीत मास्तरांचे सामान होते. टेबल, खुर्ची मध्ये आणून ठेवली. कोटाच्या खिशातून खडू आणि डस्टरचा फडका त्यांनी बाहेर काढला. चारी फळे पुसले. हजेरीपट भरला. फळयाच्या कोपऱ्यात पटसंख्या, हजर संख्या, गैरहजर संख्या लिहिली.

आणि पहिलीपासून चौथीपर्यंतच्या मुलांना पाळीपाळीने शिकवायला त्यांनी सुरुवात केली. कोणाला शुद्धलेखन घातले, कोणाला वाचन सांगितले, कोणाला गणिताची उदाहरणे घातली.

वर्ग अभ्यासात मग्न होता. मास्तरांनी कोट काढून खुंटीला टांगला आणि जरा उघड्यावर बाहेरच्या ओट्यावर ते आले.

लांबूनच त्यांना गावकऱ्यांचा एक घोळका शाळेकडे येताना दिसला. ही मंडळी का बरं शाळेकडे येत आहेत, संध्याकाळी भेटणारच होतो. मास्तरांच्या मनात नाना विचार घोळत होते. कुणाचं मयत झालं असतं तर पोरं बोलली असती. त्यांना सुटीची संधी हवी असायची.

'राम राम मास्तर', सरपंचानी आवाज दिला. पाच-सहा जण बरोबर होते.

'राम राम पाटील, आज सकाळी वक्काळी फेरी झाली, गावात सगळं ठीक आहे ना?' मास्तर.

'मास्तरा, आता ठीक हाय का नाय त्ये तूच सांग. गावात काय गडबड न्हाई. पर ह्यो माळावर काय चालल्यानी? दोन दिस झाले रातदिन ट्रका येत्यात, माल येतो. माणसं भरभरून येत्यात, येका दिवसात त्यांची पालं पडली. काय लढाई मंबइपोत्तर आली का काय?

'अहो लढाई संपली. इंग्रज जिंकले. हे काही तरी निराळंच प्रकरण दिसतंय.' मास्तर.

'लढाई संपली म्हंजे विंग्रेज जानार म्हना परत इलायतेला?' एक गावकरी.

'म्हात्मा गांधी बोलले व्हतेच ना चले जाव.' दुसरा.

'त्ये कसले जातात, आता आणखी माजतील, त्या गोऱ्या, लाल तोंड्यांच्या गाड्याबी हायतच की मालावर.

आमाला तर काय कळेनासं जालंय, तुमी बोला कोनाशीतरी अन् सांगा आमाला.'

गावाला तर काय धोका न्हाईना?

'शांत रहा मंडळी, मी करतो चौकशी. हळू हळू. सगळं कळेल आपल्याला,

पण तुम्ही धीर धरा. आता शाळा सुरू आहे. संध्याकाळी बसू, मी येतो चावडीवर रात्री, काय सरपंच!' - मास्तर.

'व्हय, काही तरी करा लवकर मास्तर, चला रे पोरं दंगा करत्यात, रातच्याला बगू.' सरपंच.

पाच वाजता शाळा सुटली, मास्तरांचा डबा तसाच राह्यला होता. हातपाय धुऊन त्यांनी स्टो पेटवला. अन्न गरम केलं.

गुरवानं देवळात पणती लावली. मास्तरांनी रामरक्षा, भीमरूपी म्हणत फेऱ्या मारल्या.

सूनबाईने भात भाजी पोळी दिली होती. तिच्या हाताला चव चांगली होती. डबा संपवून, स्वच्छ करून ते पुन्हा शतपावली घालू लागले.

माळावर दिवे लखलखत होते. गावात काळोख होता. घराघरातल्या चिमण्या प्रकाशापेक्षा धूरच ओकत होत्या.

मास्तरांना खुर्चीत बसल्या बसल्या झोप येऊ लागली, पण त्यांनी चावडीवर जायचं कबूल केलं होतं.

दुसऱ्या महायुद्धाने काही चांगल्या गोष्टी अंगवळणी पडल्या होत्या. दीर्घकाळ ब्लॅक आऊट सहन केल्याने बहुतेकांकडे बॅटऱ्या असत. शहरात ते रहात होते त्या ब्राह्मण आळीतल्या कित्येक जुन्या वाड्यात वीज आलेली नव्हती. चिमण्या, कंदिल ह्यावरच रात्र काढावी लागे. रस्त्यावरचे दिवे ब्लॅक आऊटमुळे बंद असत. अशावेळी घरटी एक तरी बॅटरी असेच.

सवयीप्रमाणे मास्तरांनी खुंटीवरची टोपी डोक्यावर ठेवली. कपाटातली बॅटरी काढली, हातात नेहमी खेडेगावात वापरावयाची बांबूची काठी घेतली. आणि देवळाच्या दाराला कडी लावून ते चावडीकडे निघाले. बॅटरीचा प्रकाशझोत लांबवर पडत होता. मास्तरांनी काठी आपटत रस्ता तुडवायला सुरुवात केली.

बहुतेक घरातली जेवणं आटोपली होती. बायका भांडी घासत होत्या. मास्तरांची चाहूल लागताच गावातली कारभारी मंडळी चावडीकडे निघाली.

मास्तर पोहोचले तेव्हा सरपंच अगोदरच आले होते. पोलीस पाटील अजून आले नव्हते. चारपाच जण जमताच तंबाखूचे बार भरले. सुपारीची खांडे तोंडात टाकून भरल्या तोंडाने सरपंच म्हणाले,

'काय मास्तरा, लागली का काई खबर?'

'अहो सरपंच, आताच कसं काय समजेल? शाळा सुटून स्वैपाकपाणी होइस्तवर काळोख पडला. ह्या काळोखात कसं कोणाला विचारायला जायचं?'

मास्तर.

'हा, ते बी खरंच, पण येकदा काय ते समजलेलं बरं, आपल्या गावाचं काय बरं-वाईट होऊ नये म्हणून घोर लागतोय.'

'सरपंच, जरा धीर धरा. आता शहरात घरी गेलो की माझ्या मुलाला विचारीन. तो इंग्रजी पेपर, बुकं वाचतो. त्याला काही ठाऊक असेल तर-'

'मास्तर, हे बाकी बरोबर, मग तुम्ही असं करा, मास्तर, तुम्ही उद्याच निघा. शाळेकडे आम्ही बघू.'

'ह्ये काय बगणार! पोरास्नी सुटी. दिसभर उंडारायला मोकळे.'

'उंडारू द्या हो. शिकून काय ते ब्यालिष्टर व्हनार हायेत. आपली शेती, गुरं ढोरं बरं.'

'काय दोन-चार दिवसांनी व्हत नाही.'

मास्तरांनाही तेच हवं होतं. पण उद्या कोणी खात्यातल्या साहेबांनी चौकशी केली तर गाव तरी आपल्या पाठीशी आहे हे समाधान मास्तरांना होतं.

नाहीतरी वयाची पन्नाशी ओलांडल्यापासून त्यांना थकायला होत होतं. आता नोकरीची पाच वर्ष जेमतेम राहिली होती. कशीबशी ओढायची.

बैठक लवकरच संपली. मास्तरांनी उद्याची शाळा करून संध्याकाळी घरी जायचं ठरवलं.

मास्तर देवळात आले. कोपऱ्यात उभी ठेवलेली खाट त्यांनी ओढत दरवाजासमोर आणली. नेहमी बांधून ठेवलेली पथारी उलगडली. देवाला नमस्कार केला आणि ते आडवे झाले.

कितीतरी वेळ मास्तरांचा डोळा लागेना. डासही चावत होते. एरवी पडल्या पडल्या घोरत पडणाऱ्या मास्तरांच्या डोक्यात नुसता गुंता झाला होतो.

केव्हातरी त्यांचा डोळा लागला. उघड्या दरवाजातून काहीजण देवदर्शनाला येत होते. त्यांच्या घंटानादाने मास्तर जागे झाले.

बरंच फटफटलं होतं. मास्तर स्वतःशीच वरमले. घाईघाईत त्यांनी वळकटी आवळली. खाट जागेवर उभी केली आणि राखुंडीने तोंड धुवून, डबा घेऊन ते प्रातर्विधीला बाहेर पडले. येताना आयाबाया दिसत होत्या. त्या लाजेने तोंड झाकत होत्या. मास्तरांनी आज लांब रेल्वे लाईनकडे जायचं ठरवलं. भराभर पाय उचलून ते लांबवर आडोशाला गेले.

प्रातर्विधी आटोपून ते सरळ देवळाकडे न जाता रेल्वे लाईनने बरोबर माळरानाकडे चालू लागले. रेल्वेपासून रस्त्याच्या उतारापर्यंत मध्ये नाल्यासारख्या

चरातून एक पाइपलाईन माळाकडे जात होती.

त्याच वाटेने ते चालत राहिले. एका ठिकाणी आठ-दहा नळातून पाणी पडत होते. माळ जागा झाला होता. लोक मश्री करून, डबे घेऊन बहिर् दिशेला जात होते. पलीकडे साहेबांच्या राहुट्या होत्या. साहेबलोक अजून झोपेत होते. उजाडलं तरी दिवे जळत होते.

सगळे आपल्या घाईत होते, त्यामुळे मास्तरांकडे कोणाचंही लक्ष नव्हतं. भल्या मोठ्या आवारात खडी, दगड, सळया, सिमेंटांची पोती यांचा पसारा होता. एका पत्र्याच्या शेडमध्ये गिरणीसारखं एक यंत्र भुकभुक आवाज करत चालत होतं. तिथे एक माणूस खुर्चीत बसला होता.

मास्तर जवळ येताच तो खाडकन उभा राहिला, 'क्या मांगता है!' त्याने मास्तरांना दरडावलं.

मास्तरांमधली स्वाभाविक जिज्ञासा जागी झाली, 'ये क्या है?' मास्तरांनी नम्रपणे त्याला विचारलं.

'ये जनरेटर है! ये जो बलब लगता है ना, उसको पावर ये मशीनसे मिलती है.'

मास्तरांच्या ज्ञानात भर पडताच त्यांनी पुढचा प्रश्न विचारलाच - 'और ये पानी कैसा आता है, विहिर बिहीर खोदा है क्या?' मास्तरांनी चौकसपणे विचारले.

तितक्यात एक चहावाला पोऱ्या हातात किटली आणि ग्लासं घेऊन आला. 'घ्या वॉचमनसाहेब, चहा घ्या', तो काळकट पोऱ्या चक्क मराठीतून बोलला, तो वॉचमनही मराठीतून म्हणाला, 'अरे एक ग्लास ह्यास्नी बी दे, घ्या मास्तर, च्या घ्या.'

तो वाफाळलेला चहा बघून मास्तरांनाही मोह आवरेना, त्यांनी धोतराच्या सोग्याने तो गरम ग्लास हातात धरला आणि ओठाला लावला. मास्तरांचे ओठ पोळले, ते फुंकरून चहा घेऊ लागले. वॉचमनने चहा तसाच घशाखाली घातला. तोपर्यंत ग्लासं घेऊन पोऱ्या निघाला. तो धावतच होता. एका भल्या मोठ्या शेडमध्ये गेला. तिथल्या सगळ्यांना त्याने चहा दिला. पैसे कोणीच देत नव्हते. मास्तरांना अचंबाच वाटला. त्यांनी वॉचमनला विचारले, 'भाऊ, चहाचे पैसे कोणीच देत नाही. तो पोऱ्याही मागत नाही, हा काय प्रकार आहे?'

'मास्तर-'

'तुम्हाला काय माहीत मी मास्तर आहे?' मास्तरांनी त्याला मध्येच तोडले.

'धोतर, टोपी घालणाऱ्या समद्यांनाच आमी मास्तर म्हनतोय! आन् चाय चं म्हनाल तर समद्यांनाच फुकट भेटतो. थोड्या टायमानं नाश्ता बी यील, समदा खर्च कंपनी करते,' वॉचमन.

'कसली हो कंपनी? काय करणार आहेत काय?' मास्तर.

'काय जाणं. आपलं काम वॉचमनचं. श्येटनी मंबईहून हितं पाठिवलं, आलो. माझ्यासारखी पाच-पन्नास मानसं हायेत. आता लवकरच डिरेस भ्येटणार हाये सर्व्यांना, आहात कुठं?' मास्तरांच्या ज्ञानात फारशी भर पडली नव्हती.

मास्तरांच्या आश्चर्यात मात्र भर पडली. दोन दिवस नोकरी नाही झाली तर ह्यांना ड्रेस! चहा, नाश्ता, जेवण फुकट. कंपनीवाला फार मोठा श्रीमंत असावा. आपलं स्कूल बोर्ड, पगारसुद्धा वेळेवर देत नाही. धोतराचं पान नाही. सदऱ्याचं मांजरपाट नाही. छत्री नाही. पंचवीस पंचवीस वर्ष. उन्हातान्हात फिरतोय पोरांना शहाणं करत.

विचार करत मास्तर त्या भागातून फिरत होते. साहेबांच्या राहुट्यांची झापं उघडली होती. ब्रशनी दात घासत, तोंडातला फेस थुंकत साहेब लोक तोंड धूत होते. हातावर पाणी ओतायला, टुवाल घेऊन आदबीनं माणसं उभी होती.

पटापट घडीची टेबलं बाहेर आली. त्याच्यावर पांढरं स्वच्छ कापड अंथरलं. चहूबाजूने खुर्च्या मांडल्या, नक्षीदार चिनी मातीच्या कपबशा आल्या. साहेब लोक एकमेकांना गुडमॉर्निंग म्हणत खुर्च्यात बसले. नोकरांनी लगबगीने बिस्किटं आणून ठेवली.

सगळेच गोरे साहेब नव्हते. काही आपलेच होते. पण सगळे अगम्य इंग्रजीत बोलत होते. कान देऊन ऐकण्याचा प्रयत्न करूनही मास्तरांना काही कळत नव्हते. इतक्यात एक धटिंगण मास्तरांवर ओरडला, 'ए, क्या काम है! चलो भागो, भीक मांगने का है तो अंदर नही आना, वो बोर्ड लगा है पढा नही क्या? अंदर आना मना है' -

खरंच मास्तरांनी तो बोर्ड पाहिलाच नव्हता.

आपण ह्या भिकारड्याला भिकारी वाटलो? मास्तरांचा संताप संताप झाला. रागारागाने ते तिरमिरीत बाहेर पडले. गावाला उजवी टाकून मास्तर देवळात आले. बरं झालं कोणी भेटलं नाही.

मास्तरांनी हातपाय धुतले. गुरवाने येऊन पूजा केलेली दिसली. देऊळ स्वच्छ झाडलेलं होतं. पिंपात पाणीही भरलं होतं.

मास्तरांनी स्टो पेटवला आणि त्याच्यावर आंघोळीसाठी हंडा ठेवला.

पाणी जरा कोमट होताच त्यांनी मागच्या दगडावर बसून स्नान केले. नुसत्या पाण्यातच धोतर आणि सदरा खळबळून वाळत टाकला. नाहीतरी संध्याकाळी घरी जायचंच आहे. सूनबाई धुईल नीट.

त्याच स्टोवर त्यांनी खिचडीसाठी तांदूळ आणि डाळ वैरली. देवाकडे तोंड

करून ते मांडी घालून बसले. पुरुषसूक्त, रामरक्षा, मारुती स्तोत्र मोठ्याने म्हणण्यात ते दंग होते.

आज ते मुद्दामच मोठ्याने म्हणत होते. मनात म्हणताना अनेक विचार येतात. आजतर मोठ्याने म्हणतानाही ते चुकत होते. आपल्याला एक भुरटा वॉचमन भिकारी समजतो ह्याचं दुःख त्यांच्या मनाला सारखं डाचत होतं.

कसेबसे चार घास पोटात ढकलून त्यांनी भांडी घासून ठेवली.

थोड्याच वेळात पाट्या पुस्तकं घेऊन मुलं यायला लागली. अकरा वाजले असतील असं त्यांना वाटलं नव्हतं. पोरांनी कोणी घड्याळं पाहिली नव्हती. सवयीने ती आली होती. मास्तरांनी एकाला सरपंचाच्या ओटीवरच्या घड्याळात किती वाजले पाहून यायला सांगितले. एकाला चारजण बरोबर धावली.

सरपंचांच्या ओटीवरचं घड्याळ बंदच होतं. त्यातला लंबक हलत नव्हता.

उत्साहात ही बातमी सांगायला पोरं ओरडतच निघाली. त्यांना वाटलं घड्याळ बंद म्हणजे अकरा वाजणारच नाही. म्हणजे घंटा वाजणारच नाही, शाळा भरणारच नाही.

पोरांनी मास्तरांना ही बातमी सांगितली.

पण मास्तर पक्के. ते स्वतःच गावात गेले. सरपंच घरात नव्हते. पोलीस पाटलांचाडी पत्ता नव्हता, पण इतक्यात एक तरुण सायकल दामटत दुधाच्या रिकाम्या कासंड्या घेऊन येत होता. त्याच्या मनगटाला घड्याळ. मास्तरांनी थांबण्याचा इशारा करताच तो धडपडत उतरला.

'वाजले किती?' मास्तर

हात पुढे करून तो म्हणाला, तुमीच बगा की मास्तर आज लई टाइम झाला. डोळं किलकिले करून मास्तरांनी घड्याळ पाहिलं. अकराला दहा मिनिटं होती. ते लगबगीने देवळात आले आणि एका पोराला घंटा वाजवायला सांगितली.

दोन-चार पोरं धावली. खुंटीला अडकवलेला तास एकाने काढला. दुसऱ्याने लाकडाच्या हातोड्याने तास बडवला.

पोरांचा ओरडा वाढला. ह्या सगळ्या गदारोळाने वस्तीतली मुले हातातली कामं टाकून पिशव्या घेऊन ओरडत शाळेत आली.

ओट्यावर उभे राहून मास्तरांनी खणखणीत आवाजात प्रार्थनेसाठी उभं राह्यला सांगितलं. मास्तरांच्या आवाजात जरब होती. आज चिडचिड झाल्यामुळे त्यांच्या आवाजाला अधिकच धार आली होती. 'प्रार्थना - सुरू कर!'

'या कुंदेन्तु तुषार हार धवला.' मुलं हात जोडून म्हणू लागली.

मास्तरांचं आज कामात लक्षच लागेना. त्या वॉचमनचे शब्द सारखे त्यांच्या कानात घुमत होते. कशीबशी अर्धवेळ शाळा त्यांनी रेटली आणि मुलांना मुकाट्याने घरी जायला सांगितलं. पण मुलंच ती ओरडा आरडा करत ते घरोघर पांगले.

मास्तरांनी घाईघाईत पिशवी घेतली. सूनबाईने दिलेला रिकामा डबा त्यात टाकला. केसरीचे अंकही त्यात कोंबले आणि चपला घालून, छत्री घेऊन मास्तर चटाचटा घराच्या दिशेने चालू लागले.

उन्ह रण रण पडत होतं. मास्तरांना छत्रीची आठवण झाली. त्यांनी छत्री उघडली. काही ठिकाणी भोके पडून उन्हाचे कवडसे मास्तरांच्या कोटावर पडत होते. छत्रीचा मूळ रंग काळा असावा इतकं कळण्याइतपत तो विटला होता. आज कित्येक वर्षे हे एकछत्री साम्राज्य त्यांनी सांभाळले होतं. तेही त्यांना पोस्टातल्या एका कारकूनानं फुकट दिलं होतं.

पूल ओलांडून ते चहूकडे पाहू लागले. सगळे उजाड होते. रस्त्याच्याकडे एकही झाड नव्हतं. टेकायला एक दगड दिसला. ते छत्री बंद करून विसाव्याला बसले. तंबाखू मळली आणि तोंडात सोडली. मास्तरांची तंद्री लागली होती.

त्यांच्यासमोर मोटारीचं एक धूड आवाज करत उभं राह्यलं. त्यांना वाटले आपलं मरणंच उभं ठाकलं. ते गांगरून कसेबसे उभे राह्यले तोच ड्रायव्हरच्या जागेवरून सकाळचा धटिंगण उतरला. आता हा आपल्यावर हात उगारतो काय? ड्रायव्हरने त्यांच्या खांद्यावर हात टाकला, "मास्तरा, येकला पायीच कुठं निघाला उन्हातान्हाचं?... आन् आपल्याकरता बी मळा की जरा तमाखू. अरे उद्या वापस करून टाकू." मास्तरांनी तत्परतेने पुडी काढली. चुना तळहातावर ठेवून त्यांनी तंबाखू मळली. 'घ्या. घ्या' ते म्हणाले. "अंग अस्सं', त्याने गोळी गालात टेकवली, दोन मिनिटं ध्यान केल्यासारखे डोळे मिटले. एक पिंक टाकली. मास्तरांनी अंग चोरलं. त्यांना वाटलं पिचकारी आपल्याच अंगावर पडणार.

'चला मास्तर, चला. सोडतो तुमास्नी. खुटं सोडायचं सांगा.'

त्या उंच ट्रकात मास्तरांना चढता येईना. त्या धटिंगणाने त्यांना उचलले. आत शेजारी बसवलं. 'हा निवान्त बसा. उतराचं ठिकाण याद ठेवा म्हणजे झालं.' आन् आतापासून आपण मैतर झालो. कवा बी रस्त्यात गाडी दिसली की आपलीच समजून हात करायचा. इतकं चालणं बरं न्हाई मास्तर. काय पोरं-बाळं हायेत का न्हाय मागं रडायला? आमाला न्हाईत पण देशावर कवातरी जाऊन याचं. काय?'

मास्तरांनी मान डोलावली. म्हणजे मला भिकारी म्हणणारा हा धटिंगण वॉचमन नाही, ड्रायव्हर आहे. मास्तरांचा त्याच्याविषयीचा आदर वाढला.

'धटिंगणसाहेब, आपलं ड्रायव्हरसाहेब, आपलं नाव काय म्हणालात?' त्यांनी विचारले.

'सखाराम म्हनतात ह्या येहीला. तुम्ही सख्या म्हनलं तरी चालंलं. तुमी शिकल्याली मानसं,' ट्रक गचकन सुरू झाला. मास्तरांच्या मनाची चक्रही फिरू लागली.

बापू घरी लवकर आले. सूनबाईला नवलच वाटले. तिला वाटलं होतं शनिवारपर्यंत काही ते येत नाहीत. लगबगीत तिने चहा टाकला.

हात-पाय आडावर धुऊन मास्तर पाटावर बसले. पण काही बोलेनात. तिला वाटलं, 'बरं नाही बापू? जरा पडा'.

बरं आणि वाईट त्यांना काही कळत नव्हतं. गावाचं काय होणार? आपलं काय होणार? श्रीराम म्हणत ते उठले. पोत्याचं तरट लावलेल्या आरामखुर्चीत ते विसावले.

त्यांना डोळा कधी लागला कळलंच नाही. जावई तात्यांचा खणखणीत आवाज ऐकून ते जागे झाले. 'काय बापू, आज मध्येच सुटी, कोणी गावकारभारी गचकला की काय?' त्यांनी विचारले.

'बसा तात्या. सूनबाई चहा ठेव गं.' त्यांनी स्वैपाकखोलीकडे आज्ञा सोडली.

'अहो, आज गंमतच झाली. एका ड्रायव्हरने मला चौकीपर्यंत सोडले, चालावं फारसं लागलंच नाही.

'अरे वा! नशीबवान आहात.'

'कोण जाणे! अहो केवढं प्रचंड काम चालू आहे. रस्ते काय, पाइपलाईन काय? वीज काय? रात्रंदिवस प्रचंड यंत्र येताहेत. हजारो माणसे काम करताहेत. काय विमानतळ बांधतायत की काय कळत नाही. कोणाला काही ठावकी नाही. जो तो मला चौकशी करायला सांगतो.' मास्तर जावयांशी बोलताना रंगले.

'बापू, नेवाळीचा विमानतळच रद्द झाला. आता युद्धच थांबलं. इंग्रज जिंकले. पण इंग्रज हरलेही.' तात्या.

'मला काही समजेल असं बोला हो. जिंकले आणि हरले? हे काही आपल्याला कळत नाही.' बापू.

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया ह्या दोस्त राष्ट्रांनी जर्मनी आणि जपानला पार शरण आणलं. पण आता लवकरच इंग्रज आपल्याला स्वातंत्र्य देऊन परत जाणार आहेत. सरकार कसं चालवावं ह्यासाठी घटना बनवण्याचं काम चालू आहे. जून महिन्यात तसा ठरावही पास झाला. ऑगस्टमध्ये आपल्याला स्वातंत्र्य मिळेल असा अंदाज आहे. मग आपणच आपले राजे. महात्माजींच्या चळवळीचा हा विजय आहे.' तात्या.

स्वातंत्र्य मिळणार हे ऐकून बापू सुखावले. पण महात्मा गांधींना तात्या श्रेय

देतात ते त्यांना आवडलं नाही. मग सावरकर, भगतसिंग, सुभाषबाबू यांच्या लढण्याला काहीच अर्थ नाही? बापू गप्प बसले. तात्या कट्टर काँग्रेसवाले. जावयाशी भांडण महाग पडेल. ते गप्प राहिले.

नानाकडून मिळवायची माहिती तात्यांकडून मिळाली.

पण मोहोन्याला काम काय चालू आहे हे गाववाल्यांना काय सांगणार. तात्यांना तेही माहीत असेल कदाचित. तात्यांचे वाचन अफाट, संपर्कही मोठा. तेही शाळामास्तर होते. पण इंग्रजी शाळेत. विचारून पाहायला काय हरकत आहे, असा बापूंनी विचार केला.

'तात्या, अहो मोहोन्याला काय काम चाललंय, आहे का काही अंदाज?'

'बापू, अहो एक भला मोठा कृत्रिम रेशीम बनवण्याचा आशियातला सर्वात मोठा कारखाना तिथे होणार आहे. अमेरिकन तंत्रज्ञ आणि आपले इंजिनीअर्स मिळून तो कारखाना उभा करताहेत. १३ सप्टेंबरला नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन या नावाची कंपनीही त्यांनी स्थापन केलीय. आपल्याकडचे प्रसिद्ध रेशमी व्यापारी चिनाई बंधूनी ह्यात पुढाकार घेतला आहे.' एका दमात तात्यांनी माहिती सांगितली. जावयाच्या ज्ञानाने मास्तर थक्क झाले. त्यांना तसे फारसे कळले नाही.

कृत्रिम रेशीम म्हणजे काय? एक प्रकारच्या किड्यापासून रेशीम मिळते. तुतीच्या पानावर ते किडे पोसतात. त्यांच्या कोषातून तंतू निघतात ते रेशीम. आपल्याकडे सोवळे, कद, पैठणी वगैरे त्या रेशमापासून बनवतात अशी माहिती त्यांनी भूगोलाच्या पुस्तकात फार वर्षांपूर्वी वाचली होती, आता चौथीपर्यंत मुलांना शिकवायला ह्या माहितीची काही गरज लागली नाही.

पण हे कृत्रिम रेशीम काय प्रकरण आहे? हे कसे बनवतात आणि त्यासाठी इतके प्रचंड काम. अवाढव्य यंत्रे. रेशीम कसे नाजूक असते. हा कारखाना तर दोरखंड बनवायला उपयोगी पडेल.

मास्तरांच्या मनात शंका घोळत होत्या. ते आपल्या आरामखुर्चीत विचार करत पडले. तात्या केव्हा निघून गेले कळलेही नाही.

बरंचसं कळलं होतं. पण बरंच कळलेलंही नव्हतं. गावकऱ्यांनी तर आठवडाभर नाही आलात तरी चालेल म्हणून सांगितलं होतं.

पण आठवड्यानंतर तरी त्यांना सांगण्यासारखं काही मिळवलं पाहिजे.

संध्याकाळ झाली होती. बाळू कामावरून आला. पण त्याला काय माहीत असणार? तो आपल्यासारखाच शिक्षणात मागासलेला.

सूनबाईने कंदील लावले. बाहेर ओट्यावर एक ठेवला. देवापुढे तिने तेलवात

केली. बापूंनी सवयीनं दिव्याला, देवाला नमस्कार केला. शुभंकरोति कल्याणम्... मोठ्याने म्हणू लागले. हातपाय धुऊन रमेश त्यांच्या शेजारी येऊन बसला. मोठ्या आवाजात तोही म्हणू लागला.

बापू उठले आणि बाहेरच्या सारवलेल्या अंगणात ते फेऱ्या मारू लागले. तोंडाने रामरक्षा पुटपुटत होते. दिण्डी दरवाजाचा आवाज झाला की ते थांबत, तिकडे बघत. नानाच्या येण्याकडे त्यांचे डोळे लागले होते. पण नाना काही येत नव्हता. त्यांच्या रामरक्षा पठणात चुका होत. मग ते सुरू करत 'अस्य श्री रामरक्षा स्तोत्रम'...

शेवटी कंटाळून ते घरात आले. माजघरात पाटपाणी घेऊन सूनबाईही वाट पहात होती. वाचनालयात गेलेला बाळू परत आला. नानाची वाट पहाण्यात अर्थ नव्हता. तो कधीही नियमित वेळी येत नसे.

शेवटी सूनबाईंनी ताटे वाढली. बापू, बाळू, रमेश पाटावर बसले. नानाचा पाट भिंतीला टेकून उभा होता.

सूनबाईंनी गरम गरम भात आमटी वाढली. बापूनी 'वदनी कवळ घेता' सुरू केले. बाळूने पुटपुटत आणि रमेशने ठणठणीत आवाजात श्लोक म्हटला.

घास घेताहेत तो नाना आला. त्याने कपडे बदलले. हातपाय धुतले आणि मुकाट्याने पाट आडवा करून जेवायला बसला.

'अरे, बापू तुम्ही येणार नाही म्हणून वहिनी म्हणाली होती. तब्येत बरी आहे ना.' नाना

बरं झालं नानानेच विषय काढला. 'अरे त्याची मोठी मौजच झाली. मोहोन्याला काहीतरी मोठ्या कारखान्याचं काम सुरू झालंय. दोनचार दिवसांत हजारो कामगार, हपिसर दाखल झाले. भलीमोठी छावणीच पडली आहे. जो तो काम करतो. रस्ता काय, पाइपलाईन काय. काही विचारू नकोस. बरं कोणांला विचारावं कळत नाही. गोरे साहेब, काळे इंजिनीअर साहेब राहुट्यात राहताहेत. बाकीचे मोठ्या शेडमध्ये. वडारांची पालं नदीजवळ पडली आहेत...'

'पण बापू त्याचा तुमच्याशी काय संबंध?' नाना

"अरे, गावकऱ्यांनी सांगितलं, 'मास्तर शाळा बघू आम्ही चार-सहा दिवस, तुम्ही कल्याणला जाऊन माहिती काढून या. आपल्या गावावर तर काही संकट नाही ना ते बघा.' अगदी मागेच लागले. शेवटी निघालोच. आणि मौज अशी, इकडे येणाऱ्या एका ट्रक ड्रायव्हरने मला लाल चौकीशी सोडलं... बरं, ते जाऊ दे तुला माहीत आहे का काय चाललंय मोहोन्याला." बापू

'नाही बा, रेयॉनचा कारखाना निघतोय म्हणतात.' -नाना.

'अरे हो, पण रेयॉन म्हणजे काय? संध्याकाळी तात्या आले होते ते म्हणाले कृत्रिम रेशीम बनवण्याचा कारखाना.' -बापू

'तात्यांचं बरोबर आहे. मलाही त्यांच्यापेक्षा जास्त माहिती नाही.' -नाना.

'अरे पण मी मोहोन्याला जाऊन सांगू काय? हात हालवत गेलो तर गावकरी म्हणतील मास्तर फुकटची रजा खाऊन आले. आपल्याला असं बोललेलं चालणार नाही.' -बापू

'बघू, काढू माहिती. नानाचं जेवण आटोपलं. बापूंचे हात कोरडे झाले होते. बाळू आणि रमेश केव्हा आंचवायला गेले कळलंही नाही. सूनबाई ताटकळली होती. तेही उठले.

भोजनोत्तर शतपावली सुरू असतानाच, अर्धी खाकी विजार, सदरा खोचलेला, हातात एक जाडजूड काठी घेऊन नाना घाईघाईने बाहेर पडला. दिण्डीतून बाहेर पडताना म्हणाला, 'शाखेत जाऊन येतो. वामन येतोस ना. मी निघालो.' मालकांच्या वामनला त्याने हाक दिली. पाठोपाठ वामनही तसाच अर्धविजारीत, शर्ट खोचून निघाला, जाताना त्याने उगाच काठी दिण्डीच्या कडीवर आपटली.

ह्या नानाचं सगळं वागणंच गूढ होतं. इतका शिकला-सवरलेला हुशार पोरगा. का असा घराबाहेर सारखा राहतो कळत नाही. आणि आपल्याला सांगतो, निवृत्त होऊन घरी बसा.

विचार करून बापू कंटाळले. सूनबाईने टापटिपेने अंथरूण टाकले होते. शेजारी रमेश झोपलाही होता. नानाची वळकटी नेहमीप्रमाणे भिंतीशी होती.

बापू विचार करत पडले. आजूबाजूच्या घरातले दिवे मंद झाले. दूरवरून टाळ मृदंगाचा आवाज येत होता. मध्ये दूधनाक्यावरील मशिदीतून बांग ऐकू येत होती. मालकांच्या घरातला झोपाळा ठराविक तालात कुरकुरत होता.

ह्या सगळ्या आवाजांच्या दुनियेत कान लागलेले असताना मास्तरांना कधीतरी डोळा लागला.

बापूंना जाग आली तेव्हा दिवस चांगलाच उजडला होता. रमेश आणि नानाच्या वळकट्या जागेवर होत्या. सूनबाईची स्वैपाकघरात धावपळ चालू होती.

इतक्या उशिरा ते आजवर कधीच उठले नव्हते. त्यांना शरमल्यासारखे झाले.

पटापट त्यांनी आवरले. विहिरीवर जाऊन त्यांनी तोंड धुतले. घाईघाईने प्रातर्विधी आटोपून, धोतराच्या सोग्याला तोंड पुसत ते स्वैपाकघरात गेले. त्यांचा पाट मांडला होता. समोर वाफाळलेला चहा होता.

चहा घेऊन ते आंघोळीला गेले. सूनबाईने तत्परतेनं गरम पाण्याची बादली विहिरीवर आणून ठेवली. स्तोत्र पुटपुटत बापूंनी स्नान आटोपलं. देवाजवळ बसून त्यांनी चार आचमनं टाकली आणि स्वैपाकघराकडे तोंड करून आवाज दिला, 'सूनबाई डबा'.

अन् त्याच्या लक्षात आले आज त्यांना जायची घाई नव्हती. सूनबाईही पदराला हात पुसत स्वैपाकखोलीच्या चौकटीत उभी राहिली अन् म्हणाली, 'बापू तुम्ही आता आठवडाभर जाणार नाहीत ना. मी डबा तयारच ठेवला नाही.'

बाळू आणि नाना बाहेरही पडले होते. रमेश तिथेच अभ्यास करत बसला होता.

आता करायचे काय असा प्रश्न बापूंना पडला. त्यांनी कपडे केले, चपला घालून ते बाहेर पडले. 'सूनबाई येतो गं जेवायच्या वेळेपर्यंत' असं म्हणत ते दिण्डीतून बाहेरही पडले.

कामावर जाणारी मंडळी स्टेशनच्या दिशेने घाईघाईने जात होती. टांगेवालेही स्टेशनचे पासिंजर घेऊन दौडत होते.

बापू आरामात चालत राहिले. बोलायला कोणालाही वेळ नव्हता.

पारावरच्या शनीला प्रदक्षिणा घालून ते राम मंदिरात गेले. दर्शन घेऊन बाजारपेठेतून ते टिळकचौकात आले. मध्ये लागणाऱ्या देवदेवतांना बाहेरून नमस्कार ते करत हाते. काही उद्योग नाही म्हणून त्यांनी तंबाखू मळली आणि गोळी अलगद तोंडात ठेवली. मुखरस सुटताच त्यांना बरं वाटलं, आपण माहिती काढायला रजेवर आहोत हे त्यांच्या लक्षात आलं.

ते रस्त्याच्या कडेकडेने चालले होते. तो समोर रावसाहेब भावे दत्त म्हणून उभे, 'काय मास्तर, आज काय रजेवर?' त्यांनीच विचारले.

'बरं झालं भेटलात. तुम्ही कचेरीकडे निघालात ना? मी येतो बोलत बोलत,' मास्तर.

'चला. काही आमच्या खात्यातलं काम आहे की काय? काय जमीन घेताय की काय?' रावसाहेब.

'काय चेष्टा करताय साहेब. गरीब मास्तर काय जमीन घेणार?

'का? अहो आता मुलं हाताशी आली. नाना चांगला रेल्वेत लागलाय, एखादा तुकडा जमिनीचा घेणे काही अवघड नाही.' रावसाहेब

'छे हो, शिरढोणला आहे त्या जमिनीची उस्तवारी होत नाही. भावकीतले लोक सांभाळताहेत म्हणून आपली म्हणायची. भाताचा दाणा काय गवताची काडीही कधी घेतली नाही. आणि करायचीय काय जमीन आपल्याला? तुम्ही म्हणालात तसे

परमेश्वरकृपेने मुलं हीच आपली संपत्ती, समाधान आहे.'

'अहो मग आमच्या खात्यातून काय माहिती पाहिजे?' रावसाहेब

'साहेब, मोहोन्याला कसलातरी कारखाना निघतोय. धूमधडाक्याने काम चालू आहे. जमिनी वगैरे कोणाच्या घेतल्या? गावकऱ्यांना भीती वाटतेय आपल्याही जमिनी जातात की काय? अहो ते पडले अडाणी. आम्ही आपली वासरात लंगडी गाय. त्यांनी मलाच चौकशी करायला सांगितली. म्हटलं, आपल्याशिवाय खात्रीची माहिती कोण देणार? म्हणून म्हटलं देवासारखे भेटलात.' भावे वास्तविक मामलेदार कचेरीत अव्वल कारकून होते.

'मास्तर, सगळं कायदेशीर काम आहे साहेबाचं. अहो सरकारच त्यांचे आहे. जंगलखात्याची जमीन होती, ती मिळवणं त्यांना सोपं. काही शेजारच्या जमिनी घेतल्या पण सगळं कायदेशीर. गावकऱ्यांना म्हणावं, काही काळजी करू नका. त्यांना काही धोका नाही आणि जोरजबरीने ती कंपनी कोणाचीही जमीन घेणार नाही. ह्याच्यापेक्षा जास्त माहिती मी देऊ शकणार नाही. अहो सरकारी कारभारात गुप्तता पाळायलाच लागते. सांगा तुमच्या गावकऱ्यांना. आणि आता तुम्ही कशाला उन्हाचं फिरताय? घरी जा. आराम करा.' रावसाहेब.

रावसाहेबांनी आपल्याला पद्धतशीर टाळलं हे न समजण्यासारखे मास्तर अडाणी नव्हते.

पण मिळालेली माहितीही पुरेशी होती.

बाकी कारखान्यात काय उत्पन्न होणार? रेयॉन म्हणजे काय? हे रावसाहेब तरी काय सांगणार!

ते परत फिरले. रमतगमत घरी आले. जेवणाची वेळ झालीच होती. रमेश जेवून शाळेत गेला होता.

बापू येताच सूनबाईंनी पाटपाणी घेतले.


मास्तरांचे निवांत जेवण झाले. दुपारी वामकुक्षीही अगदी गाढ झाली.

सकाळी उशिरा उठूनही दुपारी अशी झोप कशी लागली?

हं. मिळालेल्या माहितीच्या जोरावर ते समाधानाने मोहोन्याला जाणार होते. त्या समाधानातच ही वामकुक्षीही जरा लांबलीच.

रोज सहासहा मैल पायपीट करणाऱ्या मास्तरांना आरामाचाच थकवा आला. ते काही नाही उद्या आपण मोहोन्याला जायचेच. मास्तरांनी मनोमन ठरवले.

● ● ●



# प्रकरण दुसरे

नगीनदास फुलचंद चिनाई ॲण्ड कंपनी ही अस्सल रेशमाच्या व्यवसायातली फार मोठी कंपनी. त्यांना रेशीम किंग म्हटले जायचे. त्यांच्या पेढीवरून रमणभाई पटेल ह्या तरुणाला निरोप आला.

रमणभाईचा रेशीम धंद्याशी सुतराम संबंध नव्हता. त्यांच्या वाडवडिलांचा चिनाई कुटुंबाशी थोडा परिचय होता. रमणभाई तसा फारसा शिकलेला नव्हता. पण बांधकामाची छोटी मोठी कंत्राटे तो घेत होता.

उंच धिप्पाड शरीर, खणखणीत आवाज आणि कितीही तास उभे राहून कामगारांकडून काम करून घेण्याची जरब

आणि कसब.

चिनाईंकडे काय काम निघालं असावं? मुंबईतली सुबक घरं, प्रचंड इमारती बांधण्याचा काहीही अनुभव रमणभाईला नव्हता. त्याची धाव म्हणजे रस्ते बांधणं, गटारं, मोऱ्या, छोटे पूल असली कामं करण्याचा अनुभव त्याला होता. तोही गुजरातमधला. अजून मुंबईत तो स्थिरावला नव्हता.

नशीब काढायला गुजरात सोडून मुंबईला आलेल्या रमणभाईला वाटलं, चिनाईंचं बोलावणं म्हणजे त्याच्या दैवालाच असेल.

पत्ता शोधत तो चिनाईंच्या पेढीवर आला.

दारवानाने त्याला जीवनलालशेठच्या समोर उभे केले.

उंचपुऱ्या रमणभाईने मस्तकावरची हॅट काढून समोरच्या शेठला नमस्कार केला.

'रमणभाई एक काम आहे. करणार?'

'बोला तर खरं. जमण्यासारखं असेल तर करू'.

'अरे जमेल जमेल. तुझी सगळी माहिती मी काढली आहे. तू ते काम करू शकशील असा विश्वास आहे.'

जीवनलालशेठ अगदी पेढीवरच्या शेठसारखेच होते. डोक्याला टोपी. कपाळी उभे गंध, लांब कोट, तलम धोतर.

त्यांनी जागेवरून उठून रमणभाईंच्या खांद्यावर हात ठेवला.

'घाबरू नको. आपल्या विश्वासातला माणूस आम्हाला हवा होता. तो तूच आहेस. डिकरा, घरचं समजून काम कर.'

'पण काम सूं छे!' रमणभाईने मातृभाषेचा आश्रय घेतला.

'उतावळ ना कर डिकरा, बधु बतावु छू. अरे, कल्याणजवळ आपण एक फॅक्टरी काढतोय. प्लॅन बिन तयार आहेत. हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन, शाह ॲण्ड शाह, शापूरजी पालनजी सगळ्या कंपन्या कामाला लागल्या आहेत. अमेरिकन साहेबही कामाला आहेत. पण आमच्यातर्फे तू सिव्हिलच्या सगळ्या कामावर लक्ष ठेवायचं. काम वेळेतच संपलं पाहिजे. लढाई संपली आहे. बेकार माणसंही बरीच आहेत. त्यांना काम हवंच आहे. पण आपलं काम आपल्या कंपनीच्या नावाला शोभेल असं झालं पाहिजे. तुझ्यावर मोठमोठे शिकलेले साहेब इंजिनीअर असतील. पण आमचा माणूस तू.' जीवनलाल शेठनी आपल्यावर इतका विश्वास ठेवला, ह्याचंच नवल रमणभाईंना वाटलं.

'पण साहेब...'

'पण बीण काही नाही. पगार चांगला देऊ. तिकडे खूप घरं बांधायची आहेत. त्यात तुझंही घर असेल. काही चिंता करू नकोस. तू आम्हाला मुलासारखा. तुझ्या दादाजींपासून आपल्या कुटुंबाचा संबंध आहे. बोल, कधी जातोस?'

'आजच', रमणभाईने स्वभावाप्रमाणे तात्काळ निर्णय घेतला.

कंपनीचे लेटर घेऊन रमणभाई निघाला. मुंबईत तो एकटा जीव सदाशिव होता.

कल्याणला कसं जायचं. पुढे कुठे जायचं. सगळी चौकशी त्याने बाहेर मुनशींकडे केली.

खोलीवर जाऊन त्याने आपली पत्र्याची ट्रंक आणि वळकटी घेतली. त्याच्याबरोबर राहणाऱ्या मोहनभाईला दुकानावर जाऊन चावी दिली. आणि कल्याणला जात असल्याचं सांगितलं.

मोहनभाई कामात होता. त्यामुळे त्यानेही फारशी चौकशी केली नाही.

तो बोरीबंदर स्टेशनला आला. दुपारची वेळ होती त्यामुळे गर्दी अजिबात नव्हती. चौकशी करून तो कल्याण लोकलमध्ये चढला, खिडकीजवळची जागा मिळाली. ट्रंक आणि वळकटी त्याने रॅकवर ठेवली. हॅट मांडीवर घेतली आणि तो बाहेरचं निरीक्षण करू लागला.

गाडी धावत होती. एका तालात लोकल चालू होती. सांधे बदलताना फक्त खडखड आवाज यायचा.

रमणभाईच्या पापण्या जडावल्या, त्याला डोळा लागला. कल्याणला गाडी येऊन थांबली, कोणीतरी त्याला उठवले, कल्याण शब्द ऐकताच तो खडबडून जागा झाला. सामान घेऊन उतरला.

पुढे काय? मोहोने येथे कसे जायचे? प्रश्नांची भेंडोळी घेत तो मोडक्या तोडक्या हिंदीतून चौकशी करू लागला.

संध्याकाळ जवळ येत होती. इतक्या लांब नवख्या ठिकाणी जायचे कसे असा प्रश्न रमणभाईला पडला होता. चालण्याची त्याला सवय होती. तसा तो गुजरातमधला खेडूतच होता. कसाबसा मॅट्रिक होऊन, इंजिनीअरिंगमधलं जुजबी शिक्षण त्यानं घेतलं होतं. कष्टाचं त्याला काही वाटत नव्हतं. पण आता ट्रंक वळकटी घेऊन एकट्याने जाणं योग्य होतं का? तसं त्याला कंपनीने खर्चाला पैसेही बरेच दिले होते. विचार करत तो समोर दिसणाऱ्या रस्त्याने चालू लागला. लगबगीने घराकडे जाणारे चाकरमानी जात होते. मधूनच टांगेवाले आवाज देत, घोडे उधळत गावाकडे जात होते.

कुतूहलाने तो रस्त्याच्या बाजूला ट्रंक वळकटी ठेवून उभा राहिला. त्याने सहज मागे वळून पाहिले. तो विठ्ठलदास मॅन्शन नावाच्या एका चाळीसमोर उभा होता. तळमजल्यावर दुकाने होती. वरच्या मजल्यावर राहती कुटुंबे होती. दुकानावरील बहुसंख्य पाट्या गुजराती होत्या. रमणभाईला थोडा आधार वाटला. सामान घेऊन तो प्रवेशद्वाराजवळच्या पेढीशी आला. तक्क्याला टेकून, गादीवर मालक वाटणारी प्रौढ व्यक्ती बसली होती. गोरापान स्थूल देह. कोणाशीतरी गुजरातीतच बोलत होता. पलीकडे डेस्कवर खतावणी घेऊन दुसरा एक तरुण काहीतरी हिशेब लिहीत होता.

रमणभाई बराच वेळ उभा राहिला. कोणीही त्याची दखल घेत नव्हते. वरच्या मजल्यावर राहणारे लगबगीने लाकडी जिन्याने वर जात होते. त्यांच्या पायाचा आवाज कानी येत होता. रमणभाईंची नजर चाळीच्या मागच्या भागावर गेली. लाकडाच्या फळ्या व्यवस्थित उभ्या होत्या. कापण्याच्या प्रतीक्षेत मोठमोठे ओंडके पडले होते. पलीकडे सॉमिलचा काही भाग दिसत होता. लाकडाच्या भुशाचा प्रचंड ढीग जवळच होता. काहीजण तो भुसा पोत्यात भरून घेत होते. खांद्यावर भरले पोते टाकून, कारकूनाकडे पैसे देत ते जात होते.

ह्या भुशाचा हे लोक काय उपयोग करतात? इतक्या संध्याकाळी हे लोक का बरे भुसा नेत असावीत? रमणभाई स्वतःला प्रश्न विचारण्यात स्वतःची गरज विसरला होता.

इतक्यात डेस्कजवळच्या कारकूनाने चष्म्याच्या वरच्या भागातून डोळे उंचावून त्याला विचारले, 'केम भाय, शूं जोइये? शा माटे त्यां उभा छो?'

रमणभाई चमकला. त्याने 'जयश्रीकृष्ण', म्हणत मुनीमजीशी जवळीक केली. आता तो धीट झाला. नेहमीच्या मोठ्या आवाजात त्याने आपली अडचण सांगितली. गोऱ्यापान शेठचे लक्ष त्याच्याकडे गेले. 'अरे, डिकरा आ वक्ते मोहना जाओ छो! मूरख छो के.'

रमणभाईने जयश्रीकृष्ण करून त्याला वंदन केले. दिवे लागले. दिव्यालाही त्याने हात जोडले.

शेठनी त्याला बसायला सांगितले. रमणभाई तातडीने गादीच्या टोकाला नम्रपणे टेकला. पण त्याचे लक्ष बाहेर ओटयावर ठेवलेल्या आपल्या ट्रंक-वळकटीकडे होते.

शेठजी चाणाक्ष होते, 'जा लईने आव.' पडल्या फळाची आज्ञा घेऊन त्याने सामान जवळच ठेवले. कारकूनाने त्याला पाणी दिले. त्याला फार बरे वाटले.

'तो चिनाई सेठे तमने अय्यां मोकळ्यूं छे! सारूं. हवे एक करो. रातमा अय्यांच सुई जा. बाबू, एमनी चाय पानी, खाना बध्धी सगवड एक राते करजो. आपनो महेमान

छे. शू नाम बोल्यो!' त्यांनी विचारले.

'रमण पटेल, रमण.' रमणभाई उतावीळपणे उद्गारला.

'सारू. तो रमणभाई. तमे कांइ चिन्ता ना कर. सवारे आपणो ट्रक त्याँ जाय छे! सामान लईने, ते साथे तमे जाव. शूं - समज पडी'?

'हा, बहु बहु उपकार छे सेठ.' -रमण

'अरे, उपकार-अपकार कांई नथी. त्याँ मोटो काम चालू छे. मोटी कंपनी छे! तमेपण एक दिवस मोटो थई जशो. अमारी त्यारे ख्याल राखजो!' शेठ.

'शूं, मस्करी करो छो सेठ! आ दिवस हूं क्यारे पण भूली नथी जवानो.'

शेठजी उठले. चकचकीत जोडे घालून ते मागे गेले. मुनीमजीनी सामान आत ठेवलं.

बाबू मागच्या आवारात असलेल्या विहिरीवर रमणभाईला घेऊन गेला. रमणभाई फ्रेश झाले.

ते ज्याला मुनीम समजत होते. तो कारकून होता. मुख्य म्हणजे तो मराठी होता. तो सफाईदार गुजराती बोलायचा, लिहायचा. त्याने रमणभाईंना शेजारच्याच दुकानातून चहा मागवला.

मग दोघंही बाहेर पडले. बाबूही एकटाच रहात होतो. त्याच्या खोलीवर तो रमणभाईंना घेऊन गेला. त्याने स्वैपाकाची तयारी सुरू केली तेव्हा रमणभाई म्हणाला, आपण दोघंही बाहेरच जेवू ना. झोपायलाही मी इकडेच येईन, चालेल ना?'

बाब 'कशाला, कशाला' म्हणाला. पण त्याने रमणभाईंचे ऐकले. दोघेही खाणावळीत जेवले. चाव्या शेठकडे देऊन रमणभाईला स्वतःच्या खोलीवर नेण्याचे सांगून सामान घेऊन दोघे बाबूच्या घरी रात्रीच्या मुक्कामाला आले.

बाबूची खोली लहानच होती. जवळच गोशाळा होती. स्वच्छ होती पण सतत येणाऱ्या शेणाच्या वासाने रमणभाई तिथे अस्वस्थ झाला. तो देवभक्त होता. शेजारच्याच गोपाळकृष्णाच्या मंदिरात भजन चालू होते.

बाबूला भजनात रस नव्हता. त्याला शेणाच्या वासाची सवय होती. मुख्य म्हणजे शेठजीच गोशालेचे विश्वस्त होते. म्हणूनच त्यांची राहण्याची सोय झाली होती. लगेच पथारी टाकून झोपण्याऐवजी रमणभाई भजनाला जाऊन बसला. मराठी भजनं त्याला येत नव्हती. तरी टाळमृदंगाच्या नादात तो टाळयांची साथ करत राहिला. रात्री ११ वाजता भजन संपले. बाबूने दार लोटून घेतले होते. रमणभाई आत आला. कोपऱ्यातल्या मोरीवर स्वच्छ हात-पाय धुतले आणि पथारी अंथरून तो झोपला. मच्छरांची गुणगुण कानाशी होती. त्याला लवकर झोप येईना. कधी उजाडते आणि

आपण मोहोन्याला जातो असं त्याला झाले.

केव्हातरी त्याला डोळा लागला. तो जागा झाला तेव्हा उजाडले होते. गोशाळेतून झाडण्याचा, दुधाच्या बरण्यांचा आवाज येत होता. त्याला न समजणाऱ्या विचित्र हिंदीत गोशाळेचे कामगार बोलत होते, रस्त्यावरचे आवाजही वाढले होते.

बाबू शेगडीवर दूध गरम करत होता. दातण करता करता त्याने पाहिलं, शेगडी निराळीच होती. डब्यात लाकडाचा भुसा भरून ती शेगडी धगधगत होती. काल संध्याकाळी वखारीतून पोती भरून लोक भुसा का नेत होते ते रमणभाईच्या आता लक्षात आले.

बाबूने दुधातच चहा केला होता. छान दाट, गोड, रमणभाई खूष झाला. चहा पिऊन प्रातर्विधी आटोपून, विहिरीवर स्नान करून दोघेही खोलीवर आले. दोघांनी बादल्या भरून घरात आणल्या.

'बाबू, जरा फिरून येतो. आपल्याला वखारीवर केव्हा जायचं आहे?'

'जा, आरामात फिरून ये. मात्र चुकू नकोस', बाबू.

चुकतो कसला. तो काय लहान पोर होता. तो कपडे करून निघाला. एकच एक रस्ता होता. बहुतेक लोक स्टेशनकडे घाईघाईने निघाले होते. चहाची दुकानं, काही हॉटेलं उघडत होती. पण मोठी दुकानं बंदच होती.

चौकातच दातण विकणाऱ्या गुजराती बायका बसल्या होत्या. रमणभाईची सोय झाली. महिनाभर पुरतील इतक्या काड्या त्याने विकत घेतल्या.

खरं म्हणजे त्याला काही कपडे, बूट वगैरे घ्यायचे होते. पण दुकानंच बंद होती.

देवदर्शन घेऊन तो बाबूच्या खोलीवर आला. बाबूने नाश्त्यासाठी कुठून, कोणाला ठाऊक, पुरीभाजी आणली होती. ताजी गरमागरम होती, रमणभाई खूष झाला. नाश्ता झाल्यावर दोघेही वखारीवर आले. कुलूपाला नमस्कार करून त्याने पेढी उघडली. तक्क्याचे अभ्रे बदलले, गादीवरची चादर बदलली, मागच्या विहिरीवर जाऊन त्याने पिण्याचे पाण्याचे पिंप भरले. रमणभाई मदत करू पहात होता. पण बाबूने त्याला आरामात बसायला सांगितले.

इतक्यात हारांचा व्यवस्थित ढीग केलेले तबक एका हातावर तोलून, तुरूतुरू चालत एक पोरगा आला. त्याने पेढीवरल्या श्रीकृष्णाच्या तसबिरीला हार घातला. वाटीतल्या गंधाचा टिळा त्याने तसबिरीला लावला, पाठोपाठ बाबू आणि रमणलाही त्याने टिळा लावला अन् तो दुसऱ्या दुकानांकडे निघाला. एक शब्दही न बोलता सगळा कारभार रमण पहातच राहिला.

थोड्या वेळात पेपरवाल्या पोराने 'मुंबई समाचार'ची घडी पेढीवर भिरकावली.

बाबूने ती रमणभाईकडे दिली. 'वांचो' तो म्हणाला.

रमणभाईने पेपर चाळायला सुरुवात केली. बऱ्याच दिवसांत इतक्या निवांतपणे त्याने पेपर वाचलाच नव्हता. घरी 'गामडामा' तो पेपर येतच नव्हता. गरजही नव्हती.

काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या सुटकेच्या बातम्या होत्या. मोठे पुढारी आधीच सुटले होते. पण गावोगावचे बरेच अज्ञात सत्याग्रही गटागटाने सुटत होते. रमणभाईला आनंद झाला.

लवकरच भारताला स्वातंत्र्य मिळण्याची शक्यता होती. पण जिनांनी पाकिस्तानाचा हट्ट धरला होता. अनेक बैठकी होत होत्या, पण निर्णय होत नव्हता. मुंबईत आणि कित्येक शहरांत हिंदू मुसलमान दंगे सुरू होते. त्याच्या ठिकठिकाणच्या बातम्या वाचून रमणभाई खिन्न झाला.

इतक्यात शेठजी आले. त्यांनी श्रीकृष्णाच्या तसबिरीला नमस्कार केला, 'केम रमणभाई, नाश्तापाणी थयो के नथी?'

बाबूनेच उत्तर दिले, 'सारू.'

'आपला ट्रक जाईल तेच्या संगत तू जा.'

रमणभाईने मान डोलावली. शेठजींनी पेपर उचलला आणि वाचायला सुरुवात केली.

आजूबाजूची दुकानेही उघडत होती.

'सेठ, कांई खरेदी करवूं छे. थोडीवार बजारमा जईने आवुं के.'

'अरे जा जा. बाबू तमे पण एमने मदत करजो,' शेठ फारच प्रेमळ होते.

बाबू आणि रमणभाई बाहेर पडले. रेडीमेड कापडाची दुकानं उघडत होती. ते एका दुकानात गेले. रमणभाईच्या मापाची गंजी शोधण्यात वेळ गेला. त्याने जोडी घेतली, पंचा घेतला, रुमाल घेतला.

चपलांचे दुकान उघडले होते. रमणभाईने बूट दाखवायला सांगितले. त्याच्या पायातले बूट झिजले होते. अजून काही दिवस चालले असते. पण आपण कंपनीचे खास साहेब म्हणून जातो आहोत ह्या जाणीवेने त्याने चांगले टिकावू बूट घेतले.

तासाभरात ते परत पेढीवर आले, तो वखारीत ट्रक भरून तयार होता. रमणभाईने आपले सामान उचलले. ट्रकमध्ये टाकले. ड्रायव्हरच्या शेजारच्या सीटवर तो बसला. ट्रक सुरू झाला. बाबूला हात हालवत निरोप देत रमणभाई निघाला. नव्या कर्मभूमीकडे.

गावातला रस्ताही धड नव्हता. गावाबाहेर ट्रक डावीकडे वळला. हा रस्ता तर नावालाच होता. तसेच धडधडत ट्रक जात होते. धूळ उडत होती. एक छोटेसे गाव

लागले. आजूबाजूला धानाची शेती होती. कापणी होऊन ढिगारे पडले होते. नदीवरचा पूल ओलांडून ट्रक एका रेल्वे गेटशी थांबला. मुंबईकडे जाणाऱ्या आणि मुंबईहून येणाऱ्या गाड्या येत जात होत्या. त्यामुळे गेट बंद होते. गेट उघडताच ट्रक निघाला. उजवी-डावीकडे वळत ट्रक चालत होता. खड्डे इतके होते की रमणभाईसारख्या तगड्या माणसाचेही अंग ठेचकाळून आंबून गेले.

बऱ्याच छोट्या गाड्या रेल्वेच्या केबिनजवळ उभ्या होत्या. त्यातले साहेबलोक पायीच रस्ता तुडवत जात होते. उजवीकडे एक गाव वसलेले दिसले.

ट्रकसारखी उंच वाहनं दामटत पुढे चालली होती.

सावकाश ट्रक एका शेडसमोर उभा राहिला.

रमणभाई उतरला. शेडच्या एका बाजूला दोनचार टेबले टाकून साहेब, कारकून बसले होते.

पहिले वॉचमनने चौकशी केली. पत्र पाहिले आणि टेबलाकडे बोट दाखवले. पत्र घेऊन रमणभाई त्या टेबलाशी गेला. एक गोरापान, तरतरीत नाकाचा, माणूस ब्ल्यू प्रिंट पसरून काहीतरी पहात होता. रमणभाईने हॅट हाती घेऊन, 'गुड मॉर्निंग' म्हटले. साहेबाने वर पाहिले. 'येस', तो गुरगुरला.

रमणभाईने पत्र पुढे केले. साहेब उभा राहिला. 'वेलकम, वेलकम, मि. रमण पटेल.' पत्र पाहताच साहेबाच्या वागण्यात चमत्कार झाला. त्याने बसायला खूण केली. जारमधले पाणी दिले आणि मोठ्या उमेदीने पहात, आपल्या पारशी, गुजराती इंग्रजीत धडाधड माहिती सांगू लागला.

रमणभाईचं इंग्रजी बेताचं. त्याने गुजरातीत बोलायला सुरुवात केली. गप्पा रंगल्या. शापूरजी पालनजी कंपनीच्या पेस्तनजी आणि एनआरसीचा रमणभाई यांची पहिल्या दृष्टीभेटीतच दोस्ती जमली.

● ● ●

# प्रकरण तिसरे



कधी नव्हे ते मास्तर आजारी पडले. दुखणं तसं गंभीर नव्हतं. हिवतापाने त्यांना गाठले होते. एक दिवसाआड थंडी वाजून ताप येई. सरकारी दवाखान्यातून मुलं औषधं आणून देत हाते. घरगुती काढे आणि औषधांचाही मारा चालूच होता. गावातले नामांकित पंढरीनाथ वैद्यांच्या पुड्या ते नित्यनियमाने घेत होते.

सुदैवाने ताप थांबला, अशक्तपणा होता. पण शाळेत रूजू होण्याला मुलांचा विरोध होता. त्यांच्या बदली एक शिक्षक बोर्डाने नेमला होता. पण तो आल्या दिवसापासून जाण्याच्याच गोष्टी बोलत होता. तरुण होता, त्यामुळे दुसरीकडे नोकरी मिळण्याची त्याला आशा होती. त्याची खटपटही चालूच होती.

अधूनमधून मोहोन्याचे गावकरी येऊन भेटत होते. कारखान्याच्या कामाच्या प्रगतीविषयी बोलत असत. शेडच्याजागी आता मोठे बांधकाम बरेच वर आले होते.

प्रचंड यंत्रे बसविली गेली होती.

जमिनीभोवती कंपाऊंड उभे झाले होते. ठिकठिकाणी खाकी ड्रेसातले उंचेपुरे वॉचमन रात्रंदिवस पहारा देत असत.

मास्तरांना आता घरी पडून राहण्याचा कंटाळा आला होता. तब्येतही बरी होती. त्यांनी नोकरीवर रुजू होण्यासाठी अर्ज केला. सरकारी डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना सर्टिफिकेट दिले.

बाळू, नाना, सूनबाईने मोहोन्याला रहायचे नाही या अटीवर जायला परवानगी दिली. मास्तरांनाही आता इतके चालणे शक्य नव्हते. पण सखारामसारखा एखादा ड्रायव्हर त्यांना मदत करील असं त्यांना वाटलं.

आणि योगायोग असा की गोशाळेतला बाबू त्यांना एक दिवस गोपाळकृष्णाच्या मंदिरात भेटला. त्याने रमणभाई पटेल म्हणून एक इंजिनीअर मोहोन्याला आला आहे. त्याला आमच्या शेठनेच ट्रकमधून मोहोन्याला सोडण्याची व्यवस्था केल्याचे सांगितले.

गोशाळेचे विश्वस्त भगवानदास यांना मास्तर ओळखत होते. तेही मास्तरांना मानत असत. वसूबारसला 'गोदान'साठी निधी गोळा करण्यात मास्तर नेहमी मदत करत असत. त्यांच्या पिशवीत एक पावती पुस्तक नेहमी असे. शिवाजी गोशाळेचे नाव गावातल्या मध्यमवर्गीय लोकांमध्ये मास्तरांमुळेच पोहोचले होते, ह्या कामी बाळू आणि नानाचाही त्यांना फार उपयोग होत होता.

तो शनिवारचा दिवस होता. जवळच्या मारुतीचे, देवीचे भक्तिभावाने दर्शन घेऊन ते भगवानदासांकडे निघाले.

पेढीवर बाबू होताच. भगवानदासही कोणाशीतरी गुजरातीतून बोलत होते. त्यांचे मास्तरांकडे लक्ष गेले. 'काय मास्तर आज सकाळीच दर्शन दिले? तब्येत ठीक आहे ना? शाळाबिळा चालू आहे ना?' त्यांनी विचारले.

'शेठजी, हिवतापाने फार त्रास दिला. आता बरा आहे. रजेवर होतो. आता रुजू होण्याचा विचार आहे. म्हणूनच तुमच्याकडे आलो', मास्तर.

'काय मजाक करते. मी काय स्कूल बोर्डचा मेंबर आहे? मी काय करणार?' शेठ.

मास्तरांनी हात जोडले. तुम्हीच मदत करू शकाल. मोहोन्याला तुमचा ट्रक रोज जात-येतात असं ऐकलं.' मास्तर.

'हा. चोक्स'

'आता वयही झालं शेठ. तुमच्या ट्रकने मला जाण्यायेण्याची परवानगी द्या.

इतकीच विनंती.' मास्तर नम्रपणे म्हणाले.

'अरे, अरे मास्तर पगे ना लागो. तमारू काम थई जशे! एमा शू?'

शेठजींनी खरोखरच व्यवस्था केली. बाबूला सांगून ठेवले.

'सोमवारे सवारे आवजो. सोमवारथी तमे रजू थइ जाव.' शेठ.

मास्तरांनी पुन्हा नमस्कार केला. मोठ्या खुषीत ते घरी आले. रविवारी मुलांना नवीन व्यवस्था सांगितली.

मास्तरांची हजेरी गाववाल्यांना खूष करून गेली. नवा मास्तर मध्येच गायब झाला होता. तलाठ्याने रुजू झाल्याचं पत्र घेतलं. ते शिक्षण खात्यात पोहोचवण्याची व्यवस्था केली.

मुलांची हजेरी वाढली. शाळा व्यवस्थित मार्गी लागली. आता मास्तर वस्तीला नसत त्यामुळे शाळेच्या चबुतऱ्यावरच मंडळींचा फड जमू लागला. मास्तर शाळा लवकर सोडू लागले.

कारखान्याची प्रगती पाहून ते थक्क झाले. कंपाऊंडच्या आत मोठे रस्ते आखलेले दिसले. दुतर्फा झाडं लागली होती. रेल्वे गेटपासून कारखान्यापर्यंत रांगेने झाडे लागली होती, रस्ता सुधारला होता.

पण अजूनही काय माल निघतोय, तो रेयॉन असतो तरी कसा हे त्यांना माहीत नव्हते. उत्पादन सुरूही झाले नव्हते. सुरुंगाचे आवाज, जमीन सपाट करणारी यंत्रे, रस्त्याचे रोड रोलर यांचे आवाज दिवसभर येत असत.

मास्तरांप्रमाणे गाववाल्यांचीही सोय झाली होती. त्यांनाही ट्रकवाले कल्याणपर्यंत घेऊन जात. आता ड्रायव्हर लोकांच्या ओळखीही झाल्या होत्या. रमणभाई म्हणून आलेला साहेब सज्जन होता. त्यानेच सगळ्या ड्रायव्हरना गाववाल्यांना मदत करायचा 'हुकूम' दिला होता.

गावभर रमणभाईचे नाव होते. मास्तरांचीही रमणभाईंना भेटायची इच्छा होती.

एक सकाळ विचित्र उगवली.

सगळे गाव अंधारात होते. कारखान्यात फक्त दिवे लुकलुकत होते.

नदीच्या बाजूला सकाळच्या अंधारात बहिर्दिशेला घोळक्याने जाणाऱ्या बायका घाबरून पळत घराकडे आल्या. त्यांच्यापैकी एका मुलीला झुडपाआड एक मुंडके दिसले. ती किंचाळलीच. सगळ्या आपाबाया विधी उरकून धावल्या. पाटलांची पोर सुसाट गावाकडे धावत होती.

शेवटी सगळे गावात पोहोचले. पाटलांची पारू कशीबशी घरी पोहोचली. आजी,

आईने तिला स्वच्छ केले. पण ती तापाने फणफणली होती.

सगळ्या बाया, बापे पाटलाच्या घराशी जमले. पारूने मुंडके पाहाल्याचे कळले. ते मुंडके होते कोणाचे? बकरीचे की...

पारू बरळत होती. ते मुंडकं कोणातरी पोरीचं होते. कपाळ कुंकवाने माखले होते. लांब सुटलेले केस रक्ताने बरबटले होते.

एक म्हातारी पुढे आली. तिने घाईघाईत पत्रावळीत भात, लिंबू, गुलाल ठेवून पारूवरून उतरवला. ती लांबवर फेकायला तरातरा निघून गेली.

येतांना बडबडतच आली. 'मेल्यांनी पोरीचा बळी घेतला, त्येंचं वाटुळं व्हइल.'

उजाडलं तशी बाप्ये माणसं गटागटाने मुंडकं शोधायला बाहेर पडले. रेल्वे पुलाजवळच्या पालातून माणसं धरणाच्या कामाला निघाली होती.

'काय मानसं हत का राकेस. इतला जीव ग्येला आन् हेना काम सुचता,' ते बडबडत होते.

पण मुंडकं कुठेही गावेना. सगळे तसेच परत आले. मास्तर असते तर बरं झालं असतं. त्यांचे डोळे मास्तरांकडे लागले. आता मास्तर ट्रकने येतात. कधा येतात काय जानं?

नेहमीप्रमाणे मास्तर आले. पाठोपाठ गाववालेही जमले. एक पोरगा घंटा बडवायला धावला. सरपंचांनी त्याला रोकला. आज शाळा बंद. त्ये कोन म्येलं ते समजल्याबिगर शाळा न्हाई.

'मास्तर घात झाले. कोण मेलं? कसं मेलं?' त्यांनी विचारलं.

'मास्तर एका पोरीचा धरन बांधन्यासाठी बली दिला ह्या कंपनीवाल्यानी.'

'कोणाचा?' मास्तर.

'त्ये काय ठाव न्हाई. पाटलांची पारू सकाळी संडासला ग्येली व्हती. तिनं कुंकू लावलेलं पोरीचं मुंडकं बघतलं',

'पण गावातली कोणी पोरगी बेपत्ता आहे का?' मास्तर.

'नाय. चवकशी क्येली. गावातलं कोनी न्हाई. ह्या पालातली अंडूगुंडू पोरगी असंल.'

'पण ते लोक तर कामालाही लागले.' - मास्तर.

'हा, तेबी आमी बघतलं'. सरपंच पुढे झाले, 'मास्तरा तू त्या रमणभाईला भेट. आन् चवकशी कर.'

मास्तरांना रमणभाईची ओळख करून घ्यायचीच होती. गोशाळेच्या बाबूनं तो देवमाणूस असल्याचं सांगितलं होतं.

पोरं घरी गेली. मास्तर रेल्वे लाइनीने कारखान्याकडे निघाले.

सगळी गडबड चालू होती. सिमेंट खडीची यंत्रं गरगरत होती. घमेली डोक्यावर घेऊन बाया-बाप्ये धावत होते. मुक्रादमाचा आरडाओरडा चालू होता.

इतक्यात पांढरे कपडे, हॅट घातलेल्या एका उंच धिप्पाड माणसाकडे मास्तरांचं लक्ष गेलं. तेच रमणभाई असावेत. मास्तर तुरूतुरू पुढे गेले. वॉचमनने त्यांना अडवले. त्यांनी रमणभाईकडे बोट दाखवले. रमणभाईंचेही मास्तरांकडे लक्ष गेले, ते मास्तरांना भेटायला पुढे आले.

'मी फडके मास्तर. देवळातल्या शाळेत शिकवतो.' मास्तर.

'खबर छे! बहु सांभळ्यु छे. शुं काम छे?' रमणभाईंनी विचारले.

तिथल्या यंत्रांच्या आवाजाच्या गोंधळात मास्तरांचा आवाज रमणभाईंपर्यंत पोहोचेना. ते वॉचमनच्या चौकीकडे मास्तरांना घेऊन आले. वॉचमनने सलाम केला. त्याला दोन ग्लास च्या आणायला रमणभाईंने सांगितले.

वॉचमन तत्परतेने कँटीनकडे निघाला. आता टपरी नव्हती. कँटीन झाले होते.

मास्तरांनी बळीविषयी विचारले. रमणभाईंने हसण्याचा गडगडाट केला. 'मास्तर तमे पण... अरे, असा कायबी झाला नाय. हे गाववाले कायबी गप उठवतात.' रमणभाई.

'धरण उभं राहताना बळी द्यावा लागतो असं म्हणतात.' मास्तर.

'अरे, असा कायबी नसते. ते काय फत्तर आहे काय? आमची मानसं कामालाबी लागली. पुलावर पोलिसपण असतात. असं कसं माणसाला मारता येईल? हूं शां माटे काम करूं छू? चिंता ना कर.' रमणभाईंने धीर दिला.

चहा पिऊन मास्तर निघाले, गावाकडे जातात तर पोलिसांच्या निळ्या गाड्या येत होत्या.

पोलिसांनी धडाधड चौकशी सुरू केली. गाववाले घाबरून गेले. काही पोलीस कारखान्याच्या हद्दीत गेले. तिथेही साहेबांना भेटले.


पारूकडून त्यांनी माहिती काढण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या बोलण्यात ताळतंत्र नव्हतं. ती घाबरलेली होती.

सगळीकडे चौकशी करून पोलीस अधिकारी चावडीवर आले. सरपंच, तलाठी, मास्तर, गावातले म्होरके सगळे जमले.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, 'कोणाचाही बळी गेलेला नाही. कंपनीचे काम सगळं कायदेशीर आहे. धरणाने तुमचासुद्धा फायदा होणार आहे. उगीच अफवा उठवू नका. अफवा पसरवू नका. तो गुन्हा आहे हे ध्यान्यात घ्या. जावा आपल्या

कामाला. मास्तर, अहो तुम्ही तरी शहाणं करा यांना. तुमच्या शब्दाला मान आहे. आम्हाला ठाऊक आहे. अहो, तुम्ही आजारी होता तर दुसऱ्या मास्तराला यांनी काम नाही करू दिले. फडके मास्तरच पाहिजे म्हणून गावचा हट्ट. तेव्हा तुम्ही युक्तीयुक्तीने समजवा. आणि काही लागलं तर कधीही ऑफिसला या, रावसाहेब भाव्यांच्या बाजूलाच आमचं ऑफिस आहे.' मास्तरांना एक लेक्चर झोडल्याचं समाधान पोलीस अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर होतं.

• • •



# प्रकरण चौथे

फौजदाराने कितीही मिशीवर पीळ देऊन दम भरला असला तरी गावकऱ्यांचं समाधान झालं नव्हतं. बळी नव्हता तर पारूने पाहिलेले, मळवट भरलेले मुंडके कोणाचे होते? मग त्या पोरीचे धड कुठे गेले? आपण लगेच शोधायला गेलो तर मुंडकेही नाही अन् धडही नाही. कशाचा काही पत्ता नव्हता. ज्या आठोशाला पारू गेली होती तिथलं गवतही आडवं झालं नव्हतं. हळद कुंकवाची, अबीर गुलालाची कुठं खूणही नव्हती.

आणि पोलिसांनी इतक्या थोड्या वेळात तपास करून छातीठोकपणे कसे सांगितले बळीबिळी काही नाही.

गावात चोरट्या आवाजात गटागटाने लोक कुजबूजत राहिले.

मास्तर शाळा भरवू लागले. पण पोरांची हजेरी खूपच कमी झाली होती. जबरदस्तीने आणायला पोरंही तयार नव्हती आणि गावतले लोकही पोरांना शाळेत पाठवण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

मास्तरांना हा एक नवाच उद्योग होऊन बसला. रोज घरोघर जाऊन ते बाया बापड्यांना पोरांना शिकवायला पाठवा म्हणून गयावया करत होते.

'मारतरा, आता आमची पोरं शिकून कुठं बालिष्टर व्हायची हायेत? नको तू डोकफोड करू. येतील त्यांना शिकव.' गावकरी.

'आमचं समाधान झाल्या बिगर आमी काय पोरांना जबरीनं बाहेर पाठवणार नाही.' सरपंच.

'अहो पण मुलं घरात तरी कुठं असतात. तुम्ही तुमच्या कामात गुंतलात की पोरं पार नदी पोत्तर जातात. मी स्वतः कितीतरी पोरांना नदीत डुंबताना पाहीलंय. गायी गुरामागं पोरं उंडारत असतात. त्यापेक्षा शाळेत माझ्या नजरेखाली राहू द्या. काय चार शब्द कानावर पडतील ते पडू द्यां'. मास्तर.

सरपंचांना, गावकऱ्यांना मास्तरांचं म्हणणं पटत होतं. पण आता घरातून, बायकांतून नवीच शंका आली होती. हा करणीचा प्रकार असला पाहिजे. येकडाव भगताला बोलावून पूजा बिजा करावी. त्यो काय म्हनतो ते चार पायाचं, दोन पायाचं, द्येवाला द्यावं आन् गावावर आलेली ही बला घालवावी हा विचार पक्का झाला होता.

गावात वर्गणी पण घरटी बसवली होती. सगळा मामला गुपचूप होता. फौजदारापर्यंत हे प्रकरण पोहोचू नये म्हणून. आजकाल मास्तरांपासून सगळं गाव हळूहळू दुरावलं होतं. तरी गावाचा बेत मास्तरांच्या कानावर आलाच होता.

मास्तर नियमाने येत. येतील त्या पोरांना मन लावून शिकवत. शाळा सुटली की ते कंपनीच्या हद्दीत जात. आता वॉचमन त्यांना अडवत नसत.

त्यांचे रमणभाईशी चांगले सूत जमले होते. पण रमणभाईबरोबर सारखे चालावे लागे. हा माणूस थकत कसा नाही. कारखान्यापासून नदीपर्यंत दिवसातून त्याच्या किती खेपा होत. त्याच्या हातात एक सायकल असायची पण तो त्यावर बसलेला मास्तरांनी कधी पाहिला नाही.

बांधकामासाठी तात्पुरती पाइपलाईन टाकलेली होती. छोट्या पंपाने नदीतले पाणी खेचून आणलं होतं. पण वाढल्या कामाला हे पाणी पुरणार नव्हतं. पावसाळ्याच्या आत धरणाचे बांधकाम पुरे करण्याचे कंत्राट होते. शेजारीच एक मोठी विहीर खोदणं चालू होतं. त्यावर बसवण्यासाठी मोठे पंप येऊन पडले होते.

'तसं नाही, रमणभाई, मुलगा नुकताच नोकरीला लागलाय. तो हुशार आहे. पण बहुतेकवेळ घराबाहेरच असतो. तो संघवाला आहे.' मास्तर.

'संघवाला एटले?' रमण.

'आरएसएसचा कार्यकर्ता आहे. त्याचं काही खरं नाही. मुख्य म्हणजे मला गावाची, पोरांची काळजी आहे. शिकले तर उद्या तुमच्याच कंपनीत लागतील. पण गावात सगळीकडे गोष्टी चालू आहेत. भगताला बोलावून तंत्रमंत्राने पूजा करून करणी उलटवायची.' मास्तर.

'करू दे ना पूजा बिजा. तेमधी काय वांधा नाय. तेंचा संतोष झाला की आपलं पण काम होईल.' रमणभाई.

'कसला संतोष, कसल्याही दगडाधोंड्याला देव म्हणतात. उद्या भगताने कोंबडं, बकरं द्यायला सांगितलं तर त्याला यांची तयारी, का त्यांना जीव नाही?'

'मास्तर तुमी तर बापूसारखे बोलायला लागला?'

'मी बापूच बोलतोय.'

'अरे, हे तो मझाच झाला. अरे मी बोलतो बापू एटले महात्मा गांधी'. ह्यात काही विनोद नसतानाही रमणभाई गडगडाट करून हसला. अंधार पडत होता. रमणभाईने हात दाखवताच ट्रक थांबला. मास्तर ड्रायव्हरजवळ बसले. मोहोन्याकडे जाणाऱ्या ट्रकने रमणभाई परतले.

मास्तरांनीही गाववाल्यांचं मनावर घ्यायचं नाही ठरवलं आणि नित्याप्रमाणे कामात मन रमवू लागले.

एका सोमवारी मास्तर नेहमीच्या वेळेवर शाळेत आले. नेहमीप्रमाणे गावाला वळसा घालून ते देवळात आले. नाहीतरी गाववाले त्यांच्याशी मोकळेपणाने बोलत वागत नव्हते. मग त्यांनी तरी पर्वा का करावी.

देवदर्शन घेऊन बाहेर ओट्यावर येऊन ते उभे राहिले. मुलांचा पत्ता नव्हता. आता घड्याळ पाहायलाही ते गावात जायला राजी नव्हते. त्यांनी अंदाजाने खुंटीवरचा तास काढला आणि लाकडी हातोड्याने तास बडवला.

पाच-दहा मिनिटे झाली तरी कोणी फिरकले नाही. आता मात्र मास्तरांना काळजी वाटू लागली.

लांब गावाबाहेरच्या माळरानावर त्यांना गर्दी दिसली. सगळे गाव तिकडे लोटले होते की काय? शेवटी न राहून मास्तर गावात फेरफटका मारायला गेले. काही जख्ख म्हातारी माणसं तेवढी दिसत होती.

त्यातल्या एकाला त्यांनी विचारलं, 'काय पाटील, सगळे गेले कुठे? शाळेची घंटा ऐकू आली नाही काय कोणाला?' त्या माणसाला काही ऐकू येत नव्हते. पण घरातली एक पोटुशी बाई बाहेर आली, म्हणाली, 'मास्तर, तुमास्नी ठावे न्हाइ व्हय! अवं... आज माळावर गावातर्फे पूजा आहे. भगताने दिवस दिलाता. आज समद्या गावाला उपास हाय. रातच्याला भगताची पूजा आटोपली की गावजेवण.'

माघातली आमावस्या जवळ आल्याचे त्यांना आठवलं. हा तुटका दिवसच भगताला मिळाला का?

ते विचार करत माळरानाकडे निघाले. निसर्गानेच सपाट केलेले हे माळरान दिवाळीत दरवर्षी फुलायचे. बलिप्रतिपदेला बैलगाड्यांच्या शर्यती असायच्या. पंचक्रोशीतून शेतकरी आपल्या बैलगाड्या घेऊन येत. स्वतःपेक्षा बैलांनाच नटवलेलं असायचं. माळ गच्च भरलेलं असायचं. माणसांनी फुललेलं असायचं. कित्येक वेळा मास्तरांच्या हस्तेच बक्षिसं दिली जायची.

पण आज मास्तरांना कशाचा पत्ताही नव्हता. तरी ते लोचटपणे माळावर पोहोचले.

माळावर पोहोचताच गावपुढारी पुढे आले. रामराम झडले. कोणीतरी मास्तरांना बसायला खुर्ची दिली. कोणी पाणी दिले, कोणी चहा दिला.

'काय आहे मास्तर, तुमचा काय इस्वास नाही. तवा तुम्हाला पत्याच लागू दिला नाही. भगतानं ह्योच दिवस दिलता. टिटवाल्याच्या जोशानंदी ह्योच दिवस दिला. अेकडाव गावावरचं संकट लवकर टळावं म्हणून घाई घाई ठ्येत केला.' सरपंच सांगत होते. पण मास्तरांचं लक्ष मांडवाकडे होते, मोठा मांडव टाकला होता. खांबाखांबावर नारळाच्या झावळ्या लावल्या होत्या.

इतका मोठा मांडव बांधायला जमलं कसं ह्या अडाणी गावकऱ्यांना? 'अरे एवढा मोठा मांडव...?' मास्तर विचारणार तोच सरपंच सरसावले. 'तुमच्या रमणभाईंनेच करून दिला. लई ब्येस मानूस हाय. काय कमी न्हाई पडू दिलं. रातच्याला लाइट बी दिली हाये. चला पूजा बघायला चला.'

पाच-सहा पुढाऱ्यांबरोबर मास्तर पूजास्थानी आले.

चांगला ओटा केला होता. शेणाने सारवला होता. मागच्या बाजूला देव-देवतांच्या तसबिरी लटकत होत्या. समोर यज्ञकुंड होते. त्याच्यावर रांगोळी, हळद, कुंकू, गुलाल, बुक्का टाकलेला होता. बाजूला नारळ, फुलं यांचा ढीग होता.

'आज रातच्याला वस्तीला न्हावा मास्तर. बघा कसा येव येनार हाय. लई पावरफुल भगत हाये. पार नांदकरच्या पल्याडचा हाये.

दिवसभर त्यो जप करत कोंडून घेऊन बसला आहे. रातच्या संचाराची येल आली की हितं उगवंल,' गावपुढारी म्हणाले.

मास्तरांनाही उत्सुकता वाढली होती, पण घरी सांगितले नव्हते. आजारी पडल्यापासून पोरं काळजी करतात. त्यांनी अडचण सांगितली.

'काय फिकीर करू नका. रमणभाईला सांगितलं की तो चिठी पाठवील. चिठी लिहून द्या, आमी रमणभाईला सांगतो.' गाववाला.

इतक्यात सायकल खडखडवत रमणभाईच तिथे आले.

गाववाल्यांनी रामराम घातले. मास्तरांची अडचण सांगितली.

'ए मा शूं? हमणाच माणस मोकल्यू छू. मास्तर तुमी चिंता ना कर. आजे मारे त्या आवो. मारो महेमान करीने.' रमणभाईचा शब्द मोडवेना.

मास्तरांनी चिठी लिहिली. रमणभाईना दिली. त्यांनी पूजास्थान पाहिले. 'केम पाटील साहेब, सगळा चोकस छे ने. मास्तर तमे चालो मारे साथे. आपण रातच्या टायमाला येऊ. समद्या गावाला उपवास आहे...' रमणभाई.

'मी डबा आणलाय रमणभाई,' मास्तर.

दोघेही कारखान्याकडे निघाले.

शाळा नसल्याने मास्तरांना काही सुचत नव्हते. रमणभाई आपल्या कामाला गेला.

मास्तरांनी कारखान्याच्या आवारात फेरफटका मारला. सगळीकडे बांधकाम चालू होते. रस्त्याचे काम चालू होते. प्रचंड विहिरीसारखे एक बांधकाम चालू होते. मास्तरांनी तिथल्या साहेबाकडे चौकशी केली. पाणी शुद्ध करण्याची ती टाकी होती.

कारखान्याला शुद्ध केलेले पाणी काय करायचे, हा प्रश्न मास्तरांना पडला. रेल्वेच्या पलीकडे अटाळी गावातूनही नदीपर्यंत पाइप टाकणे चालू होते.

ह्या नदीत पाणी कमी होते. दोन्हीकडच्या नद्यांमधले पाणी घेऊन करणार काय हे कारखानावाले?

संध्याकाळी रमणभाईच्या तात्पुरत्या खोलीकडे ते गेले.

रमणभाई थोड्याच वेळात आले. 'काय मास्तर डबा खाल्ला का नाय?'

मास्तरांनी डबा उघडलाही नव्हता. अख्खा गाव उपास करणार असताना आपण कशाला जेवायचे, ह्या विचाराने डबा तसाच होता. तो देवळातच होता.

रमणभाईने पण उपास केला होता. तोही भाविक होताच. त्याने श्रद्धेनेच उपवास केला होता.

रात्री रमणभाईबरोबर मास्तर माळरानाकडे निघाले. जाताना गप्पा मारताना

त्यांनी सहज विचारलं, 'दुसऱ्या नदीपर्यंतपण पाइपलाईन टाकलेली पाहिली, तिकडूनही पाणी घेणार आहेत?'

'ना रे बाबा, तेचा काय हाय, आपली फॅक्टरी चालू झाली की खराब झालेले पाणी, त्यातले केमिकल वगैरे काढून त्या नदीत सोडणार, तसा कायदाच आहे.'

मास्तरांना काही कळले नाही, ते गप्पच राहिले. माळावर ते पोहोचले तेव्हा पूजा सुरू झाली होती. भगताने त्याचे देव मांडले होते.

तोंडाने तो काहीतरी पुटपुटत होता. ओट्यावर सगळे पूजासाहित्य पसरले होते.

कपाळाला हळद कुंकवाचे फराटे मारलेला, आपल्या जटा मोकळ्या सोडलेला, ओलं नेसलेला भगत घुमू लागला. त्याने यज्ञकुंडातला अग्नी भडकवला. मोरपिसाच्या पंख्याने तो वारा घालत होता. मध्येच फाटी टाकायला मदतनीसाला सांगत होता.

एकाएकी तो वेगाने घूमू लागला. वाघासारखी डरकाळी त्याने फोडली. पोरं बाळंच काय मोठी माणसंही त्याचा अवतार पाहून घाबरली.

'आला संचार आला, देव आला.' गाववाले एकमेकांना सांगू लागले. सरपंचांनी पुढे येऊन अवसर आलेल्या देवाची पूजा केली. बायांनी दिवे ओवाळले.

'देवा, गावावर काय बला, संकट येऊ देऊ नको महाराजा, गावावर कृपा करावी.' सरपंच.

भगताने पुन्हा आरोळ्या ठोकल्या. 'चार पायाचे देवाला द्या. त्या बिगर त्यो ऐकनार न्हाई.'

'व्हय म्हराज, जा रे आना ते चार पायाचं.' सरपंच.

पाच-सात जण सरसावले. मांडवाच्या मागे बांधलेला बोकड केविलवाणा ओरडत होता.

आंघोळ घातलेला बोकड चारजणांनी ओढत आणला. त्याचं माथं हळद कुंकवानं माखलं होतं. पाठीवरही पट्टे ओढले होते.

ते बिचारं जनावर समजलं होतं. चारजणांना ते आटपत नव्हतं. भगताचा ओरडा वाढला होता.

इतक्यात खाटिक सरसावला. त्याच्या सुऱ्याची पण पूजा झाली होती. भगतांनी सांगताच त्याने बोकडाच्या मानेवर घाव घातला. भांड्यात रक्त गोळा केलं. ते भगतानं आंब्याच्या पानानं यज्ञकुंडावर शिंपडले. मग हळूहळू टोपातलं सगळं रक्त कुंडात गेलं. फाटी पडली. कडकड आवाज वाढला. कुंडातून ज्वाला छतापर्यंत भिडल्या. तो भाग झाकलेलाच नव्हता. मंडपभर धूर झाला. डोळे चोळत एकमेकांना

ढकलत गावकरी दर्शनासाठी कुंडाकडे गर्दी करू लागले. ओटचावर रक्ताचे थारोळे साचले होते.

रमणभाईने डोळे मिटून घेतले होते. ते श्रद्धेने की भीतीने ते मास्तरांना कळेना. मास्तरांना हा सगळा प्रकार क्रूर, किळसवाणा वाटला. त्यांनी रमणभाईना हलवले आणि काढता पाय घ्यायला सांगितले. लोकांचे त्यांच्याकडे लक्षच नव्हते. देवळात जाऊन मास्तरांनी डब्याची पिशवी घेतली आणि दोघेही शब्दही न बोलताच रमणभाईच्या खोलीवर आले.

• • •

# प्रकरण पाचवे



पूर्वीच्या प्रकरणात मास्तर जवळजवळ बहिष्कृतच होते. पण आता आश्चर्य वाटण्याची पाळी मास्तरांवर आली होती. सगळं गाव उत्साहात होतं. शाळेत शंभर टक्के मुलं हजर असत. मुलांच्या वागण्यात लक्षणीय बदल झाला होता.

अभ्यासाकडे मुलं नीट लक्ष देत होती. शनिवारच्या चाचण्यांमध्ये मुलं चांगलीच हुशारी दाखवत होते. कधी नव्हते ते गावकरी मुलांच्या प्रगतीची चौकशी करायला मास्तरांना भेटत होते.

'काय मास्तर पोरं अभ्यास करतात की नाही?' कधी कधी एखादा गावकरी विचारी.

'खरंच काय चमत्कार झालाय हो, सगळी पोरं पार बदलून गेलीत. असंच चालू

राहिलं तर रिझल्ट शंभर टक्के लागेल. अहो जरा आधी हा बदल झाला असता तर चौथीच्या स्कॉलरशिपला पोरांना बसवलं असतं. खरंच कमाल आहे.' मास्तर उत्तर द्यायचे.

'हाये का न्हाई, अवं ह्यो समदा देवानं क्येलेला चमत्कार. तुमाला आवडलं नाही. पण भगताने पूजा केल्यापासून पोरंच काय आख्खं गाव बदललं हाये.' गावकरी.

मास्तरांकडे उत्तर नव्हतं. ह्या गोष्टींवर त्यांचा विश्वास नव्हता. पण चमत्कार मान्य करणं भाग होतं.

पाहता पाहता दोन महिने कसे भराभर गेले कळलंही नाही. परीक्षा झाल्या. आणि खरोखरंच सगळी मुलं पास झाली. आख्खं गाव खूष होतं. मास्तरांचं कौतुक करत होतं.

वास्तविक मास्तरांनी नेहमीप्रमाणेच प्रामाणिकपणे शिकवलं होतं. ह्या आनंदातच उन्हाळ्याची सुटीही सुरू झाली.

आता महिना दीड महिना मास्तर फिरकणार नव्हते. शाळेची कागदपत्रं नेहमीप्रमाणे सुरक्षित राहण्यासाठी त्यांनी घरी आणून ठेवली.

सुटीत मास्तरांचा कार्यक्रम पार बदलत असे, ते फारसे धार्मिक नव्हते, त्यामुळे घरात पोथ्यापूजा यात त्यांचा वेळ जात नसे.

सकाळी आंघोळ करून सार्वजनिक वाचनालयापर्यंत फेरफटका मारत. तिथे वृत्तपत्रं वाचत, सगळ्या वृत्तपत्रांतून आता इंग्रज भारताला स्वातंत्र्य देणार याविषयीच्या बातम्या असत.

रोज लॉर्ड माऊंटबॅटन, नेहरू, गांधी, जीना, पटेल यांच्यात काही ना काहीतरी खुसपट निघत होते. फाळणी जवळजवळ निश्चित झाली होती. पश्चिम पंजाब आणि पूर्व बंगाल मिळून नवे पाकिस्तान हे राष्ट्र जन्माला आणण्याचा मुस्लीम लीगचा हट्ट होता. इंग्रजांची त्यांना फूस होती. महात्मा गांधींसारखा नेमस्त नेताही आता निराश झाला होता. जातीय दंग्यांना ऊत आला होता. निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे दिल्ली, कलकत्ता, मुंबईकडे लोटत होते. त्यांच्या मुलाबाळांवर, आया बायांवर होणाऱ्या क्रूर हल्ल्याचे रक्तरंजित वृत्त रकानेच्या रकाने भरून वर्तमानपत्रांत येत होते.

केसरीची गर्जना विरोधी होती. फाळणी हिंदुस्थानला, केसरीला मान्य नव्हती. असे लुळेपांगळे स्वातंत्र्य स्वीकारू नये असा विचार वृत्तपत्रातून येत होता. ह्याच बातम्या रोज वाचून मास्तर कमालीचे अस्वस्थ होत. मग मनःशांतीसाठी ते गोशाळेतील श्रीकृष्ण मंदिर, हनुमान मंदिर, देवी-देवालय यात क्षणभर विसावत. कोणी ओळखीचे भेटले की गप्पा याच विषयाकडे वळत, मग मास्तर घराकडे निघत.

कधी ते गावाबाहेर फटका मारत. मुरबाडरोड त्यांच्या नित्य परिचयाचा, वाटेत कधी ट्रक ड्रायव्हर गाडी थांबवत पण मास्तर रजेवर असल्याचे लक्षात येताच पुढे जात. मोहोन्याकडे न वळता रेल्वे फाटक ओलांडून ते शहाडकडे जात.

तिथे प्रचंड उलथापालथ झाली होती.

शहाडपासून अंबरनाथच्या शिवमंदिरापर्यंतची जमीन युद्धकाळात इंग्रजांनी कब्जात घेतली होती. गावातल्या साठे, फडके वगैरे श्रीमंतांच्या जमिनी गेल्या होत्या. तिथे सैनिकांना राहण्यासाठी पाच कँपची व्यवस्था केली होती. युद्ध संपल्यामुळे त्या बराकीही रिकाम्या होत्या. तो भाग ओसाड झाला होता.

पण काही दिवसांतच सिंधी निर्वासितांनी ती पूर्ण वसाहत भरली. शासनाचे अधिकारी त्यासाठी व्यवस्थेचे काम पहात होते.

घरदारे सोडून, बायका पोरांसह आलेल्या ह्या कुटुंबकबिल्यांकडे पाहून मास्तरांच्या अंतःकरणात कालवाकालव होई. एकेकाळचे लक्षाधीश आज भिक्षाधीश झाले होते. सरकारी मदतीवर जगत होते.

पण ही सिंधी जमात मोठी कष्टाळू, हिमतीची. त्यांनी हळूहळू परिसरातल्या गावात पाय रोवायला सुरुवात केली.

कँपमध्येही लहानसान दुकाने निघाली. पाव बेकऱ्या निघाल्या. खांद्यावर कपड्यांचा गठ्ठा घेऊन सिंधी व्यापारी घरोघर जाऊन माल विकू लागले.

थेट त्यांच्या घरापर्यंतही हे सिंधी फेरीवाले येऊ लागले.

मास्तरांना वाईटही वाटे आणि कौतुकही वाटे.

मराठी माणसावर असे देशांतराचे संकट आले असते तर त्यांचे काय झाले असते? आपले काय झाले असते? या विचाराने ते अस्वस्थ होत.

खरे पाहता घरी परत जाण्याचा उत्साहच त्यांच्यात रहात नसे. पानावर बसले की भूकही लागत नसे. कसेबसे चार घास गिळून ते उठत.

'बापू, काही होतंय का? बरं नाही का? जेवण किती कमी झालंय तुमचं?' सून मोठी आस्थेने चौकशी करीत असे.

बापूंजवळ उत्तर नव्हते. त्यांना काहीच रोग झाला नव्हता पण देशाला झालेला रोग कोणाला थांबवता का येत नाही? आपल्या मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या वल्गना फुकट गेल्या का? पुढारी त्यांच्यापेक्षाही म्हातारे झाले होते. मास्तरांप्रमाणेच तेही हतबल झाले होते का? मग मास्तर आणि पुढारी यात फरक काय?

मास्तर आता बाहेरही कमीच पडत. वाड्यात कोणाशी गप्पाही मारत नसत. संध्याकाळ झाली की मुंबईहून नोकरीवरून येणाऱ्या आपल्या मुलांच्या वाटेकडे डोळे

लागत. उशीर झाली की ते अंगणात अस्वस्थपणे फेऱ्या मारत. मुंबईत कुठे दंगल तर झाली नसेल ना? बाळू, नाना सुरक्षित असतील ना? शंका, शंका आणि शंकांनी मास्तर आपादमस्तक कुरतडले जायचे. पाय दुखायला लागले की घरात येत. मिणमिणत्या उजेडात त्यांना अंधारच अधिक दिसे.

मग केव्हातरी बाळू येई. तो मुळात अबोल. बायकोशी तो कमीच बोले. नाना आणखीच उशिरा येई. ते विचारत, 'नाना, अरे वेळच्या वेळी घरी येत जा. दिवस कसे फिरलेत. उगीच जीव धोक्यात नको रे घालू.'

'कसला धोका? बापू काही होत नाही. आता काही मी लहान राहिलो नाही. दोन घेतले तर दोन दिल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही काळजी करू नका.'

नानाच्या बोलण्याने धीर येई, कौतुक वाटे. पण पुन्हा नाना जेवण झाल्यावर हातावर पाणी पडताच बाहेर पडे, तो मध्यरात्री केव्हातरी उगवे. मास्तरांची झोपच उडाली होती.

रात्रीच्या नीरव शांततेत दूधनाक्यापलीकडून 'पाकिस्तान जिंदाबाद', 'अल्ला हो अकबर' अशा घोषणा ऐकू येत. दूरवरून त्या घोषणांना 'भारत माता की जय', 'हर हर महादेव' ह्या घोषणा ऐकू येत असत. मोठ्या स्फोटापूर्वीची ही शांतता असावी असं बापूंना सारखं वाटे. घटकन उठून खिडकीतून ते दूधनाक्याकडे जाणाऱ्या रस्त्या-रस्त्याकडे बघत. कधीतरी त्यांना डोळा लागे. नाना उशिरा येतो ते त्या घोषणा देणाऱ्यांमध्ये तर नसेल ना.

पहाटे टांग्यांच्या आवाजाने ते जागे होत, नाना शांत झोपलेला असे. रस्त्यावर सकाळचा वावर सुरू झालेला असे. दूधनाक्यावरचे निखळ दूध घ्यायला पार शिवाजी चौक, टिळक चौकाकडून बरण्या सांभाळत माणसे लगबगीने येत. दुधाचा भाव रोज निराळा असे. सर्व दुकानांतून एकच भाव असे. मुख्य म्हणजे सगळे दूधविक्रेते मुसलमान होते आणि गिऱ्हाइकं हिंदू होती.

हे दृश्य खरं की रात्री अपरात्री ऐकलेल्या राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रद्रोही घोषणा खऱ्या?

कूस बदलूनही मास्तरांचा विचार बदलत नसत. झोप तर उडालेलीच असे. शेवटी कंटाळून मास्तर अंथरुणातून उठत. विहीरीवर जाऊन तोंड धूत. तंबाखूचा बार मारला की ते प्रातर्विधीला जात. अजून वाडा जागा झालेला नसे.

हळूहळू कपबशांचे आवाज येऊ लागत. सूनबाईही जागी होऊन सकाळच्या कामाच्या गडबडीत असे. ती केव्हातरी चहा आणून ठेवी. नाना चहा घेतच नसे.

पावणेसहा वाजता दंडा घेऊन नाना घराबाहेर पडे. जाताना मालकांच्या मुलाला

'वामन्या चल रे, मी निघालो.'

कितीही उशिरा नाना घरी आला तरी पावणेसहाला तो बाहेर पडत असे. ह्यात कधीही फरक पडत नसे.

तासादीड तासाने तो परत येई. शर्ट अर्ध्या पँटच्या बाहेर असे. जाताना तो खोचलेला असे इतकाच फरक.

आल्या आल्या स्नान, काहीतरी खाणं आणि डबा घेऊन बाहेर पडणं, घरातल्यांशी बोलायला त्याला वेळच नसे.

बापूंना किती प्रश्न नानाला विचारायचे असायचे, पण संधीच मिळायची नाही.

'इस्लाम खतरेमें'च्या घोषणांनी वेड्या झालेल्या लोकांमुळे आपली घरेदारे, नातेवाईक, जडजवाहिर, उद्योगधंदे सोडून एखाद्या बेवारशासारखे जीवन ज्यांना कँपमध्ये जगावे लागत होते तेच सिंधी बांधव सायकलीवरून दूधनाक्यावरून दूध न्यायला पहाटे पहाटे येत हे पाहून बापूंना राग येत असे.

पण ते काय करू शकत होते?

कधी एकदा शाळा सुरू होते असे त्यांना झाले होते.

आणि जूनमध्ये शाळा सुरू झाल्या.

मास्तर नव्या उत्साहाने लालचौकीजवळ उभे रहात, मोहोन्याकडे जाणाऱ्या ट्रकमध्ये चढत.

शहाडपासून वर्दळ वाढली होती. घरांची संख्याही वाढली होती. कच्चीच बांधकामं होती, पण त्यात सिंधी लोक भाड्याने रहात होते.

मोहोन्यालाही खूप फरक पडला होता, रस्ता जरा बरा झाला होता. रेल्वे आणि रस्ता यांच्यामधल्या जागेत आता मोठी पाइपलाईन पडली होती. रस्त्याच्या दुतर्फा लावलेली झाडंही वाढली होती. गुराढोरांपासून रक्षणासाठी झाडांभोवती लोखंडी पिंजरे उभे राहिले होते.

मास्तर नेहमीप्रमाणे उतरले. नेहमीप्रमाणे गावाबाहेरून देवळाकडे जाऊ लागले. पण मधेच काही चाळी उभ्या झाल्या होत्या, सगळे चेहरे अपरिचित होते.

मास्तर देवळात आले. हातपाय धुवून त्यांनी हनुमानाचे दर्शन घेतले. पूजा झालेली होती. धोतऱ्याच्या पानांचा शनिवारी घातलेला हार अजूनही टवटवीत होता. मास्तरांनी मनोभावे नमस्कार केला. दोन भुवयांच्या बरोबर मध्ये त्यांनी शेंदराचा ठिपका लावला आणि दप्तर कपाटात ठेवून खुंटीवरचा तास टणकावला.

मोठा कालवा करत मुलं शाळेकडे धावली.

नेहमीप्रमाणे प्रार्थना घेऊन नव्या वर्षाकरता सगळ्यांना शुभेच्छा दिल्या. यंदाही

सगळे खूप अभ्यास करा, पास व्हा, असा आशीर्वाद देऊन पहिलाच दिवस म्हणून सुटी दिली.

मुलं घरोघर पोहोचली. मास्तरांनी शाळा सुरू केल्याची बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरली. मोठी माणसे मास्तरांना भेटायला आली. आज चावडीवर मास्तर न जाता देवळाच्या ओट्यावरच बैठक जमली.

गावकरी खूष दिसत होते. सरपंच जरा उशिराच आले. त्यांच्याबरोबर एक नवीन व्यक्ती दिसत होती. पँट शर्ट घातलेली ही व्यक्ती मोठी प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची होती.

ओट्याजवळ येताच गावकरी उभे राहिले. सरपंचांनी पाहुण्यांना बरोबर बसवले. दोघातिघांनी देवळातून एक बाकडे आणले. सरपंच, पाहुणा आणि मास्तर दाटीवाटीने बाकड्यावर बसले.

सरपंचांनी पाहुण्याची ओळख मास्तरांना करून दिली. शंकरराव पाटील त्यांचे नाव. खूप शिकलेले आहेत. कंपनीत बड्या बड्यांची ओळख आहे. मुख्य म्हणजे गावाकरता खूप काही करण्यासाठी त्यांची धडपड असते.

मास्तरांनी शाळेतर्फे त्यांचे स्वागत केले. शाळेकडेही त्यांनी लक्ष द्यावे अशी विनंती केली.

सरपंच मध्येच गरजले, 'त्ये त्यान्ला सांगूच नका, अवं आल्या आल्या गावाला सार्वजनिक नळ दिले. आता पाण्यासाठी बायाबापड्यांना नदीपोत्तर जावंच लागत नाई.

गावकऱ्यांनी टाळ्या वाजवल्या, शंकररावांनी पण गावाला पूर्ण सहकार्य करू असे सांगितले. शाळेचा पहिला दिवस असा आनंदात गेला. मास्तरांना सगळ्याचा विसर पडला. त्यांनी नवी उमेद घेतली.

● ● ●

# प्रकरण सहावे



**प्रा**रंभीचा उत्साह मावळला. सगळं गाव शेतीच्या कामाच्या घाईत होतं. बांध बांधिस्ती, राब या कामात मुलांचाही उपयोग होत होता.

ट्रकने येत असूनही मास्तरांना उन्हाचा त्रास होऊ लागला होता. रजिस्टरांचे, चौथीच्या मुलांच्या दाखल्याचे काम करतानाही त्यांना घाम फुटत होता. दुपारी कोणी देवळाकडे फिरकतच नव्हते, त्यामुळे उघड्या अंगाने बसून ते काम करू शकत होते.

मृग कोरडे गेले आणि शेतकरी कावून गेले. ढग दिसायचे पण न बरसताच

निघून जायचे, 'नेमेचि येतो मग पावसाळा' हे सृष्टीचे कौतुक मास्तरांनी पोरांना शिकवले होते. आता मोठी झालेली मुले मास्तरांवर राग काढू लागली.

पावसाचा नेमच राहिला नव्हता. गुरांना चारा मिळेना. शंकरराव पाटलांमुळे निदान पाणी तरी भरपूर मिळत होतं.

शंकररावांची रोज गावात फेरी होती. ते शेतकऱ्यांना धीर देत. प्रसंगी उसनवारी रक्कमही देत. त्यामुळे गावाला त्यांचा मोठा आधार वाटे.

पुन्हा गावात द्येवाला अभिषेक करावा, त्यासाठी यज्ञ करावा ह्याची चर्चा सुरू झाली. मास्तरांकडे चौकशी करत, पण मास्तरांचाच विश्वास नव्हता. कल्याणला शंकराला कोंडून साकडे घातले होते. देवळात महायज्ञही झाला होता. पण पावसाचा थेंब काही पडला नाही.

कल्याणला देव प्रसन्न झाला तर मोहोन्याला पाऊस पडेलच ना? ते गावकऱ्यांना विचारायचे.

मास्तरांचं म्हणणं पटत असलं तरी शेताजवळ पाऊस आणायचा असेल तर मोहोन्यातच यज्ञ केला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

वडवली, अटाळी, आंबिवली, गाळेगाव, मोहिली, मांडा-टिटवाळा सगळ्या गावांची म्हणून मोठी पूजा करावी. वरुणदेव नक्की प्रसन्न होईल अशी गावकऱ्यांची खात्री होती.

मास्तर दाद देत नाहीत हे पाहून गावकीच्या पुढाऱ्यांनी शंकररावांशी विषय काढला. त्यांनी लगेच होकार भरला. सगळा बंदोबस्त करतो म्हणून आश्वासन दिले.

पुढच्याच आठवड्यात मांडव पडला. मुंबईहून आणि गुजरातकडून पंडित आले होते. त्यांनी यथासांग पूजा-अर्चा, यज्ञ केला. भंडारा झाला. सगळ्या परिसरातील गावकरी हातची कामं सोडून प्रसादाला आली. पंगतीवर पंगती उठल्या. सगळी व्यवस्था शंकररावांनी कशी केली कोणाला कळलेही नाही. पंडितजींशी शंकरराव अस्खलित गुजरातीतून बोलत होते. त्यांचे ते शंकरभाई पटेल होते.

भंडाऱ्याच्या दिवशीच संध्याकाळी तुफान वारा सुटला. पत्रावळी सांभाळतांना जेवणाऱ्यांची तारांबळ उडाली. पाहता पाहता टपोरे थेंब आले आणि वरुणदेवाची कृपा झाली. जोरदार पाऊस सुरू झाला.

मास्तरांचे महत्त्व संपले होते. शंकरभाईशिवाय गावाचं पान हालेना.

कंपनीला उत्पादन सुरू करण्यापूर्वी, पुढच्या मोठ्या योजनांसाठी जमीन हवी होती. शंकरभाईचा कंपनीला फार उपयोग होत होता.

त्याने परिसरातल्या गावकऱ्यांना जमिनीला कसा भाव येणार आहे हे पटवून

द्यायला सुरुवात केली.

प्रारंभी स्वतःच्या नावानेच लगतची जमीन चांगल्या भावाने त्यांनी खरेदी केली. कंपनीने थेट खरेदी करू नये आणि गावकऱ्यांनी थेट कंपनीला जमीन विकू नये हे त्यांनी दोन्ही पक्षांना पटवून दिले.

कारखाना सुरू झाला की आपल्या पोरांना नोकऱ्याही मिळतील हे आमिष होतंच.

शंकरभाईंना कमालीचं यश मिळालं. शंकरभाईंनी हळूहळू जमीन कंपनीच्या नावे केली.

मामलेदार कचेरीत शंकरभाईंची वट होती. सगळा व्यवहार बिनबोभाट चालू होता.

नळाचं पाणी देण्यापासून शंकरभाईंनी केलेल्या कामांमुळे गावकऱ्यांचा त्यांच्यावर गाढ विश्वास बसला होता.

मास्तरांच्या मनात पाल चुकचुकली. ह्यात शेतकरी गोत्यात तर येत नाहीत ना असे त्यांना वाटे. एकदोन वेळा रमणभाईकडे त्यांनी विषय काढला पण त्यांनीही त्यात रस दाखवला नाही. 'अरे मास्तर, शंकरभाई सेठनो खास माणस छे! तो कंपनीचा बडा आफिसर है. तेला कोण विचारेल नाय. तू पण गप बस नी. कसाला वात करते.' रमणभाईने अंग काढून घेतले होते.

पावसाची संततधार चालू होती. धरणाची परीक्षा झाली होती. रमणभाई आपल्या कामावर खूष होता.

पाणलोट धरणावरून जाऊन आजूबाजूच्या गावात पसरले. शहाडच्या बाजूला पाणी खोलवर घुसले होते. पण तिथे वस्ती कमीच होती.

सुरुवातीला मोहोना परिसरातले गावकरी घाबरले. पण दोनचार दिवसात पाणी ओसरले. गावांनी निश्वास टाकला.

देव कोपला म्हणायची पाळी आली होती. रेल्वे गेटपासूनचा कच्चा रस्ता ठिकठिकाणी वाहून गेला होता.

पण दोन-चार दिवसात सगळे ठीक झाले.

शंकरभाई गावाला धीर देत होते. गावांचा त्यांच्यावरचा विश्वास वाढला होता.

आठवडाभर मास्तरही येऊ शकले नव्हते. कल्याणातही सर्व बाजूने पूर आला होता. खाडीचे पाणी गावात घुसले होते. ट्रकची वर्दळही थांबली होती.

मास्तर, तालुका मास्तरांना अहवाल देत. शाळा नंबर एकमध्ये ते हजेरी लावत.

आता पाऊस मंदावला. पूर ओसरला पण नवेच काम आले.

१५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळणार होते. पहिलाच स्वातंत्र्य दिन कसा साजरा करायचा याविषयी परिपत्रके येत. तालुका मास्तर, मामलेदार, सर्कल इन्स्पेक्टर सभांवर सभा घेऊ लागले.

सकाळी ८ वा ध्वजारोहण करायचे. 'झेंडा उंचा रहे हमारा', 'सारे जहाँसे अच्छा' ही गाणी मुलांकडून सामूहिकपणे म्हणून घ्यायची. सगळ्यांना तिरंगी झेंडे द्यायचे, फलक तयार करायचे, ते घेऊन प्रभात फेरी काढायची. राष्ट्रगीत बसवून घ्यायचे, मुलांना खाऊ वाटायचा.

सगळी नुसती तारांबळ उडाली. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून मास्तर रोज झेंडे, फलकाचे साहित्य घेऊन यायचे.

पोरांकडून गावभर पताका लावून घ्यायच्या होत्या.

सरपंचांच्या हस्ते ध्वजारोहण, मग मास्तरांचेच छोटेसे भाषण... स्वातंत्र्य म्हणजे काय? कोणाच्या त्यागामुळे स्वातंत्र्य मिळाले? मुलांना समजेल अशा भाषेत भाषण करायचे.

मास्तरांनी भाषण लिहूनच काढले.

ते लिहितानाही त्यांच्या नजरेसमोर निर्वासितांचे लोंढे दिसत. पुढाऱ्यांचा त्याग त्यांना मुलांना सांगणे भागच होते.

पण आपले घरदार, माणसं, सगळं सोडून, सैनिकांनी उष्टावलेल्या चुलाणावर कॅंपात राहणाऱ्या सिंधी बांधवांच्या त्यागाबद्दल ते काय सांगणार होते?

१४ ऑगस्टला मास्तर वस्तीला मोहोऱ्याला राहिले, रमणभाई, शंकरभाई कोणी फिरकलेही नाहीत. त्यांना त्यांच्या कारखान्यात साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्य दिनाची तयारी करायची होती.

गावकऱ्यांमध्ये शहरातल्यांसारखा उत्साह नव्हता. शहरातही काही पक्षांनी हा काळा दिवस म्हणून साजरा करावा, घरावर काळे झेंडे लावावे असा आदेश दिला होता.

उसने अवसान आणून मास्तरांनी मुलांच्या मदतीने सर्व तयारी रात्रीच केली.

सकाळी लवकर उठून सर्व आन्हिके आटोपून विशेष म्हणजे, खादीची गांधी टोपी डोकीवर घालून मास्तर सज्ज झाले.

घोळक्या घोळक्याने मुले आली. गाववालेही जमू लागले. मास्तरांचं आजचं ध्यान बघून त्यांनाही हसू आलं.

मास्तरांनी निर्विकारपणे कार्यक्रम पार पाडला. सरपंचांनी राष्ट्रध्वज उभारला.

मास्तरांनी समूह गीतं सांगितली, मुलांनी कशीबशी ती म्हटली. मास्तरांनी लिहिलेले भाषण वाचून दाखवलं. पुन्हा ध्वजाला सलामी दिली. पोरांना बरोबर घेऊन त्यांनी 'जनमनगण अधिनायक जय हे भारत भाग्य विधाता' हे राष्ट्रगीत म्हटले. 'भारतमाता की जय'चा उद्‌घोष झाला. गावभर प्रभात फेरी निघाली. गावकरीही सामील झाले. कंपनीजवळ फेरी येताच शंकरभाई सामोरे आले. आज त्यांनीही पूर्ण खादीचे कडक इस्त्रीचे पांढरे स्वच्छ कपडे घातले होते. त्यांच्याही डोक्यावर टोकदार पांढरी टोपी होती.

त्यांचंही ध्यान पाहण्यासारखं होतं. पण त्यांच्याकडे पाहून कोणी हसले नाहीत.

त्यांनी इशारा करताच चार-पाच वॉचमन धावत आले. त्यांनी भरल्या पिशव्यातून खाऊचे पुडे सर्वांना वाटले.


मास्तरांनीही मिरवणूक शाळेशी संपल्यावर खाऊ मिळेल, तो घेतल्याशिवाय कोणी जाऊ नये म्हणून सूचना दिली.

प्रभात फेरी वळसा घेऊन देवळापाशी आली.

मास्तर पाच-सहा पोरांना घेऊन देवळात गेले. भरल्या पिशव्या घेऊन पोरं बाहेर आली. सुक्या मेव्याचे पुडे सगळ्यांना वाटण्यात आले.

कंपनीचे मिठाईचे पुडे आणि शाळेने दिलेले सुक्या मेव्याचे पुडे यांची तुलना मुलंच नाही तर मोठी माणसंही निःसंकोचपणे करत होते. त्यांना स्वातंत्र्याचे आणि स्वातंत्र्यदिनाचे काही सोयरसुतक नव्हते.

• • •



# प्रकरण सातवे

स्वातंत्र्य मिळाल्यामुळे मास्तरांच्या जीवनात काही फारसा फरक पडला नव्हता. मास्तरच काय, आजूबाजूच्या लोकांचे जीवनही पूर्वीसारखे चालू होते.

देशात दंगे-धोपे चालूच होते. सिंधी निर्वासितांनी पाचही कँप भरून गेले होते. तिथे त्यांनी उपजीविकेसाठी नाना उद्योग सुरू केले होते.

खांद्यावर कापडाचे गठ्ठे घेऊन फिरणाऱ्या सिंधी विक्रेत्यांनी जागा मिळेल तेथे कापडाची दुकाने टाकली होती.

कल्याणच्या लोकसंख्येत भर पडली होती. स्टेशनरोडला फुटपाथवर त्यांची विविध

वस्तू विक्रीची दुकाने सुरू झाली.

गावातल्या दुकानदारांपेक्षा त्यांच्याकडे वस्तू कितीतरी स्वस्त मिळू लागल्या. गावातले व्यापारी ह्या उपऱ्यांचा द्वेष करू लागले. स्वातंत्र्य चळवळीशी संबंध नसलेले व्यापारी आता कडक खादीत काँग्रेस पुढाऱ्यांबरोबर फिरू लागले.

मास्तरांनाही खादीचे कपडे आवडायचे पण महाग असल्यामुळे त्यांना परवडत नव्हते. एक दिवस देवीच्या देवळाजवळ रावसाहेबांचे भाऊ भावेमास्तर नख शिखान्त खादीत होते. बापूंनी त्यांना भीतभीत विचारले खादी स्वस्त झालीय काहो? 'तुम्हाला हवी आहे खादी? चला' ते बापूंना घेऊन घरी गेले. त्यांच्या घरी खादीचे ढिगारे होते. धोतरं, टोप्या, सदऱ्याचे कापड, 'जा घेऊन पैशाचा प्रश्नच नाही, नाशिकच्या काँग्रेस अधिवेशनाहून येतांना गोविंदराव देशपांडेंनी दिले, घेऊन जा.'

मुक्या टिळकाकडे मास्तरांनी सदरे शिवायला दिले. तो मुका होता, पैसेवाला होता, पैसे देण्याची घाई नव्हती.

१५ ऑगस्टला त्यांनी पहिल्यांदा टोपी घातली. हळूहळू पूर्ण खादी वापरू लागले.

कल्याणला मास्तर राहायचे तो भाग हिंदु-मुस्लीम मिश्रवस्तीचा होता. त्यामुळे परिस्थिती तंग होती. पोलीस बंदोबस्त होता. रात्री पोलीस गस्त घालीत. आपल्याच स्वतंत्र देशात नागरिकांना पोलिसांचे संरक्षण लागत होते.

नानाचे कार्यक्षेत्र आता वाढले होते. संध्याकाळी घरी आला की काहीतरी खाऊन तो सायकलने बाहेर पडे. रात्री उशिरा घरी येत असे.

मास्तरांना मन मोकळं करायला जागाच नव्हती. शाळेत ते काम रेटत होते. गावाचा विश्वास आपण गमावला आहे हे त्यांच्या लक्षात येत असे.

एका रविवारी नाना घरी असतानाच एक गोरापान, पायजमा शर्ट अशा साध्या पोषाखातला तरुण नानाची चौकशी करत घरी आला, त्याच्याबरोबर जोश्यांचा राजा होता.

तो येताच नाना घाईने बाहेर आला 'अरे नरेन्द्र, कैसा आना हुवा? काय राजा हा केव्हा आला?' नाना खुललेला पहिल्यांदाच दिसत होता.

दोघांना घरात घेऊन ते कॉटवर बसले. बापू उठून बाहेर जाऊन उभे राहिले. त्यांचे कान त्या तिघांच्या खरं म्हणजे दोघांच्याच बोलण्याकडे होते. कारण राजा नुसता श्रोता होता. नाना भरभरून बोलत होता.

इतक्यात नरेंद्र चपापला, पटकन बाहेर येऊन तो बापूंच्या पाया पडला, 'मै नरेन्द्र, सिंधूनगरमे संघ का प्रचारक हूँ, नाना की साथ हमे बहोत है।' तो आपणहूनच

म्हणाला.

नाना रोज संध्याकाळी सायकलने कुठे जात होता याचा उलगडा झाला.

आपण फक्त सिंधी निर्वासितांबद्दल हळहळत होतो. नाना प्रत्यक्ष त्यांच्यात जाऊन काम करत होता. नानाबद्दल त्यांचं मन अभिमानाने भरून आलं.

नाना, नरेन्द्र कोणीही चहा घेत नव्हते. त्यामुळे सूनबाईला तो त्रास नव्हता. पण मध्येच नाना स्वैपाकघराकडे गेला आणि नरेन्द्र जेवायला आहे हे वहिनीला त्याने सांगितले.

त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या. किती शाखा लागतात, उपस्थिती किती असते. किती शिशू, बाल, तरुण, प्रौढ ह्याचा हिशेब चालला होता. डिसेंबरमध्ये भिवंडीजवळ होणाऱ्या हिवाळी शिबिरासाठी जास्तीत जास्त स्वयंसेवक येतील असा नरेन्द्रचा प्रयत्न होता. अजून सिंध प्रांताचे संघचालक बॅरिस्टर खानचंद गोपालदास यांची कराचीतून सुटका झाली नव्हती. त्यांना एका कटात गोवून पाकिस्तान सरकारने तुरुंगात डांबले होते. याची चीड नरेन्द्रच्या बोलण्यात येत होती. भारत सरकार त्यांच्या स्तरावर प्रयत्न करत होते. पण भारत सरकारच्या प्रामाणिकपणावर सिंधी बांधवांचा मुळीच विश्वास राहिला नव्हता.

जेवण झाल्यावर नरेन्द्र आणि नाना बाहेर पडले. राजा त्याच्या घरी जेवायला गेला होता.

बापूंचे धड जेवणातही लक्ष नव्हते. त्यांची बोलणी ऐकून ते अधिकच अस्वस्थ झाले.

डिसेंबरचे शिबीर होईपर्यंत नानाचा पाय घरात ठरत नव्हता. पण आता मास्तरांना तो चांगलं काम करत असल्याचा आनंद होता.

नेहमीप्रमाणे ट्रक पकडून ते मोहोन्याला जाऊ लागले. मागणी करूनही त्यांना सहाय्यक शिक्षक मिळाला नव्हता. स्वातंत्र्यानंतर शिक्षणखात्यात काहीही सुधारणा झाली नव्हती. उलट एक प्रकारचा सुस्तपणाच आला होता.

कारखान्याचे काम प्रगतिपर होते. प्रत्यक्ष कारखान्याभोवती आता उंच तटबंदी बांधण्यात आली होती. त्यामुळे बाहेरून काहीच दिसत नसे.

मोठे गेट उभारले होते. वाहने जाता येता वॉचमन गेट उघडत लावत. माणसांनी जाण्यासाठी छोटे गेट होते. चौकशी आणि नोंद करूनच कोणालाही सोडले जायचे.

सुदैवाने मास्तरांना कोणीही अडवत नव्हते. ते रमणभाईला भेटण्याचे निमित्त काढून जात. पण रमणभाईऐवजी शंकरभाईची भेट हमखास होई. 'अरे, मास्तर रमणभाई नसले तरी मी आहेना. काही काम असेल तर सांगा आपण करून टाकू.'

मास्तरांचं काहीच काम नसे. शंकरभाईंच्या छोट्याशा केबिनमध्ये चहा, बिस्किटे येत. मास्तरांना असं वेळी अवेळी खाणं, चहा पिणं बरं वाटत नसे. वयानुसार चहामुळे त्यांना पित्तही होत असे. पण शंकरभाईंची मर्जी खप्पा होऊ नये म्हणून ते स्वीकार करत.

मग शंकरभाईच त्यांना जीपमध्ये घेऊन रमणभाई असलेल्या साईटवर घेऊन जात. अगदी टोकाला असलेल्या एका उंच टेकाडावर पाण्यासाठी टाकी बांधली होती. त्याच्या लगतच पायथ्याशी आठ-दहा बंगल्यांचं काम जोरात चालू होतं.

रमणभाईंचा ओरडाआरडा चालू असे. काम करणारी माणसं शापूरजी पालनजी कंपनीची होती. त्यांचा इंजिनीअर हातात नकाशाचं भेंडोळं घेऊन, काम बरोबर चाललंय की नाही ते पहातच असे. पण रमणभाई स्वतःचे काम समजून साईटवर तासन्‌तास उभा असे.

शंकरभाई आणि त्याचे बोलणे फारसे होत नसे. मास्तरांची अशा वेळी कुचंबणा व्हायची.

मग शंकरभाई मास्तरांना घेऊन कॉलनीचे काम कसे चालले आहे हे समजावून द्यायचे.

'हे बंगले सगळे बड्या साहेबांकरता आहेत. उतारावरून जीप येत असतानाच उजव्या बाजूला मोठे तलावासारखे पाणी साचले होते. डाव्या बाजूला मोकळी जागा होती. तिथे मंदिर बांधण्याचा प्लॅन आहे'. नकाशा उलगडून शंकरभाई मास्तरांना दाखवत. तिथे फक्त मंदिराची खूण होती.

'जरा वांधा आहे, ही जागा अजून कंपनीच्या ताब्यात आली नाही. आपला प्रयत्न चालू आहे. वरकस जमीन आहे त्यामुळे प्रॉब्लेम सुटेल. आता सौदे चालू आहेत.' मास्तरांच्या ज्ञानात नको असता भर पडली.

● ● ●

# प्रकरण आठवे



**स्वा**तंत्र्यानंतर कारखान्याचे, कॉलनीचे बांधकाम जोरात चालू होते. मास्तर नेहमीप्रमाणे शाळेत येत होते. मन लावून शिकवत होते. मुलांची संख्या वाढली होती. त्यामुळे एखाद्या वर्गाला खेळायला सोडावे लागे.

पण सहाय्यक मिळवण्यात त्यांना यश येत नव्हते.

शंकरभाईकडे अगदीच नाइलाज झाला तेव्हा त्यांनी विषय काढला. पाहतो काही जमलं तर या पलीकडे ते काही बोले ना. पण मास्तरांना शंकरभाईच्या आश्वासनात काही दम दिसला नाही.

एक दिवस ट्रकमधून मास्तर मोहन्याला आले तर रेल्वे केबिनजवळ दोन-तीन

गाड्या उभ्या दिसल्या.

सुटाबुटातले चार-पाच जण उतरून रस्ता तुडवत पायी चालत होते.

खाचखळग्यातून ठेचकाळत ट्रक सावकाश चालू होता. साहेब लोक मोठ्याने गुजरातीतून बोलत होते.

ही माणसं मास्तरांनी आजवर पाहिली नव्हती.

मास्तर शाळेत गेले. त्यांचा दिवस शिकवण्यात गेला. संध्याकाळी ट्रक पकडण्यासाठी कारखान्यात गेले.

सुदैवाने रमणभाई भेटला. मास्तरांना आनंद झाला. आसपास शंकरभाई काही दिसला नाही. त्यामुळे मास्तरांना हायसे वाटले. मोकळेपणे रमणभाईशी गप्पा मारता आल्या.

उत्सुकतेने 'आज कोण बडे पाहुणे आले होते?' त्यांनी रमणभाईला विचारलं.

'अरे मास्तर, बद्धा बडा माणसो हता, सेठ नटवरलाल चिनाई, डॉ. पारेख, पटेल साहेब. लई भणेला माणसो. सेठ नटवरलाल तर मालिक अने डॉ. पारेख अमेरिकेतून शिकून आलेला कंपनीचा साहेब. पटेल पण लई शिकलेला इंजिनीअर.' रमणभाई.

'म्हणजे तुमचा साहेब पण पटेलच!'

'ना रे बाबा, ते मशिनरी अने बिजली काममधी एक्सपर्ट', रमणभाई.

'आणि शंकरभाई?'

'तो गेला त्यांच्यामागे चमचेगिरी करायला.' रमणभाईच्या उद्‌गारात शंकरभाईविषयीचा राग बाहेर आला.

आता रोजच नवे नवे साहेब सकाळी मास्तरांना दिसू लागले. त्यांच्यासाठी कल्याणला मुरबाडरोडला एक चाळ कंपनीने भाड्याने घेतली होती.

त्यांना नेण्याआणण्यासाठी एक मेटॅडोर होती. पण कानिटकर नावाचे साहेब सायकलने यायचे. त्यांची तब्येत चांगली होती. घाऱ्या डोळ्याच्या ह्या साहेबाच्या नजरेत जरब होती. आवाजही मोठा. ते कुठून तरी दिल्लीकडच्या लाला श्रीराम कंपनीतून आले होते.

सगळे साहेब हुशार होते. विद्यापीठातून सुवर्णपदक मिळवलेले, दिवेकर साहेब सर्वात लहान होते.

जयंतभाई महेता, डॉ. एस. आय. तारापोरवाला, ए. सी. शाह अशा आठ साहेब लोकांना कंपनीने अमेरिकेत स्केनांडो रेयॉन कॉर्पोरेशनच्या, मि. मॅटिनसन यांच्या हाताखाली काम करून रेयॉन उत्पादनातले बारीकसारीक ज्ञान मिळवण्यासाठी

पाठविले होते. वर्षभर प्रशिक्षण घेऊन हे साहेबलोक परत आले. तोपर्यंत टेकडीच्या पायथ्याशी त्यांचे बंगले बांधून झाले होते. नंतर वि. ग. नवरे वगैरे तरुण केमिकल इंजिनीअर एनआरसीत आले.

काही तात्पुरते कामगार भरती झाले होते. त्यांची छोटी क्वार्टर्स बांधून झाली होती. रात्रंदिवस यंत्र उभारणीचे काम चालू होते.

नदीवरून पाइपलाईनचे येणारे पाणी शुद्ध करण्यासाठी भली मोठी यंत्रणा उभी झाली होती. तिला वॉटर वर्क्स म्हणत. नदीतून आलेले शुद्धीकरण न झालेले पाणी आसपासच्या गावांना नळाने पुरवले होते. कॉलनीसाठी पिण्यालायक पाणी शुद्ध करण्याचा भाग होता. बॉयलरसाठी निराळे प्रक्रिया केलेले पाणी तर रेयॉन उत्पादनासाठीही निराळे हलके पाणी वेगळे शुद्ध केले जाई.

हे सगळे शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी तज्ज्ञ इंजिनीअर्स होते. कामगार होते.

जयंतभाई मेहता, त्यांना सर्वजण जेजे मेहता म्हणत, ते कामावर रूजू होताच त्यांना एक भेदभाव लक्षात आला. कॉलनीत राहणाऱ्यांसाठी जे शुद्ध पोर्टेबल पाणी पुरवले जाई तेच आसपासच्या गावांना दिलेले नव्हते. त्यांना कच्चेच पाणी दिले जाई. बिचारे गावकरी नदीवरून पाणी आणण्याचे कष्ट वाचले म्हणून खूष होते.

पण जेजे साहेब म्हणजे देवमाणूस. त्यांना हा भेदभाव रुचला नाही. त्यांनी गावांनाही शुद्ध पाणीपुरवठा करण्याची आज्ञा दिली.

आपणहून कंपनीने आपल्याकरता इतके महत्त्वाचे काम केले हे कळायला गावकऱ्यांना वेळ लागला, पण मेहतासाहेबांमुळे हा बदल झाला तेव्हा मेहतांबद्दल गाववाल्यांचा आदर वाढला.

आता कोणत्याही कामासाठी मेहतासाहेबांना भेटणे गाववाल्यांना शक्य झाले होते.

अर्थात ह्याचा फायदा शंकरभाईंनी पुरेपूर उठवला. आपणच मेहतासाहेबांना सांगितलं अशी शेखी तो मिरवायचा. त्यामुळे जमिनीचे व्यवहार बिनबोभाट होऊ लागले. मामलेदार कचेरीत त्यांची माणसे होतीच.

मोहने गावात जाण्यासाठी आता मोठा रस्ता झाला होता. त्याच्या दुतर्फा काही दुकाने सुरू झाली होती. हॉटेल, पानाची दुकाने, किराणासामानाचे दुकान, एक छोटीशी बाजारपेठच तयार झाली होती.

कच्छी, सिंधी, मारवाडी, गुजराती, मुसलमान यांची ही दुकाने होती. गावातल्या लोकांकडे जमीन विक्रीतून बरा पैसा आला होता. पण कोणालाही दुकान काढावेसे वाटले नाही.

टिटवाळ्याच्या काही वाण्यांनी छोटी किराणासामानाची दुकाने काढली होती. पण त्यांचा निभाव फारसा लागत नव्हता.

आता शाळेत मास्तर ह्याच रस्त्याने जात असत. बहुतेक दुकानदारांशी मास्तरांचा परिचय झाला होता.

विशेषतः मराठी वाणी दुकानदार त्यांच्याशी आदराने बोलत. आता चहा घ्यायला त्यांना कंपनीच्या कँटीनमध्ये जावे लागत नव्हते. हे दुकानदारच आग्रहाने त्यांना चहा पाजत.

बहुतेक जणांचे कुटुंब दुकानाच्या मागच्याच बाजूला असे, त्यामुळे हॉटेलमधला चहा घ्यायची वेळ त्यांच्यावर येत नसे.

गप्पांच्या ओघात मास्तरांना कळले की, ह्या दुकानाच्या चाळी शंकरभाईंच्याच होत्या. भाडे वसुली करायला तो स्वतः दर महिन्याला येत असे. त्याने स्वतःही एक घर बांधले होते. त्यात त्याची बहीण व भाचरं रहात असत. तो स्वतः रोज मुंबईहूनच ये-जा करत असे.

एकदा शंकरभाईच भेटले. मास्तरांनी देखल्या देवा दंडवत केला. पण तो बोललाच, 'मास्तर आजकाल येत नाही कंपनीत? अहो रमणभाई नाही तर आपण आहोत ना. येत जा गरिबाकडे. तुमच्यासारखी माणसं भेटली की दिवस चांगला जातो.'

जिभेवर साखर ठेवूनच शंकरभाई बोलत असे.

'अहो एकदोनदा आलो होतो. पण तुम्ही भेटलाच नाहीत. शिपायाने सांगितले ते रोज येत नाहीत. हेड ऑफिसला जातात', मास्तर.

'हा तेपण खरंय. सेठ लोक, नवे नवे डायरेक्टर हेड ऑफिसला असतात. सगळा आर्थिक व्यवहार तिकडेच होतो ना.' पैशाची खूण हाताने करत शंकरभाई म्हणाले.

'नवी नवी मशिनरी परदेशातून येते. ती सोडवून घ्यावी लागते. अहो कारखान्यात किती प्रकारची रसायने होणार... त्याचे परवाने सरकारकडून मिळवणे फार जिकीरीचे...'

शंकरभाई रंगात आले होते. पण मास्तरांना काही कळत नव्हते.

कळत इतकेच होते की शंकरभाई फार मोठा अधिकारी आहे. फार कर्तृत्ववान आहे. पण रमणभाईसारखे ते मित्र होऊ शकत नाहीत. आपल्यासारख्यांनी सुद्धा ह्या बड्या माणसापासून लांबच राहिलेले बरे.

बापू मास्तर खरं म्हणजे आता थकले होते.

नानाने त्यांना नोकरी सोडण्याचे सुचविले होते. पण नाना सारखा घराबाहेर होता. आता तर निर्वासितांमध्ये तो काम करत होता. कल्याणपेक्षा कँपमध्येच तो जास्त वेळा असायचा.

नानाने आता लग्न करावे. एकदा संसारात पडला की तो आपोआप सामाजिक कार्यातून बाहेर पडेल. कुटुंबाची जबाबदारी तो घेऊ लागला की आपण नोकरीतून निवृत्त होऊ, असा विचार त्यांच्या मनात सतत येऊ लागला.

एकटे असले की नानाच्या लग्नाच्या स्वप्नात ते रमत असत.

कधी एकदा नानाच्या मस्तकावर अक्षता पडतील असे त्यांना झाले होते.

• • •

# प्रकरण नववे



डिसेंबरच्या अखेरीला भिवंडी येथे संघाचे हिवाळी शिबीर मोठ्या प्रमाणावर भरले होते. नाना रात्रंदिवस शिबिराच्या उभारणीच्या कामात व्यस्त होता. कल्याणपेक्षाही कँपमधून नरेन्द्रने जास्त स्वयंसेवक हजर केले होते.

नानाच्या आग्रहावरून आणि मालकांच्या सोबतीने बापूमास्तरही एका रविवारी शिबीर पाहायला गेले. कल्याणहून बरीच माणसे शिबीर पाह्यला पायीच जात होती.

दादासाहेब दांडेकरांच्या मालकीच्या माळरानावर हे प्रचंड शिबीर उभे होते. रांगेत छोट्या छोट्या राहुट्या उभ्या होत्या, दोन मोठे मंडप होते.

प्रवेशद्वारावरच पाहुण्यांना शिबीर दाखवण्यासाठी बिल्ले लावून गणवेशधारी

स्वयंसेवक होते.

ते रांगेत दोहो बाजूला तिरक्या लावलेल्या विटांच्यामधून जाणाऱ्या वाटिकेतून गटागटाने शिबिराची माहिती सांगत होते. ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे तळ पडले होते. एका मोठ्या मंडपात बौद्धिके होत. दुसऱ्या मोठ्या मंडपात ह्या हजारो जणांचा स्वैंपाक चालू असे. सगळी कामे स्वयंसेवकच करत होती. दूर लांबवर बांबूचे तट्टे लावून स्वच्छतागृहे उभारली होती. नळांच्या रांगा होत्या.

मधल्या गोल मैदानात रुपेरी खांबावर भगवा ध्वज डौलाने फडकत होता. बँडच्या तालावर कवायती झाल्या.

समाजाचे इतके शिस्तबद्ध संघटन असताना देशाची फाळणी होऊच कशी शकली हा प्रश्न बापूमास्तरांना पडला.

नाना घरी आल्यावर या बाबतीत नानाला हडसून खडसून विचारायचे त्यांनी ठरविले.

पण नाना परत आल्यावर नियमितपणे कामावर रूजू झाला. मास्तरही शाळेत जाऊ लागले. शाळेतल्या मुलांचा बेशिस्तपणा पाहून मास्तरांना नानाचा हेवा वाटत होता.

मास्तरांना जाता येता बाजारपेठेत दुकानात चहा तर मिळेच पण वर्तमानपत्रही वाचायला मिळत.

पंजाब, सिंध, बंगालमधून राजधानी दिल्लीतही निर्वासित जागा मिळेल तेथे रहात होते. दिल्लीच्या थंडीत धड अंथरुण पांघरूण नसलेले निर्वासित पाकिस्तानात गेलेल्या मालकांची जी घरं रिकामी होती त्यात, मशिदींत, रस्त्यावर कुठेही रहात होते.

ह्या बातम्यांनी मास्तर अस्वस्थ होत.

ह्या सर्व हिंसाचाराबद्दल, घुसखोरीबद्दल महात्मा गांधींनी उपोषण जाहीर केले होते.

सरकारमधील मतभेद बाहेर येऊ लागले. पं. नेहरू आणि त्यांच्या विश्वासातल्या मंत्र्यांनी, पुढाऱ्यांनी उपपंतप्रधान व गृहमंत्री वल्लभभाई पटेलांविरुद्ध ते हिंदूंना चिथवत असल्याचा प्रचार चालू केला होता. महात्मा गांधींचाही त्यांना पाठिंबा होता.

बापूंचे प्राण वाचविणे हा मुख्य प्रश्न मंत्रिमंडळापुढे होता.

महात्माजींनी १२ जानेवारी १९४८ रोजी सायंप्रार्थनेत १३ तारखेपासून उपोषण करण्याचे जाहीर केले.

सर्व पुढारी महात्माजींना भेटत होते. उपोषण करू नका म्हणून विनवत होते.

काही अटी मान्य केल्या तर महात्माजी उपोषण मागे घेण्यास तयार होते.

त्या अटी अशा होत्या : दिल्लीतील जे मुसलमान घरदारं रिकामी करून पाकिस्तानात गेले आहेत त्यांना अभय देऊन त्यांची घरे परत करा. सर्व मशिदीतून निर्वासितांनी बाहेर पडावे, त्यांची सोय सरकारने निराळी करावी. ख्वाजा कुतुबुद्दिन दर्ग्याचा उरूस सुरू करावा. फाळणीच्या कराराप्रमाणे अखंड हिंदुस्थानकडे असलेल्या ब्रिटिश खजिन्यातील पाकिस्तानच्या वाट्याचे ५५ कोटी रुपये परत करावेत.

मास्तरांसारखा राजकारण न जाणणारा सामान्य माणूसही ह्या विचित्र अटींनी चक्रावला. सिंधी निर्वासित तर खवळून उठले.

पण केन्द्र सरकारला बापूंजीच्या प्राणासाठी कोणतेही मोल देण्याची तयारी दाखवावी लागली.

सर्व संमतीने ह्या अटी पूर्ण करण्याचे आश्वासन पुढाऱ्यांनी दिले तेव्हा १८ जानेवारी १९४८ रोजी महात्माजींनी उपोषण मागे घेतले.

ह्या विरुद्ध सर्वत्र निषेध व्यक्त होत होता.

शाळेत शिकवण्यातही मास्तरांचे मन रमेना. रमणभाई, शंकरभाई यांची मते आजमावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यांना व्यवसायापलीकडे काही दिसत नव्हते.

एका संध्याकाळी ते घरी आले तर नाना घरीच होता. कँपमध्ये जायला आता हा घाबरला की काय? त्याला बरं नाही की काय?

त्यांनी कॉटवर पडलेल्या नानाच्या कपाळावर हात ठेवला. ताप तर नव्हता.

चपापून नाना उठला.

'काय रे काही होतंय का?' त्यांनी विचारले

'काही नाही. ठीक आहे. पण बापू बाहेर पडायची इच्छाच नाही.' नाना.

'नाना, तुला विचारेन विचारेन म्हणून किती दिवस वाटत होतो. तुमचा संघ इतकी शिस्तबद्ध तरुणांची संघटना आहे. शिबिरापासूनच हा प्रश्न मला पडलाय. ह्या बँड, कवायती, रोज जमणे ह्याचा उपयोग काय? तुमच्या लाठ्याकाठ्या काय आता कपडे वाळत घालण्यासाठी राह्यल्या आहेत. 'अरे ला कारे' जबाब कोणी विचारणारंच नाही का?'

मास्तरांनी प्रश्नांचा मारा सुरू ठेवला. आधीच अस्वस्थ झालेला नाना चिडला, 'बापू मला काही विचारू नका, मलाही तुम्हाला पडलेलेच प्रश्न सतावत आहेत. मी कोणाला विचारावं?' तो उठला आणि तरातरा बाहेर पडला.

रात्री मास्तरांना किती तरी वेळ झोप नव्हती. मोहोल्ल्यांतून जल्लोष चालू होता. महात्मा गांधींनी उपोषण मागे घेतल्याचा हा आनंद होता की त्यांनी घातलेल्या सर्व अटी सरकारने मान्य केल्याचा हा हर्षोन्माद होता.

मास्तर शाळेत जात होते. येता जाता दुकानात पेपर वाचत होते. २० जानेवारीला महात्मा गांधींच्या सायंप्रार्थनेत मदनलाल पटवा नावाच्या पंजाबी तरुण निर्वासिताने बॉंब फेकला. तो महात्माजींपासून पन्नास यार्डांवर पडला.

महात्माजींनी नेहमीप्रमाणे सर्वधर्म प्रार्थना म्हटली. भाषणात त्या तरुणाला शिक्षा करू नका असा सल्ला सरकारला दिला.

२१ जानेवारीचे पेपर्स ह्या वृत्ताने भरले होते. सरकारपक्षाचे समर्थन करणारे पेपर्स हिंदू संघटनांवर बंदी आणा म्हणून मागणी करत होते.

परस्परविरोधी मतमतांतरांच्या गुंत्यात मास्तर भांबावून गेले.


ते कसेतरी घरी आले. आजही नाना घरीच होता. तो नोकरीला जात होता पण परत बाहेर पडत नव्हता. सकाळीही तो संघात जात नव्हता. त्याचे सगळेच बिघडले होते. अशा वातावरणातच ३० जानेवारीला संध्याकाळी प्रचंड वादळ उठले. दिल्लीत नेहमीप्रमाणे ५ वा. महात्माजी बिर्ला भवनातून प्रार्थनेसाठी निघाले. त्यांच्या दोन्ही बाजूला आभा आणि मनू गांधी ह्या त्यांच्या नाती होत्या. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून ते चालत होते. फक्त मधेमधे लोकांना नमस्कारासाठी हात जोडताना ते नातींच्या खांद्यावरून हात काढत. ५ वाजून १० मिनिटांनी नथूराम विनायक गोडसे ह्या पुणेकर तरुणाने महात्माजींचे चरणस्पर्श करून त्यांना वंदन केले आणि अगदी जवळून तीन गोळ्या झाडल्या.

*रक्ताच्या थारोळ्यात महात्मा कोसळला.*
*महात्म्या तू कोसळलास*
*आणि*
*आभाळ कोसळले.*
*अहिंसेचा पुजारीच कोसळला*
*आणि*
*महात्म्याचे भक्त हिंसेने उसळले.*
*धर्मजाती-भेदाविरुद्ध लढणारा योद्धा*
*धरणीवर विसावला*
*आणि एकाच धर्मातील जाती पोटजातीने*

*धरणीकंप घडविला.*
*प्रेमपुजाऱ्याची पूजाच उधळून*
*द्वेषाने पेटले भक्त गण*
*महात्म्याचा आत्मा अनंतात विलीन झाला*
*आणि शरीर पेटत्या चंदन ज्वालांनी*
*लपेटण्यापूर्वीच गावागावातून सूडाग्नी पेटला.*
*निरपराध स्त्री, पुरुष, मुलांचे चिताभस्म*
*भाळी लावून, ते गुंड, भक्त नव्या चिता रचू लागले.*
*महात्म्याच्या एक 'हे राम' बरोबर शेकडो चिता गावोगाव भडकल्या.*
*महात्म्याच्या जयजयकाराच्या क्षीण घोषणेवर मात केली*
*'राम बोलो भाई राम'च्या केविलवाण्या बोलांनी.*

नानाच्या कॉटवर सकाळी बापूंना हा कागद मिळाला.
अस्वस्थ नाना असा व्यक्त झाला होता.

● ● ●



# प्रकरण दहावे

अपेक्षेप्रमाणे रा. स्व. संघावर बंदी घोषित करण्यात आली. स्वतः संघानेही आपले कार्य स्थगित केल्याचे जाहीर केले.

नागपूरसह देशभरातल्या सर्वच संघकार्यालयावर धाड टाकण्यात आली. कार्यालये सील करण्यात आणि ठिकठिकाणच्या संघचालकांना अटक करण्यात आली. त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. यात अनेक वृद्ध संघचालक होते.

गोळवलकर गुरुजींना नागपूर-जवळच्या पवनी येथील कारागृहात एकट्यास बंद ठेवण्यात आले.

बाह्यतः संघशाखा बंद झाल्या असल्या

तरी भजन मंडळे, क्रीडा मंडळे, नाट्य मंडळे या नावाखाली संघवाले ठराविक वेळी जमतच होते.

पोलिसांना हे सर्व माहीत होते. खबरे रोज पोलीस ठाण्यावर नेमाने जमणाऱ्या संघवाल्यांची नावे कळवीत होते. ही नावे कळवितांना व्यक्तिगत सूडही उगवले जात होते. त्यामुळे अटक होणाऱ्यांमध्ये कित्येक जण तर संघाशी दूरान्वयानेही संबंधित नव्हते. खरे कट्टर कार्यकर्ते, पूर्ण वेळ काम करणारे कधीच भूमिगत झाले होते.

मास्तर रहात होते त्या ठिकाणापासून जवळच असलेल्या सरकारवाड्याच्या प्रवेशाशीच एक मोठी विहीर होती. शेजारीच श्रीगणेशाचे मंदिर होते.

एक दिवस अचानक तिथल्या मोकळ्या जागेत, मुख्य रस्त्यापासून केवळ दहा पंधरा फूटावर पीर उभा राहिला. थडग्यासारख्या आकाराच्या ह्या दगडाला सफेद रंग दिला होता. आसपास वाळू पसरली होती. कबरीवर एक हिरवी चादरही पसरलेली होती.

अचानक उगवलेल्या ह्या पीराने सगळेच चकित झाले. ऐन हिंदू वस्तीत, कोणाला चाहूलही लागू न देता, रातोरात हे काम कोणी केले असावे.

तोंडावर बोट ठेवून सगळे गप्प होते. हा चमत्कार बघायला गाव लोटत होता. विरोधी तर कोणी बोलतच नव्हते पण कित्येक भाबडे हिंदूही त्यावर फुले वहात होते. उदबत्त्या लावत होते.

पोलिसांनी रीतसर पंचनामा केला. जुन्या मंडळींना भेटून पूर्वी येथे पीर होता की नाही याची चौकशी पोलीस करत होते.

प्रतिष्ठित हिंदूही बिचकतच माहिती देत होते. पण आक्रमक झालेल्या कित्येक मुसलमानांनी आम्ही दर गुरुवारी नमाज पढायला येतो. चादर घालतो. मन्नत मागतो अशा साक्षी दिल्या होत्या.

त्यांना अटक होण्याची भीतीच नव्हती.

तंग आणि भयानक शांत असलेल्या वातावरणात एका पहाटे प्रचंड स्फोटाने परिसरातील सगळे लहान थोर जागे झाले.

आणि स्फोटाच्या दिशेने घोळक्या घोळक्याने धावू लागले.

सरकार वाड्यासमोरचे थडगे शाबूत होते, पण सरकारवाड्याच्या अगदी कोपऱ्यात, ओक वाड्याच्या पिछाडीला असलेल्या पीरावरची कौले उडाली होती. जमीन उद्ध्वस्त झाली होती. मात्र पीराला काहीही झाले नव्हते.

ह्याही घटनेचा पंचनामा पोलिसांनी केला. रीतीप्रमाणे परिसरातील लोकांच्या साक्षी नोंदविल्या. कायमचा पोलीस बंदोबस्त तिथे ठेवण्यात आला. अटकसत्र सुरू

झाले. कल्याणातील नऊ तरुणांना सरकार उलथवून टाकण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली.

अटक पहाटेपूर्वी, अवेळी करण्यात आल्यामुळे प्रथम नावे कोणाला कळलीही नाहीत. हळूहळू सर्व नावे बाहेर आली.

या नऊ जणांत बापू मास्तरांच्या नानाचा समावेश होता.

यातील बहुतेकजण सरकारी नोकरीत होते.

त्यांना नोकरीतून बडतर्फ करण्यात आले. सर्वांना ठाण्याच्या मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले. ह्यांच्या स्थानबद्धतेला मुदत नव्हती. त्यांना कोर्टासमोर उभेही करण्यात आले नाही.

बापूंची तर कंबरच खचली. नानाच्या त्या कागदावर लिहिलेल्या ओळी त्यांना आठवत 'आभाळ कोसळले'. त्या ओळी नुसत्या काव्यपंक्ती नव्हत्या तर भविष्य व्यक्त करणाऱ्या होत्या.

बरं झालं नानाच्या सांगण्यावरून आपण नोकरी सोडून बसलो नाही. एकट्या बाळूच्या पगारावर कसे भागले असते.

वाईटातून इतकीच चांगली गोष्ट बापूंना मिळाली होती.

पण ते समाधानही अल्पकाळच टिकले. ३० जानेवारीच्या त्या दुर्दैवी दिवसापासून ते कामावर गेलेच नव्हते.

आता तर खचलेल्या मनाने आणि शरीराने ते मोहोन्याला जाऊच शकत नव्हते. कर्तव्य त्यांना हाक देत होते, पण वास्तवाने त्यांचे पाय घराबाहेरही पडायला [illegible] नव्हते.

एका सकाळी चौकशी करत एक इसम बापूंना शोधत आला. आसपासच्या लोकांना तो पोलीस खात्यातला साध्या वेशातला शिपाई वाटला. त्यामुळे कोणी त्याला आपले घरच दाखवेनात.

त्यांना भीती वाटत होती की, आता या म्हाताऱ्यालाही तुरुंगात डांबून ठेवणार.

शेवटी एका शाळकरी पोराने त्याला थेट बापूंच्या घरी आणले.

अंगणात तो दिसताच बापूंना राहवले नाही. 'अरे, सखारामा, बरं झालं रे बाबा [illegible] आता मला तुझ्याबरोबर यायला धीर येईल.'

मास्तर सखारामाला कडकडून भेटले. घरात आणले, त्याला पाणी दिले.

'मास्तर, मास्तर ऐकून तर घ्या' तो म्हणाला.

'मी ऐकायचं काय? तूच ऐक, अरे माझ्या शिकल्यासवरल्या नानाला [illegible] अटक केले रे! त्याची नोकरीही गेली. आता मला नोकरी करणे भागच

आहे रे.' बोलबोलता मास्तर ओक्साबोक्सी रडू लागले.

सूनबाईंनी चहा आणून दिला. ती हतबुद्ध होऊन आपल्या सासऱ्याचा आक्रोश पहात राहिली.

'शांत व्हा. मास्तर, शांत व्हा! येक परीस झालं त्येच बरं. तुम्ही आराम करा. गावात येऊ नका. गावात बामणाला पाय ठेवू द्यायचा नाही असं गावकीनी ठरवलंय.' सखाराम.

'देवा काय पाप केलं होतं रे? का ही शिक्षा आम्हाला?' मास्तर हुंदके देत बोलले.

'मास्तर घाबरू नका. गावाला नाही. पण आम्हाला तुम्ही हवेत. धीर धरा हेही दिवस जातील, त्यो न्याय देणारा तर हाये.'

मास्तरांनी दुःख बाजूला सारलं आणि स्नान वगैरे आटोपून कपडे करून ते बाहेर पडले.

त्यांच्या खादीच्या अवताराकडे आसपासचे लोक शेरे मारत होते. खादीवाल्यांनी ह्यांच्या मुलाला तुरुंगात डांबले हे मिरवताहेत देशभक्त म्हणून.

बापूमास्तर शाळा नं. १ मध्ये गेले. तालुका मास्तरांना सर्व हकीकत सांगितली. ते मास्तरांना चांगले ओळखत होते. 'गाव शांत होईपर्यंत इथे हजेरी लावत जा, दुसरा कोणी शिक्षक तिकडे जायला तयार आहे की नाही ते बघतो.' तालुका मास्तरांनी आश्वासन दिले.

नुसते आश्वासन देऊन ते थांबले नाहीत, त्यांनी तरुण शिक्षकांकडे बदलीसाठी बोलणीही केली. पण बहुतेक शिक्षक बामण आणि वाणी होते, ते जायला राजी नव्हते. त्यांना गावाने स्वीकारलेपण नसते. काही हरीजनांना तिकडे पाठवणेच शक्य नव्हते कारण शाळा देवळात भरत होती, गावातल्या जातीवादाची तालुका मास्तरांना चांगलीच कल्पना होती.

अन्य जातीतल्या शिक्षकांना त्यांनी पाठवून पाहिले पण आठदहा दिवसावर ते टिकले नाहीत. काहींनी तर शिक्षण खातेच सोडले.

बापू मास्तरांना घराजवळ शाळा सोईची झाली होती, डबा वगैरे नेण्याची गरज नव्हती. पण बापूंचे मन शाळेत रमेना.

शाळेत शिक्षक आणि बाहेर रस्त्यात भेटणारे विचारत, 'काय? मुलगा कधी सुटणार तुरुंगातून?'

मास्तरांकडे काय कोणाकडेही याचे उत्तर नव्हते.

स्थानबद्धांना घरचे अन्न मिळू शकत होते. ते आरोपी नव्हते, गुन्हा सिद्ध

झालेले शिक्षा भोगणारे कैदी नव्हते. त्यामुळे घरून डबे जाऊ शकत. पण बापूंकडे हे काम करू शकणारे कोणीच नव्हते. शेवटी गावातल्या इतर स्थानबद्धांच्या घरून एकत्र व्यवस्था झाली. त्याप्रमाणे नानाकडे डबा जाऊ लागला.

एक दिवस रिकाम्या डब्यातून नानाचे पत्र आले होते. सूनबाईने संध्याकाळी ते पत्र बापूंना दिले.

बापूंनी वाचले.

'ती. बापूंस,

सा. नमस्कार,

माझी तब्येत उत्तम आहे. पहाटे उठून योगासने करतो. व्यायाम करतो.

इथे आमच्यासारखे अनेक राजबंदी आहेत. बहुतेक शिकलेले आहेत, विद्वान आहेत. त्यांच्याशी चर्चा करताना आनंद होतो. त्यांच्यामुळे माझेही वाचन जरा शिस्तीने चालले आहे.

मुख्य म्हणजे आमच्याही आधीपासून काही कम्युनिस्ट कार्यकर्ते महिनोन् महिने स्थानबद्ध आहेत.

ते मुळीच निराश नाहीत. त्यांचे राजकीय विचार पटो न पटो पण त्यांच्या निष्ठेने माझ्यासारख्यांना धीर येतो.

माझ्यासह बऱ्याच जणांनी आमच्या अटकेविरुद्ध हायकोर्टात हेबिअस कॉर्पस अर्ज केले आहेत. निकाल कधी लागतो काही सांगता येत नाही.

माझी काळजी करू नका. स्वतःचीच काळजी घ्या. दादा व सौ. वहिनीस नमस्कार, रमेशला आशीर्वाद.

आपला,

नाना

**ता. क. :** आम्ही सर्वांनी तुरुंगाचेच अन्न घ्यायचे असा निर्णय घेतला आहे. तुम्हाला कळेलच.

● ● ●

# प्रकरण अकरावे



महात्मा गांधी खून खटल्यातील आरोपींवर खास न्यायालयात खटला सुरू झाला. नथूराम गोडसे बरोबरच नारायण आपटे, गोपाळ गोडसे इत्यादी तरुणांबरोबर स्वा. सावरकरांचाही आरोपीत समावेश झाला होता.

संघाचा ह्या घटनेशी काही संबंध नव्हता त्यामुळे ह्या संघटनेवरील बंदी उठवावी ह्यासाठी थोरामोठ्या मध्यस्थांचे प्रयत्न चालू होते. फाळणीच्या वेळी आणि नंतरही पंजाब, सिंध, पूर्व बंगालमधील निर्वासितांचे प्राण वाचवण्याचे प्रयत्न संघाने केले होते. त्याविषयी सरकारकडे निवेदने

जात होती.

पण सरकार बंदी उठवण्यास राजी नव्हते.

शेवटी संघालाही बंदी उठविण्यास काही प्रयत्न करणे भागच होते.

म्हणून संघाने शाखा भरविण्याचा निर्णय जाहीर केला.

हा सत्याग्रहच होता. रोज जथ्थाजथ्थाने स्वयंसेवक शाखा भरवत. शाखा भरविण्याची पूर्वसूचना, त्यात कोण कोण भाग घेणार आहेत त्यांची नावे, असे तपशीलवार निवेदन स्थानिक पोलिसांना दिले जाई.

दुसऱ्या दिवशी नियोजित ठिकाणी, नियोजित वेळेवर ध्वज लावून शाखा भरत असे. प्रार्थना झाली आणि ध्वज उतरवला की, पोलीस अधिकारी त्यांना अटक करत व पुढे कोर्टापुढे उभे करून त्यांना शिक्षा ठोठावली जात होती.

लाखो स्वयंसेवकांनी सत्याग्रह करून तुरुंगभरती फार मोठ्या प्रमाणावर झाली. महाराष्ट्रातील सर्व तुरुंग क्षमतेपेक्षा जास्त भरले. महाराष्ट्राबाहेर कर्नाटक व गुजरातमधील तुरुंगात कित्येकांना पाठविण्यात आले.

महाराष्ट्रात वरळीसारख्या ठिकाणी तारेचे कुंपण विद्युतप्रवाह सोडून उभे केले व तात्पुरते कारागृह निर्माण झाले.

तुरुंगातील नियम कठोरपणे पाळायचे, कोणतेही बंड करायचे नाही. शांततामय सत्याग्रहाला गालबोट लागू नये ह्याची काळजी घेण्यास प्रत्येक कैद्यास बजावले होते.

तरीही प्रत्यक्ष तुरुंगाधिकाऱ्यांना प्रशासनात खूप अडचणी येत. पुरेसा धान्यपुरवठा होत नसे. अंथरूण-पांघरूणे कैद्यांना पुरविणे त्यांना शक्य झाली नाही. प्रारंभी कैद्यांना तुरुंगाचे कपडे देण्यात आले होते. पण संख्या अफाट वाढल्यानंतर कैद्यांना स्वतःचे कपडे, अंथरूण-पांघरूण वापरण्यास परवानगी देण्यात आली.

सुरुवातीला कैद्यांना काम देण्यात आले, पण नंतर काम काय द्यायचे हेच ठरविणे तुरुंगाधिकाऱ्यांना कठीण झाले.

अनपेक्षित, अफाट कैद्यांच्या संख्येने शासनापुढेही प्रश्न उभे राहिले.

वाटाघाटींना पुन्हा वेग आला.

संघाला घटना नाही. त्यात लोकशाही नाही. म्हणजेच संघ हुकूमशाहीवादी आहे असा ठपका ठेवण्यात आला. त्यामुळे तोडगा म्हणून संघाने आपली घटना तयार करावी, ती सरकारला सादर करावी असे सुचविण्यात आले.

मध्यस्थांनीही पवनीच्या तुरुंगात जाऊन गोळवलकर गुरुजींची संमती मिळविली.

संघाच्या कार्यात प्रत्यक्षात काहीच फरक पडत नव्हता. सरसंघचालकाचे पद

निवडणुकीने नव्हे तर नेमणुकीनेच होणार होते. सरकार्यवाह व इतर पदाधिकाऱ्यांची निवड प्रतिनिधीसभा करतच होती.

तेव्हा लिखित घटना देण्यात काहीच अडचण नव्हती.

गोळवलकर गुरुजींनी मध्यस्थांना संमती दिली.

शेवटी सरकारने संघावरील बंदी उठविली.

ठिकठिकाणी पुन्हा शाखा नव्या जोमाने सुरू झाल्या.

पण दरम्यानच्या काळात संघ स्वयंसेवकांच्या कुटुंबांत फार कठीण समस्या निर्माण झाल्या होत्या.

नोकऱ्या गेल्यामुळे प्रत्येक कुटुंबात बेकार तरुण होते.

घराबाहेर होते तोपर्यंत त्यांच्याबद्दल कुटुंबात सहानुभूती होती. आता ते घरी आल्यावर कुरबुरी सुरू झाल्या.

त्यागाच्या धुंदीत असणाऱ्या स्वयंसेवकांना घराबाहेर शौर्य गाजवल्यासारखे वाटत होते. पण घरात प्रत्यक्ष आई, वडील, भावंडे यांचे टोमणे ऐकताना क्लेश होत होते.

कित्येक सुशिक्षित तरुण मिळेल तेथे, मिळेल तशी अल्प पगारावर नोकरी करत होते.

स्वतःचा व्यवसाय करण्याइतका पैसा नाही आणि सरकारी नोकरी मिळणे अशक्य झाले होते.

संघ बंदी उठल्यावर नानासुद्धा सुटेल अशी बापूंना आशा होती. पण स्थानबद्धांची सुटका झाली नव्हती.

त्यामुळे फडके कुटुंबावरचे दुःखाचे सावट अधिकच दाटले होते.

मास्तर निराश झाले होते.

त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे मोहोऱ्याची प्रतिष्ठित गावकरी मंडळी तालुका मास्तरांना भेटले आणि प्रत्यक्ष बापूंना भेटले. त्यांची क्षमा मागून त्यांनी शाळेत रूजू व्हावे अशी त्यांनी मास्तरांना विनवणी केली.

खरं म्हणजे मास्तरांचे आता निवृत्तीचे वय अगदी जवळ आले होते. आता म्हातारपणी ही दगदग स्वीकारू नये असे त्यांना वाटत होते.

पण इतकी वर्षे लाभलेल्या सहवासामुळे त्यांना गावाची विनंती अव्हेरता येईना.

तालुका मास्तरांनी, शिक्षण खात्यानेही त्यांना रूजू होण्याचा सल्ला दिला.

दुखावलेल्या बापूंचे मन ह्या जनभावनेने गहिवरले. त्यांनी मोहोने येथे रूजू होण्यास होकार दिला.

मास्तर रूजू झाले. रमणभाई वगैरे अधिकारी वर्गातही आनंद झाला. शंकरभाईंची मात्र भेट झाली नाही.

थोड्याच दिवसात शंकरभाईंनी नोकरी सोडल्याचे कळले. बापू थोडेसे सुखावलेच.

दुःखासारखेच सुखही एकापाठोपाठ येते की काय?

नानाची, सर्व स्थानबद्धांची सुटका झाली. हेबिअस कॉर्पस जिंकल्याचा हा परिणाम होता.

● ● ●

# प्रकरण बारावे



बापूंना रूजू व्हायला १९५० साल उगवले. जानेवारी ४८ पासून मास्तर मोहोन्यालाच काय त्या बाजूलाही फिरकले नव्हते. तो अध्याय त्यांनी आयुष्यातून पुसून टाकला होता. इतकं जीव लावून, पायपीट करून, अनेक गैरसोईशी सामना देत मास्तरांनी मोहोन्याच्या शाळेत शिकवले होते.

मुलांनाच नाही तर गावालाही थोडं फार शहाणे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. पण गावाने त्यांना केवळ जातीवरून बहिष्कृत केले ह्याचे

त्यांना फार वाईट वाटे.

स्कूल बोर्डाने, शिक्षण खात्याने त्यांच्या सेवेचा विचार करून त्यांना कल्याणात काम करू दिले होते. त्याबद्दल मास्तर कृतज्ञ होते. पण गावकऱ्यांच्या क्षमायाचनेने मास्तरांनी मन मोठे केले आणि आता उरलेले वर्षभर तरी कोणाचे शिव्याशाप नको, समाधानाने निवृत्त होऊ असा त्यांनी विचार केला.

नेहमीप्रमाणे ते निघाले. मागच्याप्रमाणेच देवीच्या देवळाजवळ भावे रावसाहेब भेटले. 'काय बापूमास्तर, निघालेत का कर्मभूमीकडे?' त्यांनी विचारले.

'आपली कृपा. कोणाचा रोष नको. आता वर्षही राहिले नाही रिटायर व्हायला. रावसाहेब, गरीबाला सांभाळून घ्या', मास्तरांनी हात जोडून विनंती केली.

'अहो मास्तर, तुम्ही मोठे आहात. मला कसला नमस्कार करता? तुम्ही दोन वर्षं कशी काढली असतील याची कल्पना आहे मला, आम्हाला मेंबरांकडून कमी का टोमणे ऐकावे लागले. पदोपदी अपमान गिळावा लागला. अजूनही सहन करतोच आहे.' रावसाहेबांनीही चष्म्याच्या काचेआड धरलेल्या अश्रूंना सदऱ्याच्या टोकानेच टिपले.

'चला मास्तर आता तुमची मोहोन्याला जाण्याची उत्तम सोय झाली आहे. अहो, कंपनीने खासगी बसेस कल्याण-मोहोने सुरू केल्या आहेत.' रावसाहेब.

'काय सांगताय काय?' मास्तर

'खरंच सांगतोय, कंपनीच्या नोकरांना वेळी अवेळी जावं लागतं. लोकल तर थांबत नाही. म्हणून त्यांनी कंपनीच्या शिफ्टच्या वेळी जाण्यासाठी कंत्राट दिलंय एका सिंध्याला. चला, आमच्या कचेरीजवळच बस थांबते. कंत्राटदार आपल्या ओळखीचा आहे. मंघवानी म्हणून कोणी निर्वासित आहे. चांगला माणूस आहे.' रावसाहेब.

'फार चांगलं झालं. आता शरीर पूर्वीसारखं साथ नाही देत हो, बरं झालं.' मास्तर.

रावसाहेब देवीदर्शन घेऊन परतले आणि मास्तर स्टेशनकडे चालू लागले. खादीच्या जड कपड्यांची अजून त्यांना सवय झाली नव्हती. त्यामुळे चालण्यातला वेगही कमी झाला होता.

मामलेदार कचेरीजवळ खरंच एक दुरंगी बस उभी होती. काही माणसं बसमध्ये चढत होती. भीत भीत मास्तरही चढले. त्यांना कोणीही हटकले नाही. समोरच्याच सीटवर एक धोतर, शर्ट, कोट, पुढ्याची काळी टोपी घातलेला इसम बसला होता.

आपल्याच वयाचा तो इसम पाहताच मास्तरांना धीर आला. तेही समोरच्या

सीटकडे गेले. त्या इसमाने चष्म्याच्या फ्रेमवरून मास्तरांकडे आपादमस्तक नजर टाकली. 'राम राम, बैठो', त्याने मास्तरांना शेजारीच बसायला जागा दिली.

तो माणूस मराठीच वाटत होता. पण बोलत होता हिन्दीत.

मास्तरांनी नमस्कार करून जागा स्वीकारली.

'मला, मोहोन्याला जायचे आहे. मी देवळातल्या शाळेत शिक्षक आहे. ह्या बसने प्रवास केला तर चालेल ना?' त्यांनी आदराने चौकशी केली. त्या इसमाने त्यांना पुन्हा, 'आरामसे बैठो' सांगितले.

हळूहळू बस भरली. कंडक्टरने तिकिटे फाडायला सुरुवात केली. मास्तरांकडे तिकिटाचे पैसे मागताच शेजारच्या इसमाने हातानेच त्याला जायला सांगितले.

'अच्छा सेठ', कंडक्टर इतर प्रवाशांकडे वळला.

बसच्या पत्र्यावर ढँग ढँग असा आवाज काढत त्याने घोगऱ्या आवाजात ड्रायव्हरला आज्ञा सोडली -

'जाने दो.'

बस धावत होती. मुरबाड रोड कोरट, सिंडिकेट, शहाड असे थांबे घेत बस मोहोन्याला पोहोचली. 'सेठ' उतरला आणि कंपनीच्या इमारतीकडे गेला. सगळे उतरले. मास्तर उतरले. त्यांचा डोळ्यांवर विश्वासच बसेना.

समोर कारखान्याची प्रचंड इमारत उभी होती. टाइम ऑफिस अशी अक्षरे मिरवणारी इमारत गेटजवळच उभी होती. प्रत्येकाला तपासूनच आत सोडले जात होते.

वळसा घेऊन बस कल्याणकडे निघाली. ती उणीपुरी भरलीही नव्हती. उतरलेल्या एका बऱ्या कपड्यातल्या माणसाला त्यांनी विचारले, 'तो कोट, टोपीवाला कोण होता हो?'

त्याला माहीत नव्हते.

ते गेटवरच्या वॉचमनकडे गेले. त्यालाही त्यांनी तोच प्रश्न विचारला.

'तो मोठा माणूस आहे. त्या बसचा कंत्राटदार - मंघवानी सेठ.' आपल्याला खुद्द शेठने बसमधून फुकट आणले. इतका मोठा माणूस, इतका साधा.

प्रारंभ तर चांगला झाला. ते गावातून शाळेकडे जाऊ लागले.

दोन्ही बाजूच्या दुकानदारांनी मास्तरांना बोलावले. पण मास्तरांना आता फार वेळ दवडून चालणार नव्हते. ते सर्वांना नमस्कार करत देवळाकडे चालू लागले.

पण अप्पा शेटेला ते टाळू शकले नाहीत. तो माळकरी पुढे झाला आणि बळेबळेच मास्तरांना दुकानात घेऊन आला.

दुकान चांगलेच वाढले होते. दुकानावर त्याने माडीही उभारली होती. वर तो सहकुटुंब राहायचा.

'अरे वा अप्पा, दुकान चांगले वाढवलंय, छान.'

'विठ्ठलाची कृपा! मास्तर त्यानेच तारले. आता सगळं ठीक आहे. मुलं मोठी झालीत. आता दुकानाचं तेच बघतात. तुमच्या सारख्यांचे आशीर्वाद आहेत.' अप्पा शेटे.

वरून तांब्यात चहा घेऊन एक पोरेलेशी तरुणी जिन्यावरून आली. तिने कपात चहा ओतला. डोईवर पदर घेऊन तिने मास्तरांना वाकून नमस्कार केला.

'मास्तर, सूनबाई आहे, लग्नाला तुम्हाला बोलवताच आलं नाही.' शेटे म्हणाले.

'नशीबवान आहात, चांगलं वळण आहे सूनबाईला.'

'आपल्या नात्यातलीच आहे. शिकलेली आहे. तिचे दोन भाऊही शिकले-सवरले आहेत. कंपनीत लागले आहेत. विठ्ठलाने दोन्ही हातांनी दिलंय मास्तर.' -शेटे.

मास्तर उठले. उशीर होत होता.

जाता जाता सरपंचांना भेटलंच पाहिजे. ते सरपंचांच्या ओटीवर गेले. सुदैवाने चार गावकऱ्यांसह मास्तरांना सरपंच भेटले, उराउरी भेट झाली.

दोघांच्याही डोळ्यात पाणी तरळले.

'ब्येस झालं मास्तर, आता आमची काळजी मिटली. अहो पोरं शिकलीच पाहिजेत आणि ते तुमच्यासारखे मास्तर असले तरच शिकणार!' सरपंच भडभडून बोलत होते.

'मास्तर आज तुम्ही शिकवलेली पोरं कंपनीत लागलीत. तुम्ही बोललात ते खरं झालं. अहो घरटी एक काय चार चार जण कंपनीत लागलेत. आसपासच्या सर्व गावातली पोरं कामाला लागली'. सरपंच.

'छान छान! म्हणजे आता गाव सुधारलं. आता मी वर्षभरही नाही. पण पोरांना शिकवा. कालेजात घाला. म्हणजे कंपनीत हपीसर म्हणून लागतील.' मास्तर कळवळ्याने बोलले.

सरपंच त्यांना मानाने शाळेत घेऊन गेले. तिथे एक तरुण शिक्षक होता. त्यानेही अंदाजाने मास्तरांना ओळखलं. मास्तरांना आणि सरपंचांना नतमस्तक होऊन त्याने नमस्कार केला.

'मी देशमुख. आता सुटलो. कशीबशी नोकरी केली. आता शाळा ताब्यात घ्या. मला कंपनीत नोकरी मिळतेय'... देशमुख मास्तर.

'ठीक आहे. तुमचं भलं होत असेल तर तुम्हाला जावंच लागेल. पण मग


शाळेला मास्तर मिळणार कसे? जाऊ द्या. येईल कोणी. कंपनीत चांगली प्रगती करा.' मास्तरांनी तोंड भरून आशीर्वाद दिला.

सरपंचांनी निरोप घेतला. मास्तरांनी देशमुखांकडून चार्ज घेतला. रजिस्टरं तपासली. त्यांना दाखला दिला.

आणि नव्या पोरांची चौकशी करू लागले.

मुलांमध्ये फरक पडला होता. कपडे चांगले होते. दप्तरं बरोबर होती. स्वच्छताही दिसत होती. मास्तरांना समाधान वाटलं. मास्तरांनी हनुमानाला नमस्कार केला, मनात म्हणाले, पुनश्च हरिॐ!

● ● ●



# प्रकरण तेरावे

एका शनिवारी अर्धवेळ शाळा करून मास्तर बससाठी कंपनीच्या गेटवर आले. बस काही आली नव्हती. दहापाच माणसं वाट पहात होती.

मास्तरही नजर पोहोचेपर्यंत बसच्या दिशेने पहात होते. इतक्यात एक करकरीत कार मास्तरांना येऊन भिडली. मास्तरांना वाटले आटोपला कारभार. पण मास्तर अलगद उभे होते. कारचे दार उघडून एक पांढऱ्याशुभ्र गणवेशातला इसम बाहेर आला आणि गडगडाट करत हसत म्हणाला, 'घाबरू नका. माझ्या गाडीखाली आज पुत्तर कोनबी म्येला न्हाई, चला.' इसम.

'अरे, कोण सखाराम! मी तुला ओळखलंच नाही. तुझ्या हसण्याने आणि आवाजाने ओळखलं बघ, बाकी तू पार बदलून गेलास.' मास्तर हसून म्हणाले.

आता आपन ट्रक ड्रायव्हर न्हाई राह्यलो. साहेबाच्या गाडीवर खास नेमणूक झालीय. चला. आत फेरी मारून येऊ.' सखाराम खुशालला.

'अरे पण मला कल्याणला जायचं आहे', मास्तर.

'जाल हो. लई बशी हायेत, आन् तुमी तर वशिल्याची मानसं. तुमाला फिरीमध्ये बस हाये का नाय?' सखाराम.

'खरंच रे! तो कोण मंघवानीशेठ, त्यानं म्हणे मला फुक्कट प्रवासाची आर्डरच सगळ्या कंडक्टरांना दिली आहे.' मास्तर.

'म्या काय बोलतो व्हतो? त्यो हाये वर न्याय द्यायला,' सखाराम.

त्याने बळेबळेच मास्तरांना शेजारी बसवले. गाडी सुरू झाली. कॉलनीत छोट्या-मोठ्या इमारतींचे बांधकाम सुरू होते. काही पूर्ण झाले होते. छोट्या घरातून काही जण राहायलाही आले होते.

डांबरी रस्ते चकचकीत गुळगुळीत होते. बाजूच्या झाडांनी चांगलीच वाढ घेतली होती. काही जुने वृक्ष तसेच ठेवले होते. त्यांना पार केले होते. रस्त्याच्या दोहो बाजूने छोटी छोटी शोभेची दाट झाडे नीट कापून उभी होती. माळी लोक काम करत होते.

दोन वर्षांत ह्या उजाड जमिनीचा झालेला कायापालट पाहून मास्तर थक्क झाले.

देखणे रस्ते, देखण्या बागा पाहून त्यांना जुन्या कल्याणची आठवण आली. वर्षानुवर्षे त्यात बदल नव्हता आणि बदल नव्हता ह्याचाच गावाला अभिमान होता.

शेजारी गाडी चालवणारा सखाराम म्हणतच होता. बदलायलाच हवं.

त्याचे कडक इस्त्रीचे पांढरे शुभ्र कपडे, छातीवर चकाकणारा एनआरसीचा बिल्ला पाहून ते संकोचले. त्यांच्या खादीचा रंग पांढरा म्हणता येण्याइतका शुभ्र नव्हता. नीळ घालून तो निळाईकडे झुकला होता. कोट गबाळ्यासारखा शरीरापेक्षा मोठा होता. टोपी टोकदार नव्हती, कपाळाच्या बाजूने कडा पिवळ्या पडल्या होत्या.

आजपर्यंत त्यांना त्याचे काही वाटले नाही. 'साधी राहणी उच्च विचारसरणी' हे सांगण्यात त्यांनी आयुष्य घालविले होते.

ते विचारात मग्न असताना कॉलनीत फेरी मारून गाडी थांबली. सखारामने उतरून समोरच्या साहेबाला सलाम केला.

त्याने खुणेनेच कोण म्हणून सखारामला विचारले.

पुन्हा गडगडाटाने हसत तो म्हणाला 'न्हाय वळखलं, अवं मास्तर आपले!'

समोरचा साहेबही सवाई गडगडाटाने हसला. कपडे पांढरेच होते. डोक्याला हॅट होती. पोट सुटले होते. चष्मा नाकावर येत होता. त्याने दरवाजा उघडून मास्तरांना बाहेर काढले. 'अरे, शूं मास्तर ओळख्यू नथी! मी रमणभाई. तुमी लई महाग झाले. कवासून भेट नाय.' त्याने कडकडून मास्तरांना मिठी मारली.

'रमणभाई, अरे काय रामायण घडलं माहीत आहे ना? दोन वर्ष कशी काढली मला माहीत.' मास्तरांनी डोळे टिपले.

'हवे. भूली जा. सारूं ठीक थशे! हूं? समज पडी ने! चालो जईए. फॅक्टरी जोवानी छे ने?' रमणभाई

'फॅक्टरी तर बघायचीच आहे. पण आज नको. घरी वाट पहात असतील. आता वय झालं ना. बाहेर पडलो की घरच्यांना घोर लागतो.'

'येत्या बुधवारी व्हिजटर्स येणार आहेत. तवा या. समदा समजावून पण सांगतील. सकाळी चोकस दस वागे इथेच या. मी इंतजाम करतो.' रमण म्हणाला.

त्यांचे गेटकडे लक्ष गेले, कल्याणकडे बस निघत होती. ते वयाला न शोभेलसे धावू लागले. वॉचमनने शिटी वाजवून गेटवरच्या वॉचमनला बस थांबवायला सांगितले.

'आराममथी जा. दौडू नको. पडशील तर मोडशील. अने आ खादी शू काम पेहरो छो. अरे, हमणा अमारो रेयॉन. स्वदेशीच छेने!' मास्तरांना धड ऐकू आले नाही.

ते बसमध्ये बसले. पहिली सीट त्यांच्याकरता रिकामी होती.

खिडकीतून येणाऱ्या झुळुकीने त्यांच्या पापण्या जडावल्या. मधूनमधून ते जबरदस्तीने डोळे उघडत होते.

सगळे बदल ते उघड्या डोळ्याने पहात होते. कंपनीची कॉलनीची प्रगती त्यांना दिसत होती. गावाची श्रीमंती वाढलेली त्यांना दिसत होती. शेतजमीन कंपनीला विकून बहुतेक घरंदाज पाटिलांनी चाळी बांधून उत्पन्न वाढवले होते. भातशेतीच्या मानाने कितीतरी पट पैसे खुळखुळत होते.

घरटी एक काय चार चार पोरं कंपनीत नोकरीला लागले होते आणि 'हे सगळे मास्तर तुमच्यामुळे' असा भलेपणा सरपंच त्यांना देत होते.

खरंच आपल्यामुळे इतके तरुण नोकरीला लागले? मग आपल्या नानासाठी शब्द टाकायला काय हरकत आहे?

त्यांची पेंग उडाली, नाना हुशार आहे. संधी मिळाली तर तो नक्की तिथं सोनं करील याची त्यांना खात्री होती.

त्यांना नानाच्या प्रगतीची स्वप्ने दिसू लागली. केव्हा एकदा घरी पोहोचतो असं त्यांना झालं होतं.

कल्याणला बस पोहोचली तेव्हा रणरणते ऊन होतं. टांग्याने जावं असा विचार त्यांच्या मनात डोकावला. पण लगेच त्यांचे पाय जमिनीवर आले. नाना अजून बेकार आहे. आपले काही महिनेच राहिले आहेत, ह्या वास्तवाचे चटके उन्हापेक्षा तापदायक होते.

ते तसेच निघाले. दुपार असल्यामुळे गर्दी नव्हती. ते इमारतींच्या सावलीतून चालत दूधनाक्यावरील घरी पोहोचले.

वाड्यात सामसूम होती. उघड्या दारासमोर चटईवर सूनबाई झोपली होती.

बापूंची चाहूल लागताच ती उठली. पाटपाणी घेतलं. तवर मास्तर हातपाय धुऊन पाटावर येऊन बसले.

भूक लागली असूनही त्यांना जेवण जाईना. कसेबसे चार घास घशाखाली लोटून ते उठले.

सूनबाईची चटई तशीच होती. तिने उंच उशी आणून ठेवली. किती काळजी घेते ही पोर असा विचार करत ते आडवे झाले. वयाने, थकव्याने त्यांचा डोळा लागला.

उशीवर त्यांची लाळ गळली होती. इतकी गाढ झोप त्यांना कित्येक दिवसात लागली नव्हती. कोणाच्या तरी बोलण्याने ते जागे झाले. बाहेरच्या ओटीवर नानासह ते गृहस्थ मोठमोठ्याने बोलत होते. नानाला ते पटवून देत होते की त्याने प्रचारक म्हणून बाहेर पडावे. पूर्ण वेळ संघाचे काम करावे. नव्या जोमाने काम वाढले पाहिजे. स्वयंसेवक निराश झाले असतील त्यांना हुरूप आला पाहिजे. यंदा जास्तीत जास्त प्रचारक निघावेत असा वरचा आदेश आहे. नाना काहीच बोलत नव्हता. तो ऐकत तरी होता की नाही ह्याचीच बापूंना शंका होती.

तुरुंगातून सुटून आल्यापासून नाना बदलल्यासारखा वाटत होता. पूर्वीसारखा सकाळ-संध्याकाळ तो घराबाहेर जात नव्हता. बोलणंही कमी झालं होतं. कुठून कुठून इंग्रजी पुस्तकं आणून वाचत होता.

नोकरीसाठीही फारसा प्रयत्न तो करताना दिसत नव्हता.

सदासर्वदा सार्वजनिक जीवन जागणारा नाना एकलकोंडा होणे धोक्याचे होते. तो इतका कशाचा विचार करत होता. असाच रात्रंदिवस घुम्या राहिला तर कदाचित् त्याला वेड लागायचे!

बापूंना नवाच घोर लागला.

ते गृहस्थ गेल्याबरोबर बापूंनी नानाला घरात आणले. कॉटवर बसवून एखाद्या मित्रासारखे त्याला जवळ घेऊन, त्याच्या पाठीवर हात फिरवून ते त्याची चौकशी करू लागले. त्याला काही दुखणं आहे का विचारू लागले.

'नाना, त्या गृहस्थांचं म्हणणं खरंच पटलं असलं तर तू जा प्रचारक म्हणून. आम्ही भागवू कसं तरी. सहा महिन्याने मी निवृत्त होणार आहे. पण शिकवण्या करीन. तू आमची काळजी करू नकोस.'

बापूंचा प्रेमळ हात नानाच्या पाठीवर फिरत होता आणि बापूंच्या शब्दांपेक्षा तो हातच सारं काही बोलत होता. नानाला राहवलं नाही. बापूंच्या खांद्यावर डोकं ठेवून तो ढसढसा रडू लागला.

सूनबाईने लगबगीने समोरचे दार बंद केले.

'बापू, मला काही सुचत नाहीये. इतकी वर्षं केलेल्या कामाची समाजाला काय किंमत आहे? ज्या समाजासाठी करायचं त्यालाच ते नको असेल तर काय अर्थ आहे? बापू, मला क्षमा करा. माझ्यामुळे सगळ्या कुटुंबाला हाल सोसावे लागले. तरीही तुम्ही मोठ्या मनाने मला प्रचारक व्हायला परवानगी देता? शिकवण्या करून घरखर्च भागवण्याची उमेद धरता. या वयात हा विश्वास तुम्ही कसा साधलात? मला क्षमा करा बापू. मला लाज वाटते तुमचा मुलगा म्हणवून घ्यायला. मी ऐन तरुणपणी हरलो आहे आणि तुम्ही म्हातारपणी नव्या उमेदीने स्वप्नं पहात आहात. बापू क्षमा करा. मी काय करू सांगा. तुमच्या आज्ञेबाहेर मी जाणार नाही.'

नाना स्फुंदत स्फुंदत बोलत होता.

'नाना, सांगतो ते पटतं का पहा. मी मोहोन्याला जाऊ लागलो आणि दोन वर्षांत सगळा परिसर बदलला आहे असं जाणवलं. खेडेगावातली साधी गरीब माणसं कंपनीत नोकरीला लागली आहेत. उद्योगधंदे करत आहेत. कंपनीने दोन वर्षांत अफाट प्रगती केली आहे. परिसरातल्या गावांचंही भलं झालं आहे.

तुझ्यासारख्या हुशार मुलाला ही सोनेरी संधी आहे. तुझी इच्छा असेल तर मी ओळखीच्या साहेबांकडे शब्द टाकतो. माझा शब्द ते खाली पडू देणार नाहीत. पूर्वपुण्याईचा जरा स्वतःच्या कुटुंबासाठी तरी उपयोग होऊ दे. विचार कर. सक्ती नाही. पण जरा मोकळा हो. घरात बसून राहू नकोस. त्याच त्याच विचारांच्या माणसात घोटाळत राहू नकोस. अरे तूच म्हणाला होतास ना ते कम्युनिस्ट वर्षानुवर्षे तुरुंगात आहेत पण ते निराश नाहीत. असंच असलं पाहिजे. आणि मला विचारशील तर मी सांगेन कंपनीत नोकरी करूनही तू सामाजिक काम करू शकशील. माझं मन सांगतं, 'नाना मोठा होणार आहे।' ऊठ, मोठा हो.'

नाना उठला, हात पाय धुऊन तो फ्रेश झाला.

संधीप्रकाशात तो मागच्या गल्लीने बाहेर पडला. दुर्गाडीवरच्या पडक्या बुरुजावर तो विसावला. खाडीपलीकडे पश्चिमेला सूर्य मावळत होता. मावळतांनाही

तो तेजस्वी गोळा उद्या अधिक प्रखर होऊन परतण्याचे आश्वासन देत होता.

मावळत्या दिनकराला नानाने नमस्कार केला. उद्यापासून पुन्हा सूर्यनमस्कार सुरू करायचा त्याने निश्चय केला. पूर्वी तो मंडळात जात असे. आता घरीच तो सूर्योपासनेला सुरुवात करणार होता.

काळोख पडल्यावर तो दुर्गाडी उतरून, राममारुतीच्या देवळावरून थेट घरी आला.

रस्त्यात त्याला कोणीही ओळखीचे भेटले नाहीत. भोजनोत्तर तो फार वेळ वाचत बसला नाही. प्रथमच तो लवकर झोपत होता.

'पहाटे बापू जागे झाले नानाच्या, 'ध्येयसदाराविवृमंडल, मध्यवर्ती नारायण' ह्या मंत्राने. नानाने बारा नमस्कार घातले. किलकिल्या नजरेने बापूंनी हे टिपले. एका विलक्षण समाधानाने ते उठले. 'कराग्रे वसते लक्ष्मी' म्हणत त्यांनी पथारी सोडली.

बापूंनी नित्याप्रमाणे अन्हिके आटोपली. डबा घेऊन ते शाळेत जायला निघाले. धावत दिण्डी दरवाजापाशी नानाने बापूंना गाठले. 'बापू बोला कोणा साहेबाशी, मी कंपनीत नोकरी करायला तयार आहे,' तो म्हणाला.

वय विसरून बापूंना उडी मारावीशी वाटली.

आज एका विलक्षण आनंदात बापू निघाले. योगायोग म्हणजे देवीच्या देवळाशी नेमके रावसाहेब भेटले. 'नमस्कार रावसाहेब, एक विनंती होती. जरा माझ्या नानासाठी एनआरसीतल्या हपिसरकडे शब्द टाका ना.' मास्तर

'अरे त्यात काय कठीण आहे? आजच मी कोणी साहेब आले की बोलतो. पण मास्तर तुम्हीच बोला ना. तुमचीपण चांगली वट आहे. तुमच्याबद्दल कंपनीतले साहेब चांगले बोलतात.' - भावे.

बघतो बघतो म्हणत मास्तर निघाले. ते मोहोन्याला पोहोचेपर्यंत कोणाकडे शब्द टाकावा त्यांना सुचत नव्हते.

ते शाळेत गेले. नेहमीप्रमाणे वर्ग घेऊ लागले. शाळा सुटायच्या जरा आधी कंपनीचा शिपाई त्यांना भेटायला आला.

त्याचा गणवेश, बिल्ला पाहून ते विचारात पडले. 'नमस्कार, मास्तरसाहेब, आमच्या डब्ल्यूसायेबांनी बोलावलंय तुम्हाला. कल्याणला जाण्यापूर्वी भेटून जा.'

डब्ल्यूसाहेब? हा कोण इंग्रजसाहेब आलाय आणि आपल्याशी काय काम?

त्यांनी शिपायाला थांबायला सांगितले. आवराआवर केली आणि त्याच्याच बरोबर ते निघाले.

शिपायाबरोबर ते मुख्य इमारतीत आले.

शिपायाने साहेबांना मास्तर आल्याचे कळवलं. साहेब केबिनचं दार उघडून मास्तरांकडे आले.

लाल टाय बांधलेले डब्ल्यूसाहेब नमस्कार करून मास्तरांना शुद्ध मराठीत म्हणाले, 'मास्तरसाहेब आत चला ना.'

त्यांना मास्तरसाहेब म्हणणारा हा पहिलाच साहेब होता. त्या थंडगार केबिनमध्ये, गुबगुबीत खुर्चीत ते अवघडून बसले. शिपायाने स्वच्छ पाण्याचे काचेचे किमती ग्लास आणून ठेवले. त्या गारव्यातही मास्तरांच्या घशाला कोरड पडली होती. ते ढसढसा पाणी प्याले. इतक्यात ट्रेमधून गरमागरम कॉफीचे कप आले.

ह्या स्वागताने मास्तर भांबावले. त्यांना काय बोलावे सुचेना.

हा इंग्रजी नाव असलेला साहेब शुद्ध मराठीत बोलतोय ह्याचंच अप्रूप त्यांना होतं.

'मास्तरसाहेब, एक रिक्वेस्ट होती. तुम्ही म्हणे आता रिटायर होणार आहात. तशी परमेश्वरकृपेनी तुमची तब्येत ठीक आहे.' ते बोलत होते.

मास्तरांनी छताकडे पाहिले, 'त्याची कृपा' ते पुटपुटले.

'तर रिक्वेस्ट अशी. जूनपासून आम्हाला शाळा सुरू करायची आहे. तुमचा प्राथमिकचा अनुभव दीर्घ आहे. काही काळ तुम्ही आमच्या शाळेत शिकवावं अशी इच्छा आहे. पगार वगैरे चांगला देऊ. पाहिजे तर राह्यची सोय करू कॉलनीत. आरंभालाच आपणासारखा सज्जन मिळाला तर शाळेचं भलं होईल. विचार करून एक-दोन दिवसांत कळवा.'

'साहेब, तुम्ही दिलेल्या देकाराबद्दल आभारी आहे. तुमची विनंती मान्य करायला माझी हरकत नाही. पण माझं एक काम आपण करावं. माझा मुलगा मॅट्रिक झालाय, हुशार आहे. रेल्वेत नोकरी होती. पण संघाच्या चळवळीत गेली. त्याला आपण संधी दिलीत तर आयुष्यभर तुमच्या शाळेत फुकट शिकवीन.'

'अहो, अशी कुणाचीही फुकट सेवा आम्ही घेत नाही. आणि मुलाचं म्हणाल तर उद्या भेटायला पाठवा. सकाळी नऊ वाजता पाठवा. सर्टिफिकेट वगैरे घेऊन पाठवा. तुमचं काम होऊन जाईल.'

'साहेब, एक विचारू का? आपलं नाव डब्ल्यू आणि आपण मराठी तर छान बोलता...' मास्तर.

'अहो माझं नाव डबली. मी नागपूरकडचा. डबली हे सरकारी पद होतं निजामीत. तेच आमच्या पूर्वजांना कायमचं लागलं. झालं समाधान? खरोखर मास्तर शोभता, चौकसपणा पाहिजेच.' साहेब.

'माफ करा. असे विचारणारा मी पहिलाच असेन ना. ...घेऊ रजा. नमस्कार.' मास्तर.

साहेबांनी दरवाजापर्यंत येऊन मास्तरांना निरोप दिला. शिपायाला बसपर्यंत जाण्यास सांगितले.

मास्तर अत्यंत आनंदात होते. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन. देवाचे मनोमन आभार मानत त्यांनी तिथूनच देवळाच्या दिशेने नमस्कार केला. केव्हा एकदा घरी पोहोचतो आणि नानाला ही बातमी सांगतो असं त्यांना झालं. इतक्यात दुरंगी बसने झोकदार वळण घेतलं व नेहमीच्या ठिकाणी ती थांबली. रांगबिंग लावायची शिस्त कोणालाच नव्हती, सगळ्यांनी एकच झुंबड केली.

मास्तरांना दगदग करण्याचं कारणच नव्हतं. मंघवानीच्या कृपेने त्यांची पहिली सीट त्यांच्यासाठी राखीव होती.

बस सुटली. फारसे थांबे न घेता ती कल्याणकडे धावत होती. मास्तरांचे मन कधीच घरी पोहोचले होते.

# प्रकरण चौदावे



'कंपनीत महत्त्वाच्या कामाला बोलावलंय म्हणून पोरांना सुटी देऊन सरपंचांच्या कानावर मास्तरांनी घातले आणि ते कंपनीत रमणभाईने सांगितलेल्या ठिकाणी येऊन उभे राहिले. सात-आठ तरुणही उभे होते.

इतक्यात एक तरतरीत तरुण तिथे आला. 'वेलकम टू यू ऑल... कम ऑन, लेट अस स्टार्ट' असे म्हणत त्याने आपल्या मागे सर्वांना यायला सांगितले.

एक टेबलाशी क्लार्क बसला होता. त्याने प्रत्येकाचे नाव वगैरे माहिती लिहून घेतली. सगळ्यांची भाषा मराठीच होती.

'मी देशपांडे. तुमची ओळख या कागदावरून झालीच आहे.'

सगळे जण त्याच्या मागोमाग जाऊ लागले. तो थांबला. 'एक मिनिट. हे तुमच्या

बाजूला कागदासारखे शीट्स दिसताहेत ना तो पल्प', देशपांडे.

'पल्प म्हणजे काय?' मास्तर

'अरे हो, पल्प म्हणजे लगदा. पण हा परदेशातून येतो. कॅनडा, अमेरिका वगैरे देशातून तो असा पुठ्ठ्यासारखा कोरडा करून पाठवणे सोपे जाते.'

'मग ह्याला पल्प का म्हटलं?'

'हं, त्याचं कारण ह्या कागदाचे आता लगेचच लगद्यात रूपांतरित होते. चला दाखवतो.'

एका मोठ्या यंत्रात त्या कागदाचे बारीक तुकडे होत असतात. एका प्रचंड घरघरणाऱ्या यंत्रात ते पडतात. त्यात काही रसायने असतात. ह्या यंत्रात सारखी घुसळण चालू होती.

'ह्याला चर्न म्हणतात, ह्या लगद्यात ९० ते ९५ अल्फा (Alpha) सेल्यूलोज असते. त्यामुळे ह्या लगद्यापासून धागा निघतो. त्यालाच रेयॉन म्हणतात.'

'पण साहेब, हे शीट्स कशापासून बनवलेले असतात?'

'बरं झालं विचारलंत. हा पल्प मूळ झाडापासून, बांबूपासून बनवतात. हे शीट्ससुद्धा थेट तुकड्यात रूपांतरित होत नाहीत. हे शीट्स १८% कॉस्टिकमध्ये बुडवून प्रेसमध्ये साधारण तीस मिनिटे ठेवतात. मग तुकडे करून चर्नरमध्ये जातात. पुढे त्याच्यावर कार्बन डाय सल्फाइटची प्रक्रिया केली जाते. त्यामुळे पल्पचे सोडियम सेल्यूलोज झान्थेट तयार होते. नंतर ते कॉस्टिकमध्ये विरघळवण्यात येते. त्यामुळे जे द्रावण तयार होते त्याला व्हिस्कोज म्हणतात. चला आता त्या व्हिस्कोज खात्यात जाऊ. इथे तापमान १८ ते २० डिग्री सेंटिग्रेड असते. ही सर्व प्रक्रिया व्हायला ४५ ते ४८ तास लागतात.

इथून ते द्रावण पाइपमधून स्पिनिंग खात्यात जाते... काही अडचण आली तर मध्ये विचारा हं.' देशपांडे मोठ्या शालीनतेने बोलत असतात. सर्वनाथ कळत होते असे नाही. पण ते बोलत असताना, प्रक्रिया यंत्रणा हे सगळे पाहण्याने धक्क झालेले पाहुणे गप्पच असतात.

आता आपण स्पिनिंग खात्यात जाऊ. स्पिनिंग रूममधली ही यंत्रं पहा. याच्या दोन्ही बाजूला पाईप असतात. दोन्हीकडे ६४-६४ पोझिसन्स असतात. प्रत्येक पोझिशनवर एक पंप असतो. त्याला झेनिथ मीटरिंग पंप म्हणतात. या पंपातून दर मिनिटाला ठराविक ग्रॅम व्हिस्कोज मशीनवर जोडलेल्या १३.४-१३.८% सल्फ्युरिक ॲसिडमध्ये सोडला जातो. ॲसिड मशीनरवर असलेल्या ट्रफमध्ये एका दिशेने ते वाहत असते. त्याच दिशेने व्हिस्कोज ॲसिडमध्ये जातो. हाच व्हिस्कोज

ॲसिडमध्ये गेल्यावर परत आपले सुरुवातीचे रूप धारण करतो. म्हणजे व्हिस्कोजच पण धाग्याच्या स्वरुपात. ह्यालाच रिप्रेसिसिपटेशन ऑफ सेल्यूलोज म्हणतात. पण व्हिस्कोज, मीटरिंग पंपामधून, कँडल फिल्टरमधून, स्पिनरेटमधून धाग्यांच्या स्वरूपात ॲसिडमध्ये येतो तेव्हा धागे अनेक असतात. तिथे काम करत असलेला कामगार ते उचलून काचेच्या चाकावर टाकतात. हे चाक वेगात फिरत असते. व्हीलवरून धागा उचलून कामगार मशीनमध्ये असलेल्या पॉटला म्हणजे स्पिनिंग बकेटला जोडतात. धागा आतल्या आत गुंडाळला जातो. ह्या पूर्ण गुंडाळलेल्या रिळाला केक म्हणतात. काही तासांनी हा केक काढून ब्लिचिंग खात्यात पाठविला जातो.' देशपांडे रंगून सांगत असताना फिल्टर, स्पिनरेट, काचेचे व्हील प्रेक्षकांना प्रत्यक्ष दाखवत होते. त्यामुळे कळले नसले तरी काहीतरी विलक्षण पाह्यला मिळाल्याचा आनंद प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर होता.

स्पिनरेट दाखवताना देशपांडे म्हणाले, 'हे प्लॅटिनम धातूचे असते. प्लॅटिनम सोन्यापेक्षा कितीतरी महाग असते. ह्या स्पिनरेटला बारीक बारीक छिद्रं असतात. ज्या प्रकारचा धागा काढायचा त्या परिमाणाला डेनियर म्हणतात. ४०D, ६०D, ७५D, १२०D, १५०D असा धाग्याचा नंबर ठरतो. बाजारात ज्या प्रकारची मागणी असेल त्यावर छिद्रांची साईज ठरते. हायर डेनियरला कमी छिद्रे व लोअर डेनियरला जास्त छिद्रे असतात.' देशपांडे.

'साहेब हे डेनियर परिमाण आम्ही पहिल्यांदाच ऐकतोय. त्याच्याबद्दल काही सांगाल का?' उत्सुक तरुण.

'डेनियरची तुम्हाला व्याख्याच सांगतो. WEIGHT OF 9000 MEETERS OF CONDITIONED YARN IS CALLED AS DENIER.' जसं मघा सांगितलं ४०D, ५०D वगैरे लोअर डेनियर म्हणजे तलम धागा, हायर डेनियर म्हणजे जाड धागा समजलं?' देशपांडे.

'मग तलम धागा महाग की जाड?' मास्तरांनी आपल्या जाड खादीकडे पहात विचारलं.

'अर्थातच तलम महाग. सिल्क कापड करणाऱ्या कंपन्यांना तो धागा लागतो. जाड धागा सूतगिरण्या घेतात.' देशपांडे.

मास्तरांच्या शेजारच्या तरुणांनी मास्तरांचे खादी हातात घेऊन 'हे किती डेनियरचे असेल हो?' सगळीकडे खसखस पिकली.

'चला अजून आपल्याला ब्लीचिंग खात्यात जायचं आहे.' देशपांडे.

सारखं खालीवर करून, सतत उभं राहून मास्तरांचे पाय दुखायला लागले

होते. ते कंटाळले होते. पण सर्वांबरोबर जाणे तर भागच होते.

देशपांडे पाठोपाठ सगळा गट निघाला. ते सर्व ब्लीचिंग खात्यात आले. देशपांडेंनी सर्वांना एकत्र बोलावले व म्हणाले, 'हे ब्लीचिंग खाते, स्पिनिंग खात्यातून तयार झालेला माल इथे येतो. तो विशिष्ट रासायनिक प्रक्रियेने धुतला जातो. त्यामुळे धाग्याचा रंग पांढरा स्वच्छ होतो. नंतर तो ड्रायरमध्ये पाठविला जातो. तो या खात्यात आला आहे. इथे माल साधारण सहा दिवस असतो. तापमान ६५ ते ७० डिग्री सेंटिग्रेड ठेवावे लागते.

ड्रायरमधून धागा कोनिंग खात्यात नेला जातो. तिथे तापमान १८ ते २० डिग्री सेंटिग्रेड असते. हा पहा धागा कोरडा झालेला आहे. आता हे पेपर कोन असतात.

हो म्हणजे एक प्रकारची कागदी रिळेच. त्यावर धागा गुंडाळला जातो. हे पहा हे सगळे काम अत्याधुनिक यंत्राद्वारे आपोआप चालते. साधारण १ किलो वजन झाले की यंत्र आपोआप थांबते. मग तो कामगार काढतो आहे तसे कोन काढून पॅक केले जातात.

आता आपण पाहयला फार थोडा वेळ घेतला पण प्रत्यक्षात ह्या पल्पचे धाग्यात रूपांतर होऊन कोन पॅक करेपर्यंतची प्रक्रिया पूर्ण व्हायला साधारण आठ दिवस लागतात. ही सगळी प्रक्रिया चोवीस तास सर्व दिवस चालू असते.' देशपांडे.

'साहेब, आता नवीन नवीन कारखाना सुरू झालाय म्हणून कामगारांचा अडथळा येत नसेल. पण उद्या काही कारणांनी संप वगैरे झाला की फार मोठा प्रॉब्लेम होऊ शकेल, नाही?' कोणीतरी शंका काढली.

पाहुण्यांपैकी एकानेच परस्पर त्याला बजावले, 'अहो, काय शंका काढून चांगल्या कामाला खीळ घालता? जरा शुभ बोला.'

'बोलू द्या हो। त्यांची शंका बरोबर आहे. असं काही अचानक झालं तर कंपनीचं प्रचंड नुकसान होतं. प्रक्रियेतला सगळा माल फुकट जातो. यंत्रसामग्री पूर्ववत करायला कामगारांनाच खूप कष्ट घ्यावे लागतात. अगोदर सूचना असेल तर कंपनी मॅनेजमेंट सावध होते. आणि कमीत कमी नुकसान होईल याची काळजी घेते. पण तरीही तुम्ही काढलीत शंका बरोबर आहे, सर्वच रासायनिक कारखान्यांना, चोवीस तास प्रक्रिया चालू असणाऱ्या कंपन्यांना हा धोका पत्करावाच लागतो.

म्हणूनच कामगारांनी ऊठसूट संप करू नयेत. त्यांच्या कल्याणाच्या, आरोग्याच्या दृष्टीने सर्व सुविधा आमची कंपनी पुरविते.' देशपांडे यांनी स्पष्ट केले.

'आमच्या कारखान्याला भेट दिल्याबद्दल धन्यवाद. आता चला आमच्या कँटीनला.' देशपांडे.

'कशाला? आता आम्हाला निरोपच द्या. तुम्हालाच आमचे धन्यवाद. आमच्यासारख्या सामान्य माणसांसाठी तुम्ही इतका वेळ दिलात, मन लावून सर्व माहिती दिलीत, खरोखर आभारी आहोत.' एकजण म्हणाला.

'अहो, आम्ही आमचं कर्तव्यच केलं. आज तुम्ही व्हिजिटर म्हणून, पाहुणे म्हणून आलात, पाहुणचाराशिवाय कसे जाणार? चला तर. जरा बघा आम्ही रोज काय खातो.'

'बरं चला.' एकजण म्हणाला. सगळ्यांनी त्याची री ओढली.

सगळे कँटीनला गेले. चकचकीत स्टीलची टेबले, खुर्च्या, पाणी पिण्याची भांडी, चकचकीत वॉश बेसिनवर हात धुऊन पाहुणे टेबलाशी येताच, कँटीन बॉइजनी ताट आणून ठेवली.

ताट भरलं होतं. भात, भाजी, आमटी, ताक, कचुंबर, पुऱ्या रेलचेल सुग्रास अन्न होतं. मास्तरांनी न लाजता सवयीने हात जोडले व 'वदनी कवळ घेता' श्लोक म्हणू लागले. सगळे जण मास्तरांच्या मॅनरलेस पणाला नाकं मुरडत होती. काही कँटीनची पोरे, उरलेसुरले कामगारही ह्या खणखणीत श्लोकाने चकित झाले. कँटिन सुपरव्हायजरने स्वतः येऊन मास्तरांना धन्यवाद दिले. सावकाश जेवण्याचा आग्रह केला.

जेवण झाल्यावर हात धुताच पोऱ्याने 'वरियाळी' हातावर ठेवली.

हे असं सगळं रोज कामगारांना मिळतं? एकाने विचारलं. सुपरव्हायजर म्हणाले, 'फूड हेच. पण सगळ्यांना कौंटरवरून घ्यावं लागतं. आज तुम्ही गेस्ट आहात म्हणून टेबलावर वाढलं. बाकी काही फरक नाही.'

'सगळ्यांना सवलतीने जेवण मिळतं. त्याची कूपन्स खरेदी करावी लागतात. आज तुमची कूपन्स आम्ही खरेदी केली. हिशेब लागलाच पाहिजे ना?'

ह्या अवाढव्य यंत्रणेत ह्या बारीकसारीक खर्चाचाही हिशेब ठेवतात हे पाहून सारे आश्चर्यचकित झाले.

तेवढ्यात देशपांडे कधी गेले कळलेच नाही. वैद्य म्हणून एक प्रौढेले गृहस्थ आला. 'आता ह्यांच्या संगत कोलनी बघून या. तेन्ला मराठी नाय चांगलं येत. अने गुजराती तमने चालसे नही. वैद्य एमने कोलनी बतावजो.'

कोणाला बोलायला संधीच मिळाली नाही. तरी मास्तर म्हणालेच, 'साहेब, मला जाऊ द्या, घरी सांगून नाही आलो.'

'अरे, मास्तर तमे तो आपणोच माणस छो, तुमी कवा बी येऊ शकता. जा तुमी गेलात तरी चालेल.' वैद्य.

एका छोट्याशा गाडीतून सगळे कॉलनीत गेले. ठिकठिकाणी थांबून वैद्य माहिती देत होते.

A B C D E F G H अशा टाइपची क्वार्टर्स् होणार आहेत. अजून सगळे टाइप व्हायला टाइम लागेल.

ए म्हणजे एकदम टॉप ऑफिसरसाठी. अने गेस्टसाठी बी. त्याच्या असिस्टंटसाठी सी बंगले. फ्लॅट. खाते प्रमुखांसाठी...

आपण थांबलो आहोत. ही सगळी ज्याला चौथा वर्ग म्हणतात, त्या सफाई कामगार, कमी उत्पन्न पगार वेतनश्रेणी असणाऱ्या कामगारांसाठी बांधलेली एच टाइप क्वार्टर्स आहेत. दोन छोट्या खोल्या, चाळवजा बांधकाम. संडास बाथरूम कॉमन, बाकी सगळ्यांनाच असते ती सवलत यांनाही आहेच. उदाहरणार्थ विजेचा मासिक दर अत्यल्प आहे. पहिले वीस युनिट तर फुकटच.

सध्या इथे वरचे स्टाफ मेंबर्स पण रहात आहेत. त्यांचे जी टाईप क्वार्टर्स जसे तयार होतील तसे ते तिकडे जातील, काही गेले पण आहेत.

हा रस्ता काटकोनातून जातो. त्याच्या डाव्या बाजूला जी.इ. एफ.डी या टाइपची थोडी मोठी होणारी क्वार्टर्स होत आहेत. चला.

गाडी निघाली. काटकोनात एकमेकांना छेदणाऱ्या रस्त्याच्या चौकात गाडी उभी राहिली. डाव्या हाताला बांधकाम चालू होते. उजवीकडे मोठी मोकळी जागा होती. त्यात पाणी साचलं होतं, त्यावर हिरवं शेवाळं पसरलं होतं.

'हा काय तलाव आहे का?' एकाने विचारले.

'नाही. पाणी साचलं आहे. पण तिथे लवकरच भर घालण्यात येईल. ह्या बाजूला शाळेसाठी जागा राखून ठेवली आहे. शेजारी स्पोर्टस् क्लब, त्याच्या समोरच्या उंच टेकाड्यावर हॉस्पिटल होणार आहे.' - वैद्य.

'पण इथे तर काहीच दिसत नाही,' पाहुणा.

'सगळे प्लॅन तयार आहेत. गरजेप्रमाणे बांधकाम होते.' - वैद्य.

पुन्हा एक वळसा घालून गाडी गेटकडे निघाली. मध्येच एका मोकळ्या जागेकडे बोट दाखवत वैद्य म्हणाले, 'इथे मार्केटिंग प्लेस आणि रेस्टॉरंट असेल. आपण उभे आहोत तिथे आहोत तिथे पेट्रोल पंप असेल.'

'पण हे सगळं कंपनी चालवणार?' एकाने विचारले.

'नाही. सहकारी पद्धतीने कामगारांच्या सोसायटीनेच ते चालवावं अशी कंपनीची कल्पना आहे. सर्व प्रकारचे सहाय्य कंपनी करेल. चला, आता माझी वेळ संपली. तुम्हाला गेटपर्यंत सोडतो.' - वैद्य

गेटवर गाडी आली. तिथे अधिकाऱ्यांनी त्यांना निरोप दिला. 'थँक यू फॉर दि व्हिजिट!' त्याने नमस्कार केला.

ह्या सर्व वातावरणाने व्हिजिटर्स् भारावून गेले होते. सगळे जण मूकपणे गेटबाहेर उभ्या असलेल्या दुरंगी बसमध्ये बसले. आपण गेले तीनचार तास एका निराळ्या विश्वात होतो ह्याची जाणीव त्यांना होती. बसमध्ये ते एकमेकांना आपण पाहिलेल्या गोष्टीच सांगत होते. त्यामुळे ठेचकाळणाऱ्या रस्त्याने बस जात असूनही ते कोणाला जाणवत नव्हते.


कल्याणला बसमधून उतरल्यावर त्यांनी एकमेकांचे निरोप घेतले. काहींना लोकल पकडण्याची घाई होती. काहीजण कल्याण गावाकडे निघाले.

पाच-सहा मैलावर एक आदर्श नगरी उभी रहाते आहे, ह्याचा पत्ताही कल्याणच्या गर्दीला नव्हता. लोकलमधून बदाबदा प्रवासी बाहेर पडत होते आणि गोठ्याकडे धावणाऱ्या गुरांसारखे एकमेकांना ढुसण्या देत घाईने घराकडे जात होते. मुंबईकडे जाणाऱ्या लोकल्स त्यामानाने कमी गर्दीच्या होत्या.

रूळाप्रमाणेच रोजच्या रूळवाटेने कल्याणचे जीवन वहात होते. नदी जशी तीरावरचा बदल तटस्थपणे स्वीकारत असते, तशीच ही लोकगंगा तीरावरच्या बदलाची फारशी दखल न घेता वहात होती.

पण ह्या तटस्थपणाला लवकरच तडा जाणार आहे आणि इच्छा असो नसो एनआरसी बरोबर ह्या गावाला बदलाची दखल घ्यावीच लागणार आहे ह्याची पुसटशी कल्पना लोकांना नव्हती.

• • •



# प्रकरण पंधरावे

कामगारांच्या जशा नेमणुका झाल्या तसेच अधिकारी- वरिष्ठ अधिकारीही त्यांचे शिक्षण, क्षमता, पूर्वीचा अनुभव, निर्णयशक्ती इत्यादींचा विचार करून नेमले गेले.

चिनाई बंधू ही कंपनी मॅनेजिंग एजंट म्हणून काम करत होती. साहजिकच चिनाईंपैकी कोणीतरी पूर्ण अधिकारी असलेली व्यक्ती नियुक्त होणे आवश्यक होते. त्यानुसार दिनकरशेठ चिनाई हे कारखान्यात रोज प्रत्यक्ष हजर असत. सर्व खात्यांवर त्यांची प्रत्यक्ष देखरेख होती. उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या सर्व यंत्रणेवर ताबा ठेवण्याइतके त्या त्या क्षेत्रातले ज्ञान

त्यांना होते. त्याप्रमाणेच कारखान्याचा उपयोग परिसरातील लोकांना उपयुक्त ठरावा, प्रत्यक्ष नोकऱ्यांपेक्षा अन्य क्षेत्रांतही त्यांनी काम करावे, लोकोपयोगी कामे करावीत यासाठी चिनाई बंधूंचा लोककल्याणाभिमुख दृष्टिकोन होता. त्याची जाणीव दिनकरशेठना उत्तम होती.

डॉ. पारेख हे तंत्रज्ञांमध्ये सर्वश्रेष्ठ अधिकारी होते. त्यांच्या खालोखाल उत्पादन व नवनवे संशोधन यात रस असणारे जयंतभाई महेता हे चतुरस्र अधिकारी होते. रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, भूविज्ञान, चित्रकला, छायाचित्रकला, संगीत ह्या अभिजात कलांमध्ये त्यांना रस होताच. ते स्वतःच उत्तम चित्रकार होते.

त्यामुळे हुशार अधिकारी आणि कामगारही त्यांच्याकडे आकृष्ट होत. साहेब व सहाय्यक असे कडक नाते त्यांच्यात नव्हते.

ह्याचा फायदा अर्थातच उत्तम उत्पादनाला होई. कामगार व कनिष्ठ अधिकारी ह्यांना प्रारंभीच खास ट्रेनिंग देऊन कामावर पाठवत. ह्यासाठी अर्थातच कामगार सुशिक्षित असणे आवश्यक असे.

ए व बी टाइपचे बंगले बांधल्यावर त्यात डॉ. पारेख व महेता सहकुटुंब रहावयासही गेले.

त्यांच्या मुलांमुळे एक नवाच प्रश्न निर्माण झाला. डॉ. पारेखांच्या मुली व महेतांचा मुलगा प्राथमिक शिक्षण घेण्याच्या वयाचे होते. त्यांना गावातल्या देवळातल्या शाळेत पाठवणे शक्य नव्हते. एक तर ते गुजराती माध्यमातून शिकत होते, शिकणार होते. ह्या बाबतीत चिनाई बंधू आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मत त्यांनी मातृभाषेतून शिक्षण घ्यावे असेच होते.

त्यामुळे शाळा सुरू लवकर करावी ह्या विचाराने उचल खाल्ली. ठाण्याच्या [illegible]गारी नाजाबेन पटेल ह्या पारशी शिक्षिका दिनकरशेठ चिनाईंच्या परिचयात आल्या होत्या. त्यांनी नाजाबेनना निरोप दिला. त्या प्राथमिक शिक्षणातले प्रशिक्षण घेतलेल्या होत्या. त्यामुळे नियुक्तीला शिक्षण खात्याकडून काही हरकत येण्याची शक्यता नव्हती.

नाजाबेन दिनकरशेठना भेटल्या. त्यांना शाळेची कल्पना सांगितली. त्या वयाने आणि अनुभवानेही लहान होत्या. पण स्वतंत्र काम करायची संधी घ्यावी असे त्यांनाही [illegible]ले.

शाळेसाठी आवश्यक ती कागदपत्रे, मान्यता मिळवणे वगैरे सर्व व्यवस्था [illegible] करायची होती.

त्यासाठी स्पोर्ट्स क्लबच्या इमारतीतील एक वर्गखोली त्यांना दाखवली. खोली

मोठी होती. मुलांची संख्या फक्त तीन पण अनुदान वगैरेची अपेक्षा नसल्यामुळे सर्व काही शक्य आहे, असे त्या उमद्या पारशी शिक्षिकेला वाटले.

पण इतक्या मोठ्या कंपनीत आपण एकटी स्त्री. आपला निभाव कसा लागेल याचे दडपण त्यांच्या मनावर होतं. म्हणून त्या पहिल्या मुलाखतीत काही बोलल्या नाहीत.

काही दिवसांत पुन्हा त्यांना बोलावले. दुसऱ्या मुलाखतीत डॉ. पारेख आणि महेताही होते. सगळे खेळीमेळीने बोलत होते. त्यामुळे नाजाबेनना ती मुलाखत वाटलीच नाही.

तुम्हाला आम्ही राह्यला क्वार्टर देतो. तुमची इच्छा असेल तर ठाण्यापासूनचा पहिल्या वर्गाचा रेल्वे पास देतो. बससाठीही फ्री पास देतो. पण तुमच्यासारख्या तरुण, उत्साही शिक्षिकेची आम्हाला गरज आहे तेव्हा होकार द्या.' शेठजींनी आग्रह केला.

शेठजी म्हणत असले तरी ते अद्ययावत पोशाखात होते. उत्तम देखणे व्यक्तिमत्त्व होते. त्यांना शेठजी म्हणण्यापेक्षा साहेब म्हणणे बाईंना आवडले असते. शेवटी त्यांना राहवले नाही.

'साहेब, हूं आवीस.' इतकंच त्या बोलल्या.

संध्याकाळी ही बातमी शेजारच्याच बंगल्यात राहणाऱ्या कानिटकरसाहेबांच्या पत्नीला कळली. कानिटकरही मोठे अधिकारी होते. अफाट कष्ट घेऊन प्लँट त्यांनी उभारला होता. दिल्लीच्या लाला श्रीराममधून एक कर्तृत्ववान अधिकारी म्हणून रसिकलालशेठनी त्यांना मुद्दाम आणले होते. वयानेही ते ज्येष्ठ होते.

त्यांच्याचप्रमाणे सी. जी. महंत आणि डोर्ले हे दोन प्रशासन व अकाऊंटस्‌मधील तज्ज्ञ वालचंद ग्रुपमधून रसिकलालशेठनी मिळवले होते. हेही वयाने ज्येष्ठ होते. आज ना उद्या तेही कॉलनीत राह्यला येणारच होते. त्यांची मुले शिकत होती.

कानिटकरसाहेबांच्या पत्नी सौ. निर्मलाबाई ह्या स्वतः प्रशिक्षित पदवीधर होत्या. पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरी त्यांचे शिक्षण झाले होते.

संध्याकाळी उशिरा साहेब घरी येताच निर्मलाबाईंना शाळेविषयीची ऐकलेली बातमी सांगितली. त्यांचा मोठा मुलगा कल्याणच्या मराठी माध्यमाच्या शाळेत शिकत होता.

त्यामुळे शाळा निघणारच असेल तर आपण मराठी माध्यमाचाही आग्रह धरावा, असा विचार त्यांनी साहेबांकडे काढला.

साहेबांना हा मुद्दा न पटण्यासारखा नव्हताच.

ते म्हणाले मी बोलतो उद्याच.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे सकाळी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होती. नेहमीच्या कामाचा आढावा घेऊन झाल्यावर कानिटकरसाहेबांनी मराठी माध्यम शाळेत असावे असा मुद्दा मांडला.

कामगार, कनिष्ठ अधिकारी, क्लेरिकल स्टाफमध्ये आताच मराठी माणसे जास्त आहेत. त्यांनी मागणी करण्याची वेळच आपण येऊ देऊ नये असं मला वाटतं.

माझाच मुलगा इतक्या छोट्या वयात कल्याणच्या शाळेत जातो आहे. तो तिथे जातच राहील, प्रश्न फक्त माझ्या मुलाचा नाही. भविष्यात आपल्याला एक आदर्श निर्माण करण्याची संधी आहे.

दिनकरभाईंनी ताबडतोब मुद्दा स्वीकारला. कोणी शिक्षक मिळतात का , याची चौकशी करायला त्यांनी कानिटकरांनाच सांगितले.

गावातल्या शाळेतले प्राथमिक शिक्षक श्री. फडके निवृत्त होणार होते. असा अनुभवी माणूस मिळाला तर प्रारंभीची सगळी कामे ते सहन करू शकतील. मला वाटतं, डब्लींनी फडके यांच्याशी बोलावे. काम होईल. एक चांगला निर्णय घेऊन बैठक संपली.

डब्लींना बोलावून घेण्यात आले आणि दिनकरशेठने डब्लींना फडके मास्तरांना विचारायला सांगितले. डब्लींनी त्याप्रमाणे फडके यांच्याशी बोलणेही केले. त्यांनी तात्पुरती सोय म्हणून जबाबदारी घेण्याचे मान्य केले.

निवृत्तीनंतर लगेचच आपणास काम मिळेल असे त्यांना मुळीच वाटले नव्हते. कंपनीला मदत करण्याच्या मोठेपणाबरोबरच त्यांनी नानाचीही सोय करून घेतली.

ठरल्याप्रमाणे नाना डब्लीसाहेबांना भेटला. त्यांनी त्याला वालियांकडे पाठविले. वालिया हे लेबर ॲन्ड वेल्फेअरचे मुख्य अधिकारी होते. पंजाबी दिलखुलासपणा, कामगार कायद्याचे ज्ञान, व्यवस्थापनाचा अनुभव आणि मुख्य म्हणजे राजधानी दिल्लीत बड्या बड्या सरकारी अधिकाऱ्यांशी नाते, परिचय ह्याच्या जोरावर वालियासाब एनआरसीतले एक प्रभावशाली व्यक्तिमत्त्व होते.

त्यांनी जी. के. फडके म्हणजे नानाची दीर्घ मुलाखत घेतली. नानाच्या इंग्रजी बोलण्याने, अर्थशास्त्राच्या अभ्यासाने इतरही अनेक इझमस्च्या त्याच्या व्यासंगाने वालियासाहेब खूष झाले.

जी.के. नक्की कोण आहे याचे मात्र त्यांना गूढ होते. कम्युनिझमचा त्याचा व्यासंग, कम्युनिस्ट पुढाऱ्यांशी झालेली ओळख सगळे काही नानाने वालियासाहेबांना सांगितले होते. संघाशी असलेला संबंध तो लपवू शकत नव्हता. कदाचित

संघचळवळीशी संबंधित म्हणूनच त्याला दीर्घ कारावास भोगावा लागला होता. हेबिअस कॉर्पसच्या अर्जाने हायकोर्टाने आपणास कसे निर्दोष मुक्त केले हेही त्याने सांगितले होते.

नानाचा गौर वर्ण, लष्करी अधिकाऱ्यासारखी भरदार मिशी, व्यायामाचे शरीर ह्या सर्वांचा परिणाम होऊन नानाची निवड झाली होती.

वालियासाहेबांनी जी. के. फडके यांची डी.सी.शी गाठ घालून दिली. एनआरसीत पद्धत रूढ होती, ती म्हणजे नावांची आद्याक्षरे वापरायची, म्हणून डी.सी. म्हणजे दिनकरसेठ चिनाई, आर. जे. सी. म्हणजे रसिकलाल जीवनलाल चिनाई.

डी.सी.नीही जी.के.च्या नेमणुकीला मान्यता दिली व विचारले, 'वन् मिनिट मि. फडके, हू इज दॅट ओल्ड गाय फडके मास्टर?'

'ही इज माय फादर, सर.' नाना.

'व्हाय डिड यू नॉट मेन्शन इट ॲट दि आऊटसेट.' -डी.सी.

'एक्स्क्यूज मी सर, बट माय फादर हॅड ऑलरेडी स्पोकन टू मि. डब्ली व्हेन ही ऑफर्ड हिम स्कूल जॉब.' -जीकेपी.

'इट्स् ऑल राइट. वेलकम टू एनआरसी ॲंड होप बेस्ट लक आणि बेस्ट सर्व्हिसेस.' -डी.सी.

'थँक्यू सर.' जीकेपीचा एनआरसीत असा प्रवेश झाला.

वालियासाहेबांच्या हाताखाली जीकेपीची नेमणुकीची सर्व प्रक्रिया समजावून घेतली. कामगारांची भरती लेबर खात्यातर्फेच होत होती. त्यामुळे पाहता पाहता जी.के.पी. साहेब झाले.

नानाचा स्वभाव बदलला नव्हता. पूर्वीसारखा आता तो घरात बसत नव्हता. सायंकाळी पारनाक्यावरील रिक्रिएशन व्यायामशाळेत तो नियमाने जाऊ लागला. ती एक अंधारी जुनी व्यायामशाळा होती. वरती डॉ. नेने यांचा दवाखाना होता. कोणाचीही आर्थिक मदत नव्हती. सभासद नोंदणी नीट नव्हती. वेळेचे बंधन नव्हते. अशा स्थितीत तरुण त्या अंधाऱ्या व्यायामशाळेत फिरकतही नव्हते.

अनेक महिन्यांचे भाडे न भरल्यामुळे मालकांनी जागा सोडण्याची कायदेशीर नोटीस दिली होती. एक चांगली उपयुक्त संस्था बंद पडण्याच्या मार्गावर होती. भाडे नाममात्र होते. तरीही ते एक रकमी भरण्याची ऐपत कोणातही नव्हती. ज्या धनाढ्य प्रतिष्ठितांना हे सहजशक्य होते त्यांनी पाठ फिरविली होती.

नानाने आणि त्याच्या काही मित्रांनी एक एक रुपया गोळा करून निधी उभा केला. मालकांचे भाडे भरूनही बराच निधी उरला. त्याचा उपयोग भिंतींची दुरुस्ती,

रंगरंगोटी, आखाड्यातली माती बदलणे, नवी आधुनिक व्यायाम साधने विकत घेणे या करता केला.

व्यायामाला येणाऱ्यांसाठी रजिस्टर ठेवले, नियम केले. ते फलकावर लिहून ठेवले. शाळा उघडण्याची, बंद करण्याची व्यवस्था केली. संस्था रजिस्टर करण्यात आली, त्यासाठी घटना तयार करण्यात आली.

एन.आर.सी.तील नोकरीव्यतिरिक्त नानाने ह्या व्यायामशाळेच्या विकासाकरता अतोनात कष्ट केले. अगोदरच गावातील तरुणांत नाना लोकप्रिय होता. आता या विधायक कामाने तो अधिकच लोकप्रिय झाला.

संस्थेची आर्थिक स्थिती सुधारली. शासकीय अनुदान मिळू लागले. व्यवस्थापक व व्यायाम शिक्षक म्हणून अल्प का होईना निश्चित वेतनावर नेमणुका झाल्या.

रिक्रिएशन व्यायामशाळेला पुन्हा जुनी प्रतिष्ठा प्राप्त झाली.

बाह्यतः मात्र नाना बदलला होता. तो एनआरसीमुळे जीकेपी झाला होता. पूर्वी झिजल्या चपलांनी वणवण फिरणारा नाना आता उत्तम बूट वापरत होता. कपडे कडक इस्त्रीतले होते. त्याला तसे राहणे भागच होते.

कारखान्यातल्या बड्या साहेबांशी त्याचा थेट संपर्क निर्माण झाला. आपल्या खात्याच्या गरजांप्रमाणे सुशिक्षित, सुदृढ, विशिष्ट उंची वजन असलेल्या व्यक्ती त्यांना हव्या असत.

१९५० च्या अखेरीस कंपनीचे उत्पादन सुरू झाले असले तरी योजनेप्रमाणे आणि बाजारातील वाढत्या मागणीप्रमाणे अधिक उत्पादन वाढविणे कंपनीला गरजेचे होते. अधिक क्षमतेची यंत्रे बसविण्यात येत होती. उत्पादन कमालीच्या वेगाने वाढत होते. उत्पादनाची प्रत उत्तम रहावी ह्याची दक्षता घेणारी प्रयोगशाळा निर्माण झाली.

कामगार भरती जोरात होती. हळूहळू वालियासाहेबांनी जीकेपीवर जबाबदाऱ्या सोपवायला आरंभ केला. जीकेपींनी चोख काम करून त्याच्यावर टाकलेला विश्वास सार्थ केला.

संघ सत्याग्रहात नोकऱ्या गेलेले अनेक सुशिक्षित तरुण नानाच्या संपर्कात येऊ लागले. कंपनीच्या शारीरिक व बौद्धिक क्षमता पुऱ्या करतील असे अनेक जण नानाला व्यक्तिशः ओळखत होते.

ह्या साऱ्यांना नानाच्या सहाय्याने एनआरसीत नोकरी मिळाली. जीकेपींचा माणूस ही एक विशेष ओळख ठरू लागली. व्यवस्थापनही जीकेपींच्या निवडीवर खूष होते.

हे सगळे सुशिक्षित कामगार अत्यंत प्रामाणिक होते. आपआपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडत होते.

दोन-चार वर्षात जी.के.पी. हे एनआरसीतील एक प्रस्थ झाले होते. कोणतेही अधिकार पद नसतांनाही त्यांच्या मनमिळावू स्वभावाने, त्यांनी अनेक मित्र मिळविले होते.

ह्याच काळात कॉलनीतील घरेही बांधून झाली होती. कामगार, अधिकारी, कनिष्ठ अधिकारी रहायला येऊ लागले होते.

सर्व प्रकारच्या गरजा वाढत होत्या. विविध खाती त्यासाठी काम करीत होती.

● ● ●

# प्रकरण सोळावे



फडके मास्तर कॉलनीतील शाळेत रुजू झाले. पारशीबाई नाजाबेन होत्याच. तीन गुजराती मुले आणि दोन मराठी मुले होती. मास्तरांना ही शाळाच वाटेना. एकाच खोलीत मध्ये लाकडी पार्टीशन टाकून दोन माध्यमातली शाळा सुरू झाली.

फडके मास्तरांनी शासकीय परवानगीचे सगळे सोपस्कार पार पाडले. काही महिन्यांनी शाळेला मान्यताही आली. अनुदानाचा प्रश्नच नव्हता. मुलांना फी नव्हती. पगार कंपनीतर्फे मिळे.

नाना कंपनीत नोकरीस लागताच बापूंनी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. नानाचा अर्थात ह्याला पूर्ण पाठिंबा होता.

नाहीतरी इतक्या कमी मुलांना शिकवणे अवघड जात होते. वयही साथ देत

नव्हते. त्यांनी प्रकृतीचे कारण पुढे करून सेवामुक्त करण्याची विनंती केली.

त्यांची विनंती व्यवस्थापनाने मान्य केली. नाहीतरी शाळा सुरू करण्यातील सव्यापसव्य मास्तरांनी पुरे केले होतेच. व्यवस्थापनालाही कोणीतरी तरुण शिक्षक हवा होता. शक्य तो शिक्षिकाच हवी होती. मास्तरांनीच एखादी परिचित तरुण शिक्षिका मिळवून द्यावी अशी विनंती व्यवस्थापनाने केली.

मास्तरांनी होकार दिला व ते सेवामुक्त झाले.

संध्याकाळी नानाची भेट होताच त्यांनी आपला निर्णय सांगितला आणि सेवामुक्त झाल्याची बातमीही सांगितली.

फक्त कोणीतरी तरुण शिक्षिका त्यांना मिळवून देण्याची काहीतरी व्यवस्था आपल्यालाच करावी लागणार आहे, हेही बापूंनी नानाला सांगितले.

नानाकडे नोकरीसाठी अनेकजण येत असत, त्यात एक जोशी नावाचा, त्यांच्याच आळीत रहाणारा तरुण होता.

त्याला शिक्षकाची नोकरी चालणार होती. पण आता कंपनीला शिक्षिकाच हवी होती. प्राथमिक विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेता तेच योग्य होते.

त्याने शेवटी बहिणीसाठी विनंती केली. ती मॅट्रिक नव्हती पण प्राथमिक शिक्षकांना आवश्यक असलेल्या दोन वर्षे प्रशिक्षणापैकी एक वर्ष तिने पूर्ण केले होते. पुढे परिस्थितीने तो दोन वर्षांचा अभ्यासक्रम तिला सोडावा लागला होता.

नानाने कंपनीत योग्य त्या अधिकाऱ्यांपाशी विषय काढला. सुरुवातच असल्यामुळे अशी शिक्षिका त्यांना चालणार होती. पुढे मागे उरलेले वर्ष तिने पुरे करावे असे त्यांनी सुचविले.

कु. अलका जोशी ह्या तरुण शिक्षिकेची नेमणूक झाली. कु. पटेल व कु. जोशी ह्या तरुण शिक्षिका शाळा व्यवस्थित चालवत होत्या.

इतर ठिकाणी असलेले प्रश्न इथे नव्हतेच. मागाल ती शैक्षणिक साधने मिळत होती. पगार वेळच्या वेळी मिळत होता. संख्या अगदी कमी, ती मुलंही बड्या साहेबांची. त्यामुळे शिस्त राखण्यात शिक्षकाला जे रक्त आटवावे लागते तो अनुभव इथे मुळीच नाही.

मुलंही इतकी हुशार होती की, कित्येक वेळा त्यांच्या शंकांना उत्तरे देणे शिक्षकांना कठीण जात होते.

पालकांनाही ह्याची कल्पना होती. पण व्यवस्थापनाने कल्पिलेल्या आदर्श वसाहतीतील आदर्श शाळा उभी करायची असेल तर प्रयत्नपूर्वक, कार्यक्षम, कल्पक, बुद्धिमान अशी व्यक्ती मिळविली पाहिजे ह्या निर्णयावर व्यवस्थापन आले

होते.

अशी कोणी व्यक्ती परिचयाची असेल तर सुचवावे असे सर्व बड्या अधिकाऱ्यांना सांगण्यात आले.

यू. मश्रूवाला हे वरिष्ठ दर्जाचे अधिकारी होते. ते चीफ मेकॅनिकल इंजिनीअर होते. अत्यंत हुशार होते. प्लँट उभारणीच्या तांत्रिक बाबी त्यांनी तत्परतेने सांभाळल्या होत्या. चिनाई बंधूंशी त्यांचे जवळचे संबंध होते. महात्मा गांधींच्या निकटवर्ती वर्तुळात असलेले किशोरीलाल मश्रूवाला यांच्या कुटुंबीयांपैकीच ते होते. गांधी विचारांचा पगडा त्यांच्या नित्य वागण्यात दिसत असे. ते नेहमी संपूर्ण खादीधारी वेषात असत. त्यांचं लहानपण वर्धा येथेच गेलेलं.

त्यांच्या पत्नी सौ. सुमनबेन भावनगरच्या. सगळा गुजरातच महात्माजींच्या पूर्ण प्रभावाखाली होता. त्यांची मैत्रीण नलिनी बधेका हिचे वडील गिजूभाई बधेका हे भावनगरमधले उत्तम व्यवसाय असलेले वकील होते. महात्माजींशी त्यांचा संबंध आला आणि गिजूभाईंचे जीवनच पार बदललं. बापूजी त्यांना म्हणत होते, 'गिजूभाई, वकील तर देशात खूप आहेत, पण माझ्या मते भारतीय समाज आणि संस्कृतीशी जाण असलेले शिक्षणशास्त्री फार थोडे आहेत. मादाम मॉटेसरीची पद्धत किंवा किंडर गार्टन पद्धत ही एक नवी विचारधारा आहे यात शंका नाही. पण आपण त्या पद्धतीचे शिक्षण अंधपणे स्वीकारता कामा नये.'

'माफ करा, बापूजी मी वकील आहे. माझा शिक्षणशास्त्राशी काहीच संबंध नाही, ह्यावर मी काय मत देणार?' गिजूभाई

'पण विचार तर करू शकता. मी म्हणतो म्हणून नव्हे तर तुम्हाला पटेल तर भारतीय जीवनाशी सुसंगत अशी प्रणाली तुम्ही काढू शकाल. पहा विचार करून.' बापूजी.

गिजूभाईंच्या डोक्यात बापूजींच्या विचाराचा भुंगा घुमू लागला. रात्रंदिवस ते विचार करू लागले आणि त्यांना प्रकाश दिसला. वकिली बंद करून पूर्वप्राथमिक वयातील संस्कारशील मुलांना योग्य अशी हसतखेळत शिक्षण ही प्रणाली त्यांनी प्रत्यक्ष प्रयोगात उतरविण्याचे ठरविले. दक्षिणामूर्ती मंदिर ह्या संस्थेत त्यांनी नव्या प्रणालीने अध्यापन सुरू केले. त्या पद्धतीने शिकवू शकणारे अध्यापक त्यांनी तयार केले.

ताराबाई मोडकांसारख्या महाराष्ट्रातल्या प्रख्यात विदूषीने गिजूभाईंचे शिष्यत्व स्वीकारले आणि तीच विचारधारा पुढे त्यांनी महाराष्ट्रात आणली. थेट आदिवासींना शिक्षण देण्यासाठीही ही प्रणाली उपयुक्त झाली.

ह्या गिजूभाईंची कन्या नलिनी आपल्या पत्नीची मैत्रीण आहे. तिच्यावर वडिलांच्या ध्येयवादी जीवनाचा परिणाम निश्चितच झाला असेल. त्यांनी सुमनबेनला चौकशी करायला सांगितले.

सुदैवाने नलिनी मुंबईतच होती. तिने चित्तरंजन पाठक ह्या तरुण, बुद्धिमान, सामाजिक कार्याची भान असणाऱ्या व्यक्तीशी लग्न केले होते.

सुमनबेन व नलिनीची भेट झाली तेव्हा तिला आनंद झाला. कित्येक दिवसांनी बालमैत्रीण भेटल्याचा आणि काहीतरी आव्हानात्मक काम करण्याची संधी मिळाल्याचा.

तिने एकच अट घातली. 'आम्हा पतीपत्नीला एकत्र नोकरी मिळत असेल, रहाण्याची सोय असेल आणि स्वतंत्र बुद्धीने काम करण्याचे स्वातंत्र्य मिळणार असेल तर आम्ही दोघेही येऊ.'

सुमनबेनने ह्या मुलाखतीविषयी मश्रूवालांना सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीने दोघांनाही मुलाखतीला बोलावले.

खरे पाहता आत्ता दोन काय एकाही पदवीधराची गरज नव्हती. पण भविष्यातला विचार करता दोन चांगली व्यक्तिमत्त्वे मिळताहेत त्यांना होकार द्यावा असे ठरले.

१९५२ मध्ये पाठक दाम्पत्य कामावर रुजू झाले.

कॉलनीतही शेकडो कुटुंबे राहू लागली होती. त्यांच्याही मुलांच्या शिक्षणाची सोय करणे भाग होते. नियोजित आराखड्यानुसार रस्त्याला समांतर शाळेची इमारत उभी राहिली.

रस्ता ओलांडला की छोट्याशा टेकाडावर एक सुबक इमारत उभी होत होती. तिथे हॉस्पिटल येणार होते. उतारावर उत्तम हिरवे लॉन होते. प्रवेशद्वारासमोरच एक कारंजे उभारले जात होते.

इमारती ज्या वेगाने उभ्या रहात होत्या त्याच वेगाने मोठमोठी लवकर वाढणारी, सदाहरित राहणारी झाडेही वाढत होती.

पाठक दाम्पत्य रुजू झाले तेव्हा जेमतेम प्राथमिक शाळा होती. ती सातवीपर्यंत वाढत गेली. बालवाडी गिजूभाई बधेका पद्धतीने स्थिरावली होती. त्यांना प्रशिक्षण स्वतः पाठक आणि नलिनीबेन देत होत्या.

पाहता पाहता शाळेच्या दोन इमारती झाल्या. मराठीत अनेक तुकड्या होत्या. गुजरातीत प्रत्येक वर्गाची एकच तुकडी होती.


पुष्कळ वेळा इंग्रजी, हिन्दी, संस्कृतसाठी मराठी गुजराती वर्ग एकत्र भरत.

कारण वर्गात पंचवीस-तीसच्या वर मुले नव्हती. शिक्षक संख्याही मर्यादित राहिली. ह्या प्रयोगामुळे शिक्षकांना एकमेकांच्या भाषा बोलता येऊ लागल्या. श्री. पाठक तर अस्खलित मराठीत बोलत. त्यांचे इंग्रजीवर उत्तम प्रभुत्व होते. तिन्ही भाषा ते उत्तम लिहूही शकत. मुख्य म्हणजे गणित विषयाचे ते पदवीधर होते, त्यामुळे जवळजवळ सर्व विषय ते लीलया शिकवू शकत.

पाठक दीर्घकाळ मुख्याध्यापकच होते. पुढे इंग्रजी माध्यमही सुरू झाले. आणि शालेय इमारतीत आणखी वाढ झाली.

पिछाडीचे मैदान भर घालून तयार करण्यात आले. क्रिकेटचे पीच शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केले. त्यासाठी खास माळी होते. हॉकी व फूटबॉलची मैदानेही आखण्यात आली. खोखो, कबड्डी यांची क्रीडांगणे आखली गेली.

• • •



# प्रकरण सतरावे

कंपनीची उत्पादन क्षेत्रात घोडदौड सुरू होती. १९५२ पासून कंपनीने उत्पादन क्षमता वाढविली. पुढच्या पाच वर्षांत सर्व विभागांचा विस्तार झाला. ॲसिड प्लँटची क्षमता १० टन होती ती ५० टनावर येऊन पोहोचली. नवीन कॉस्टिक प्लँट सुरू झाले. ह्या उत्पादनामुळे हायड्रोक्लोरिक ॲसिड, हायड्रोजन, क्लोरिन, कार्बन टेट्रा क्लोराइड यांचे उत्पादन सुरू झाले.

सर्व उत्पादनांचा स्तर उत्तम रहावा यासाठी प्रोसेस कंट्रोल लॅबोरेटरी सुरू झाली. रेयॉनपासून सर्व उत्पादनांतील नमुने ठराविक वेळाने तपासले जात. त्यांचे अहवाल

ताबडतोब त्या त्या खातेप्रमुखाकडे जात. कारखाना जसा रात्रंदिवस तीन पाळ्यांतून चालत होता, त्याप्रमाणेच पी.सी. लॅबही तीन पाळ्यांतून चाले.

प्रशिक्षित हुशार केमिस्टांची प्रयोगशाळेत नेमणूक होई. तिथे प्रत सुधारण्यासाठीही सतत नवनवे प्रयोग केले जात.

हुशार अधिकाऱ्यांनी हाताखालच्या हुशार केमिस्ट व कामगारांच्या एकत्रित प्रयत्नाने कितीतरी नवनवे शोध लागले.

त्यामुळे कारखाना आता परदेशी तंत्रज्ञानावर विसंबून नव्हता. ह्याच प्रयत्नामुळे व्हिस्कोज पायलट प्लँट आणि पल्प पायलट प्लँटची सुरुवात झाली. ही पावले स्वावलंबनाकडे चालली होती. हिमाचल प्रदेशात आणि इतरत्रही पल्पसाठी खास वने निर्माण केली.

फार लांब कशाला? उल्हास नदीच्या किनाऱ्यापासूनच थोड्या अंतरावर गाळेगाव भागात खास बांबूंची लागवड करण्यात आली. त्या करता जमिनीखालून नळ टाकण्यात आले आणि ठिबक सिंचन पद्धतीने बांबूंना पाणीपुरवठा होईल अशी व्यवस्था केली. ह्या बांबूवनातच बी.एस्सी ॲग्रिकल्चर झालेला अधिकारी नेमण्यात आला. गुरांपासून आणि चोरांपासून संरक्षणासाठी सर्व वनाला तारेचे कुंपण घातले होते. चोवीस तास सिक्युरिटी खात्याचे वॉचमन तेथे पहारा देत असत.

ही लागवड अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने केली जात होती.

बांबूची प्रत वाढावी म्हणून प्रयोगही केले जात होते. ज्यापासून उत्तम प्रकारचा पल्प तयार होऊ शकेल ह्या दृष्टीने हे प्रयत्न केले जात होते. इतर राज्यांतून लागवड व्हावी म्हणून त्यांनाही सल्ला एनआरसीकडून मिळत होता.

हिमाचल प्रदेशातील मंत्र्यांसह शिष्टमंडळ प्रत्यक्ष लागवडीचा व पल्प प्लँटचा अभ्यास करायला येऊन गेले होते. केरळ राज्याने तर आघाडी मारून स्वतःचा व्हिस्कोज प्लँट उभारला होता. त्यांच्याकडून कंपनी पल्प खरेदी करत असे.

जसे वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक कंपनीच्या बांबू लागवडीस भेट देत तसेच शाळेच्या लहान बालकांनाही हे बांबूवन मोठे आकर्षण ठरले होते. शाळेतील बालवाडीतील छोट्या विद्यार्थ्यांच्या सहलीचे हे मोठे आवडते ठिकाण होते.

उंच गगनभेदी बांबूंची सरळवाढीची झाडे, त्यांच्या घनदाट सावलीचा मंडप शिरावर, रांगेत शिस्तीत कवायती करणाऱ्या विद्यार्थ्यांसारखी बांबूची झाडे बाहू उंचावून जणू त्यांचे स्वागत करीत असत.

नदीकडून येणारा गरम वाराही या वनात शिरला की जणू वनमाळी होऊन शीतल शीळ घालून ह्या छोट्या बालगोपालांना रिझवीत असे.

आणलेल्या डब्यातील खाऊ संपला तरी ही बालके आपल्या ताईबरोबर परत जायला तयार नसत.

बालवाडीतील शिक्षिकांना ताई संबोधण्याची पद्धत हेसुद्धा एनआरसी शाळेचे वैशिष्ट्य होते. कारण गिजूभाईंच्या शिक्षण पद्धतीनं 'शिकविणे' हा प्रकारच नव्हता, कृतीतून, खेळातून बालके स्वतःच ज्ञानेंद्रियांना वळण लावत. ह्यासाठी 'ताईंच्या' मार्गदर्शनाखाली ही इवलीइवली बालके शैक्षणिक साधनेही बनवत. प्रत्येक व्यक्तीत कलावंत दडलेला आहे, ह्या तत्त्वाने आपआपल्या स्वतंत्र प्रज्ञेने ही मुले चित्रे काढत, कागदाच्या, पालापाचोळ्याच्या, लगद्यापासून त्यांना जमतील तशा वस्तू बनवत. वर्षातून एकदा त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन पालकांसाठी खुले असे. आपल्याच मुलांनी ह्या वस्तू केल्या आहेत ह्यावर त्यांचा विश्वासही बसत नसे.

अर्थात ह्यासाठीच निसर्गात भटकण्याची संधी त्यांना शाळेतर्फे मिळत होती. पाण्याच्या टाकीवरची बाग, गेस्ट हाऊसची बाग, बांबूवन ह्यातून फेरफटका मारून, फुले, फळे, फुलपाखरे, पक्षी, त्यांची घरटी पाठ्यपुस्तकातून न पाहता ते प्रत्यक्ष पहात. निसर्गाशी अशी जमलेली मैत्री पुस्तकी ज्ञानापेक्षा आयुष्यभर त्यांना उपयोगी पडत असे.

ज्ञान, विज्ञान, कला आत्मसात करण्याची संधी इतक्या लहान वयात त्यांना उपलब्ध होत असे.

हे भाग्य इतर शाळातील विद्यार्थ्यांना क्वचितच मिळत असे...

कॉलनीची वाढ १९५२-५३ पासून ५७ पर्यंत फार झपाट्याने झाली.

एका उपेक्षित माळरानावर आधुनिक विज्ञानाच्या हातात हात घालून, प्राचीन संगीत, नृत्य, कला, घनदाट वनश्री, एक तपोवनच फुलवत होती.

फुलं फुलू लागली की पाखरे मध लुटण्यासाठी त्यावर झेपावणारच. ते नैसर्गिकच असते. ह्या फुलपाखरांमुळे, पाखरांमुळे वृक्षांमध्ये फलधारणाही होतच असते.

पण मानवी भुंगे नुसते मधच शोषत नाहीत. अति लोभापायी ते वृक्षच पोखरतात.

तसेच झाले. निर्वासित वसाहतीत नवनवे पुढारीही पुढे येत होते. स्वतःला कॉंग्रेस म्हणवणारे भाई सलामत राय ह्या वकिलाचे ह्या उद्योगसमूहाकडे, त्यातील सहज उपलब्ध होऊ शकतील अशा माणसांकडे लक्ष गेले.

त्यांनी युनियन बांधण्याचा प्रयत्न केला. भडक भाषणे, अफाट मागण्या, प्रचंड पगारवाढ, मालकांची नफेखोरी याविषयी त्यांनी गेट मीटिंग घ्यायचा धडाका लावला.

एनआरसीतील आतापर्यंतच्या वातावरणाला हे नवे होते. खरोखर गरजू, सुशिक्षित, प्रामाणिक, उद्योगप्रवण कामगार आता बहुतांशी पांढरपेशात जमा झाले होते.

त्यांची ह्या संघर्षाला तयारी नव्हती. पण तरीही काही कच्ची मडकी सलामत राय यांच्या गळाला लागलीच.

युनियन सुरू झाली. रोज कामावर येण्यापूर्वी लाल बावटे घेऊन गेटवर कामगार जमत, व्यवस्थापनाविरुद्ध घोषणा देत, गावातल्या एका मोकळ्या जागेचं नामकरणही त्यांनी लालमैदान केलं.

पण व्यवस्थापनाने याकडे दुर्लक्ष केलं. उत्पादनावर परिणाम होत नव्हता. ते वाढतच होते.

त्याचबरोबर व्यवस्थापनातील बहुसंख्य अधिकारी हे तंत्रज्ञ होते, त्यांच्या शास्त्रात, संशोधनात त्यांना रस होता. ती यंत्रे बिघडली तर तत्परतेने ते दुरुस्ती करू शकत होते.

पण मानवी यंत्रणेत झालेला बिघाड त्यांना अनाकलनीय होता.

त्यासाठी कठोर शिस्तीचा, तत्काळ निर्णय घेऊ शकणारा व्यवस्थापनाचे आणि कायद्याचे, अर्थशास्त्राचे ज्ञान असलेला कर्तव्यदक्ष बेडर अधिकारी हवा होता.

चिनाई कुटुंबानी वास्तविक असा अधिकारी वालचंद गटातून मिळवलेलाही होता. पण मुंबईला मुख्यालयात त्यांची नेमणूक होती. मुख्याधिकारी म्हणूनच ते होते. आता त्यांना मोहोने येथील कारखान्यातही लक्ष देणे भाग होते.

एनआरसीच्या कारखाना परिसरातील संघर्षाच्या उंबरठ्यावर उभ्या राहिलेल्या परिस्थितीला समर्थपणे तोंड देण्यासाठी मुख्याधिकारी वसाहतीत राहू लागले. त्यांचे नाव होते सी. जी. महंत.

महाराष्ट्रातील कर्तबगार, कर्तव्यकठोर शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रथमश्रेणीत शोभतील असे व्यक्तिमत्त्व म्हणजे महंत साहेब.

स. गो. बर्वे, पिंपुटकर यांसारखे कर्तव्यदक्ष अधिकारी त्या काळात जिवंत दंतकथा ठरले होते. सी. जी. महंत त्यांच्याच मालिकेत शोभतील असे होते. अक्कलकोटसारख्या छोट्याशा संस्थानातील एका शिक्षकाचा मुलगा स्वतःच्या हुशारीवर शिकला होता. पुण्याला स.प. महाविद्यालयाचे प्राचार्य, वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू, माऊली सोनोपंत दाण्डेकर यांचे ते लाडके विद्यार्थी होते. तत्त्वज्ञान विषय घेऊन एम.ए. झालेले महंत वालचंद उदयोगसमूहात नोकरीस लागले. पुढे मुंबईत आले. कायद्याचे पदवीधर झाले. वालचंद समूहाचे आणि चिनाई कुटुंबाचे स्नेहाचे

संबंध होते. त्यांनी एखाद्या उत्तम प्रशासकासाठी वालचंद यांच्याकडे विनंती केली. गुणांची कदर करणाऱ्या वालचंद शेठजींनी तरुण महंतांची शिफारस केली आणि महंत मुख्याधिकारी म्हणूनच एनआरसीत आले.

कॉलनीत राहायला आल्यावर, त्यांच्या शिस्तप्रिय नजरेतून कारभारातील गलथानपणा जाणवला. विशेषतः स्टाफमधील कर्मचारी यांच्या जाण्यायेण्यात काही ताळतंत्र नव्हते. वेळ पडल्यास उशिराही थांबून काम करणारे प्रामाणिक कर्मचारी होते. पण कित्येक जणांचा डोळा ओव्हरटाइमवर होता हेही त्यांच्या लक्षात आले. वरिष्ठ अधिकारी उत्पादनाकडे लक्ष देत, ह्या प्रशासकीय गोष्टींकडे बारकाईने पाहण्याची त्यांना सवयही नव्हती व वेळही नव्हता.

स्टाफमधील कित्येक कारकून स्वतःला साहेब म्हणवून घेत आणि स्वार्थी कामगार अशा अर्ध्या हळकुंडात पिवळ्या झालेल्या साहेबांची हांजी हांजी करून आपले स्वार्थ साधत. पाहिजे तशी सोयीची शिफ्ट बदलून घेत.

उत्पादनावर ह्याचा फारसा परिणाम होत नसला तरी ह्या बेशिस्तीने प्रशासनाची पकड ढिली झाली होती.

त्याचाच फायदा सलामत राय सारख्या पुढाऱ्यांनी काही काळ घेतला.

महंतांनी कर्मचाऱ्यांसाठी आचारसंहिता तयार केली. त्याप्रमाणे संहितेचे कठोरपणे अवलंबन केले. कामगारापासून सर्वांना कार्ड पंचिंग आणि येता-जातानाची वेळ नोंदवण्याची यंत्रे प्रवेशद्वारावरच लावली.

स्वतः महंत वेळेवर कामावर जात. प्रत्येक बाबतीत वक्तशीरपणाला ते प्राधान्य देत. सकाळी होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या ब्रेकफास्ट मीटिंगही वेळेवर सुरू होऊ लागल्या व वेळेत संपू लागल्या.

ही शिस्त कित्येकांना जाचक वाटली. पण हळूहळू हे सर्व कामगार कर्मचाऱ्यांच्या अंगवळणी पडले.

साहजिकच कंपनीचे विकास प्रकल्प, धूमधडाक्याने उभे राहू लागले. रेयॉनपेक्षा टायरकॉर्डला मागणी वाढली होती. त्यामुळे स्वावलंबनाने टायरकॉर्ड उत्पादनासाठी नवीन प्लँट सुरू झाला.

कोणत्याही उद्योगाला युनियन असणे ही एक गरज असते. त्यादृष्टीने इंटकची युनियन सुरू झाली. निमकर नावाचे पुढारी ही युनियन चालवत. इंटक ही काँग्रेस पक्षाची कामगार आघाडी होती. ती अर्थातच काँग्रेसला, सरकारला आणि त्यांना खूष ठेवणाऱ्या उद्योगपतींना अनुकूल ठरतील अशाच मागण्या करत.

मागणीपत्रे, सभा, वाटाघाटी ह्या सर्व चक्रातून जाऊन कामगार कर्मचाऱ्यांचे

वेतन, बोनस ठरू लागले.


आयटक ही कम्युनिस्टांची संघटना ह्या काळात मुंबई किंवा इतरही उद्योग नगरीत लोकप्रिय होती. पण संपाचे हत्यार उपसण्याइतकी ही संघटना बलवान नव्हती.

स्वातंत्र्य चळवळीत कम्युनिस्टांनी काँग्रेसला सहाय्य केले नव्हते. दुसऱ्या महायुद्धात इथले कम्युनिस्ट रशियाच्या तालावर नाचत. रशिया ब्रिटिशांचे दोस्त राष्ट्र होते. ही दोस्त राष्ट्रे महात्मा गांधी व काँग्रेसवर कडाडून हल्ला करीत.

त्यामुळे त्यांची देशभक्ती, समाजप्रियता संशयास्पद आहे असा काँग्रेसचा सर्वत्र प्रचार असे.

आयटकची संघटना एनआरसीत आली नाही. निमकरांच्या सहाय्याने युनियनशी यशस्वी करारमदार होऊ लागले. कामगार कर्मचाऱ्यांना दर वर्षी दोन अडीच महिन्यांचा बोनस मिळू लागला, पगारवाढही झाली. त्यामुळे कामगार संघर्ष फारसा तीव्र होऊ शकला नाही आणि कंपनीच्या योजनांप्रमाणे उत्पादन वाढू लागले. वसाहतीतील विविध टाईपची क्वार्टर्स बांधून झाली. त्यात कामगार, कर्मचारी, अधिकारी यांना त्यांच्या श्रेणीनुसार क्वार्टर्स मिळू लागले. शाळेत विद्यार्थी संख्या वाढली. समोरच अद्ययावत सोयी असलेले हॉस्पिटल उभे राहिले.

● ● ●



# प्रकरण अठरावे

उद्योगधंद्यात भारतात प्रचंड गतीने बदल होत होता. रशियाचे मॉडेल पं. नेहरूंसमोर होते त्यामुळे प्रचंड प्रकल्प उभे रहात होते. रशियाच्या धर्तीवर पंचवार्षिक योजना भारताने स्वीकारल्या होत्या. त्यासाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालीच नियोजन समिती काम करत होती.

त्यामुळे खासगी उद्योगधंद्यातही बरकत आली होती. सर्वेषां अविरोधेण अशी प्रगती होत होती. एनआरसीही त्याला अपवाद नव्हती.

पण उद्योगात अडथळे फक्त कामगार

संघटनेकडून येतात असे नाही.

काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळात, भारतात स्वातंत्र्योत्तर भाषावार प्रांतरचना होईल आणि लोकभाषेत व्यवहार होईल असे आश्वासन दिले होते.

त्यासाठी स्वातंत्र्योत्तर राज्य पुनर्रचना आयोग नेमण्यात आला. फाजल अली, पं. कुंझरू व पण्णीकर हे ह्या आयोगाचे सदस्य होते.

१९५५ साली आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. ह्या आयोगाने महाराष्ट्र व गुजरात हे द्विभाषिक राज्य निर्माण केले. बाकीची राज्ये भाषावार स्वतंत्र झाली होती.

महाराष्ट्रातील व गुजरातमधीलही जनतेला हे मुळीच रुचले नाही. सर्व राजकीय पक्ष आपसातील भेद विसरून ह्याविरुद्ध लढा द्यायला सिद्ध झाले. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समिती तयार झाली. कॉ. डांगे, एस.एम. जोशी, आचार्य अत्रे, ना.ग. गोरे, दादासाहेब गायकवाड, लाड, दाजिबा देसाई, एन.डी. पाटील इत्यादी अध्वर्यू एकत्र आले. देव-धर्म न मानणाऱ्या कम्युनिस्टांपासून सनातन धर्माची अभिमानी राम राज्य परिषद या समितीत घटक म्हणून सामील झाली. शे. का. पक्ष, नुकताच स्थापन झालेला जनसंघ हेही समितीचे घटक झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मराठी दौलतीचे स्वप्न साकार करणे हे तो श्रींची इच्छा ह्या भावनेने अवघा महाराष्ट्र खवळला. ही पूर्णतः जनतेची चळवळ होती.

विशेष म्हणजे ही भाषिक राज्यासाठी चळवळ असूनही कोणत्याही अन्य भाषकाविरुद्ध चळवळीला वळण लागले नव्हते.

पण द्विभाषिकाचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी अत्यंत निष्ठूरपणे चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.

२१ नोव्हेंबर १९५५ रोजी समितीतर्फे प्रचंड मोर्चा आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्ह्यातून मोर्चेकरी स्वखर्चाने आझाद मैदानावर जमले.

साधारणतः सर्व मोर्चे काळा घोडा येथे अडविण्याची प्रथा होती, तेथून शिष्टमंडळ सचिवालयात भेटावयास जात असे.

पण ह्यावेळी मोर्चाचे प्रचंड आणि उग्र स्वरूप पाहून मुख्यमंत्र्यांनी पोलीस बंदोबस्त वाढवला आणि मोर्चा फ्लोरा फौंटन येथेच अडविण्याचा निर्णय घेतला.

आधीच खवळलेल्या ह्या जनसागरात संतापाचे वादळ उठले आणि फ्लोरा फौंटनला सर्व बाजूने घेरून भाषणे, घोषणा यांनी उद्रेक प्रकट होत होता.

कडे तोडून लोक सचिवालयाकडे धावले. पोलिसांनी जमाव पांगण्यासाठी अश्रूधुराची नळकांडी सोडली. तरीही जमाव मागे हटेना.

अखेरीस पोलिसांना शूट ॲट साइटचा आदेश आला आणि ह्या प्रचंड जमावावर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. कोणतेही नियम पाळले गेले नाहीत. पहिल्या मजल्यावरच्या खिडक्यांची तावदाने फुटून इमारतीच्या आश्रयाला असलेल्या निरपराध लोकांवरही गोळ्या झाडण्यात आल्या.

लोक सैरावैरा पळू लागले. सगळे व्ही.टी. किंवा चर्चगेटच्या दिशेने धावू लागले. मिळेल त्या इमारतीत दडून बसू लागले. अश्रूधूरांनी सर्वांचे डोळे चुरचुरत होते. सर्वांनाच इमारतीत आश्रय मिळाला नव्हता. चेंगराचेंगरीतही अनेक जण जखमी झाले. प्रत्यक्ष फ्लोरा फौंटनच्या परिसराला स्मशान कळा आली. १५ इसम जागच्या जागी ठार झाले होते. त्यांची प्रेतं बेवारशांसारखी पडली होती. गंभीर जखमी झालेले विव्हळत रस्त्यात पडले होते.

जनता चिडली होती पण हतबल झाली होती.

अठरा नोव्हेंबरपासून सेनापती बापट ह्या वृद्ध क्रांतिकारकांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सुरू झाला होता. आचार्य अत्रे, कॉ. मिरजकर त्यांच्याबरोबर होते. त्या सर्वांना अटक झाली.

पुढचा सर्व आठवडा महाराष्ट्र अशांत होता. ठिकठिकाणी सत्याग्रह केले जात होते. शेकडोंना अटक होत होती. हरताळ होत होते. चळवळ दडपून टाकण्यासाठी पोलिसांनी ठिकठिकाणी बळाचा वापर केला. ९० सत्याग्रही पोलिसांच्या गोळ्यांनी जागोजागी ठार झाले.

चळवळ कल्याणातही येऊन पोहोचली होती. कॉ. दत्ता केळकरांनी सत्याग्रह केला. पाठोपाठ शे. का. पक्षाचे चिटणीस सदाशिव फणसे यांनी सत्याग्रह केला. रोज कोणत्या ना कोणत्या घटक पक्षाचे कार्यकर्ते सत्याग्रह करून अटक करून घेत होते.

सर्वत्र संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ चालू होती, पण ह्या चळवळीचे विशेष असे की कोणाही स्त्रीवर हल्ला झाला नव्हता. भाषिक राज्यासाठी चळवळ होती, तरीही इतर भाषकांविरुद्ध कुठेही गैरभावना नव्हती. ही सगळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने केलेली किमया होती.

कल्याणातही हरताळ असला की दुकाने बंद होत. बहुसंख्य व्यापारी गुजराती होते. पण एकही दुकान लुटले नाही.

द्विभाषिकाचेच नव्हे तर त्रिभाषिकाचे, मुंबई स्वतंत्र राज्य करण्याचे समर्थन करणारे मोरारजी देसाई, पोलिस दलाचा क्रूरपणे वापर करणारे मोरारजी गुजराती असले तरी गुजराती लोकांवर कोणीही हात टाकला नाही.

खुद्द गुजरातमध्येही ह्या द्विभाषिकाला विरोध होता. त्यांचीही महागुजरातची

चळवळ सुरू झाली होती.

नऊ ऑगस्ट १९५६ रोजी द्वैभाषिक जाहीर झाले आणि ह्या विशाल द्विभाषिकाच्या मुख्यमंत्रीपदी मोरारजी देसाई यांची निवड झाली.

चळवळीचा प्रभाव कमी करण्यासाठी किंवा महाराष्ट्रात फूट पाडण्यासाठी मोरारजींना केंद्रात मंत्रीपद दिले व १६ ऑक्टोबर १९५६ ला यशवंतराव चव्हाण ह्या समाजप्रिय मराठा नेत्याची द्विभाषिकाच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाली.

पण ह्या धूळफेकीने फसणारी मराठी जनता नव्हती. सं. म. समितीची चळवळ अधिक तीव्र होऊ लागले.

महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे असे म्हणणारे यशवंतराव चव्हाण काय आणि यावत्‌चंद्रदिवाकरौ मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही अशी चौपाटीवरच्या सभेत वल्गना करणारे स. का. पाटील काय, सं. म. समितीला आणखी बळ देत होते.

छत्रपती प्रेमाचा उपयोगही काँग्रेसने घेऊन समितीला निष्प्रभ करण्याचे मनसुबे आखले. प्रतापगडावर श्रीछत्रपतींचा पुतळा उभारला होता, त्याचे अनावरण करण्यासाठी यशवंतरावांनी पं. जवाहरलाल नेहरूंना आमंत्रण दिले. 'वाट चुकलेला देशभक्त' असा शोध आपल्या डिस्कव्हरी ऑफ इंडियात लावणाऱ्या नेहरूंच्याच हस्ते शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण करणे, हा समितीला छत्रपतींचा अपमान वाटला. पुढे नेहरूंनी नंतरच्या आवृत्तीत आपल्या मतात बदल केला. पण सं. म. समितीच्या नेत्यांनी हा विषय सतत पेटत ठेवला. प्रतापगडच्या रस्त्यावर नेहरूंना काळे झेंडे दाखवून निषेध करण्याचा निर्णय सं. म. समितीने घेतला.

निदर्शने शांततामय मार्गाने झाली. पुढे दिल्लीत पार्लमेंटवर मोर्चा नेण्याचे ठरले. सर्व महाराष्ट्र ढवळून निघाला.

जनमताचा दबाव इतका वाढत गेला की, अखेरीस द्विभाषिक भंग करण्याचे विधेयक मार्च व एप्रिलमध्ये लोकसभेने व राज्यसभेने मंजूर केला.

आणि १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला.

हा मंगल कलश यशवंतराव चव्हाणांनीच आणला, याचे श्रेय काँग्रेसने कौशल्याने लाटले. १९६२ च्या निवडणुकीत विदर्भामुळे काँग्रेसला बहुमत मिळाले. समिती विरोधी पक्ष म्हणून विधानसभेत राहिला.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या या मोठ्या प्रश्नात सर्व राजकीय पक्ष गुंतले होते. त्यामुळे १९५२ पासून १९६३ पर्यंत जवळजवळ एक तप कंपनीला निर्वेधपणे आपले प्रकल्प पुरे करता आले.

तरीही महंत यांची कडक शिस्त काही अधिकाऱ्यांना जाचक वाटत होती.

महाराष्ट्रभर चळवळ होत असतानाही वालियांचे सहाय्यक म्हणून काम करणाऱ्या जी.के.पी.मुळे कंपनीत फार मोठ्या प्रमाणावर मराठी कामगार भरती झाले होते...

कल्याणात राहणाऱ्या फडक्यांचे धुळपांशी संबंध जवळचे होते. निरनिराळ्या कारणाने गावकीचे म्हणून होणाऱ्या सर्व उपक्रमात फडके क्रियाशील होते. लोकमान्य टिळक जन्मशताब्दी, स्वातंत्र्य समर शताब्दी, गोवा मुक्ती आंदोलन ह्यात सर्व पक्ष एक होते. १९५४ साली ठाणे जिल्ह्याला लागून असलेल्या दादरा नगर हवेली मुक्ती संग्रामाच्या काही योजना कल्याणातून झाल्या होत्या. त्यात नाना फडकेंचा सहभाग मोठा होता. १९५५ मध्ये झालेल्या गोवा मुक्ती सत्याग्रहात नाना फडकेंचे अत्यंत निकटचे मित्र होते. सत्याग्रहात पोर्तुगीज सैनिकांच्या गोळीबारात ते जखमी झाले होते. अग्वादच्या तुरुंगात ते बराच काळ होते.

ह्या सर्व घटनांमुळे नाना फडके कल्याणात लोकप्रिय होते.


नाना आता बाह्यतः तरी बदलला होता. आर्थिक स्थिती सर्वच एनआरसीतील नोकरांची सुधारली होती. पण नाना फडके मोटरसायकलने कल्याण-मोहना येत-जात असत. त्यामुळे कंपनीतील काही जणांना वैषम्य वाटू लागले.

त्यांची बदली व्हावी म्हणून काही अधिकाऱ्यांचे कारस्थान शिजत होते. जी.के.पी. हे मुख्याधिकारी श्री. सी.जी. महंत यांच्या विश्वासातले होते. त्यामुळे त्यांना डावलून थेट शेठजींच्या कानाशी काहीजण लागले.

आणि एक दिवस नेहमीप्रमाणे जी.के.पी. बरोबर आठ वाजता कंपनीत पोहोचले तो त्यांना मस्टरवर सही करण्यापूर्वीच त्वरित बदलीची ऑर्डर देण्यात आली. वरवर पाहता ही बढती-बदली होती पण त्यामागचे राजकारण जी.के.पी. जाणत होते.

आल्या पावली ते परतले व थेट मुंबईला मुख्यालयात त्याच दिवशी रुजू झाले. बाहेरच्या राजकारणाचा एनआरसीवर झालेला हा एकमेव परिणाम होता. पण त्यानेही जी.के.पी. अधिकच प्रिय झाले.

● ● ●



# प्रकरण एकोणीसावे

एनआरसीची वसाहत ही एखाद्या बेटासारखी झाली होती. महाराष्ट्रभर गोवा मुक्ती, संयुक्त महाराष्ट्र यासाठी चळवळींचे वादळ घोंगावत असतानाही कारखान्यावर किंवा वसाहतीवर त्याचा काही विशेष परिणाम होत नव्हता.

कारखान्यातील विविध प्रकल्प उत्पादन क्षमता वाढवत होते. कामगारभरती चालूच होती. त्यामुळे वसाहतीतील इमारती अपुऱ्या पडत होत्या. म्हणूनच बैठ्या घरांच्या आणि चाळींच्या ऐवजी तीन मजली इमारती झपाट्याने बांधल्या जात होत्या..जी टाइपची क्वार्टर्स् होती तशाच नवीन तीन मजली

इमारती उभ्या राहिल्या. त्यांना जी.एन. टाईप म्हणू लागले. एन म्हणजे न्यू. ह्याच पद्धतीने सी, डी, ई ह्या ब्लॉक टाईप इमारती तीन मजली झाल्या. त्यांना सीएन, डीएन, ईएन अशी नावे देण्यात आली.

स्पोर्टस् क्लबची दिमाखदार इमारत कार्डरूम, टेबलटेनिस, बिलियर्डस्, ग्रंथालय, छोटेसे कँटीन यांना सामावून घेऊन उभी राहिली. संध्याकाळी मनोरंजनासाठी लहानथोर मंडळींची तिथे वर्दळ वाढली.

स्पोर्टस् क्लबच्या समोरच्या उंचवट्यावर सुरेख हिरवेगार लॉन, वळणदार रस्त्याच्या दुतर्फा डेरेदार झाडे आणि समोर थुई थुई नाचणारे कारंजे, त्या पाठीमागे हॉस्पिटलची एक मजलीच पण प्रशस्त इमारत उभी राहिली. रुग्णांच्या सर्व तपासण्यांची, चिकित्सेची आणि उपायांची येथे मोफत सोय होती.

प्रत्येक विषयातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळण्याची तिथे सोय होती. जनरल वॉर्डस्, स्पेशल वार्ड, खास खोल्या विशेष म्हणजे टी.बी.च्या रुग्णांसाठी मुख्य इमारतीपासून थोडे फटकून वार्डस् होते. तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्सेस, आया, सफाई कामगार ह्या रुग्णालयाची, रुग्णांची काळजी घेत.

स्पोर्टस् क्लबला लागूनच बाग होती. शाळेची मुख्य इमारत दोन मजली होऊनही अपुरी पडू लागली तेव्हा मैदानाला लागून आणि जुन्या शालेय इमारतीला समांतर दोन मजली देखणी इमारत उभी राहिली. तिथे प्रवेशद्वार भव्य होते. आठ-नऊ पायऱ्या चढून, मैदानातून शाळेत प्रवेश होता. जुन्या इमारतीत बहुसंख्य प्राथमिकचे वर्ग होते तर नव्या इमारतीत माध्यमिकचे वर्ग होते.

दोन्ही इमारतींना जोडणारा एक कॉरिडॉर बांधला होता. त्याचा उपयोग दोन बॅडमिंटन कोर्टांसाठी होत होता. शाळेसाठी तो प्रार्थना हॉल होता. कॉलनीतील रहिवाशांनाही सुटीच्या दिवशी तो खासगी समारंभाना मिळू शके. अनेक मंगल विवाहांचा हा हॉल साक्षीदार होता.

विशेष म्हणजे क्लबतर्फे महिन्यातून पाच चित्रपट फक्त पाच रुपयांत दाखविले जात.

नव्या शाळेला लागूनच, क्लबच्या बाजूला नाटकासाठी मोठे कायमस्वरूपी स्टेज उभारण्यात आले होते.

क्रीडांगणाला लागूनच मध्यवर्ती गोलाकार इमारतीत वसाहतीतील लोकांना लागणारे किराणा, स्टेशनरी, दळण गिरणी, रेशन, पेट्रोल सर्व काही मिळणारे सहकारी भांडार होते.

कंपनीच्या कँटीनमध्ये जाता न येणाऱ्या रहिवाशांसाठी, त्यांच्या

मित्रमंडळांसाठी, गरजूंसाठी एक कॉलनी रेस्टॉरंटही होते.

ह्याच इमारतीत कॅनरा बँकेची शाखा होती. सर्वांना पगार परस्पर बँकेतून मिळण्याची सोय होती.

ह्या सर्व सुविधांमुळे रहिवासी थोडेफार सुखासीन झाले होते. त्यांच्या परिस्थितीकडे पाहून इतरही कामगार कर्मचाऱ्यांना कॉलनीत जागा मिळावी अशी तीव्र इच्छा होती.

व्यवस्थापनालाही आपल्या सेवेतील सर्व स्तरातील सेवक, अधिकारी यांचे जीवनमान उंचावत रहावे असे वाटत होते. चिनाई बंधूंचा व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विधायक होता.

त्यामुळे उल्हास नदीच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेवर नवीन जोड वसाहत १९६२-६३ च्या सुमारास बांधण्यात आली.

थेट बांबू प्लँटेशन असलेल्या गाळेगाव हद्दीपर्यंत ही वसाहत जाऊन भिडली.

येथील प्रशस्त मुख्य रस्त्याला रिव्हरसाइड अव्हेन्यू असे नाव होते. त्याला काटकोनात भिडणारे छोटे रस्ते होते.

आतल्या कॉलनीतील टाईपप्रमाणेच सी. एन. टाईप चार मजली इमारती उभ्या राहिल्या. त्यांना लागूनच वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी बंगले बांधण्यात आले. केमिस्ट, केमिकल इंजिनीअर्स, सुपरव्हायजरी स्टाफ, सीनियर शिक्षक यांच्यासाठी जुन्या कॉलनीतील ई.एन. टाईप सदनिका असलेल्या चार मजली इमारती उभ्या राहिल्या. मात्र अमेरिकन अव्हेन्यूचा आदर्श समोर असल्यामुळे ह्या इमारतींना आरएस. (रिव्हरसाईड) पाच, सहा, सात असे क्रमांक दिले गेले. थेट गाळेगावात कनिष्ठ कामगारांसाठी जुन्या कॉलनीतील एच टाइप इमारतीप्रमाणे पण चार मजली इमारती उभ्या राहिल्या. त्याला अर्थातच एच.एन. टाईप संबोधण्यात आले. शेवटच्या टप्प्यापर्यंत बस जात असे.

बांबू प्लँटेशनचा पल्प प्रयोग स्थगित झाला व सर्व बांबू काढून टाकण्यात आले. इतके करूनही हजारो कामगारांना कॉलनीत जागा मिळू शकत नव्हती. कारण कामगारांची व कर्मचारी, अधिकारी यांची संख्या सात हजारावर पोहोचली होती. त्यामुळे मोहोने, अटाळी, आंबिवली गाळेगाव ह्या भागात खासगी जमीन मालकांनी चाळी उठवल्या. त्याशिवाय जंगल खात्याच्या रिकाम्या जागांवर जमेल त्यांनी झोपडपट्ट्या बांधल्या. तिथेही कामगार भाड्याने रहात होते.

कंपनीच्या कल्याणकारी दृष्टिकोनानुसार कल्याण-मुरबाड रस्त्यावर शहाडकडे जाणारा रस्ता थेट मोहोन्यापर्यंत होता, पण तो सार्वजनिक बांधकाम

खात्याकडे नव्हता. त्यांच्याकडे असलेल्या मुरबाड रोडची देखभाल सार्वजनिक बांधकाम खाते नीट करू शकत नव्हते. शहाड रस्ता तर जिल्हा परिषदेकडे होता. परिषदेकडे आर्थिक अडचण नित्याचीच होती.

त्याच रस्त्यावर अमरडाय केमिकल्स, इंडियन डायस्टफ इंडस्ट्रीज, उल्हास ऑइल मिल सारखे मोठे कारखाने उभे राहिले. शेकडो वाहने हा रस्ता वापरत असत पण डागडुजी फक्त एनआरसी करत असे. पाटील नावाचे सुपरव्हाइजर ह्या कामात सतत लक्ष घालत. त्यांना लोक रोड पाटील म्हणत इतके ते रस्ता बांधणीशी निगडित होते.

पण ही सगळी कामं अनधिकृतपणे कंपनी करत होती. अधिकृतपणे हा रस्ता एनआरसीकडे हस्तांतरित व्हावा यासाठी केंद्र, राज्य सरकार, जिल्हा परिषद या सर्वांकडे कंपनी प्रयत्न करीत होती. मोहोने परिसरात हजारोंनी लोकवस्ती वाढली पण रेल्वे स्टेशन नव्हते. शहाडहून थेट टिटवाळ्याला गाडी जायची. कारखाना रेल्वे लाइनपासून अवघ्या शंभर फुटांच्या आत होता. तीन पाळ्यांतून कामगार काम करत. कंपनीने बसची सोय केली होती. पण वाढत्या वस्तीला ही खासगी बससेवा अपुरी होती. म्हणून केंद्र शासनात रेल्वेशी कंपनीची खटपट चालू होती. १९५२-५३ पासून पत्रव्यवहार चालू होता.

कंपनी स्टेशन बांधण्याचा सर्व खर्च करण्यास तयार होती. फक्त कंपनीची एक रास्त अट होती, ती म्हणजे स्टेशनला 'रेशम नगर' नाव ठेवावे.

वास्तविक असा खर्च न करताही पूर्वी रेल्वेने किर्लोस्करवाडी, विद्याविहार वगैरे नावे ठेवली होती. चिनाई बंधूंचा, बाबूभाई चिनाईसारख्या बड्या काँग्रेस नेत्याशी संबंध असूनही रेल्वेने ही मागणी मान्य केली नाही. मात्र एनआरसी कंपनीला कारखान्याच्या हद्दीत स्वतंत्र गोदी बांधायची आणि त्यासाठी स्वतंत्र रेल्वे लाइन टाकण्याची परवानगी मिळालेली होती.

अखेरपर्यंत शासनातील शुक्राचार्यांच्या झारीतून ही विधायक, जनहिताची मागणी रेल्वेने मान्य केली नाही आणि आपल्याच पद्धतीने १९६४ साली आंबिवली स्टेशन बांधले व सुरू केले.

रेल्वे शासनातील गतानुगतिक वृत्तीला शोभेल असाच निर्णय रेल्वेने घेतला. वास्तविक जेथे स्टेशन निर्माण झाले त्याला लागूनच मोहोने हद्दीतील एनआरसीचा, आशिया खंडातला पहिला कृत्रिम रेशीम निर्मितीचा कारखाना उभा होता.

तर दुसऱ्या बाजूला लागूनच अटाळी हे गाव होते. प्रत्यक्ष आंबिवली गाव तेथून दोन मैल लांब होते, तेथे वस्तीही फारशी वाढली नव्हती.

पण कोणताही तर्कसंगत निर्णय घ्यायचा नाही असे जणू रेल्वेचे सनातन ब्रीद होते. टिटवाळा स्थानक निर्माण झाले तेव्हाही प्रत्यक्ष स्थानक ज्या गावाच्या हद्दीत होते त्या गावाचे नाव 'मांडे' होते. पण दोन मैल लांब असलेल्या धड रस्ता नसलेल्या, टिटवाळे गावाचे नाव स्थानकाला देण्यात आले. कदाचित कोणातरी गणेशभक्ताने आपला नवस फेडण्यासाठी हे पुण्य कृत्य केले असावे.

कसेही का होईना जनतेची सोय निश्चित झाली.

कंपनीने वेळापत्रकात किंचित बदल करून आंबिवलीला रेल्वे थांबवण्याची विनंती केली होती. गेली १४-१५ वर्षे सकाळी सात ते दुपारी तीन, दुपारी तीन ते रात्री अकरा व रात्री अकरा ते सकाळी सात अशा तीन पाळ्या व सकाळी आठ ते सायंकाळी पाच अशी जनरल शिफ्ट, अशा चार पाळ्यांतून काम चालू होते. पण रेल्वेने ह्या बाबतीतही कोणत्याही बदलाला तयारी दाखवली नाही. शेवटी कंपनीनेच सात पस्तीस ते चार पस्तीस अशी जनरल शिफ्ट व इतर पाळ्यांतून रेल्वे वेळापत्रकानुसार शिफ्टच्या वेळा बदलल्या.

उल्हासनदीवरचा, रेल्वे पुलाला समांतर असलेला पूलही कंपनीने स्वखर्चाने दुरुस्त केला. शंभर वर्षांहून जास्त काळ टिकलेला हा चिरेबंद पूल रेल्वेने रद्द करून नवीन लोखंडी पूल, अधिक रेल्वे लाइनसाठी बांधला होता. तेव्हापासून ह्या पुलाचा वापर एनआरसीच अधिक करत होती. नानावटी, अजंटा पेपर मिल्सही पूल वापरत पण दुरुस्ती एनआरसीच करत असे. पूल कठड्याशिवाय होता. एनआरसीने स्वखर्चाने दोन्ही बाजूला कठडे आणि सीमेंट ब्लॉक्स बांधून अनेकांचे प्राण वाचविले. कारण ह्यापूर्वी काही ट्रक्स माल माणसांसह नदीत पडले होते.

कंपनीच्या ह्या कल्याणकारी, जनहिताच्या कार्याची दखल परिसरातील लोकांनी घेतली. वृत्तपत्रांनीही ह्याची नोंद घेतली.

अर्थात् सर्वांनीच हा उमदेपणा दाखवला असे नाही. काही असंतुष्ट नेत्यांनी कंपनीने स्वार्थासाठीच हा खर्च केला, कंपनीची व कंत्राटदारांची वाहने वाचावी म्हणून कंपनीने हे काम केले, लोककल्याणाच्या बुरख्याखाली हा स्वार्थ कंपनीने साधला, एनआरसी आर्थिक नफ्याकरताच काम करते, पुण्य जमविण्यासाठी नाही, कुठलाही भांडवलदार मूळतः नफेखोरीकडेच पाहतो... असा प्रचार केला.

अर्थात अशा ठोकळेबाज शेरेबाजीचा कामगारांवर काही परिणाम झाला नाही आणि कंपनीचे प्रकल्प निर्वेधपणे पुरे होत होते.

• • •

# प्रकरण विसावे



शाळा वाढत होती म्हणजे गुसत्या भव्य देखण्या इमारती उभ्या रहात होत्या असे नाही.

शाळेत शिक्षकांची निवड चोख पारख करून घेतली जात होती. लेखी परीक्षा व नंतर निवडक व्यक्तींच्या मुलाखती घेऊन नेमणुका होत.

पण शाळा म्हणजे फक्त शैक्षणिक प्रगतीचे स्थळ नव्हते. ते एक संस्कार मंदिर होते.

त्यामुळे वर्षभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी भाग घेत असत.

कॉलनीबाहेर इतक्या भावना भडकणाऱ्या घडना घडत असतानाही शाळेतील शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमावर कोणताही विपरीत परिणाम होत नव्हता.

१९५६ हे लोकमान्य टिळकांचे जन्मशताब्दी वर्ष. २३ जुलै १८५६ हा त्यांचा जन्म दिवस आणि १ ऑगस्ट १९२० ला त्यांचे निधन झाले. २३ जुलै ते १ ऑगस्ट शाळेत टिळक शताब्दी कार्यक्रम झाले.

लोकमान्यांसारखा लोकोत्तर महापुरुष, त्यांची विद्वत्ता, जहाल विचारसरणी हे कळण्याइतके विद्यार्थ्यांचे वय नव्हते कारण शाळा फक्त आठवीपर्यंत होती.

तरीही लोकमान्यांविषयी कात्रणे जमविणे, चित्रे जमविणे, शक्य तसे त्यांच्या जीवनातील प्रसंग रेखाटणे, निबंध, वक्तृत्व स्पर्धा असे भरगच्च कार्यक्रम ह्या छोट्याशा शाळेतील छोट्या बालकांनी सादर केले. त्या सर्व संग्रहाचे एक प्रदर्शन योजण्यात आले होते. कलेचे जाणकार, रसिक, विद्वान श्री. जे. जे. मेहता यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांनी घेतलेल्या कष्टाचे कौतुक केले.

कॉलनीतीलच नाही तर आसपासच्या गावातील ग्रामस्थांनीही लोकमान्य टिळक पुण्यतिथीला प्रदर्शनाला भेट दिली.

विशेष म्हणजे जुलै अखेर पावसाची संततधार चालू होती. कल्याणहून येणारे सर्व रस्ते पाण्याखाली होते. काही पुरुष शिक्षक रात्री शाळेत मुक्कामाला राहिले. कित्येक शिक्षिका रेल्वेच्या रुळातून चालत मोहोने येथे आल्या. इतका कर्तव्यदक्ष शिक्षकवर्ग असताना विद्यार्थ्यांवर आपोआपच चांगले संस्कार घडत होते.

दुसऱ्याच वर्षी १९५७ च्या स्वातंत्र्य समर शताब्दीला १०० वर्षे पूर्ण होत होती. त्यानिमित्त झाशीच्या राणीच्या जीवनातील प्रसंगावर एक नाटिका विद्यार्थ्यांनी सादर केली. एकांकिका मराठी होती. नववीत गुजराती-मराठी मिळून पंधरावीस विद्यार्थी होते.

त्यातील नंदा कर्णिकने लक्ष्मीबाईची तडफदार भूमिका केली तर वरिष्ठ अधिकारी श्री. एस. एम. पटेल यांच्या पुतण्याने, दिलीप पटेलने मेजर एलिसची भूमिका केली.

मुख्य म्हणजे ह्या नाटिकेला लागणारे पोषाख हे शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांनी बनविले होते. कागद, पुठ्ठे, तरट यांचा उपयोग बेमालूम केला होता. कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या काळ्या-निळ्या पडद्यासमोर हे नाट्य घडले. प्रायोगिक नाट्याचा हा नमुना प्रेक्षकांना अतिशय भावला.

१ मे १९६०, जागतिक कामगार दिन आणि संयुक्त महाराष्ट्राचा निर्मिती दिन

शाळेने मोठ्या थाटात साजरा केला.

शासनाने शाळा उन्हाळ्याच्या सुटीसाठी बंद ठेवण्याचा दिनांक बदलला होता. विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपल्या होत्या.

तरीही 'महाराष्ट्र दर्शन'चा देखणा कार्यक्रम विद्यार्थी व शिक्षकांनीही साजरा केला. मोठ्या रंगमंचावर महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरांचे दर्शन त्यात होते. ओव्या, अभंग, शाहीरी पोवाडे यांच्या माध्यमातून सकाळच्या सडासंमार्जनापासून रात्री देवळात होणारी भजने, कीर्तने आणि गावाबाहेर मोकळ्या जागी होणारे तमाशे त्यांचेही नमुने सादर करण्यात आले. लेखन, दिग्दर्शन, संगीत, रंगभूषा, वेषभूषा ही सर्व रंगमंचाची अंगे शिक्षकांनीच सांभाळली होती. हजारो प्रेक्षकांनी ह्या कार्यक्रमाला उत्तम दाद दिली. एक चिरस्मरणीय कार्यक्रम म्हणून कॉलनीवासीयांच्या आणि परिसरातील ग्रामस्थांच्याही तोंडी हा विषय होता.

पुढे वसंत बापट यांनी त्याच नावाचा तीन तासाचा व्यावसायिक कार्यक्रम महाराष्ट्रभर सादर केला. तरीही आपल्या छोट्या कलाकारांचे कौतुक पालकवर्ग अभिमानाने करत असे. मुख्य म्हणजे अशा सर्व कार्यक्रमात गुजराती मराठी विद्यार्थी हिरीरीने भाग घेत. भाषिक राज्यासाठी झालेल्या चळवळीचा शाळेतील विद्यार्थ्यांवर मुळीच परिणाम झाला नव्हता ह्याचे गमक अशा कार्यक्रमांतून मिळत होते.

ज्याप्रमाणे कारखान्यातील विविध प्रकल्प बारा-तेरा वर्षांत विकसित होत होते त्याचप्रमाणे विद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रगतीही सर्वांगीण पद्धतीने होत होती.

क्रीडा क्षेत्रात विद्यालय जिल्हा पातळीपर्यंत आघाडीवर होते. वैयक्तिक क्रीडा स्पर्धा, कबड्डी, खोखो, लंगडी ह्या सामन्यांतही तालुका, जिल्हा पातळीवर विद्यालयाचे विद्यार्थी प्रावीण्य पदकांचे मानकरी ठरत होते. काही विद्यार्थ्यांची निवड राज्य पातळीवरही झाली होती.

चित्रकला परीक्षांतही विद्यालयाचे निकाल शंभर टक्के लागत होते. इंटरमिजिएट परीक्षेला पश्चिम विभागातील राज्यातून शाळेचा विद्यार्थी पहिला आला होता. तो मागासवर्गीय होता. आज तो मुंबईतला विख्यात हृदयरोग चिकित्सक म्हणून एका बड्या रुग्णालयात विभाग प्रमुख आहे.

कारखान्यातील कामगारांसाठीही आंतरविभागीय सामने होत. त्यातून एनआरसीचा क्रिकेटचा संघ टाइम्स ऑफ इंडिया शील्ड स्पर्धेत ए विभागातून खेळत असे. शाळेसमोरच्या मैदानाचा उपयोग सर्वांसाठी होत असे. खंडू रांगणेकर, सुभाष गुप्ते यांच्यासारखे निष्णात खेळाडू एन.आर.सी.च्या खेळाडूंना प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत.

कबड्डीचा एनआरसीचा संघही आंतरराज्य स्पर्धेत अजिंक्य होता.

नारायण मराठे, कानेटकर, दत्ता देशमुख, महाडिक, बाबूराव कदम हे खेळाडू राज्यभर गाजले होते.

हॉकी आणि फूटबॉलचेही एनआरसीचे संघ चमकत होते.

'कामा'तर्फे (कल्याण-अंबरनाथ मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन) होणाऱ्या स्पर्धेत एनआरसीच्या संघाला तोड नव्हती.

नोकरीबरोबरच कामगारांच्या ह्या विविध गुणांचा विकास होत होता, त्यामुळे संघर्षाला कामगारांची फारशी तयारी नव्हती.

विद्यालयाच्या इमारतीचा उपयोग विविध कलोपासनांसाठी, ज्ञानार्जनासाठी, कॉलनीवासी करत होते.

कल्याणच्या गायन समाजाची संस्था दिनकर संगीत विद्यालय. ह्या विद्यालयाची शाखा एनआरसी शाळेच्या इमारतीत नियमाने चालत असे. कंठ संगीत व वाद्य संगीत शिकवण्यासाठी पंडित वसंतराव गोसावींसारखे विख्यात गायक, अध्यापक, विशारदपर्यंत विद्यार्थ्यांना शिकवत असत. एकनाथ गीध, ढोलाभाई, लाला धनेकर यांच्यासारखे विद्यार्थी विशारद झाले होते. महिन्यातून एकदा सर्वांसाठी संगीत जलसा दिनकर संगीत विद्यालयातर्फे होत असे.

शाळा हे सर्व वसाहतीचे एक ज्ञान विज्ञान केन्द्र बनले होते. दरवर्षी शाळेत प्रसिद्ध साहित्यिकांची व्याख्याने होत. आपल्या पाठ्यपुस्तकातील ज्या लेखक कवींचा आपण अभ्यास करतो ते लेखक कवी प्रत्यक्षात दिसतात कसे, बोलतात कसे, वागतात कसे हे जाणण्याची विद्यार्थ्यांची नैसर्गिक उत्सुकता असते. त्यादृष्टीने एक वर्ष शाळेतल्या वरिष्ठ वर्गातील काही विद्यार्थ्यांनी साहित्यिक दैनंदिनीतून पत्ते घेऊन जोडपत्र पाठविण्याचा उपक्रम केला होता. बहुतांशी साहित्यिकांनी पत्रोत्तरे पाठवून ह्या विद्यार्थ्यांना सुयश चिंतिले होते. ह्या सर्व पत्रांचे एक छोटेसे प्रदर्शन शाळेने सर्वांसाठी खुले ठेवले होते.

पालकांनी ह्या उपक्रमाचे कौतुक केले आणि ह्या बड्या लेखकांना शाळेने सर्वांसाठी आमंत्रण द्यावे अशा सूचनाही केल्या.

शाळेने अर्थातच पुढचा उपक्रम हाती घेतला. मराठीतील प्रख्यात कवी. प्रा. अनंत काणेकर, समीक्षक प्रा. रा. भि. जोशी, कादंबरीकार गो. नी. दांडेकर, विचारवंत प्रा. न. र. फाटक, प्रख्यात विनोदी साहित्यिक द. मा. मिरासदार, शं. ना. नवरे, कल्याणचे वि. आ. बुवा, प्रसिद्ध इतिहास संशोधक आणि शैलीदार वक्ते श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे, स्वामीकार रणजित देसाई अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची व्याख्याने

शाळेने विद्यार्थी व पालकांसाठी योजिली होती. यापैकी काहींनी तर पुन्हा भेटी दिल्या. शाळेतील चित्रकला शिक्षक श्री. विश्वनाथ अभ्यंकर यांनी काढलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या ४'x३' अशा तैलचित्राचे अनावरण खुद्द बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले.

श्री. अभ्यंकरांनी ह्याच आकारातील अनेक महनीय व्यक्तींची तैलचित्रे काढली होती. ती कलाभवनातील भिंतींवर लावलेली होती. शास्त्रज्ञांची चित्रे प्रयोगशाळेत लावली होती. छत्रपतींचे चित्र प्राचार्यांच्या कार्यालयातच शासकीय नियमाप्रमाणे लावण्यात आले होते.

शालेय इमारतीच्या रुंद मार्गिकेत विविध नेत्यांची, संशोधकांची, साहित्यिकांची, समाजसुधारकांची तैलचित्रे लावली होती.

एक विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शाळेतील सुतारकाम शिकवणाऱ्या श्री. मारुती लिंबाजी मिसळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पेन्सिल व चारकोलच्या सहाय्याने काढलेले उत्तम चित्र नव्या इमारतीतील मार्गिकेत मोक्याच्या जागेवर लावले होते.

ह्या सर्व चित्रांना योग्य अशा चौकटी श्री. मिसळे यांनीच विद्यार्थ्यांच्या सहाय्याने केल्या होत्या.

शिक्षण आणि निर्मिती यांचा आनंद तर विद्यार्थ्यांना होतच होता. पण ह्या महान विभूतींच्या दर्शनाने विद्यार्थ्यांवरही नकळत सुसंस्कार होत होते.

प्रा. न. र. फाटक यांना आग्रहाने बोलावण्याची सूचना मुख्याधिकारी श्री. सी. जी. महंत यांची होती. विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमात कंपनीतील जबाबदारीची कामे सोडून येणे अधिकाऱ्यांना जमण्यासारखे नव्हते, पण इतक्या मोठ्या विचारवंताशी संवाद साधण्याची संधी त्यांना हवी होती. त्यानुसार प्रा. फाटक यांना निमंत्रण दिले. ते आनंदाने आले आणि शाळेतच ग्रंथालयात कंपनीतील बड्या अधिकाऱ्यांबरोबर मोकळेपणाने चर्चा झाली. प्रा. न. र. फाटक महाराष्ट्रभर अत्यंत परखड, स्पष्टवक्ते म्हणून प्रसिद्ध होते. अधिकाऱ्यांच्या शंकांना उत्तरे देताना फाटकांच्या फटकळपणाचा अनुभव आला.

श्री. महंत स्वतः विद्वान विचारवंत होते. तत्त्वज्ञान विषय घेऊन ते एम.ए. झाले होते. पुण्याच्या स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांचे ते शिष्य. आपल्या गुरुवर्यांच्या विचारांचा लाभ कॉलनीवासीयांना व्हावा असा त्यांचा अनेक दिवसांचा आग्रह शाळेकडे होता. त्यादृष्टीने प्रयत्नही केला पण वाऱ्या आणि महाविद्यालय यांच्या कामातून वेळ काढणे दांडेकरांना जमले नाही.

पुढे कामगार संघर्षाच्या वातावरणात ते राहूनच गेले. कॉलनीवासींची 'माऊली'च्या दर्शनाची आस अपुरीच राहिली.

तरीही सर्व ऐहिक सुखसोईंमुळे कामगार कर्मचारी मूलभूत भारतीय विचारांना पारखे होऊ नयेत, अध्यात्माचाही विचार त्यांनी केला तर जीवन अधिक समृद्ध होईल या विचाराने स्वाध्याय परिवाराचे अध्वर्यू, समाजसुधारक, संघटक गुरुवर्य पांडुरंगशास्त्री आठवले यांचे शिष्य प्रा. हरिभाई कोठारी यांचे दर गुरुवारी बरोबर एक तास प्रवचन होत असे.

स्वाध्याय परिवाराच्या पद्धतीने अत्यंत शिस्तीने आणि वक्तशीरपणे सायंकाळी सात ते आठ प्रवचने होत. श्रीमद भगवतगीतेच्या आधारे प्रवचने होत. त्याला गर्दीही बरीच असे.

विशेष म्हणजे त्या काळात कामगार अधिकाधिक वेतन व बोनससाठी व्यवस्थापनाशी कडवा संघर्ष करत होते. त्यावेळी कधी कधी ते गुजरातीत बोलत.

'जे काम आपणने सोपवामा आव्यु होय एना प्रत्येनी जवाबदारीनी भावना अेज आपणुं आत्मसन्मान छे! हुं अेकलो आ काम शुं काम करू अेवुं बहानु अे जातनु अवमूल्यन छे.'

म्हणून कर्तव्य करा, फळाची आशा न करता काम करा ही शिकवण ते देत. हेच प्रवचन गेटवर त्यांनी दिले असते तर कामगारांकडून त्यांच्यावर शिव्या आणि दगडांचा मारा झाला असता. पण शालेय सभागृहातील प्रवचनाला बहुसंख्य कामगार उपस्थित असूनही ते स्थितप्रज्ञतेचा अनुभव घेत असत. अस्खलित हिंदीत बोलणाऱ्या हरिभाईंनी नकळत गुजरातीचा आश्रय का घेतला हे गूढच वाटले.

स्वाध्याय परिवाराचे मोहोळे केन्द्र फार प्रभावी होते. पू. पांडुरंगशास्त्री म्हणजे परिवाराचे दादाजी. पू. दादाजींनी एकदा कॉलनीत प्रवचन करावे असा लोकांचा आग्रह होता आणि एक दिवस तो सुवर्णक्षण उगवला.

पू. दादाजींचे देवदुर्लभ स्वागत झाले. नेहमीप्रमाणे भजने, भक्तिगीते समूहाने म्हटली आणि पू. दादाजींनी सहस्रावधी भक्तांना तासभराच्या प्रवचनाने मंत्रमुग्ध केले.

चिनाई बंधू व्यापारी होते, उद्योजक होते पण तितकेच ते भाविकही होते.

दरवर्षी शांततेसाठी यज्ञ केला जाई. त्यासाठी एक भूखंड राखूनही ठेवला होता. मुंबईहून विद्वान वेदमूर्तींना पौरोहित्यासाठी बोलावले जाई. त्यांचे सोवळे, आन्हिके या सर्वांची काळजी खास माणसे नियुक्त करून ठेवली जात असत.


बेळगावच्या साध्वी गोदावरीमाता कित्येक वर्षे यज्ञसत्रप्रसंगी शिष्य परिवारासह

उपस्थित असत.

आपल्या सर्व ऐहिक उद्योगांना परमेश्वरी अधिष्ठान पाहिजे हीच कल्पना त्यामागे होती.

एके काळी जंगल-रान असलेल्या मोहोने परिसरातील भूमीवर मंगल उभे राहिले याचा अनुभव आबालवृद्धांना होत होता.

● ● ●



# प्रकरण एकवीसावे

श्रीमद् भगवतगीतेचे तत्त्वज्ञान कितीही थोर असले, त्याचे निरुपण करणारी व्यक्ती कितीही महान असली तरी क्षणकाळाच्या मंत्रमुग्धतेमुळे व्यवहारातील मोह टाळता येत नाही. खुद्द अर्जुनालाही हा मोह टाळता आला नाही. शेवटी श्रीकृष्णही एक प्रकारे हताश होऊनच अर्जुनाला म्हणाले, 'यथेच्छसि तथा कुरू'.

वास्तवाच्या जमिनीला पाय लागताच कामगारांना आधुनिक कृष्णाच्या आवाहनाला प्रतिसाद द्यावाच लागला. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कल्याण मतदारसंघातून शे. का. पक्षाचे कृष्णराव

धुळप पुन्हा विजयी झाले. इतकेच नाही तर विधानसभेत ते विरोधी पक्षनेते म्हणून निवडून आले.

त्यांना आपल्या मतदारांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे भागच होते. त्यांच्या मतदारसंघात असलेला कामगार संघटित झाला तर फार मोठे सामर्थ्य वाढले असते, म्हणूनच १९६३ ला धुळपांनी शे. का. पक्षाची युनियन एनआरसीत स्थापन केली. संघटित शक्तीचे प्रदर्शन वारंवार होणाऱ्या गेट मिटिंगमधून होऊ लागले.

पुरेशी संघटित शक्ती उभी राहताच युनियनने तीन महिन्याचा बोनस मिळावा अशी मागणी कंपनीकडे केली. त्यासाठी आंदोलन छेडण्याचीही सूचनावजा धमकी देण्यात आली.

कंपनीने ही सूचना फेटाळून लावली, इतकेच नव्हे तर १ मे १९६३ पासून टाळेबंदी जाहीर केली.

ह्या टाळेबंदीला युनियनने न्यायालयात दाद मागितली आणि न्यायालयाने टाळेबंदी बेकायदेशीर ठरविली. त्यानुसार ८ मे १९६३ ला कारखाना सुरू झाला.

युनियन व कंपनी यांच्या लढ्यात धुळपांचा हा पहिलाच विजय होता. मागण्यांविषयी कंपनी व युनियनमध्ये वाटाघाटीचं गुऱ्हाळ सुरू झालं. कंपनी दीड महिन्याचा बोनस द्यायला तयार होती. युनियनला हे मुळीच मान्य नव्हते. जुलै १९६३ पर्यंत ही बोलणी सुरू होती. कामगारांच्या मते हे कालअपहरण होते. कंपनी जाणूनबुजून निर्णयाबाबत टोलवाटोलवी करीत असल्याचा आरोप युनियन नेते उघडउघड करू लागले. कामगार संतापले. रोज मोठ्या आशेने गेटबाहेर ते आपल्या नेत्यांची वाट पहात असत. शेवटी जुलै १९६३ मध्ये वाटाघाटी फिसकटल्या.

संध्याकाळी सहा वाजता अयशस्वी बैठक सोडून कंपनीचे मुख्याधिकारी श्री. सी. जी. महंत व वाटाघाटीत कंपनीचे प्रतिनिधित्व करणारे अधिकारी कारखान्याच्या बाहेर पडले. मागून काही अंतरावर युनियनचे प्रतिनिधी मुर्दाबादच्या घोषणा देत होते.

गेटपलीकडे, वॉचमनने अडवून ठेवलेला कामगारवर्ग समजून धुकला. वाटाघाटी फिस्कटल्याचे त्यांना कळले. समाज संतापला, गेटवरून उड्या मारून, वॉचमनला बाजूला सारून कामगारांचा लोंढा आत शिरला. श्री. महंत त्यावेळी कारचे दार उघडून आत बसण्याच्या तयारीत होते. इतक्यात दगडांचा वर्षाव होऊ लागला. शेवटी स्वसंरक्षणार्थ त्यांनी पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. त्यात एक कामगार जखमी झाला. सारे सैरावैरा पळू लागले. श्री. महंत आणि इतर अधिकारी संधी साधून कॉलनीकडे भरधाव निघाले.

पण कॉलनीत संतापलेला जमाव आपला असंतोष मिळेल त्या मार्गाने व्यक्त

करत होता. व्यक्तिशः शांतताप्रिय असलेल्या कित्येक व्यक्ती समूहात विवेकशून्य वागत होत्या. प्रचंड दगडफेक होत होती. दिसेल त्या वाहनाची मोडतोड होत होती. खुद्द श्री. महंतांच्या बंगल्यासमोर उभ्या असलेल्या त्यांच्या कारची मोडतोड झाली. सिक्युरिटी खात्याचे वॉचमन इतक्या खवळलेल्या समुदायाला थोपवणं शक्य नव्हते. शेवटी पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला.

थोड्याच दिवसात काही अधिकाऱ्यांनी व्यक्तिशः कामगारांशी संपर्क साधत त्यांची समजूत घातली.

वाटाघाटी पुन्हा सुरू होतील असे आम्ही प्रयत्न करू पण कामगार प्रतिनिधींनी सामोपचाराने प्रश्न मिटवावा. मारझोड किंवा मोडतोड याने प्रश्न सुटणार नाही. उलट व्यवस्थापन कंपनीच बंद करेल, ह्यात सर्वांत जास्त नुकसान कामगारांचंच होईल.

हळूहळू हा विचार कामगारांत रुजला. पुढाऱ्यांना सांगून पुन्हा वाटाघाटी सुरू झाल्या.

श्री. महंत यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केल्याचा आरोप होता, तो मागे घेण्यात आला.

· शेवटी शांततामय वाटाघाटीत दीड महिन्याचा बोनस आणि दीड महिन्याचा सदिच्छा बोनस देण्याचे ठरले. जादा (Ex-Gratia) बोनस पुढे पगारातून हप्त्याहप्त्याने कापला जाईल ही अटही कामगारांनी मानली.

आणि कंपनी चालू राहिली.

पुढे कंपनीनेही वातावरण शांततामय राहण्यासाठी जादा बोनस कापून न घेण्याचे ठरविले.

पण सर्व कामगार ह्या कराराबद्दल खूष नव्हते. धुसफूस चालूच होती. मुख्य म्हणजे कामावर असतानाच आपले खाते सोडून काही स्वयंघोषीत पुढारी दुसऱ्या खात्यात जाऊन कामात अडथळा आणत. ही बेशिस्त कोणत्याही व्यवस्थापनाला परवडण्यासारखी नव्हती. त्यामुळे नियम मोडणाऱ्या कामगारांवर कंपनीने कायदेशीर कारवाई सुरू केली. युनियनच्या उपाध्यक्षाने तर कहरच केला. तो स्वतः टायरकॉर्ड खात्यात बेकायदेशीररीत्या जाऊन कामगारांना काम न करण्याची चिथावणी देत होता. कामगार त्याला प्रतिसाद देत नव्हते. मग त्याने स्वतःलाच जखमी केले व आपल्यावर कंपनीने मारेकरी घालून प्राणघातक हल्ला केल्याची अफवा उठवली.

आता मात्र कामगार कंपनीवर संतापले. २३ नोव्हेंबर १९६३ पासून त्यांनी बैठा संप सुरू केला. कंपनी कोणालाही प्रतिसाद देत नव्हती. काम तर ठप्प झाले होते. उत्पादन नाही म्हणून पगार नाही. कामगार हैराण झाले. ही टाळेबंदी आहे की

संप हा नेहमीचा प्रश्न कामगार न्यायालयात निर्णयाची वाट पहात पडला होता.

शेवटी आमदार कृष्णराव धुळपांनी, कल्याणच्या महात्मा फुले पोलीस चौकीसमोर असलेल्या डॉ. आंबेडकर उद्यानात आमरण उपोषण सुरू केले.

उपोषणाच्या जागी सतत गर्दी असे. मोठमोठे नेते आमदार धुळपांना भेटायला येत होते. उपोषण सोडण्याची विनंती करत होते. पण धुळपही हट्टाला पेटले होते.

वास्तविक धुळप यांना रक्तदाब व मधुमेह हे विकार होते. त्यांना उपोषण घातक होते. लवकरात लवकर कोणीतरी मध्यस्थी करून आपल्या नेत्याचे प्राण वाचवावे असे कामगारांना वाटत होते. आधीच उपाशी, अर्धपोटी असलेले कामगार धुळपांना साथ देण्यासाठी चक्री उपोषण करत होते.

शेवटी धुळपांची तब्येत बिघडली. त्यांना जबरदस्तीने मुंबईला सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तत्कालीन मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांनी आमदार धुळपांना उपोषण सोडण्याची विनंती केली व स्वतः कंपनीशी बोलणी करण्याचे आश्वासन दिले. २० जानेवारी १९६४ रोजी धुळपांनी उपोषण सोडले व मुख्यमंत्र्यांच्या शब्दाला मान देऊन कंपनी सुरू केली.

प्रत्यक्ष कामगारांच्या हातात काही पडले नाही.

उलट कंपनीने मात्र कायदेशीर कारवाया सुरूच ठेवल्या होत्या. ६८ कामगारांना कामावरून काढून टाकले. ह्यामध्ये युनियनच्या कार्यकारी मंडळातले, छोटे-मोठे सर्व नेते होते.

त्यांना परत कामावर घेण्यासाठी युनियनने फारसे लक्षच दिले नाही. चळवळीतील पुढारीच नाहीसे झाल्यावर युनियन चालणार कशी?

प्रत्यक्ष चळवळ थांबली होती. कारखान्यातील सर्व खाती व्यवस्थित चालू होती. अधूनमधून कामावर जाणाऱ्या कामगारांना- स्टाफ मेंबर्सना मारपीट होत होती. पण कामगारांनी आणि कर्मचारी, अधिकाऱ्यांनी धीराने ह्या दहशतीला तोंड दिले.

शेवटी तोही प्रयत्न मंदावला. धुळपांनीही हळूहळू लक्ष काढून घेतले. युनियन बंद पडली.

पुढची पाच-सात वर्षे कोणतीही युनियन क्रियाशील नव्हती.

याचे दुष्परिणामही कामगारांना भोगावे लागत होते. त्यांच्यासाठी भांडणारे कोणी नसल्यामुळे कंपनीतील काही बेवरकार अधिकाऱ्यांनी त्याचा फायदा घेतला.

कामगार हतबल होता. पुन्हा युनियनचे काम करण्याची त्यांची तयारी नव्हती.

१९७० मध्ये आणखी एक घटना घडली.

शासनाने मॅनेजिंग एजन्सीची पद्धत बंद केली. त्यामुळे धिनाई कुटुंबाकडे

मूळात भागभांडवल कमी होते. ते मालक वाटत पण ते व्यवस्थापकीय एजंट होते.

चिनाई कुटुंबातही नव्या जुन्या पिढीत कुरबुरी सुरू झाल्या होत्या. ज्या विश्वासाने रसिकलाल चिनाई आपण मुद्दाम आणलेल्या, कार्यक्षम अधिकाऱ्यांवर पूर्ण विश्वास ठेवून यशस्वी व्यवस्थापन करत होते, त्या अधिकाऱ्यांचे नव्या पिढीतील तरुण चिनाई वारसांशी जमेना. वयाकडे, अनुभवाकडे न पाहता त्यांचा वेळोवेळी अपमान होई.

दिनकरशेठ चिनाई. चिनाईंचे प्रतिनिधी म्हणून प्रत्यक्ष कारखान्यात काम करत होते. ते चुलत घराण्याचे होते. त्यांनाही काम करण्यात अडथळे निर्माण करण्यात येत होते.

त्यांनीही वैतागून कंपनी सोडली आणि कल्याण-डोंबिवली रस्त्यावर असलेल्या चिनाईंच्या एनॅमल वापर्स ह्या उद्योगाचे प्रमुखत्व स्वीकारले.

जुन्या तज्ज्ञांनी सुचविलेल्या योजना चिनाईंच्या नव्या पिढीने फेटाळल्या. खुद्द महंतांसारख्या कंपनीच्या सर्वश्रेष्ठ, कर्तृत्ववान अधिकाऱ्याला कारखान्यातून हलवून मुख्यालयात पाठवण्यात आले. वर वर पाहता ही पदोन्नती होती. सर्व कंपनीचे ते उपाध्यक्ष झाले होते.

युनियनमधील निर्नायकी आणि व्यवस्थापनातील मतभेद उघड्यावर येऊ लागले.

व्यवस्थापनाचा धाक राहिला नाही.

चिनाईंनी आपले भाग विकायला काढले. कापडिया हे शेअर बाजारातील फार मोठे दलाल होते. त्यांनी ह्या संधीचा फायदा घेतला आणि भाग खरेदी केले. आता बहुसंख्य भाग कापडियांकडे होते, त्यांच्याकडे कंपनीचा ताबा आला.

वास्तविक उद्योग जगताचा कापडियांना काही अनुभव नव्हता. भरभराट झालेला एक उद्योग, आशियातला सर्वात मोठा रेयॉन, रसायने यांचे उत्पादन करणारी अग्रगण्य कंपनी म्हणून केवळ फायद्याकडे लक्ष देऊन कापडियांनी कंपनी ताब्यात घेतली.

पूर्वीचा उत्पादनातील दर्जा राखण्याचा कटाक्ष, नवनवीन प्रयोग, संशोधन यासाठी असलेली अद्ययावत प्रयोगशाळा, कामगार कल्याणार्थ सुरू केलेले उपक्रम यांचे महत्त्व कापडियांच्या हिशेबी नव्हते.

उद्योगाचे ज्ञान नसताना केवळ अधिकाऱ्यांच्या सल्ल्यावर विसंबून उत्तम व्यवस्थापन होत नाही.

कंपनीची आर्थिक स्थिती बिघडू लागली. त्याचा राग अधिकाऱ्यांवर व

अधिकारी कामगारांवर काढू लागले.

कंपनीवर हजारो कुटुंबे अवलंबून होती. सहा-सात हजार कामगार कर्मचारी, अधिकारी तर प्रत्यक्ष सेवेत होते. कारखान्यामुळे परिसरात अनेक उद्योग सुरू झाले होते.

कंत्राटदाराचे कामगारही कंपनीत कामाला होते. त्यांना तर युनियनने कधीच वाऱ्यावर सोडले होते. आसपास किराणा दुकाने, दुग्धव्यवसाय, हॉटेल्स, स्टेशनरी, खासगी दवाखाने, छोटी हस्पितळे निघाली होती. हे सर्व उद्योग एनआरसीवर अवलंबून होते.

खुद्द कल्याण शहरातले कित्येक व्यापारी एनआरसीच्या कामगारांना उधारीने माल देत. त्यांना खात्री होती बोनस झाला की त्यांची उधारी वसूल होईल.

पण कंपनीतील बदलामुळे त्यांच्याही व्यवसायात चिंतेचे वातावरण होते.

कंपनी चालू राहिलीच पाहिजे ह्याकरता हातावर हात ठेवत बसून चालणार नव्हते. व्यवस्थापनाला धाक वाटेल असा युनियन नेता हवा होता. जो ज्ञानी हवा, आंतरराष्ट्रीय व्यापार-उदीमांचा जाणकार हवा आणि उठसूट काम बंद न करता, चर्चेने प्रश्न सोडवणारा हवा.

सुदैवाने असा नेता कामगार कर्मचाऱ्यांना मिळाला. तोही पुन्हा श्रीकृष्णाच. एस. आर. कुलकर्णी.

● ● ●

# प्रकरण बावीसावे

१९७२ साली स्टाफच्या कर्मचाऱ्यांनी एस. आर. कुलकर्णींची भेट घेतली. मुख्यालयातील स्टाफ मेंबर्सची युनियन आधीच एस.आर.कडे आली होती. त्या युनियनची विस्तारित शाखा म्हणून मोहोने येथील कारखान्यात एस. आर. कुलकर्णी यांची युनियन सुरू झाली.

एस. आर. कुलकर्णी जागतिक गोदी कामगारांच्या युनियन्सच्या फेडरेशनचे वर्षानुवर्षे अध्यक्ष होते.

आंतरराष्ट्रीय संबंधांचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. एक स्वच्छ चारित्र्याचा नेता म्हणून ते प्रसिद्ध होते. प्रख्यात कामगार पुढारी डिमेलो यांच्या हाताखाली अगदी सतरा-अठरा वर्षांचे असल्यापासून त्यांनी काम केले होते. अंमळनेरहून ते आणि मंगळूरहून जॉर्ज फर्नांडिस एकाच वेळी मुंबईत आले आणि दोघांनी डिमेलोंचे शिष्यत्व स्वीकारले.

दोघांमध्येही उत्तम वक्तृत्व, त्याग, देशभक्ती, अफाट कार्यक्षमता, कष्ट करण्याची तयारी आणि जिद्द भरपूर होती.

पण दोघांच्या तऱ्हा निराळ्या होत्या. जॉर्ज क्रांतिवादी जहाल स्वभावाचा तर एस.आर. शांततावादी मवाळ वृत्तीचा. जॉर्ज संपसम्राट झाले तर एस.आर. संपाचे हत्यार सर्वात शेवटी अपरिहार्य झाले तरच वापरायचे या विचाराचे.

टेबलावर बसून कोणत्याही व्यवस्थापनाशी शांतपणे, अभ्यासपूर्ण बोलणी करण्यात एस.आर. अत्यंत निष्णात होते.

रेयॉन उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित होता. पल्पसाठीही कॅनडा, अमेरिकेवर त्यांना अवलंबून रहावे लागे.

कोणत्याही कंपनीने वाटाघाटीत तिरकी चाल चालली तर गोदीतून त्या कंपनीचा माल उचलला जाणार नाही. एकही गोदीकामगार एस.आर.च्या आज्ञेबाहेर नव्हता. त्यामुळे एस.आर.ना क्वचितच संप करावा लागे. नाक दाबले की कोणत्याही उद्योजकाचे तोंड उघडते हे एस.आर.ना माहीत होते.

एस.आर.नी कामगारांच्या आणि व्यवस्थापनांच्या वास्तवस्थितीचा अभ्यास केला. कंपनी जगलीच पाहिजे आणि त्यासाठी युनियन ताब्यात घेतली पाहिजे असा निर्णय एस.आर.नी घेतला. मोहनरावसारखा अत्यंत हुशार कार्यकर्ता त्यांचा सहाय्यक होता.

एनआरसीच्या कामगारांचे भवितव्य चांगले म्हणून त्यांना एस.आर.सारखा नेता मिळाला.

एस.आर.ची कार्यपद्धती, सौजन्यपूर्ण वागणूक याचा प्रभाव कोणावरही पडे. परिणामी कर्मचारी, कामगार, अधिकारी, सिक्युरिटी सर्व विभागांतील युनियन्स एकछत्री, एस.आर.च्या युनियनखाली आले.

सर्व स्तरांतील कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या, त्यांची वेतनश्रेणी याविषयी पूर्ण अभ्यास करून त्यांनी मागण्यांचा खलिता सादर केला. आणि सर्व स्तरांतील सेवकांचे जीवनमानच बदलून गेले. प्रत्येकाच्या पगारात भरघोस वाढ झाली, बोनस वाढले, वेतनश्रेणी वाढल्या, निश्चित झाल्या.

त्याचा परिणाम उत्पादनवाढीवर झाला. कंपनीच्या मालाचा दर्जा टिकवणे ही सेवकांची जबाबदारी आहे, अशी हक्काबरोबरच कर्तव्याची जाणीव करून देणारा एस.आर. हा एकमेवाद्वितीय नेता होता.

पुन्हा कंपनीत आणि कॉलनीत आनंदाचे, सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले. पुन्हा शांततामय जीवन लोक जगू लागले.

एस.आर. हे निव्वळ कामगार नेते नव्हते. राष्ट्रीय संकटाच्या वेळी त्यांनी कामगारांना राष्ट्रप्रवण केले.

अगोदरच १९६५ च्या पाक युद्धात कॉलनीतील रहिवाशांनी जागरुकता दाखवली होती. रात्री ब्लॅकआऊटच्या वेळी निरनिराळी पथके फेऱ्या मारून लोक प्रतिसाद देतात की नाही याचे शिक्षण कॉलनीवासीयांना होते.

पुन्हा १९७१ मध्ये पाकिस्तानने केलेल्या युद्धाच्या वेळीही सर्व प्रकारची सावधगिरी कंपनी बाळगीत असे.

बांगलादेश मुक्ती संग्रामात त्यांना आर्थिक मदत युनियनच्या माध्यमातून केली होती.

बांगलादेशीयांचे एक कलापथक प्रचारासाठी भारतात फिरत होते. कॉलनीत त्यांच्या आमार शोनार बांगला हा कार्यक्रम युनियनने आयोजित केला होता.

पुन्हा कॉलनीतील सर्व कला, क्रीडा क्षेत्रांतील उपक्रम सुरू झाले.

कल्याणचे किंवा बाहेरून आलेले पाहुणे कॉलनीला भेट देत असत त्यावेळी ते कॉलनीला हॉलीवूडच म्हणत. त्यावेळी बॉलीवूड नाव रूढ नव्हते. पण हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रख्यात नट, दिग्दर्शक कॉलनीच्या गेस्ट हाऊसमध्ये रहावयास येत असत.

मंगेशकर भावंडे तर नेहमी माधवी काटकर (देसाई) यांच्याकडे येत असत.

सांस्कृतिक कार्यक्रमांची कॉलनीत रेलचेल असे.

पावसाळा संपताच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात होत असे. शाळेतील वार्षिक उत्सव हे कॉलनीचे एक मोठे आकर्षण असे.

बालवाडीतील छोट्या बालकांपासून मोठ्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य, संगीत, नाटके यांची मेजवानीच प्रेक्षकांना असे. मराठी, गुजराती व पुढे इंग्रजी माध्यमही सुरू झाल्यामुळे तिन्ही भाषेतील भरगच्च कार्यक्रम असत. सर्वांना आपल्या पाल्याची कला पहायला मिळावी म्हणून दोन दिवस कार्यक्रम चालत.

शाळेत, संगीत, नृत्य शिकवण्यासाठी शिक्षक होते. कित्येक शिक्षक निष्णात कलावंत, लेखक, कवी, गायक होते. त्यांचाही कार्यक्रम सादर करण्यात सिंहाचा वाटा असे.

पाठोपाठ स्पोर्टस् क्लबतर्फे आयोजित 'आनंद बाजार' हा कार्यक्रम वार्षिक आकर्षण असे. कॉलनीतील हौशी कुटुंबे उत्तमोत्तम खाद्यपदार्थांचे स्टॉल्स् लावत. भारतभरच्या विविध प्रदेशांतील पदार्थ मिळत. रसिक खवय्ये त्यांचा आस्वाद घेत.

'आनंद बाजार' म्हणजे एक जत्राच असे. मुलांसाठी मेरी गो राऊंड, भव्य रहाटपाळणे असत.

जुगाराचेही विविध स्टॉल्स असत. पण ते क्लबतर्फे चालवले जात. कधीही

जुगाराच्या वाटेलाही न जाणाऱ्या कित्येक व्यक्ती गंमत म्हणून हाही अनुभव घेत असत.

आनंद बाजाराचा आनंद कॉलनीने मनसोक्त लुटून जरा निवांत दिवस जात तो दाक्षिणात्य श्रीआय्यप्पा महोत्सव सुरू होई. फार मोठ्या प्रमाणावर हा उत्सव साजरा होई. साबरीमलाई येथील मंदिराची प्रतिकृती मैदानावर उभी राहत असे. पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत आय्यप्पाच्या मूर्तीची विविध उपचारे पूजा केली जाई. दक्षिणेतून खास आणलेले पंडित वेदमूर्ती पूजेला असत. डॉ. रामस्वामी, श्री. नायर वगैरेंचा पुढाकार असे. कॉलनीतील सर्व वातावरण दाक्षिणात्य सांस्कृतिक परंपरांनी भारल्यासारखे असे. एक दिवस लक्षार्पनाचा विधी असे. लक्ष तुळशीदले देवाला अर्पण करत. ह्यात फक्त दाक्षिणात्य नाही तर कोणालाही सहभागी होता येत असे.

पहाट दाक्षिणात्य सुंद्री वादनाच्या सुस्वराने होत असे.

रात्री सर्वांसाठी करमणुकीचा भव्य कार्यक्रम असे. भारतात गाजलेल्या बॅलेंचा रंगमंचीय भव्यदिव्य आविष्कार सादर होई.

साबरीमलाईला जाणारे व्रतधारी उपास करत आणि सर्व प्रवास होईपर्यंत काळी वस्त्रे धारण करत. पंढरपूरच्या वारीप्रमाणे हा प्रवास पायी, खडतर असे. ह्या यात्रेकरूंना अनेक पथ्ये पाळावी लागत. सर्व प्रकारच्या सुखसोयी त्यांना त्यागाव्या लागत. आपल्या साहित्याचे लहानसे गाठोडे, माथ्यावरून त्यांना न्यावे लागे. ह्या व्रताचरणातही बिगर दाक्षिणात्य सामील होत.

पाठोपाठ किंवा तिथीनुसार अलीकडे पलीकडे नवरात्रोत्सव कॉलनीभर सुरू होई.

गुजराती बांधवांचा उत्साह अवर्णनीय असे. रात्री मध्यरात्रीपर्यंत गरबा नृत्य कॉलनीत ठिकठिकाणी होत असे. त्यात आबालवृद्ध स्त्री-पुरुष अत्यंत मोकळेपणे भाग घेत असत. भाषेची बंधने कधीच गळून पडलेली असत. रंगीबेरंगी पोषाखातील स्त्रिया, दांडिया रासमधील त्यांचे कौशल्य, तालाचे भान, पारंपरिक गाणी पारंपरिक चालीबरच म्हटली जात. गरब्याचे स्थळ सुशोभित असे. रोज कोणातर्फे तरी प्रसाद वाटला जाई.

दहा दिवस कॉलनी गरबी गुजरात झालेली असे.

त्यामानाने पावसाळ्यात येणारा श्री गणेशोत्सव माफक प्रमाणावर असे. काही उत्साही तरुणांनी माघ महिन्यात श्री गणेश जन्माचे निमित्त साधून श्री गणेशोत्सव साजरा करण्याचा प्रयत्न केला. हा उपक्रम फारसा रुळला नाही. पारंपरिक भाद्रपदातील घरोघरच्या गणपती पूजनानंतर हा केवळ उत्सवी प्रकार फारसा

लोकप्रिय झाला नाही.

घरगुती गणेशोत्सवातही सर्व जातीधर्माचे लोक भाग घेत असत. दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, दहा दिवस इतकेच नाही तर एका गुजराती कुटुंबात वर्षभर उत्सव असे. त्यांच्याकडे भाद्रपदात श्री गणेश मूर्तीचे आगमन झाले की गतवर्षीच्या मूर्तीचे विसर्जन होत असे.

नवरात्रातच दुर्गापूजा महोत्सव बंगाली बांधवही साजरा करत. पण त्यांची संख्या त्यामानाने कमी असल्याने कल्याण, अंबरनाथ येथील महोत्सवात ते सहभागी होत असत.

डिसेंबर अखेरीस ख्रिस्ती बांधवांची धावपळ सुरू होई. हिंदूंच्या दिवाळीप्रमाणेच, आकाश कंदील, दीपमाळा घरासमोर रात्री लागत. २५ डिसेंबरला मध्यरात्री ख्रिस्ती स्त्री-पुरुष पारंपरिक पद्धतीने वस्त्रे धारण करून, मेणबत्त्या हातात धरून मूक मिरवणूक कॉलनीभर काढत, शेवटी प्रार्थना होई.


नववर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने होई. ह्यात सर्व धर्मातील बांधव मोठ्या प्रमाणावर भाग घेत असत.

कॉलनी म्हणजे साने गुरुजींच्या आंतरभारतीचे एक नमुनेदार उदाहरण होते. असे सामाजिक अभिसरण इतरत्र क्वचितच दिसत असेल.

बौद्ध समाजाची वस्ती कॉलनीत तुलनेने कमी असली तरी कॉलनीच्या कुंपणाबाहेर फार मोठ्या प्रमाणावर बौद्धधर्मीय लोक रहात होते. त्यातल्या कित्येक कुटुंबांनी प्रत्यक्ष बाबासाहेबांबरोबरच नागपूरच्या दीक्षा भूमीवर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. डॉ. बाबासाहेबांचा जन्मदिन व ह्या महामानवाचा निर्वाणदिन उत्साहाने, मिरवणुकीने पण संयमपूर्ण शिस्तीने साजरा करत. बहुतेक बौद्धजन दादरला चैत्यभूमीवर किंवा नागपूरला दीक्षाभूमीवर भक्तिभावाने जात असत.

मुस्लीम बांधवांची ईदही साधेपणाने, सामूहिक नमाजाने साजरी होई. पारंपरिक खाद्यपदार्थ केले जात. इतर धर्मीयही ईदमुबारक करायला मुस्लीम बांधवांकडे आवर्जून जात असत. खास बिर्याणी, खीरचा आस्वाद लुटत असत.

● ● ●



# प्रकरण तेवीसावे

कामगारांच्या, कर्मचाऱ्यांच्या अभिनयगुणाला वाव देण्यासाठी कामगार रंगभूमीवर होणाऱ्या स्पर्धांतून एनआरसीचा नटसंच सहभागी व्हायचा. विशेष म्हणजे त्यांचा दबदबा होता. मुंबईतील कामगार रंगभूमी एनआरसीच्या कामगारांनी सातत्याने गाजविली व सातत्याने अजिंक्यपद मिळविले. कॉलनीतील लोकांना त्यांच्या अभिनयाचा आस्वाद मिळण्यासाठी दरवर्षी रंगभूमीवर स्थानिक कलाकारांची नाटके सादर केली जात. ही सगळी व्यवस्था स्पोर्टस् क्लबतर्फे होत असे. त्यासाठी खास समिती निवडली जात असे.

कंपनीचे चीफ इलेक्ट्रिकल इंजिनीअर श्री. नवीन पारीख यांना नाट्यकलेत रस होता. त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून एक खुला रंगमंच कायमचा उभारला होता. पुरेसा लांब, रुंद व खोल असा हा मंच सर्व विद्युत सोयींनी उपलब्ध असे.

बाहेरच्या हौशी नाट्यसंस्थाना जे स्पॉट लाईट, डीमर्स्, बेबी स्पॉटस् तासाच्या भाड्याने घ्यावे लागत ते कंपनीच्या विद्युत खात्याकडून विनामूल्य मिळत, त्यासाठी जाणकार आणि हौशी इलेक्ट्रिशियन्स व वायरमन्सची सेवा उपलब्ध असायची.

दरवर्षी व्यावसायिक रंगमंचावर गाजणारी मराठी, गुजराती, हिन्दी नाटके अत्यंत स्वस्त दरात कॉलनीतील रहिवाशांना पाहायला मिळत. त्यासाठी एक सप्ताह नाट्यमहोत्सव असे.

अत्रे थिएटर्स्‌चा 'तो मी नव्हेच' ह्या नाटकाचा प्रयोग एनआरसीच्या रंगमंचावर झाला. प्रभाकर पणशीकरांची अनेक व्यक्तींची रूपे घेऊन केलेली लखोबा लोखंडेंची भूमिका प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतली. पंतांनी ऐन उमेदीत दाखविलेले बहुरूपी स्वरूप त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा कळस होता. अर्थात त्यानंतरच्याही विविध भूमिकांना त्यांनी तितकाच न्याय दिला.

नाट्यरंगात रंगलेल्या प्रेक्षकांपेक्षा नवीन पारीख त्या नाटकाच्या तांत्रिक कौशल्याचे निरीक्षण करण्यात गुंग होते. दुसऱ्या दिवशी त्या फिरत्या रंगमंचाचा त्यांनी स्वतः मंचावर जाऊन अभ्यास केला आणि स्थानिक कार्यकर्त्यांना म्हणाले, आपणसुद्धा असा मंच उभा करू. आपल्याकडे भरपूर कौशल्य असलेले कारागीर आहेत.

अर्थात् नाटकाच्या मागणीवरून फिरत्या, सरकत्या रंगमंचाची गरज असते ह्या विचारापेक्षा आपणही कशात कमी नाही हे व्यावसायिक नाट्य संस्थांना कळावे हा त्यांचा सद्हेतू होता.

शेवटी काही कायम सोपी त्यांनी मंचावर केल्या.

विख्यात नाट्य संस्था एनआरसीच्या खुल्या मंचावर नाटक सादर करताना खूष असत. पण एक गैरसोय होती. ती प्रेक्षकांची. प्रेक्षागार एकाच पातळीवर होते. त्यामुळे रंगमंचावरील सर्व हालचाली शेवटच्या रांगेतील प्रेक्षकांना नीट दिसत नसत.

पारीख साहेबांच्या लक्षात ही त्रुटी येताच त्यांनी मैदानाच्या त्या भागात प्रचंड भराव टाकून, उत्तम हिरवळ लावून, योग्य तो उतार करून घेतला.

त्यावेळी कित्येकांनी त्यांना नावे ठेवली. सोन्यासारख्या सुंदर मैदानात, जिथे क्रिकेट, हॉकी, खोखो, कबड्डी, लांबउडी, उंचउडी, व्हॉलीबॉल यांची आखीव मैदाने होती, तिथे ह्या उतारामुळे काहींना अडथळा वाटू लागला.

पण आग्रही पारीख साहेबांनी निर्णय बदलला नाही. जेव्हा सर्व मैदानाचा वापर आवश्यक असेल तेव्हा तो उंचवटा काढून टाकला जाई.

स्पोर्ट्स क्लबचा अध्यक्ष प्रेक्षकांचे इतके लाड करणारा असल्यामुळे त्या त्या वर्षीची उत्तमोत्तम नाटके एनआरसीच्या रंगमंचावर झालीच पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. त्याप्रमाणे जवळजवळ साठच्या दशकापासून गाजलेली सर्व नाटके कॉलनीत होऊ लागली.

हा काळ मराठी रंगभूमीच्या इतिहासातील सुवर्णकाळ होता. राज्य नाट्यस्पर्धेत कसदार नाटके उतरत होती. त्यातूनच काही व्यावसायिक अभिनेते निर्माण झाले.

साहित्य संघ मुंबई, नाट्य संपदा, चंद्रलेखा, अत्रे थिएटर्स, रंजन कला मंदिर नागपूरचा संघ, नगरचा प्रा. लोंढरमलांचा संघ, नाशिकच्या लोकहितवादी मंडळाचा संघ. गुजरातीतील कांति मेडिया, अरविंद त्रिवेदी यांचे संघ. हिंदीतील मोहन राकेशची आधुनिक नाटके सादर करणारा अमरीश पुरींचा संघ, सत्यदेव दुबेंची थिएटर आर्ट्स, विजया मेहता, अरविंद देशपांडे यांचा आविष्कार ह्या संस्था रंगमंचावर अविस्मरणीय प्रयोग करीत होते.

कॉलनीवासीयांचे भाग्य की ह्या सर्व श्रेष्ठ कलाकृती एनआरसीच्या खुल्या रंगमंचावर दिमाखदारपणे सादर झाल्या.

मांडवीनी जुई, चकडोलं, महानगर, अमे तमे नी रतियो, धूपसळी सारखी गुजराती नाटके, स्टील फ्रेम, आधे अधुरे सारखी हिन्दी नाटके आणि मराठी तर सगळी नावे आठवणे कठीण इतक्या संख्येने सादर झालेली नाटके. नटसम्राट, गारंबीचा बापू, अश्रूंची झाली फुले, घरात फुलला पारिजात, बेइमान, रायगडाला जेव्हा जाग येते, गुडबाय डॉक्टर, थँक यू मि. ग्लॅड, दुर्वांची जुडी, सौजन्याची ऐशी तैशी, दिनूच्या सासूबाई राधाबाई, तो मी नव्हेच, वऱ्हाडी माणसे, ती फुलराणी, अखेरचा सवाल, कट्यार काळजात घुसली, घेतलं शिंगावर, हिमालयाची सावली, गाढवाचं लग्न... किती नावे आठवावी?

त्याशिवाय, सुहासिनी मुळगावकरांचे एकपात्री सौभद्र, सुमन धर्माधिकारी यांचे एकपात्री 'घार हिंडते आकाशी', हेही उल्लेखनीय प्रयोग झाले.

व्यावसायिक नाटकांइतकीच तोलामोलाची नाटके स्थानिक कलावंतांनीही सादर केली. तुझे आहे तुजपाशी, सुंदर मी होणार, काळे बेट लालबत्ती, अपराध मीच केला, दिवा जळू दे सारी रात, भटाला दिली ओसरी, प्रेमा तुझा रंग कसा, कथा कुणाची व्यथा कुणाची, काका किशाचा, वेगळं व्हायचंय मला... वगैरे अनेक.

एल.एम. देशमुख, दत्ता देशमुख, दशपुत्रे, नारायण मराठे, मामा केळुसकर, बाळ जिगजिन्नी, सुधाकर बापट, रत्नाकर आंबिकर, प्रभाकर जोशी, प्रभाकर पत्की, श्रीरंग बेहेरे, अनंत गोखले, संत, विजयकर, केळकर, देवस्थळी, लिमये, बजाज, डी. एस. कुळकर्णी, बापू दाबक ह्या स्टाफमधील कलाकारांप्रमाणेच कामगारांपैकी अनंत नेरुरकर, सुरेश भिंगारदिवे, खानोलकर, पिलाजी कदम, लाड, पवार, केदारे, गवारे, घोडके, कालरा, मुजावर, वनसोडे, अशोक वैद्य यांनीही दमदार अभिनय सादर केला.

गुजराती कलावंतांमध्ये किशोर चोकसी, यशवंत भट्ट, अंतानी यांनी उल्लेखनीय कामे केली.

संत, गोखले, प्रभाताई नवरे, विमल चौधरी, सुलभा देशमुख, चंद्रकला देशमुख, माधवी देसाई, उषा समर्थ, मंगल वैद्य, नीशा दाबक, पाठारे, अरुणा रत्नपारखी या स्त्री कलावंतांनीही आपली अभिनय कला दर्जेदारपणे सादर केली.

कामगार कलावंतांच्या गटात बाहेरून सौ. आचवल वगैरेंना आणावे लागे. कारण स्टाफमधील साहेबांच्या पत्नींबरोबर काम करणे त्यांना अवघड होई.

यातील सर्वच नाटके नाट्य महोत्सवाशिवाय, गणेशोत्सव वगैरे प्रासंगिक कारणाने सादर केली गेली.

नाटकांशिवाय इतरही मनोरंजनात्मक कार्यक्रम एनआरसीच्या मंचावर सादर झाले. मेलडी मेकर्स, महेशकुमार अँड पार्टी, सीनियर आणि ज्युनियर सरकार, रघुवीर यांचे मंत्रमुग्ध करणारे जादूचे प्रयोग विस्मरणात जाणे शक्यच नाही.

गोपीकृष्ण यांचा नृत्याविष्कार, सचिन शंकर यांचा बॅले हे असेच प्रचंड लोकप्रिय कार्यक्रम झाले.

त्याशिवाय, मंगेश गोकर्ण ह्या हरहुन्नर वादकाचा स्थानिक बाळगोपाळांना घेऊन सादर केलेला वाद्यवृंदाचा कार्यक्रम पण कौतुकाचा विषय होता.

त्याचप्रमाणे देवीदास वेल्लारे, स्पोर्ट्स् क्लबचे नुसते व्यवस्थापक नव्हते, एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. जादू, बासरी वादन, नाकाने बासरी वादन, नकला अशा विविध कार्यक्रमांत वेल्लारे छोट्या मोठ्या मुलामुलींच्या सहाय्याने कार्यक्रम सादर करत. त्यांचे छंदवर्ग मुक्त हस्ते बालकांना विविध छंद लावत. त्यांच्या पत्नी मुक्ता वेल्लारे ह्या उत्तम नर्तिका होत्याच त्याशिवाय अनेक कला त्यांना वश होत्या. साबणाच्या जाहिरातीत प्रथम चमकणाऱ्या अभिनेत्रींमध्ये त्यांचा उल्लेख करावा लागेल.

एनआरसीतले अनधिकृत फॅशन डिझायनर वेल्लारेच होते. नवीन कपड्यांची

फॅशन त्यांच्या देहावर पहिली दिसे.

याशिवाय ते उत्तम बावर्ची होते. पार्ट्या आयोजित करण्यात ते वाकबगार. माधव चव्हाण, महेन्द्र दोषी, अंधारिया यांच्या बालकन् जी बारीच्याही कार्याला बेल्लारेंचे सहाय्य असे.

आज इव्हेन्ट मॅनेजमेंट हे चलनी नाणं झालं आहे. त्या दृष्टीने बेल्लारेंना मॅनेजमेंट गुरूच म्हटले पाहिजे.

स्पोर्टस् क्लबमधील कँटीन, ग्रंथालय, जिम, सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांवर त्यांचा प्रेमळ वचक होता. 'बेल्लारेकाका' नेहरू चाचांनंतर तितकेच विद्यार्थ्यांमध्ये प्रिय.

एनआरसीची कॉलनी म्हणजे एखाद्या बुद्धिबळ पटासारख्या नियोजित स्थानी नियोजित मोहोरे होते. त्यादृष्टीने नगरीचा आराखडा अत्यंत रेखीव व उचित होता.

मनाचे आरोग्य आणि रंजनासाठी असलेल्या क्लबपासून अक्षरशः हाकेच्या अंतरावर हॉस्पिटल होते.

थोडा चढ चढून रुग्णाला जावे लागे. पण रस्त्याच्या दुतर्फा उत्तम राखलेले लॉन, रस्त्याच्या कडेला उंच शोभिवंत झाडे आणि समोर थुईथुई नाचणारे कारंजे पाहून रुग्णाचा विकार अर्धा बरा होत असे.

काही काळ डॉ. पी. सी. मेहता मुख्य आरोग्याधिकारी होते. नंतर त्यांची बदली कारखान्यात औद्योगिक आरोग्य अधिकारी म्हणून झाली. त्यांच्या जागी इंग्लंडमध्ये दीर्घकाळ वैद्यकीय सेवा केलेले उच्चशिक्षित शल्यविशारद डॉ. एन. आर. पटेल ह्या हसतमुख अधिकाऱ्याची नेमणूक झाली.

डॉ. के. एम. पटेल, सौ. प्रभा पटेल, डॉ. रामस्वामी, डॉ. कोचर, डॉ. गवारे, काही काळ डॉ. कवठेकर, अशा अनुभवी डॉक्टरांचे पथक सदैव तत्पर असे. ह्याशिवाय नाक, कान, घसा तज्ज्ञ डॉ. पिंपळखरे, दंतविद्यातज्ज्ञ डॉ. गावंड, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रमेश तोलात, डॉ. श्रीकांत डिके ह्यांच्याही सेवा उपलब्ध होत्या.

अत्यंत आधुनिक सोयींनी युक्त शल्यक्रिया कक्ष, आय.सी.यू., टी.बी. वॉर्ड असल्यामुळे येथून बहुसंख्य रुग्ण ठणठणीत होऊनच बाहेर पडत.

माधवन म्हणून रुग्णालयाचे प्रशासन बघणारे अधिकारी चतुरस्र अनुभवाचे होते. नर्सिंग स्टाफ, स्वच्छता कामगार ह्यांचे चोवीस तास हॉस्पिटलकडे लक्ष होते.

नाट्य महोत्सवाचे निमित्ताने, डॉ. श्रीराम लागू, प्रभाकर पणशीकर, वसंतराव देशपांडे, कांति मडिया, अमरीश पुरी, दत्ता भट, आशालता वाबगावकर, बबन प्रभू, मधुकर तोरडमल यांच्यासारखे जागतिक कीर्तीचे कलाकार कॉलनीत येत. त्यांच्या

बडवास्तीवर, पाहुणचारावर आणि परिसरावर ते अत्यंत संतुष्ट असत. पण तरीही कित्येकवेळा दीर्घ दौऱ्यावरून ते थेट एनआरसीत येत. वय, सतत प्रवासाचा त्रास ह्यामुळे त्यांना वैद्यकीय मदत गरजेची असे. तेव्हा हॉस्पिटलमधील डॉक्टर तत्परतेने त्यांच्या सेवेला हजर असत.

काही वेळा तर आपले आरक्षित आसन सोडून विंगमध्ये उभे राहून कलावंतांच्या सहाय्याला डॉक्टर हजर असत. अभिनय कलेवर व स्वतःच्या वैद्यकीय व्यवसायावर प्रेम आणि निष्ठा असलेले असे आरोग्याधिकारी कॉलनीतील रहिवाशांना उपलब्ध असत ह्याचे वैषम्य कलाकार बोलून दाखवत.

कॉलनीतील कँटीन किंवा बेल्लारेंची व्यवस्था ह्या पलिकडेही काही व्यवस्था करावी लागे. गाढवाचं लग्नचे दादू इंदूरीकर ह्या कुशल ग्रामीण, तमासगिराला कांद्याची, मिरच्यांची भजी असली की बाकी काही नको. बाकीचे त्याचे कलाकारही मैदानात राहुटी टाकून, रंगमंचावर दिलखेचक नृत्य सादर करणाऱ्या कलावंतीणी, तीन दगडांची चूल मांडून भाकऱ्या भाजत.

हे दृश्य जेव्हा नाटक संपल्यावर रेंगाळणारे प्रेक्षक पहात तेव्हा आपल्या जिभेच्या चोचल्यांची त्यांना कीव येत असे.


महाराष्ट्रातल्या सर्व थरातील कलावंतांचे दर्शन घेण्याची पर्वणी म्हणजे हा नाट्यमहोत्सव असे.

बेल्लारे यांनी तत्परतेने कुठूनतरी, गेटबरच्या सामान्य हॉटेलातून कागदात बांधून पुडकाभर भजी आणली, दादूंपुढे ठेवून ते प्लेट व पाणी आणायला गेले, येतात तो रंगपटात भिंतीकडे तोंड करून तमाशासम्राट, कुरकुरीत, चमचमीत भज्यांवर हात मारत होता. बेल्लारेंनी प्लेट आणली, त्यात चार भजी बेल्लाऱ्यांसाठीच ठेवत दादूजी म्हणाले, 'घ्या टेसदार हायेत."

बेल्लारेसाहेबांना अशी सवय नव्हती, पण ह्या सम्राटापुढे बेल्लारेतला 'साहेब' गेला.

असे सम्राट. असे त्यांचे साम्राज्य.

• • •



# प्रकरण चोवीसावे

**बी.** एड. कॉलेजचे निरीक्षक प्राध्यापक कधी कधी आपल्या विद्यार्थ्यांचे पाठ-निरीक्षण करायला शाळेत येत.

एक शिक्षिका एकदा श्रीलंकेच्या नैसर्गिक संपत्ती विषयी पाठ घेत होत्या. शेवटी कृत्रिमपणे शेवट करत त्यांनी विद्यार्थ्यांना विचारले, 'श्रीलंकेला पाचूचे बेट का म्हणतात?'

मुलांनी योग्य-अयोग्य उत्तरे दिली. तास संपल्याचा टोला पडला आणि कासावीस झालेल्या शिक्षिका, नकाशा, गुंडाळफलक, खडू, डस्टर आणि स्वतःला सावरत वर्गाबाहेर पडल्या.

निरीक्षक प्राध्यापकांनी पाठाच्या टिपणावर लिहिले होते.

'ज्ञाताकडून अज्ञाताकडे, प्रत्यक्षाकडून अप्रत्यक्षाकडे, या मूलभूत तत्त्वाचे पालन करायला हवे होते. वास्तविक एनआरसी कॉलनी ही वसाहतच एक पाचूचे बेट आहे. इतकी हिरवाई आसपास कुठेही नाही.'

बाहेरून मुद्दाम भेट द्यायला लोक येत. हे हिरवे बेट खरोखर कामगार संघर्ष नसे तेव्हा आनंदाचे डोही डुलत असे.

एसआरच्या एकछत्री युनियनमध्ये कामगार, कर्मचारी, अधिकारी सर्व गुण्यागोविंदाने नांदत होते.

पण रासायनिक उद्योगाचा मुळीच अनुभव नसलेल्या, फक्त दलाल बाजारात कौशल्य असलेल्या निमजीभाई कापडियांनी चिनाईकडून कंपनी ताब्यात घेतली. चिनाई फक्त मॅनेजिंग एजंट होते. १९७० मध्ये मॅनेजिंग एजन्सी पद्धतच सरकारने बंद केली. चिनाईकडे मुळात भाग भांडवल कमीच होते. भाग भांडवलाच्या जोरावर सोन्याची अंडे देणारी ही कोंबडी कापडियांनी घेतली.

पण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर वचक बसणे शक्य न झाल्याने आपसात एकमेकांविरुद्ध कागाळ्या करणे सुरू झाले. दुहीची बीजे पेरणे सोपे असते पण त्याला येणारी फळेही किडकी येणार याचे भान व्यवस्थापनाला राहिले नाही. कसेही करून स्वतः पैसा कमावणे हे एकच उद्दिष्ट राहिले.

ह्याच काळात देशात आणिबाणी जाहीर झाली. संप, मोर्चे, सर्वांवर बंदी आली.

लेखन स्वातंत्र्यावर प्री सेन्सॉरशिप आली. कंपनीचे परिवार मासिक 'रेयॉन न्यूज' दर महिन्याला निघत होते. ते मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजीतून असे. कामगारांच्या कलागुणांना प्रसिद्धी दिली जाई. त्यांच्या साहित्याला, काव्यांना प्रोत्साहन देऊन प्रकाशित केले जाई.

पण ह्यातील प्रत्येक शब्द न शब्द पोलिस अधिकाऱ्याकडून तपासल्यावरच छपाईला जाई, वर्षानुवर्षे पाळलेली शिस्त गेली. मासिक वेळेवर निघणे शक्यच नव्हते. सहाजिकच ते बंद पडण्याच्या मार्गावर आले.

देशातील सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. अठरा महिने देश हुकूमशाहीच्या वरवंट्याखाली भरडला जात होता. पण वस्तुस्थिती कोणालाही कळू शकत नव्हती.

कंपनीची तोट्यात जाण्याची स्थितीही फक्त जाणकारांना होती. पण कोणी काहीही करू शकत नव्हते.

१८ महिन्याच्या अंधारानंतर पुन्हा प्रकाश आला. जयप्रकाश नारायणांच्या

सर्वपक्षीय संघर्षाला यश आले. आणिबाणी उठली आणि इंदिरा गांधींनी सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या.

देशभर दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धाचा भडका उडाला. सरकार विरोधी भावनांचा उद्रेक मतपेटीतून व्यक्त झाला आणि जनता पार्टी सत्तेवर आली.

आता कंपनी वाचवण्यासाठी प्रयत्न करणे भाग होते. प्रश्न कापडियांच्या नफेखोरीचा नव्हता. सहा-सात हजार कामगारांच्या, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांच्या जन्ममरणाचा होता.

सुदैवाने कल्याणचे १९६७-६८ साली नगराध्यक्ष असलेले नारायण मराठे हे युनियनचे उपाध्यक्ष होते. त्यांनी अध्यक्ष एस.आर.श्री बोलणे केले आणि नानाजी देशमुखांच्या मध्यस्थीने केन्द्र सरकारला वस्तुस्थिती कळवावी असे ठरले.

एस.आर., नारायण मराठे व युनियनचे इतर सहकारी त्याकरता दिल्लीत गेले. अर्थमंत्री एच.एम. पटेल, उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस, रेल्वेमंत्री मधू दंडवते, पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याशी बोलणी झाली. कायदामंत्री शशिभूषण यांच्याशी तपशीलवार बोलणे झाले. हे सगळे घडवण्यात नानाजी देशमुख यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती.

शशिभूषण कंपनी लॉ बोर्डाचे अध्यक्ष होते.

युनियनचे म्हणणे त्यांना पटले व तातडीने कापडियांचे बोर्ड ऑफ डायरेक्टर रद्द करून नवीन बोर्ड नियुक्त करण्यात आले. अर्थतज्ज्ञ डी.एम. त्रिवेदी यांना मुख्याधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले.

त्यांनी त्वरेने पावले उचलली. कंपनीत धाक निर्माण करून कामात शिस्त आणली. सर्वच अधिकारी, कर्मचारी, कामगार यांनी आपल्या नेत्याचा निर्णय शिरोधार्य मानून प्रामाणिकपणे काम केले आणि कंपनीची बुडती नौका वाचली.

विधायक नेतृत्वाचा हा नमुना केवळ अपूर्व म्हटला पाहिजे.

तरीही संकटाचे सावट संपले नव्हते. कंपनीतील काही स्वार्थी अधिकाऱ्यांना धरून धुळपांना परत नेतृत्व करण्यास प्रवृत्त करण्यात आले. धुळपांच्या घराच्या आसपास कंपनीतील अनेक कामगार, कर्मचारी रहात होते. त्यांच्याकडे येणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या कारवाया युनियनला कळत होत्या.

आपली जरब निर्माण करण्याचा सोपा उपाय म्हणजे स्टाफ मेंबर्सना मारपीट करणे, शे. का. पक्षाच्या नेहमीच्या पद्धतीने हे सुरू झाले. कंपनीत घबराट निर्माण झाली आणि एक जुलै १९७८ ला कंपनी बंद पडली. मनगटाच्या जोरावर धुळप युनियन यशस्वी झाली. कंपनीने एस.आर.च्या युनियन ऐवजी लालबावटा युनियनला

मान्यता द्यावी ही मुख्य मागणी होती.

लोकशाही नसानसात असलेल्या एस.आर.नी मतदानाने कामगारांनी युनियन निवडावी ह्या मागणीला मान्यता दिली.

सार्वजनिक निवडणुकीप्रमाणे गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक घेण्यात आली आणि धाकदपटशाहीखाली दडपलेल्या कामगारांनी एस.आर.नी मिळवून दिलेले सर्व फायदे विसरून धुळप युनियनला बहुमताने निवडून दिले.

एस.आर. कुळकर्णींनी खुल्या दिलाने पराभव मान्य केला.

१९६३ नंतर १९७८ मध्ये धुळप युनियनचे कंपनीत पुनरागमन झाले. सात जुलै १९७८ पासून रीतसर धुळप युनियन काम करू लागली. कंपनीचा छुपा पाठिंबा असल्यामुळे युनियनच्या काही मागण्या मान्यही करण्यात आल्या.

प्रत्यक्षात कॉ. धुळप विधानसभेत विरोधी पक्ष नेते होते. अनेक कमिशन्सवर ते पदाधिकारी होते. एस.टी. व पोलीस ह्या मुख्य खात्यावर ते जबाबदार पदावर होते. साहजिकच त्यांचे वैयक्तिक लक्ष एनआरसीकडे फारसे राहिले नाही.

त्याचा परिणाम दुय्यम दर्जाच्या नेतृत्वावर झाला. काही जणांचे कंपनीशी अर्थपूर्ण व्यवहार झाले. त्यांचे बिंग त्यांच्याच सहकाऱ्यांनी फोडले.

ह्या परिस्थितीला कामगार कंटाळले. एस.आर.कडे जायला त्यांना तोंड नव्हते. ह्याच सुमारास मुंबईतील सूतगिरण्यांत दत्ता सामंतांचे झुंजार नेतृत्व गाजत होते. ते वास्तविक व्यवसायाने डॉक्टर होते. त्यांचा शांततामय वाटाघाटींवर विश्वास नव्हता. गिरणी कामगारांचे नेतृत्वही त्यांनी नाइलाजाने स्वीकारले होते. दीर्घ संपामुळे मुंबईतील कामगारांचे संसार उद्ध्वस्त झाले होते. पण मुंबईतील सर्वात मोठ्या संघटनेचे ते संपसम्राट होते.

एनआरसीचे कामगार त्यांना वारंवार गळ घालू लागले. शेवटी डॉक्टरांनी युनियन काढण्याचे मान्य केले.

त्यांच्या पद्धतीनेच विरोधकांना मारझोड करणे सुरू झाले. धुळप युनियनच्या पदाधिकाऱ्यांना अखेरी १९८१ साली पळताभुई थोडी झाली.

कंपनीतील स्टाफ व अधिकाऱ्यांवर जरब बसवण्यासाठी कारखान्याच्या हद्दीतच त्यांना अमानुष मारहाण झाली. कंपनीच्या पर्सोनेल मॅनेजरांना अत्यंत क्रूरपणे त्यांच्याच ऑफिसमध्ये भरपूर मारण्यात आले. वि. ग. नवरे यांच्यासारख्या शांत स्वभावाच्या अधिकाऱ्यावरही हल्ला झाला.

वास्तविक एक वर्षापूर्वी सर्व कामगारांच्या भावना लक्षात घेऊन कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा उभारण्यात आला होता.

पुतळा समितीने नाकारलेला अर्धपुतळा, धुळपांशी कानगोष्टी करणाऱ्या एका अधिकारी जोडगोळीने, तो पुतळा परस्पर कल्याणच्या एका कुंभाराकडून बनवून घेतला होता.

जागतिक कीर्तीचे शिल्पकार सदाशिव साठे कल्याणातच होते. समितीने त्यांना काम देण्याचे सुचविले होते. पुतळा आणि जागेची निवड यासाठी समितीत मतभेद होते. म्हणून जवळपास वर्षभर तो पुतळा टाईम ऑफिसजवळ कापडात झाकून ठेवला होता.

धुळप युनियनला त्याचे काही सोयरसुतक नव्हते.

पण घाग नावाचे तडफदार तरुण अधिकारी मुख्याधिकारी म्हणून आले. त्यांचे धोरण एक घाव दोन तुकडे होते. समिती सभासदांना, कंपनीतल्या स्थापत्य तज्ज्ञांना, सर्वांना फैलावर घेत पुतळा बसवण्याचे त्यांनी जाहीर केले.

१३ एप्रिल १९८० रोजी सातारच्या महाराणी सुमित्राराजे भोसले यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे उपस्थित होते.

त्यानंतर पुतळ्याकडे कोणी पाहिलेही नाही.

शिवरायांच्या साक्षीनेच डॉ. सामंत यांच्या प्रचंड सभा झाल्या. आग भडकावणारी भाषणे डॉ. करत. शिवीगाळ करत. बॅलन्सशीट वगैरे मी मानत नाही. पैसा कुठूनही आणा, माझ्या कामगारांना पगारवाढ, बोनस मिळालाच पाहिजे. माझा वाटाघाटीच्या गुऱ्हाळावर विश्वास नाही. असेच मर्दासारखे लढा. विजय आपलाच आहे.

डॉ.च्या भाषणाने लोक पेटून उठत. दिवसेंदिवस दहशतीचे वातावरण वाढू लागले. पोलीस बंदोबस्ताने कॉलनीला छावणीचे स्वरूप आले.

शेवटी सहा ऑगस्ट १९८२ ला कंपनी व युनियनमध्ये करार झाला. कामगारांच्या पगारात मोठी वाढ झाली.

कामगार खूष होते. पण कंत्राटी कामगारांना काहीच मिळाले नाही. त्यांनी संप केला. कंपनीचे काम ठप्प झाले. शेवटी एक जानेवारी १९८३ रोजी कंपनीने टाळेबंदी जाहीर केली. ती ६८ दिवस टिकली. पुढे युनियनने चाळीस टक्के बोनसची मागणी केली होती. ती अर्थातच कंपनीने फेटाळली. २३ नोव्हेंबर १९८३ रोजी कंपनीने पुन्हा टाळेबंदी जाहीर केली. ती अठरा महिने टिकली. शेवटी कोणताही आर्थिक लाभ न होता १० मे १९८५ रोजी कंपनी सुरू झाली.

त्या अठरा महिन्यांत कामगारांना काही उत्पन्न नव्हते. स्टाफमधील कर्मचाऱ्यांना अर्धा पगार मिळत होते. सर्व कॉलनीला अवकळा आली होती.

कामगारांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. कारखान्यातील सर्व खाती बंद

होती. अधिकारी वर्ग कडक सुरक्षेत रोज सकाळी गेस्ट हाऊसमध्ये जमत होता.

कामगार आपला असंतोष व्यक्त करू शकत नव्हते. त्यातून कॉलनीतील शाळा व हॉस्पिटल पूर्णपणे चालू होते. अर्धपगारावर शिक्षक, डॉक्टर्स वगैरे पूर्ण जबाबदारीने काम करत होते.

पण घरच्या परिस्थितीने वैतागलेल्या कामगारांना मुलांना न्यायला, आणायला येण्याच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी मिळत होती. पेशंट या नात्याने डॉक्टरांना एकटेच गाठता येत होते. काही गुंड प्रवृत्तीचे कामगार ह्याचा फायदा घेऊन शाळेच्या प्राचार्यांच्या खोलीत घुसून, थुंकून, शिवीगाळ करून आपला सूड घेत होते. डॉक्टरांवर अशीच मानहानीची वेळ येत होती. पण काम करणे तर भाग होते.

विशेष म्हणजे ह्या दीर्घ बंदच्या काळातही शाळेचा शालान्त परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागत होता, इतकेच नाही तर दरवर्षी मेरिट लिस्टमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांची नावे येऊ लागली.

रोज शाळेभोवती जमणाऱ्या समूहात स्त्रियांची संख्या खूप असे, पुरुष मागे राहून चिथावणी देत. स्त्रियाही अत्यंत अश्लील हावभाव करून शिवीगाळ करत.

कंपनीनेही बंदोबस्तासाठी पोलिसांशिवाय आसपासच्या बेकार गुंड तरुणांना साध्या पोषाखात कॉलनीत गस्त घालायला नेमले होते.

त्यामुळे शांतता प्रस्तापित होण्याऐवजी कामगारांमध्ये चीड निर्माण होत होती.

अशा स्फोटक परिस्थितीतही शाळेचे, हॉस्पिटलचे दैनंदिन काम चालूच होते. १९८५ चा प्रजासत्ताक दिन जवळ आला. नेहमीप्रमाणे शेवटचे दोन तास मुला-मुलींची शिस्तबद्ध कवायत होत होती. हा सराव आठ दिवस चालू होता. चोषाच्या तालावर कवायत, लष्करी वंदना सर्व विद्यार्थी कमांडरकडून बसविले जात होते.

हजारो रिकामे कामगार रोज ही कवायत पहायला जमत होते. आपल्याच पाल्यांच्या ह्या शिस्तबद्ध कवायतीचे त्यांना कौतुक वाटे.

पण व्यवस्थापनाच्या आज्ञेच्या एका फटकाऱ्याने विचका उडाला. २५ जानेवारीला प्राचार्यांना सांगण्यात आले. 'कवायत रद्द करा. २६ ला प्रजासत्ताक दिन साजरा करू नका.'

प्राचार्यांनी सांगितले, 'असे करता येणार नाही. हा दिन साजरा केला नाही तर शाळेवर कारवाई होईल. ध्वजवंदन हा सर्वांचा हक्क आहे. तो हिरावून घेतला तर प्रचंड क्षोभ माजेल.'

'पण त्याचबरोबर प्रेक्षक म्हणून हजारो कामगार कॉलनीत जमतील. झेंडा वंदनानंतर ते प्रचंड दंगल, जाळपोळ करतील असा पोलिसांचाच अहवाल आहे.

कॉलनीवासीयांचे जीव धोक्यात घालण्यापेक्षा उत्सव रद्द करणे इष्ट. ही आमची आज्ञा समजा.' व्यवस्थापन.

रात्रीच गडबड सुरू झाली. कामगारच नव्हे तर परिसरातील गाववालेही चिडले. रातोरात त्यांनी तयारी केली.

मुलांनीही चंग बांधला. त्यांनीच दोन-अडीच तासाचा मैदानी कार्यक्रम बसवला होता. त्यांनी आपणच कार्यक्रम करू असा निश्चय केला.

२६ जानेवारीला सकाळपासून हालचाल दिसू लागली. व्यवस्थापनाने लष्कराला पाचारण केले. सर्व गेट बंद करून कोणालाही आत सोडणे बंद केले.

गेटवर प्रचंड जमाव जमला. जमावाने उग्र स्वरूप धारण केले. दगडफेक सुरू झाली. गेटवर चढून काही कामगार आत शिरले. प्रत्यक्ष पोलीस व कामगार समूह ह्यांत हातघाई सुरू झाली. पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. त्यात काही कामगार दगावले, अनेक जखमी झाले.

पण शाळेच्या मैदानावरील कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

मध्यान्ही कामगारांच्या हिंस्र झालेल्या टोळ्या कॉलनीत धिंगाणा घालू लागला. अधिकारांच्या, स्टाफच्या क्वार्टर्सवर तुफान दगडफेक झाली. रॉकेलचे पेटते बोळे टाकण्यात आले. कंपाऊंडची मोठी दगडी भिंत तोडण्यात आली.

लष्कराची अधिक कुमक कॉलनीत गस्त घालू लागली.

वरवर पाहता शांतता प्रस्थापित झाली.

आता कंपनीनेही कडक धोरण स्वीकारले. युनियनशी बोलणेच बंद केले. शेवटी १७ मे १९८५ रोजी टाळेबंदी उठली व कंपनी सुरू झाली.

कामगारांच्या पदरात फारसे काही पडले नाही. होरपळलेले कामगार मुकाट्याने कामावर आले.

डॉ. सामंतांचा मुंबईतलाही प्रभाव संपत आला होता. दीर्घकाळच्या संपाने मुंबईतील गिरणी कामगार उद्‌ध्वस्त झाला होता. निराश झाला होता.

त्याचा परिणाम एनआरसीतही होऊ लागला.

डॉक्टरांचेही युनियनकडे लक्ष नव्हते. नवीन आलेले एम.डी. बुद्धिराजा एकतर्फी निर्णय जाहीर करू लागले. बोनसमध्ये कपात केली. हतबल कामगार काहीच करू शकत नव्हते.

अशा अस्वस्थ वातावरणात डॉक्टरांना अनेक शत्रू निर्माण झाले होते. परिणामी १६ जानेवारी १९९७ रोजी डॉक्टरांवर जीवघेणा हल्ला झाला. त्यात डॉक्टरांचे निधन झाले.

सामंत युनियनचं अस्तित्व नावालाच होतं.

मध्यंतरी कापडियांनाही परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे कळले होते. त्यांनी गौरीप्रसाद गोएंकांना कंपनी विकली.

पण उत्पादन, दर्जा घसरत चालला. टायरकॉर्ड, नायलॉनच्या उत्पादनाचा प्रयत्न करूनही फायदा होईना. बाजारात मागणी मंदावली. उत्पादित माल पडून राहू लागला.

अनुभवी, तज्ज्ञ अधिकारी कंपनी सोडून गेले. कित्येकांनी व्ही.आर.एस.चा फायदा घेतला.

कंपनी बंद करण्याशिवाय व्यवस्थापनाकडे मार्गच राहिला नाही.

शेवटी नोव्हेंबर २००८ मध्ये कंपनी पूर्णपणे बंद करण्यात आली.

गेल्या दोन वर्षांत मधुकर सरपोतदार, काँग्रेसचे भाई जगताप यांनी युनियन काढली. सुभाष पाटील अध्यक्ष झाले. वडवलीचे मुकुंद भोईर चिटणीस झाले. कंपनी चालू करणे हा विषय इतिहासजमा झाला. आता फक्त कामगारांची देणी द्यावी हीच मागणी राहिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार शशिकांत शिंदे पुढे सरसावले. त्यांनी कामगारांचा विश्वासही संपादन केला. आरपीआयचे माजी नगरसेवक भीमराव डोळक यांनी संघर्ष समिती स्थापन केली.

त्यांचीही मागणी कामगारांची थकित देणी मिळावी हीच राहिली.

गोएंकांनी मध्यंतरी रहेजा या मोठ्या विकासकाबरोबर जमिनीचा काही व्यवहार केल्याचे बाहेर आले. त्यातून कामगारांची थकित देणी दिल्याशिवाय कॉलनीतील कोणीही जागा सोडणार नाही अशी सक्त ताकीद आमदारांनी व नेत्यांनी दिली. त्याचबरोबर बेघर होणाऱ्या कामगारांचे आधी पुनर्वसन करा, त्यांच्यासाठी आधी घरे बांधा व मग काय करायचा तो जमिनीचा विकास करा, असा सज्जड दम दिला. कॉलनीत राहणाऱ्या कामगारांनाही किमान हे तरी हवेच होते.

त्यामुळे रिकाम्या झालेल्या इमारतींची देखभाल बंद झाली. रस्ते, पाणी, वीज याकडे व्यवस्थापनाने पूर्ण दुर्लक्ष केले.

तरीही कामगार घरे सोडेनात.

आज बहुसंख्य कामगार जीएन, एचएन, काही स्टाफफ मेंबर्स, इ एन टाईप इमारतीत स्वतःच्याच जबाबदारीवर, सगळ्या गैरसोयींना तोंड देत रहात आहेत.


एका स्वप्नसृष्टीचा असा भयानक अंत झाला आहे.

व्यक्तिगत जीवनात चौसष्ट वय आता फारसे वृद्धत्व मानले जात नाही.

संस्थात्मक जीवनात तर रौप्य, सुवर्ण, हीरक महोत्सव, शताब्दी ह्यांनाही फार दीर्घ काळ मानस नाहीत.

पण एनआरसीसारख्या प्रचंड उद्योगावर उण्यापुऱ्या साठ-बासष्ट वर्षांत इतिहासजमा होण्याची वेळ यावी हे दुर्दैव आहे.

● ● ●



# प्रकरण पंचवीसावे

उल्हासनगरच्या सेवासदन संस्थेच्या बी.एड. महाविद्यालयातून निवृत्त झाल्यावर मी डोंबिवली सोडून ठाणे येथे स्थायिक झालो.

एक दिवस सकाळी कौपिनेश्वराचे दर्शन घेऊन बाहेर पडत होतो तो एक बाई समोर आल्या. त्यांनी वाकून नमस्कार केला. 'सर, ओळखलंत का?'

खरं म्हणजे मी ओळखलं नव्हतं. शेवटी त्याच म्हणाल्या, 'पाचूचे बेट आठवतंय का?'

मला लगेच तो जुना प्रसंग आठवला. एनआरसीच्या शाळेतल्या त्या शिक्षिका प्रशिक्षणासाठी आमच्या महाविद्यालयात

होत्या.

श्रीलंकेचे निसर्गसौंदर्य सांगताना त्यांनी खरे पाहता एनआरसी कॉलनीचेच उदाहरण द्यायला हवे होते. मी तसा शेराही पाठवर दिला.

त्यावेळी त्या पोरेलशा होत्या. आता संसार मानवलेला दिसत होता. मी काहीतरी विचारायचे म्हणून विचारले, 'काय तुमची शाळा तरी चालू आहे का?'

'हो, पण चालतेय कशीतरी. पगार आम्हाला सरकारकडून मिळतो म्हणून ठीक आहे. बाकी सगळा आनंद आहे.' त्या म्हणाल्या. 'सर या ना एकदा शाळेत. त्यानिमित्ताने प्रत्यक्ष परिस्थिती पहायला मिळेल... मी गडबडीत आहे. फोन नंबर द्या मग ठरवू...' त्या म्हणाल्या.

नंतर मी विसरूनही गेलो होतो. मधूनमधून एनआरसीविषयी बातम्या येत, तेव्हा आठवण येई. जुन्या सहकाऱ्यांचीही आठवण येई.

एक दिवस फोन आला. त्या बाईंचाच. पारितोषिक वितरण समारंभाला मुख्य पाहुणा म्हणून यावे अशी त्यांची आग्रहाची विनंती. मी मान्यता दिली. त्यांनी घ्यायला यावे ही एकच अट.

मी भाड्याची गाडी ठरवली. त्या वेळेवर आल्या. मला आग्रहाने घेऊन गेल्या.

रस्ता तसा परिचयाचा होता, पण गेल्या वीस वर्षांत खूपच फरक पडला होता. शहाडपासून मोहोन्याकडे वळलेला रस्ता अत्यंत खराब झाला होता.

आम्ही एनआरसीच्या गेटजवळ पोहोचताच मी गाडी थांबवली. प्रवेशद्वारासमोरच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा केविलवाणा वाटत होता. ह्या ठिकाणी होणाऱ्या प्रत्येक पुढाऱ्यांच्या गेट मिटिंगमध्ये शिवाजी महाराजांचा जयजयकार होत असे. समोर सुंदर हिरवे लॉन होते. ते हिरवे राहण्यासाठी स्प्रिंक्लरच्या फवाऱ्यांचे तुषार उडत असत.

आज पुतळ्याभोवती गवताची काडीही नाही. सुकलेल्या फुलांचा हार, बहुदा जयंतीला कोणीतरी घातला असावा. रंग विटलेले काही भगवे झेंडे कुंपणाच्या गजांना बांधले होते. गंजलेल्या गजाआड महाराजांचा अर्धपुतळा उदासवाणा वाटला. मन खिन्न झाले. गेटवर अर्धगोलाकार पाटी होती. 'एनआरसी परिवार आपले स्वागत करतो.'

हे असे स्वागत कुठेही, कधीही झाले नव्हते. एखाद्या मध्यवर्ती कारागृहाच्या महाद्वारावर दिसते तशी ती पाटी होती. तसेच लोखंडी गेट होते, पण सताड उघडे होते.

आम्ही शाळेकडे निघालो. डावीकडे कारखाना पूर्ण बंद होता. दारे गंजली

होती. काही खिडक्यांची दारं वाऱ्याबरोबर कधीही निखळून पडतील अशा स्थितीत होती.

पूर्वी रस्त्याच्या दुतर्फा सुंदर कापलेली हिरवीगार कुंपणे होती. काळा कुळकुळीत रस्ता चकाकत होता. कागदाचा कपटाही कुठे दिसत नव्हता. शेकडो माळी आणि सफाई कामगार सारे कसे नीटनेटके ठेवत होते.

मी बाहेर पाहिले. हिरवाई मुळीच नव्हती. पानगळीचे दिवस नसूनही पालापाचोळा साचला होता. वाऱ्याबरोबर ती सगळी पाने भिरभिरत रस्त्यावर पसरत होती. बाई काहीबाही बोलत होत्या. मला काही ऐकूच येत नव्हते. मन-कान सुन्न झाले होते.

पूर्वीच्या डिपार्टमेंटल स्टोअरजवळ गाडी वळली. दुकान बंदच होते. फक्त गॅस, गिरणी आणि काहीतरी चालू होतं. कॅनरा बँकेची पाटी दिसली. बँक चालू आहे, अशी माहिती बाईंनी पुरवली.

रस्ता ठिकठिकाणी फुटला होता. सांडपाणी रस्त्यावर वहात होते. भव्य क्रीडांगणाला एखाद्या तुरुंगासारखा उंच कोट होता. फुटकी गटारे टाळत ड्रायव्हरने शाळेसमोर गाडी उभी केली.

माझा एक विद्यार्थी मुख्याध्यापक झाला होता. त्याने स्वागत केले. पूर्वीच्या प्राचार्यांची प्रशस्त केबीन ओळखू येत नव्हती. व्हरांड्यात काळोख होता. कार्यक्रम आहे की नाही याची शंका यावी इतकी शांतता होती.

मुख्याध्यापकांच्या खोलीत चहापान झाले. एक अवकळा आलेली ती खोली होती. समारंभापूर्वी शाळेत फेरी मारली. बाई बरोबर होत्या. मुख्याध्यापक अन्य कामात होते.

वीस वर्षांपूर्वी सकाळी सातपासून संध्याकाळी साडेसहा-सातपर्यंत शाळा उघडी होती. हजारो विद्यार्थी तीन माध्यमांतून शिकत होते. मराठी, गुजराती, इंग्रजी माध्यमांत शाळा व्यवस्थित चालू होती.

चित्रकलेसाठी कलाभवन म्हणून मोठा हॉल होता. आता दाराच्या चौकटीवर फक्त पाटी होती. बहुतेक सर्व वर्ग बंद होते. वापरातच नव्हते. दारांना लाकडी फळ्या मारून पूर्ण बंद करण्यात आली होती.

कुठेही जिवंतपणाचे चिन्हही नव्हते. मला हे बघवेना.

इतक्यात बोलावणे आले. हॉलमध्ये विद्यार्थी बसले होते. पारितोषिक समारंभ असूनही कोणाच्याही चेहऱ्यावर संतोष नव्हता.

यांत्रिकपणे समारंभ झाला. पारितोषिके वाटण्यात आली. टाळ्या वाजल्या.

मी नेहमीसारखे भाषण केले, पण मला कळत होते त्या बोलण्यात काही जीव नव्हता.

समारंभ संपला.

मुख्याध्यापकांना मी विनंती केली, मला कॉलनीत एक फेरी मारायची आहे. त्यांनी दोन शिक्षकांना बरोबर दिले. बाईंना बहुदा दुसरी काही जबाबदारी असावी.

मी निरोप घेतला. बाई रेल्वेने येणार होत्या.

सोबतच्या शिक्षकांनी मी पूर्वी पाहिलेल्याच वास्तू दाखवल्या. हा स्पोर्ट्स क्लब. आता काही नाही. खाली बीएसएनएलला जागा भाड्याने दिली आहे.

डाव्या बाजूला उंचवट्याच्या रस्त्याने गाडी निघाली. 'इथे हॉस्पिटल होते. इथे ह्या बाजूला डॉक्टरांच्या केबिन्स होत्या.' आम्ही पायउतार होऊन, पडझड ओलांडून जात होतो. 'इथे ऑपरेशन थिएटर होते म्हणतात. आम्ही काहीच पाहिले नाही. कुंपणापलीकडच्या लोकांनी दारं-खिडक्या नेल्या असं म्हणतात.'

पुढे स्टाफ क्वार्टर्स होते. सबंध इमारतीत एखाद-दोन कुटुंबे रहात होती. बाकीच्या ब्लॉक्सची दारं-खिडक्या गायब होती.

ठिकठिकाणी गवत वाढले होते. काटेरी झुडपे पार करून जाण्याचा उत्साह नव्हता, कारणही नव्हते.

शाळेसमोरच्या बैठ्या बंगलीवजा इमारतींना छपरेच नव्हती. दारे-खिडक्या कधीतरी असाव्यात. विजयनगरचे उद्ध्वस्त साम्राज्य दाखवणारे हंपी वगैरे सारख्या एखाद्या ऐतिहासिक ठिकाणी आलो आहोत असे वाटत होते.

पाण्याचे नळ गळत होते. ड्रेनेज फुटले होते. ती सगळी गलिच्छ घाण रस्त्यावरच उताराने वहात होती.

आम्ही गाडीत बसलो. बड्या साहेबांचे बंगले शिक्षकांनी दाखवले. सगळे उद्ध्वस्त होते.

ज्या गेस्ट हाऊसमध्ये देशातली थोर माणसं येऊन गेली होती, सिनेसृष्टीतील प्रख्यात नट्या-दिग्दर्शक जिथे आठवडा आठवडा रहात, तिथे आज पडझड झालेली उद्ध्वस्त वास्तू होती.

यज्ञभूमी म्हणून त्या बंगल्यांच्या रांगेत सोडलेला एक भूखंड मोकळा होता. झाडंझुडपं होतीच. पण नवल म्हणजे कधीकाळी झालेल्या यज्ञाचे होमकुंड निद्रिस्त ज्वालामुखीप्रमाणे काळवंडून आपली दैना दाखवत होते.

फेरी पूर्ण झाली. अधिक पाहणे असह्य झाले.

तरीही मला खेळांची आवड होती म्हणून मी गाडी क्रीडांगणाकडे घ्यायला

सांगितली.

एखाद्या माळरानासारखे मैदान दिसत होते. कोपऱ्यात काही मुले व्यायाम करत होती.

क्रिकेटच्या पीचवरती आम्ही उभे होतो. समोर शाळेची दोन मजली इमारत उभी होती. मला ती एखाद्या मतिमंद मुलासारखी पिप्पाड वाटली.

पीचवर उभे रहाण्याची अशी संधी पूर्वी मिळत नसे. माळी हाकलून देई.

सुभाष गुप्ते, बाळू गुप्ते, खंडू रांगणेकर, तुकाराम सुर्वे यांच्यासारखे रणजी आणि टेस्ट मॅचमध्ये खेळलेले उत्तम क्रिकेटपटू या पीचवर खेळले होते. नेट प्रॅक्टिसला कोच म्हणून ते मैदानावर हजर असत. त्या पीचवर उभे राहण्याचे पाप घडले होते. त्या तरुण शिक्षकांना काहीच माहीत नव्हते.

त्या पीचची माती मी कपाळाला लावली, तेव्हा एका शिक्षकाने विचारले, 'साहेब, इथलीच माती कपाळावर का लावली?' मी काही उत्तर दिले नाही. मी माझ्या तरुणपणी इथे खेळायला येत होतो.

मी टेनिस कोर्टच्या दिशेने पायीच गेलो.

तिथे टेनिस कोर्ट असावे ह्याचा काहीही पुरावा नव्हता. ठाणे जिल्हा पोलिस प्रमुख सुधाकर भावे, अमर डायचे रेगेंसारख्या खेळाडूंचा खेळ पाहाला आम्ही तरुणपणी येथे येत होतो हे सांगूनसुद्धा त्या तरुणांना पटले नसते.

कारण खेळाडूपणाच्या कोणत्याही खुणा आता माझ्या शरीरयष्टीत नव्हत्या. ते बांधेसूद नव्हते, ताजे टवटवीत नव्हते. डोळ्यावरच्या जाड काचांच्या चष्म्याने तर मी अधिकच वयस्कर वाटत होतो.

उघड्या मैदानात मला गलबलून आले. वारा असतानाही घाम फुटला. क्षणभर मी घाबरलोच. मी लगबगीने कारकडे गेलो. ड्रायव्हरला सांगितलं, परतायचं. त्या तरुण शिक्षकांना कसेबसे धन्यवाद दिले. गाडीत बसलो. ड्रायव्हरला एसी वाढवायला सांगितलं.

एक वळण घेऊन मैदान सोडलं. खरोखर एखाद्या पळपुट्यासारखे.

केव्हा एकदा स्वागत कमानीच्या खालून बाहेर पडतो असे झाले होते. बाहेर बाजार भरला होता. छत्रपतींच्या पुतळ्याभोवती असलेल्या कुंपणालाच पाट्या लागल्या होत्या. 'साधी दाबेली रोटी'. वडापाव केन्द्र. कुल्फी मलाईवाले, चौपाटीची भेळ. समोर गाड्या लागल्या होत्या. गिऱ्हाईकं गर्दी करत होती. आम्ही बड्या संकुलात राहणारी माणसं वाडा संस्कृतीचे गोडवे गाताना पुष्कळ वेळा म्हणतो, 'शेजारच्या ब्लॉकमध्ये कोणाचे निधन झाले असेल तर त्या मजल्यावरही कोणाला पत्ता नसतो.

आज मी काय पहात होतो?

दगडी भिंतींच्या आड हजारो हातांना काम देणारा कारखाना गंजतो आहे. कंपनीकडून थकित बाकी मिळेपर्यंत पडक्या घराघरातून माणसं कसाबसा दिवस रेटत आहेत.

एखाद्या प्रचंड कलेवराच्या भोवती आडोसा करत माणसं बाहेर भेळ, पाणीपुरी, वडे यांचा आस्वाद घेत आहेत.

माणसे शेवटी माणसेच आहेत. मग ते ब्लॉक संस्कृतीतील असोत, वाडा संस्कृतीतील असोत किंवा वातानुकूलित संकुल संस्कृतीतील असोत..

आता पाहण्यासारखे काही नव्हते. इंडियन डायस्टफ, अमरडाय केम हे कारखाने गंजताना पाहिले होते.


आता पाहवतही नव्हते.

मी डोळे मिटून घेतले. एसीच्या गारव्यात झोप लागेल असे वाटत होते.

पण मिटल्या डोळ्यासमोरही त्या उद्ध्वस्त स्वप्नगरीचा चलतचित्रपट उलगडत होता.

त्यानंतर कित्येक रात्री मी निद्रानाशात घालवल्या. बाईंचे आभार मानावे की त्यांच्यावर चिडावं हेच कळेना.

शेवटी फारसा श्रद्धाळू नसूनही मी कौपिनेश्वराला रोज जाऊ लागलो. तिथल्या ठराविक खांबाला टेकून, डोळे मिटून मी ध्यानस्थासारखा बसत होतो. धास्ती एकच होती, त्या बाई भेटतील की काय? त्यांच्याशी काय बोलू?



गोपाळ वामन टोकेकर

ही कहाणी आहे एका
खऱ्याखुऱ्या रेशीमनगरीची.
एक अवाढव्य कारखाना होता, त्याच्या टुमदार वस्तीची.
इथं सुखाची रेलचेल होती. दुःखाला प्रवेश नव्हता.
आखीव रेखीव दिनक्रम होते.
लोभसवाणे शेजार होते.
बहरलेले संसार होते.
किलबिलणारी शाळा होती. शाळेमधले संस्कार होते...
ते एक नंदनवनच होतं.
अचानक या सुखाच्या वस्तीला अखेरची घरघर लागली,
आणि आचके देत ती संपलीच.
कारखाना बंद पडला. वस्तीची जमीन, तिथल्या इमारतींसकट
बिल्डरच्या घशात गेली.
आता तिथं उरलेत ते केवळ अवशेष...

या रेशीमनगरीच्या उदयास्ताची ही भावस्पर्शी कहाणी.

नवता